

म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
न. - ८०९
RLI BK-0007786

# वेचलेले मणी

[कै. नानासाहेब केदार यांचा जीवनवृत्तांत]

लेखिका :

रमाबाई केदार

REFBK-0007786

१४ मार्च १९५२

प्रकाशक
व्ही. टी. केदार,
काटोल रोड, नागपूर

मूल्य ३॥ रुपये

मुद्रक
पां. ना. बनहट्टी,
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर

৭৬৭৩৮
২৫।৩।৫৭



ज्यांच्या सहवासाने माझें जीवन सुखी व पवित्र झालें त्यांच्याच जीवनांतील वेचलेल्या कांहीं मण्यांची ही माला मी अतीव आदराने व भक्तिभावाने आज त्यांच्या प्रथम श्राद्धदिनीं त्यांनाच अर्पण करीत आहें.

—रमा

# प्र स्ता व ना

"वेचलेले मणी" या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याचें काम श्रीमती माई (श्री. रमाबाई केदार) यांनी मजवर सोपविलें तें केवळ त्यांच्या माझ्या स्नेहामुळेच असावें असें समजून मी मोठ्या आनंदाने प्रस्तावना लिहिण्याचें कबूल केलें. श्री. माईना कोणतीच शैक्षणिक पदवी नाही, तेव्हा आपल्यासारख्या बाईच्या हातून पुस्तक कसें काय लिहिलें जाईल असें वाटणें साहजिकच होतें. परंतु आपल्या पतीच्या बहुविध कार्याबद्दल त्यांना अतिशय कौतुक व जिव्हाळा असल्याने त्यांनी हें पुस्तक सहज सुलभतेने, व कोणत्याहि सुशिक्षित स्त्रीच्या योग्यतेचें लिहिलें आहे, हें नमूद करण्यास मला फार आनंद वाटतो. पुस्तक वाचतांना लक्षांत येतें की किती जुन्या वातावरणांतील माई मनाने, विचाराने व कृतीने काळाप्रमाणे बदलत गेल्या व कर्तबगार पतीच्या कर्तबगार पत्नी बनल्या. कै. केदारसाहेबांचा राजकीय इतिहास वाचला म्हणजे तर स्वतःला अशिक्षित म्हणविणारी ही स्त्री किती उत्तम रीतीने राजकारणासारखा कठिण विषय हाताळूं शकली याचें नवल वाटतें. त्यांच्याशीं बोलतांना त्या सहज म्हणाल्या, 'कै. नानासाहेबांच्या फोटोपाशीं बसलें की त्यांना स्फूर्ति होई व लेखणींतून झरझर मजकूर उतरे.' त्यांचें कै. नानासाहेबांवर अढळ प्रेम आहे, त्यांच्या प्रभावानेच त्या हें पुस्तक लिहूं शकल्या.

त्यांनी हस्तलिखित वाचण्यास दिलें तें मोठ्या कुतूहलाने मी वाचण्यास प्रारंभ केला. दिलेलीं सर्व प्रकरणें संपेपर्यंत मी तीं खालीं ठेविलीं नाहीत. यावरूनच तें किती मनोवेधक लिहिलें गेलें आहे हें

लक्षांत येईल. भावी पिढीला आदर्श म्हणून हा ग्रंथ आपल्या मुलाबाळांच्यापुढे ठेवण्यास अगदी योग्य असा आहे. "प्रयत्न केल्यास व चिकाटी धरल्यास या जगांत मनुष्यास अशक्य व असाध्य काय आहे ?" असा कै. नानासाहेबांचा विश्वास असे. परिस्थितीने गरीब अशा तरुण मुलामुलींनी हें चरित्र वाचल्यास कै. नानासाहेबांनी आपल्या विश्वासाप्रमाणे करून दाखविलें याचें सत्य पटेल.

लेखिकेचें या लिखाणाबद्दल कौतुक वाटतें.

नागपूर, ८-२-५२ रमाबाई तांबे

# पु र स्का र

श्रीमती रमाबाई केदार ह्या प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने आज प्रथमच मराठी वाचकांच्या समोर येत आहेत. यापूर्वी कोणत्याहि प्रकारचे लेखन त्यांनी केलेले नाही. त्यामुळे लेखक या नात्याने कोणत्याहि वर्तमानपत्रांतून किंवा मासिकांतून त्यांचे नाव कधी झळकले नाही. वर्धा आणि नागपूर येथील स्त्रियांच्या काही सार्वजनिक संस्थांच्या बाहेर त्यांचे नाव फारसे कुणाला ठाऊक असेल असे मला वाटत नाही. पण यामुळे त्यांचा परिचय मराठी वाचकांना करून देतांना मला अडचण पडत आहे असेहि नाही. कारण त्यांच्या जीवनाला एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे आणि तेच आपल्या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे. सुप्रसिद्ध कायदेपंडित आणि नागपूर विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु म्हणून प्रसिद्ध असलेले कै. तुकाराम जयराम केदार यांच्या त्या पत्नी होत. प्रस्तुत पुस्तकातहि याच एका नात्याने त्यांचे कर्तृत्व व व्यक्तित्व वाचकांच्या समोर यावयाचे आहे. त्यामुळे हाच त्यांचा परिचय आपणाला पुरेसा होईल असे वाटते.

'वेचलेल्या मण्यां'च्या रूपाने कै. नानासाहेब केदार यांचे जीवनचरित्र मराठी वाचकासमोर त्यांनी ठेवलेले आहे. त्यात दोन हेतु आढळतात. प्रस्तुत चरित्रलेखनाच्या निमित्त आपल्या व्यथित अंतःकरणाला विरंगुळा मिळावा हा त्यातील प्रमुख हेतु होय. आपल्या कुटुंबातील मुलाबाळासमोर त्यांच्या कर्तृत्ववान पित्याचा व आजोबाचा आदर्श ठेवणे हा दुसरा हेतु होय. हे दोन्ही हेतु वैयक्तिक आहेत हे खरे. पण त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचाहि फायदाच

झालेला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. कारण कै. केदारांच्या कर्तृत्वाचे अधिष्ठान केवळ कौटुंबिक नव्हते, ते सार्वजनिकहि होते. आपल्या कुटुंबापुरतेच जीवन जगून इहलोकीची यात्रा संपवणारे लोक बहुतेक सर्वच असतात. कालाच्या इतिहासात त्यांच्या नावाची नोंद करून ठेवण्याची कुणालाच फारशी आवश्यकता वाटत नाही. नानासाहेब केदार हे त्या वर्गातील नाहीत. त्यांनी आदर्श कौटुंबिक जीवन व्यतीत केले हे तर खरेच; पण केवळ त्यातच ते गुरफटून राहिले नाहीत. म्युनिसिपालटीपासून तो प्रांतिक कायदेमंडळापर्यंतचे क्षेत्र त्यांनी आपल्या शक्तीनुसार गाजविले; स्थानिक जिल्हा कोर्टा-पासून तो आपल्याच प्रांतातील नव्हे तर परप्रांतातील हायकोर्टे, इतकेच नव्हे तर दिल्ली येथील फेडरल कोर्टहि आपल्या कायदे-पांडित्याने त्यांनी दणाणून सोडले; शिक्षणक्षेत्रातील कुलगुरुत्वाचा सर्वोच्च अधिकार संपादन करून आपल्या स्वतंत्र व बाणेदार वृत्तीने त्याची प्रतिष्ठा त्यांनी जगभर वाढविली. त्यांच्या या कार्याचा अभिमान त्यांच्या कुटुंबाप्रमाणेच कुटुंबाबाहेरील असंख्य जनतेला वाटावा यातच त्यांच्या कर्तृत्वाची थोरवी आहे. त्यांनी अंगीकार-लेल्या निरनिराळया कार्यांतून त्यांची राष्ट्रसेवेची तळमळ अनुस्यूत होती ही त्याहून महत्त्वाची गोष्ट होय. याचे एकच ठळक उदाहरण पुरेसे आहे. 'वंदे मातरम्' या पवित्र मंत्राचा जयघोष केल्याबद्दल अन्याय्य रीतीने शिक्षणापासून वंचित झालेल्या उस्मानिया विद्यापीठा-तील अनेक विद्यार्थ्यांचे त्यांनी ज्या भावनेने स्वागत केले तिच्यातून राष्ट्राभिमान नुसता ओसंडून वाहत होता. नियमांची बंधने तोडूनच नव्हे तर राष्ट्रीय वृत्तीला पोषक असे नवीन संकेत निर्माण करून त्यांनी नागपूर विद्यापीठाचे दरवाजे त्या विद्यार्थ्यांसाठी उघडून दिले. या कार्याचे विस्मरण होणे कसे शक्य आहे ?—होय; पण विस्मरण होणारच नाही असे तरी कसे म्हणावे ? कारण ज्या 'वंदे मातरम्'

९४९३८ २३१५३

-साठी देशांतील अनेक तरुणांनी आणि तरुणींनी सत्तामदांध ब्रिटि-शांच्या लाठ्यांचे तडाखे सोसले व बंदुकातील गोळ्यांचा मार सहन केला त्या 'वंदे मातरम्' गीताची आजच्या निधर्मी स्वतंत्र सरकार-कडून चाललेली विटंबना पाहून 'कोणा ठाउक काय काय दडले पोटी भविष्याचिया'— असा विचार मनात येणे साहजिक आहे. तथापि अशा काळात कै. नानासाहेब केदारांच्या उपरोक्त कार्याचे स्मरण होताच किंवा त्याचे वर्णन वाचायला सांपडताच भावी काळातील विद्यार्थ्यांचे अंतःकरण भरून येईल यात शंका नाही. सारांश, कै. नानासाहेब केदारांच्या कर्तृत्वाचे कार्यक्षेत्र मर्यादित नसल्यामुळे त्यांच्या जीवनचरित्राची ओळख करून घेऊ इच्छिणारा वर्ग बराच मोठा आहे यात शंका नाही. त्या दृष्टीने पाहिले तर त्यांच्या सर्वच कार्यांचे सविस्तर समालोचन करणारे त्यांचे विस्तृत चरित्र प्रसिद्ध व्हावयाला पाहिजे. पण कधीकाळी ती अपेक्षा पूर्ण होईपर्यंत या 'वेचलेल्या मण्यां'चा इतरांनाहि फार चांगला उपयोग होईल.

प्रस्तुत 'जीवनचरित्रा'चा एक महत्त्वाचा विशेष असा की ते चरित्रनायकाच्या पत्नीने स्वतः लिहिलेले आहे. पण म्हणूनच त्याकडे अगदी काटेकोर दृष्टीने पाहू नये अशी वाचकांना सूचना करणे अवश्य वाटते. कोणतीहि व्यक्ति आपल्या माणसाविषयी जेव्हा लिहिते तेव्हा तिच्या लेखनात आपुलकीमुळे थोडीफार अत्युक्ति होणे स्वाभाविक असते. त्यातूनहि हिंदु कुटुंबातील पत्नी, कर्तृत्वाने आपल्यापेक्षा अत्यंत थोर असलेल्या आपल्या पतीच्या जीवनाकडे जेव्हा पाहते तेव्हा 'दोषांतेंहि गुण करणाऱ्या' प्रेमाचा प्रत्यय येणे साहजिक आहे. प्रस्तुत वेचलेल्या मण्यांना श्री. माईनी 'जीवन-चरित्र' जरी म्हटलेले असले तरी ते 'स्मृतिचित्रा'च्या स्वरूपाचे आहे. आणि त्यामुळेच 'वेचलेले मणी' हे समर्पक नाव त्यांनी या पुस्तकाला

दिलेले आहे. चरित्रनायक आणि चरित्रलेखिका यांचे पतिपत्नीचे नाते लक्षांत घेतले म्हणजे या पुस्तकाचे स्वरूप थोडयाफार प्रमाणात आत्मचरित्रासारखे आहे असेहि वाटेल. ते थोडेफार सत्य असले तरी पूर्णांशाने मात्र नाही. 'आत्मचरित्रा'मध्ये चरित्रलेखक हाच चरित्राचा नायक असतो. त्यातील सर्व प्रसंग प्रामुख्याने लेखकाच्या व्यक्तित्वाभोवती गुंफलेले असतात. तसे प्रस्तुत पुस्तकाचे नाही. लेखिकेचे लक्ष आपल्या स्वतःवर केंद्रित झालेले नाही तर ते आपल्या पतीवर म्हणजेच नानासाहेब केदार यांच्यावर केंद्रित झालेले आहे. त्यामुळे निव्वळ आत्मचरित्राच्या दृष्टीनेहि त्याकडे पाहू नये. चरित्र आणि आत्मचरित्र यांचे हे एक गोड मिश्रण आहे. त्यातून चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचे जसे दर्शन होते तसेच लेखिकेच्या व्यक्तित्वाचेहि होते.

कै. नानासाहेबांच्या व्यक्तित्वाची जी विविध अंगे होती त्यांचे स्थूल दिग्दर्शन श्री. माईंनी अतिशय ठसठशीतपणाने केलेले आहे. नानासाहेबांचे राजकारण, शैक्षणिक कार्य, कायदेपांडित्य इत्यादिकांची माहिती तर अनेकांना आहे. पण ती सांगतांना तिच्यांत नानासाहेबांच्या स्वभावांचे रंग माईंनी हळुवारपणाने भरले आहेत. त्यामुळे एकंदर वर्णनाला चांगलाच उठाव मिळालेला दिसून येतो. नानासाहेबांची ईश्वरावरील निष्ठा, विशेषतः त्यांची शिवभक्ति, साधुपुरुषाविषयी त्यांच्या मनात असलेला आदर, कुटुंबातील व्यक्तींच्या सुखदुःखाविषयी हवेतून मिळालेल्या संदेशावरील त्यांचा विश्वास, शकुनावरील श्रद्धा ह्या काही गोष्टी अशा आहेत की त्या वाचताच नानासाहेबांच्या स्वभावाची एक निराळीच बाजू आपणाला पहावयास सापडल्याचा आनंद खुद्द त्यांच्या मित्रमंडळीला देखील वाटेल. काही बाबतीतली त्यांची प्रागतिक विचारसरणी लक्षात घेतली म्हणजे नानासाहेब म्हणजे जुन्यानव्यांचे सुंदर संमेलन

होय याचा ठसा वाचकाच्या मनावर चांगला उमटतो. राजकारणात नानासाहेब केदारांना लोकमान्य टिळकाविषयी असलेला असीम आदर व महात्मा गांधींच्या स्वराज्यसंपादनाच्या साधनावरील त्यांची तुच्छताबुद्धि या दोहोंचेही चित्र माईंनी चांगले काढले आहे. नानासाहेबांचे जीवनचरित्र लिहिण्याच्या निमित्ताने मध्यप्रदेशातील राजकारणात प्रसिद्ध असलेल्या रा. ब. नायडू, डॉ. मुंजे, मोरुभाऊ अभ्यंकर, डॉ. राघवेंद्रराव इत्यादि व्यक्ति व अनेकार्थांनी हिंदुस्थानभर गाजलेल्या डॉ. खरे, महात्मा गांधी, सुभाष बोस, बॅ. सावरकर, सरोजिनी नायडू इत्यादि व्यक्ति यांचे उल्लेख माईंना करावे लागले आहेत. पण ते करतांना आवश्यक तो संयम पाळूनहि त्यांनी आपले निर्भीड मतप्रदर्शन केले आहे हे मला विशेष कौतुकाई वाटले. या सर्व वर्णनांना घरगुती वातावरणाची पार्श्वभूमि असल्यामुळे तर ते सगळ्यांनाच हृद्य वाटतील. सरोजिनी नायडूंना माईंनी खाऊ घातलेल्या 'कोपत्या'पेक्षाहि त्याचे वर्णन अधिक सरस आहे असे मला वाटते.

प्रस्तुत ग्रंथातील लेखनशैलीहि सर्वसाधारण वाचकांचे चित्त वेधून घेईल अशीच आहे. माईंनी सांगितलेली कांकेरची कथा, महिषेकरशास्त्री आणि मैनाबाईची खाणावळ यांच्या संबंधीच्या आठवणी, 'आता तू खरी देशसेविका दिसतेस' हा प्रसंग, नानासाहेबांना मिळालेल्या हैद्राबाद सरकारच्या पाहुणचाराची गंमत इत्यादि वर्णने वाचली म्हणजे माईंच्या खेळकर व सुबोध लेखनशैलीची कल्पना येईल. आपल्या स्वतःच्या विवाहाचा प्रसंग तर त्यांनी कादंबरीतील चित्तवेधकतेने वर्णन केलेला आहे. हे सर्व पाहिले म्हणजे लेखनाच्या या पहिल्याच प्रयत्नात त्यांना मिळालेल्या यशाबद्दल सादर कौतुक वाटू लागते. लेखनशैली जशी अभ्यासातून निर्माण होते तशीच ती लेखकाच्या अंतरंगातूनहि आविष्कृत होते.

-माईंना लेखनाचा अभ्यास नाही हे खरे; पण नानासाहेबासारख्या विद्वान व रसिक पतीच्या सहवासाने त्यांचे अंतरंग तयार झालेले आहे. तशात वर्ण्य विषयाची मनापासून गोडी. तेव्हा या सर्वांचा परिपाक सुंदर उतरला यात आश्चर्य नाही.

प्रस्तुत चरित्रलेखनात नानासाहेबांच्या संशोधनाचा व वाङ्मय-प्रेमाचाहि त्यांनी ओझरता परिचय करून दिलेला आहे. काही ठिकाणी त्यांच्या भाषणातील उतारे त्यांनी उद्धृत केले आहेत. क्वचित ते लांब वाटले तरी नानासाहेबांच्या मतांची कल्पना देण्यास लेखिकेच्या मते ते आवश्यक असण्याची संभवनीयता नाकारून चालणार नाही. काहीहि असले तरी नानासाहेबांच्या कर्तृत्वाची ओळख करून देतांना 'प्राप्तं वादिगणे यशो मतिमता चंद्रोज्ज्वलं श्रीमता'—हा महामहोपाध्याय ताह्मणांचा श्लोक उद्धृत करण्यात माईंनी अभिजात रसिकता व्यक्त केलेली आहे यात शंका नाही. महात्माजींच्या राजकारणाचे विडंबन करणारे 'नित्यं चरखा तकली शिक्षा। सत्यमहिंसा विहिता दीक्षा'—हे नानासाहेबांचे पद्य देण्यात, महात्माजींच्या आधुनिक अनुयायांच्या दृष्टीने अप्रासंगिकपणा असला तरी स्वभावदिग्दर्शनाच्या दृष्टीने त्यात औचित्य मुळीच नाही असे कुणालाहि म्हणता यायचे नाही.

सारांश, आपल्या व्यथित मनाच्या विरंगुळयासाठी आपल्या व आपल्या पतीच्या जीवनातील मणी वेचतांना श्री. रमाबाई केदारांनी चांगल्या प्रतीचे लेखनकर्तृत्व प्रगट केले आहे, यात शंका नाही. हा चरित्र आणि आत्मचरित्रवजा ग्रंथ त्यांच्या कुटुंबिया-प्रमाणेच इतरांनाहि वाचनीय वाटेल. कै. नानासाहेब केदारांचे चरित्र आणखी कुणी लिहायला घेतले तर त्याला या पुस्तकावरून चांगली साधनसामुग्री मिळेल, असे वाटते. श्री. रमाबाईंनी लिहि-

लेल्या आपल्या पतीच्या जीवनचरित्रातील या आठवणी वाचून महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाजसेविका श्री. रमाबाई रानडे यांनी आपल्या पतीच्या लिहून ठेवलेल्या आठवणींची कुणालाहि स्मृति होणे साहजिक आहे. या दोन ग्रंथांची तुलना मी करीत नाही. वाचकांना नुसते स्मरण करून देतो आणि पुरस्काराचे हे दोन शब्द आटोपते घेतो.

वि. भि. कोलते

# हृद्गत

ह्या पुस्तकाच्या प्रथमारंभीं मी माझी भूमिका स्पष्ट केलीच आहे. आता मी अधिक कांही लिहावें असें मला वाटत नाही. गेलें सबंध वर्षभर मी 'ह्या एकाच ध्यासां'त होतें. आमच्या चार दशकांतील सहजीवनाच्या आठवणी कशा काय माझ्याकडून लिहिल्या जातील याबद्दल मी साशंक होतें. पण ह्यांच्या अनुग्रहाने मला जशी स्फूर्ति मिळत गेली तसें एकेक घटनेचें वर्णन मी कागदावर टिपून काढलें. परंतु पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याइतपत तें माझ्याकडून लिहिलें जाईल की नाही याची मला स्वतःलाच खात्री वाटेना. ह्यांचा सदैव असा उपदेश असे की, कोणत्याहि कार्यांत मनुष्याने हताश होऊं नये व आत्मविश्वास सोडूं नये. ह्यांच्या या शिकवणुकीचा गोड परिपाक म्हणजेच माझा हा प्रथम उपक्रम होय. तो बरा की वाईट हें वाचकांनीच ठरवावें.

या लेखनकार्यांत मला अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्या दूर करण्याच्या कामीं ज्या मंडळींनी मोठ्या सहृदयतेने मला मदत केली त्यांना मी कितीहि धन्यवाद दिले तरी ते अपुरेच ठरणार आहेत. माझ्या विदुषी भगिनी सौ. रमाबाई तांबे ह्यांनी माझें हस्तलिखित मोठ्या प्रेमाने वाचलें व माझ्या विनंतीला मान देऊन वेळांत वेळ काढून ह्या पुस्तकाला थोडक्यांत परंतु उद्बोधक व चटकदार प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहें.

त्याचप्रमाणे येथील विद्वान साहित्यिक व महानुभाव वाङ्मयाचे चिकित्सक संशोधक डॉ. कोलते (भाऊ) ह्यांनी या पुस्तकाला मोठ्या आपुलकीने आपला पुरस्कार जोडला, इतकेंच नव्हे,

तर माझें हस्तलिखित वाचून तें पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यास मला उत्तेजन दिलें. त्यांच्यामागे बहुविध कार्यांचा पसारा असूनहि या कामीं त्यांनी मोठीच आस्था दाखविली. पुस्तकांत कोठे त्रुटि राहूं नये म्हणून अखेरचीं प्रुफें तपासण्याचें किचकट कामहि त्यांनी व त्यांच्या सुशिक्षित पत्नी सौ. उषाताई यांनी मोठ्या आत्मीयतेने स्वतःकडे घेऊन माझें पुस्तक निर्दोष बाहेर पाडण्यांत मला बहुमोलाची मदत केली. याबद्दल या दोघांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नाही हें मी जाणतें. तरी त्यांचे आभार मानल्यावांचून मला राहवत नाही. आपल्या पुरस्कारांत श्री. भाऊंनी माझ्यासंबंधीं जे कांहीं उद्गार काढले आहेत ते मला खरोखरच मार्गदर्शक ठरतील.

डॉ. खरे यांचे प्रथितयश चरित्रकार व येथील 'महाराष्ट्र' दैनिकाचे उपसंपादक श्री. जगन्नाथराव जोशी यांचेंहि या कामीं मला सतत चार महिने अमोल सहाय्य झालें हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो. तसेंच येथील एक नवोदित लेखक श्री. व्ही. बी. रत्नपारखी यांचीहि माझ्या हस्तलिखिताची प्रेस कॉपी करण्यांत जी मदत झाली त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

वर्धेचे प्रसिद्ध वकील श्री. कृष्णराव बागल व आमचे ऋणानुबंधी डॉ. दिवाकरराव मुकद्दम यांनी मोठ्या आपुलकीने ह्यांच्या संबंधी जी माहिती पुरवली तिने या पुस्तकाच्या सौंदर्यांत अधिकच भर पडली. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतें. येथील नारायण मुद्रणालयाचे संचालक श्री. पां. ना. बनहट्टी, यांनी माझें हें पुस्तक अल्पावकाशांत सुबक रीतीने छापून दिल्याबद्दल त्यांचीहि मी ऋणी आहें.

शेवटीं हें पुस्तक लिहून काढण्यास माझीं मुलें व सुना ह्यांनी जें अंतःकरणपूर्वक सहकार्य दिलें, त्याबद्दल मी त्यांचेंहि कौतुकच करीन.

ता. ११ मार्च १९५२ **रमाबाई केदार**

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| प्रस्तावना : सौ. रमाबाई तांबे ... ... | (५) |
| पुरस्कार : डॉ. वि. भि. कोलते ... ... | (७) |
| हृद्गत : ... ... ... | (१४) |
| मणी १ ला : बाळपण व शिक्षण ... ... | १ |
| मणी २ रा : माझें माहेर ... ... | २५ |
| मणी ३ रा : लग्नानंतर ... ... | ३४ |
| मणी ४ था : प्रबळ आशावाद ... ... | ५१ |
| मणी ५ वा : वृत्तिदर्शन ... ... | ५८ |
| मणी ६ वा : वर्धा नगरपालिकेंतील कामगिरी ... | ७२ |
| मणी ७ वा : प्रांतिक राजकारणांत पदार्पण ... | ८४ |
| मणी ८ वा : नागपूरला कायम वास्तव्य ... | ९३ |
| मणी ९ वा : गूढ घटनांच्या पूर्वसूचना ... | १०४ |
| मणी १० वा : ग्रंथ-व्यास ... ... | ११७ |
| मणी ११ वा : अभ्यंकरांची निवडणूक ... ... | १२४ |
| मणी १२ वा : कॉंग्रेसमध्ये प्रवेश ... ... | १३३ |
| मणी १३ वा : नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु ... | १४१ |
| मणी १४ वा : कुलगुरुपदावर ... ... | १५५ |
| मणी १५ वा : कुलगुरुपदाची दुसरी राजवट ... | १६७ |
| मणी १६ वा : कुलगुरुपदाच्या कालखंडांत ... | १८१ |
| मणी १७ वा : कांही आठवणी ... ... | १९३ |
| मणी १८ वा : अखेरचीं तीन वर्षे ... ... | २०५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
१८२३
२३।४३

# वेचलेले मणी

मणी पहिला

## बाळपण व शिक्षण

दीपाः स्थितं वस्तु विभावयन्ति ।
कुलप्रदीपास्तु भवन्ति केचित् ॥
चिरव्यतीतानपि पूर्वजान्ये ।
प्रकाशयन्ति स्वगुणप्रकर्षात् ॥

—सुभाषित

### माझी भूमिका

मी ह्यांच्या (नानासाहेब केदार) जीवनचरित्रलेखनास कां बरें सुरुवात करीत आहें? ह्यांच्या जीवनचरित्राचीं अनेकविध अंगें होतीं. मी कांही मोठीशी शिकलेसवरलेली नाही. तेव्हा ह्यांच्या जीवनाच्या विविध अंगांची यथातथ्य ओळख करून देणें किंवा त्यांतल्या त्यांत ह्यांचें राजकारण व वाङ्मयीन कर्तृत्व यांचा नुसता परिचय करून देणेंहि माझ्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे, याची मला जाणीव असूनहि मी अशा या बिकट कार्याची जबाबदारी कां घेत आहें?

याचें उत्तर एवढेंच की, भरून चाळीस वर्षांच्या ह्यांच्या सतत सह-वासांत मला लाभलेलें अनेक प्रकारचें ज्ञान व अनुभव यांचा निदान आमच्या भावी पिढ्यांना थोडा कां होईना, पण उपयोग व्हावा, या उद्देशानें या लेखनकार्याला मी प्रवृत्त झालें. माझ्या शिक्षित बंधु-भगिनींना कदाचित् माझ्या ह्या लिखाणाचा उपयोग होईल वा होणारहि नाही. पण आमच्या मुलाबाळांना ह्या छोट्या चरित्रापासून जरूर मार्गदर्शन होऊं शकेल अशी माझी मनोभावना आहे. याशिवाय आणखी एक उद्देश आहे. तो म्हणजे माझ्यापुरतेंच बोलायचें झाल्यास स्वार्थी आहे, असेंच मला वाटतें. आजवरच्या ह्यांच्या सहवासांत प्रत्यहीं मला लाभलेल्या सुखाच्या क्षणांची नुसती आठवण झाली की, माझ्या मनांत विचारांचें नुसतें काहूर उठतें. वाटूं लागतें की, माझे हे सुखाचे क्षण जर मी एका सूत्रांत गोवले, तर ती स्मरणी माझ्या सध्याच्या व्यथित मनाला अल्पसा कां होईना, पण निश्चित विरंगुळा देईल !

## मातापितरें

महात्माजींच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या व अखिल जगांत प्रसिद्धी पावलेल्या वर्धा नगरींत ता. १९ जुलै १८८६ सालीं एका लहानशा घरांत ह्यांचा जन्म झाला. वडील जयरामपंत केदार या वेळीं येथेंच एका छोट्याशा दुकानदारीवर कसाबसा आपला उदरनिर्वाह करीत होते. त्यांचा स्वभाव सरळ व पापभीरु होता. व्यवहारांतील डावपेच त्यांना अवगतच नव्हते म्हटलें तरी चालेल. त्यांच्या पत्नी तान्याबाई ह्या मोठ्या व्यवहारदक्ष, निर्भीड व करारी स्वभावाच्या होत्या. त्यांना प्रथम लागोपाठ तीन मुली झाल्या. आपल्या नशिबांत पुत्रसुख नाही, अशी त्यांची समजूत होऊन बसली. यामुळे त्या नेहमी खिन्न असत. याच सुमारास एक अकल्पित घटना घडून आली. या

घटनेची माहिती तान्याबाईकडून घरांतील इतर मंडळींना मोठ्या कुतूहलानें मिळे.

### साधु पुरुषाचा आशीर्वाद

एके दिवशीं आपल्या यजमानांच्या दुकानाजवळ धुनी लावून बसलेला एक साधु पुरुष त्यांनी पाहिला. त्या त्याला रोज नियमाने दूध नेऊन देत. एके दिवशीं त्या साधूने 'माई, तूं इतनी उदास क्यों दिखती है' असा प्रश्न त्यांना केला. 'कुछ तो नहीं बाबा' असें त्या साधूला लागलीच उत्तर मिळालें. 'तेरेको कुछ तो भी दुख जरूर है' असें तो साधु पुन्हा म्हणाला. आता मात्र हा कोणी साधासुधा मनुष्य नसून अंतरींचें दुःख जाणणारा महापुरुष आहे, असें वाटून तान्याबाईंनी आपल्या मनांतला भाव त्या महापुरुषाजवळ व्यक्त केला. तेव्हा त्या महापुरुषाने धुनींतील अंगाऱ्याची एक चिमूट तान्याबाईंच्या हातावर ठेवली व 'माई, यह प्रसाद खा जा. तेरेको भाग्यवान पुत्र होगा.' असा आशीर्वाद दिला.

### जिवावरचें संकट निभावलें

पुढे थोड्याच दिवसांत तो साधु कोठल्या तरी यात्रेला निघून गेला. मात्र जाण्यापूर्वी त्याने तान्याबाईंना सांगून ठेवलें होतें की, 'मी एक वर्षाने पुन्हा येथे परत येईन त्या वेळीं तुझ्या घरीं मुलाचा पाळणा हलत राहील.' पुढे त्या साधूच्या आशीर्वादाप्रमाणे एक वर्षाच्या आंतच तान्याबाईंना पुत्रप्राप्ति झाली. साधूच्या आशीर्वादाने झालेल्या मुलाचें नांव 'तुकाराम' असें ठेवण्यांत आलें. नवसाचा मुलगा म्हणून तीन वर्षेपर्यंत जावळ काढले नव्हते. एके दिवशीं खेळतां खेळतां खोलींतील खांबाला अडकवलेली चिमणी या ल्हानग्याचा धक्का लागल्यामुळे खाली पडून तिच्यांतील तेल त्याच्या

डोक्यावर पडलें. जावळांनी एकदम पेट घेतला व त्यामुळे पाठ व छाती भाजून निघाली. एवढेंच नव्हे तर डावा कानहि भाजला गेला व त्या कानाला कायमचें वैगुण्य आलें. या अपघातामुळे तीन दिवस बालकाला शुद्ध नव्हती. हा अपघात जिवावरचाच ठरतो की काय याची आईबापांना मोठीच चिंता पडली. सुदैवानें चारआठ दिवसांतच हें जिवावरचें संकट निवारण होऊन मुलगा थोड्याच दिवसांत पूर्ववत् बरा झाला. ही त्या साधुपुरुषाचीच कृपा, असें आईबापांना वाटलें. इतक्या भयंकर संकटांतून हा मुलगा बचावला तेव्हा पुढील आयुष्यांत त्याच्याकडून कांहीतरी थोर कामगिरी घडेल व तो आपल्या गरीब आईबापांचे पांग फेडील, असेंच ओळखीच्या लोकांनी भाकित केलें.

## शिक्षणास प्रारंभ

जयरामपंतांनी आपल्या छोट्या 'नानाला' वयाच्या ६ व्या वर्षी वर्धा येथील प्राथमिक शाळेंत घातलें. त्या वेळीं ह्यांची अभ्यासांतील गति पाहून, ह्यांच्या भावीकालीन कर्तबगारीची चुणूक बाळपणींच इतरांच्या प्रत्ययाला आली. नवव्या वर्षीच मराठी चौथी पास झाल्यावर, इंग्रजी शाळेंत नांव घालण्यांत आलें. इंग्रजी चौथीची परीक्षा उत्तम रीतीने उत्तीर्ण होऊन पुढे हायस्कूलमध्ये ह्यांचा प्रवेश झाला. इंग्रजी चौथींत उत्कृष्ट यश मिळाल्यामुळे दरमहा ६ रु. ची शिष्यवृत्तीहि मिळाली.

## माझा नाना 'साहेब' होणार !

इंग्रजी पहिल्या वर्गांत असतांना जेव्हा हे इंग्रजी शब्द पाठ करीत तेव्हा ह्यांच्या वडिलांना मोठेंच कौतुक वाटायचें ! मुलाला साहेबाची भाषा बोलतांना पाहून जयरामपंतांना मोठी मौज वाटायची,

आणि अभिमान पण वाटायचा! जो कोणी घरीं येई त्याला, 'पहा, माझा नाना कसा फाड् फाड् इंग्रजी वाचतो' असें तें सांगत. 'लौकरच माझा नाना छोटा साहेब (मुन्सफ) होणार' अशी महत्त्वाकांक्षा जयरामपंत आपल्या मनाशीं बाळगूं लागले. त्यांची ही महत्त्वाकांक्षा त्या काळीं अगदीच विलक्षण होती असें म्हणतां येणार नाही. तो काळच असा होता की, मोडकें तोडकें इंग्रजी जाणणाऱ्यास समाजांत व सरकार दरबारीं त्या काळीं प्रतिष्ठा व मानाचें स्थान सहज प्राप्त होई. तेव्हा जयरामपंतांची आपल्या मुलाबद्दलची महत्त्वाकांक्षा अगदीच अनाठायीं होती असें कसें म्हणतां येईल? ह्यांची बालपणांतली शिक्षण-प्रगति, बुद्धीची तीव्रता आणि ह्यांना मिळालेली शिष्यवृत्ति या गोष्टी जयरामपंतांच्या महत्त्वाकांक्षेला पोषकच होत्या.

## अरे, प्रहार म्हणजे सब्बल!

हे शाळेंत जात असतांची एक मजेदार घटना! एके दिवशीं शाळेंत तोंडी परीक्षा चालू होती. आपला नाना कशीं उत्तरें देतो या कुतूहलाने ह्यांचे वडील त्या दिवशीं मुद्दाम शाळेंत गेले. दाराच्या आड उभे राहून ते आपल्या लाडक्या मुलाचें कौतुक पाहूं लागले. परीक्षकाने मुलांना 'प्रहार' या शब्दाचा अर्थ विचारला. बरींच मुलें उत्तर देण्यांत गोंधळलीं. कोणीच उत्तर देत नाही हें पाहून दरवाज्याच्या आड उभ्या असलेल्या ह्यांच्या वडिलांनी आपल्या मुलाकडे दृष्टिक्षेप करून हळूच 'प्रहार'चा अर्थ 'सब्बल' म्हणून हातवाऱ्यांनी खुणविलें. पण वडिलांच्या हातवाऱ्यांचा कांहीच बोध ह्यांना झाला नाही. त्यांच्या खुणांकडे ह्यांनी दुर्लक्ष करून प्रहारचा खराच अर्थ सांगितला. परीक्षकाचें समाधान झालें पण ह्यांच्या वडिलांचें मात्र झालें नाही. शाळा सुटल्यावर त्यांनी घाईघाईनेच आपल्या मुलास म्हटलें, 'अरे, नाना, प्रहार शब्दाचा साधासुधा अर्थ तुला कळूं

नये ! बरें, तूं चुकूं नयेस म्हणून मी सारखी खूण करून तुझ्याकडे पाहत होतों. पण तूं लक्ष देशील तेव्हाना !'

पुढे बापलेकांत थोडीशी चर्चा होऊन सर्व गोष्टीचा उलगडा झाला. वडिलांना आपल्या मुलाच्या हुषारीबद्दल मोठें कौतुक तर वाटलेंच पण अभिमानहि वाटला !

वडिलांसंबंधींच्या अशा बऱ्याच गोष्टी प्रसंगानुरोधाने हे सांगून म्हणायचे 'माझे वडील फारच साधेभोळे व सरळ मनाचे होते.'

## छोटे पुराणिकबुवा

सरळ मनाच्या आणि धार्मिक वृत्तीच्या प्रेमळ मातापित्यांच्या कृपाछत्राखाली वाढणाऱ्या मुलाच्या मनावरहि त्याच वृत्तीचा पगडा न बसला तरच आश्चर्य ! आईच्या सान्निध्यांत लहानपणींच कथा-कीर्तन व पुराण ऐकण्याची विलक्षण गोडी लागल्यामुळे वयाच्या १४ वर्षांपर्यंत १८ पुराणांपैकीं निदान १० पुराणें तरी ह्यांनी ऐकलीं असावीं. त्यांतल्या त्यांत पांडवप्रताप तर ह्यांना मुखोद्गत झाला होता, म्हटलें तरी चालेल. वर्धेच्या राममंदिरांत पुराण ऐकण्यास जाण्याला ह्यांच्या आईला वेळ मिळत नसे. तेव्हा त्यांचा छोटा नानाच पुराणिक बुवा बनला. राममंदिरांतील पुराणिक बुवांपेक्षा घरचे हे १२ वर्षांचे 'छोटे पुराणिकबुवाच' आईला अधिक आवडूं लागले. पांडवप्रतापांतील ओव्या हे पुराणिकबुवा नुसत्या वाचीतच नसत तर त्याबरोबरच सरळ व सुबोध भाषेंत त्यांचा अर्थहि सांगत. पुढे पुढे तर घराच्या चार भिंतींच्या आड असलेली ह्या छोटया पुराणिक-बुवाची कीर्ति बाहेर पसरूं लागली. त्यामुळे घरीं पुराणास श्रोत्यांची बरीच गर्दी जमूं लागली. इतकेंच नव्हे तर त्यामुळे राममंदिरांतील बडया पुराणिकबुवांचा श्रोतृगण रोडावूं लागला. एके दिवशीं ह्या छोटया पुराणिकबुवांची कीर्ति त्यांच्याहि कानांवर गेली. तेव्हा हा

छोटा पुराणिक कसें काय पुराण सांगतो याची त्यांना जिज्ञासा उत्पन्न झाली व ते पुराण ऐकण्यास एकदा ह्यांच्या घरीं आले. त्या दिवशीं कौरव-पांडव-युद्ध हा पुराणाचा विषय होता. छोटया पुराणिकानें त्या प्रसंगाचें वर्णन इतकें हुबेहुब व बहारदार केलें की, जणूं काय तो प्रसंग साक्षात् डोळयासमोरच घडत आहे. मंदिरांतील पुराणिक-बुवा पुराण ऐकून इतके खूष झाले की, त्यांनी लागलीच छोटया पुराणिकाला जवळ घेतलें व पाठीवरून हात फिरवीत म्हणाले, 'एवढया अल्पवयांत तुझी कुशाग्र बुद्धिमत्ता व वर्ण्यविषयाचें इतकें सर्वस्पर्शी ज्ञान पाहून मला मोठेंच आश्चर्य वाटतें. तू पुढे मोठा झालास म्हणजे आपल्या ह्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या आणि अमोघ वक्तृत्वाच्या सामर्थ्यावर लोकांवर चांगलीच छाप पाडशील!'

## ईश्वरावरील निष्ठा

देवादिकांबद्दल ह्यांच्या ठिकाणीं बालवयांत जी श्रद्धा निर्माण झाली ती अखेरपर्यंत कायम राहिली. लहान असतांना स्नान झाल्या-वर देवाची पूजाअर्चा करून व्यंकटेशस्तोत्र व शिवलीलामृताचा रुद्राध्याय म्हटल्यावांचून हे अन्नग्रहण करीत नसत. एकादशी, शिव-रात्रीचा उपवास कधीहि ह्यांनी टाकला नाही. इतकेंच काय पण बरोबरीच्या मित्रांनाहि तशा तऱ्हेनें आचरण करण्याचा ह्यांचा आग्रह असे. ईश्वरभक्ति, पूजाअर्चा व ध्यान केल्यानेच मनाला खरी शांति मिळते अशी ह्यांची धारणा होती. मनुष्याच्या ठिकाणीं आत्मबलहि त्यामुळे वाढतें असें ह्यांना मनःपूर्वक वाटत असे. असें असलें तरी धार्मिकतेच्या आवरणाखालील अवडंबर व ढोंग ह्यांना मुळीच खपत नसे. बुद्धिवादच हे श्रेष्ठ मानीत. व पुढील आयुष्यांत शिक्षणाच्या संस्कारामुळे हे गतानुगतिक बनले नाहीत; पण ह्यांच्या ठायीं डोळस निष्ठा निर्माण झाली.

## खेळापेक्षा वाचनाचीच गोडी

लहानपणीं मुलांना खेळण्याचा नाद साहजिकच अधिक असतो. पण हे मात्र या गोष्टीला अपवाद ठरले. विटीदांडू, भोंवरा, चेंडू, गोट्या या मुलांच्या लहानपणच्या खेळांपैकी एकही खेळ ह्यांना धड खेळतां येत नसे. सवंगडयांचा फारच आग्रह झाला तर तेवढयापुरतें खेळायला तयार व्हायचें; पण खेळच माहित नसल्यामुळे स्वतःवरच बाजू उलटून घ्यावयाची व सोबत्यांचा विजय बिनतक्रार कबूल करायचा! थोडी का फुरसद मिळाली की, शाळेच्या पुस्तकांव्यतिरिक्त इतर विषयांवरील पुस्तकें व वर्तमानपत्रांचें वाचन लायब्ररींत जाऊन करावयाचे. अर्थात् या एकलकोंडया वृत्तीमुळे बरोबरीच्या मित्रांनी ह्यांना 'माणुसघाण्या' हें विशेषण दिलें होतें.

## मोरु-नानाची कुस्ती

वर्धेला शिकत असतांना बॅरि. मोरूभाऊ अभ्यंकर व हे शाळा-सोबती होते. मोरुभाऊंचें घराणें सधन व सुखवस्तु होतें. ते शरीराने सदृढ व धिप्पाड बांध्याचे होते. त्यांच्या उलट ह्यांची शरीरयष्टि अगदीच काटकुळी होती. हे दोघेहि मित्र शाळेंत नेहमी क्षुल्लक कारणावरूनहि भांडत. ही केदार-अभ्यंकर जोडी जशी आपसांत भांडणें करी तशीच त्यांच्यांत चारआठ दिवसांत पुन्हा दाट मैत्रीहि पण होई. त्या दोघांत मैत्री असली म्हणजे 'त्यांचा शुक्लपक्ष चालू आहे' व कट्टी असली म्हणजे 'कृष्णपक्ष चालू आहे' असे उद्गार त्यांचे सोबती नेहमी काढीत. दोघेहि अशा कांही विचित्र स्वभावाचे कीं त्यांना हमरीतुमरीवर येण्यास कांही कारणच लागतच नसे. या हमरीतुमरींतच दोघे नंतर कुस्तीवर यायचे! या कुस्तींत मोरुभाऊंची जीत व ह्यांची हार हा निर्णय नेहमींच ठरलेला असायचा! ही गोष्ट ह्यांच्या मनाला चांगलीच बोचत असे. 'या मोरुला मी आखाड्यांत

लोळविल्याशिवाय राहणार नाही.' या ईर्षेने नंतर ह्यांनी व्यायाम करण्यास सुरुवात केली. व्यायामानंतर खुराक घेण्याची आवश्यकता होतीच! मोरुभाऊंचा खुराक बदामपिस्ते असला तरी आपल्या गरीबासाठीहि 'गरिबांचे बदाम' ईश्वराने निर्माण केले आहेत; त्याचा रोज आपण खुराक घेऊं' असें ह्यांनी ठरविलें. व रात्रीच्या वेळीं मूठभर हरबरे भिजत घालून दुसरे दिवशीं सकाळीं व्यायामानंतर ह्यांनी त्या हरबऱ्यांचा नियमित खुराक सुरू केला. ह्या खुराकाचा ह्यांच्या प्रकृतीवर पुढे लवकरच अनुकूल परिणाम झाला.

## मोरूभाऊंचे प्रांजळ उद्गार

१९२६ सालीं मध्यप्रांतांत दिल्ली असेंब्लीच्या निवडणूकी झाल्या. त्यांत मोरुभाऊ पडले. निवडणुकीनंतर मोरुभाऊ आमच्याकडे आले होते. तेव्हा 'लहानपणीं वर्धेला शाळेंत शिकत असतांना मी नानाला कुस्तींत कितीदां तरी हरवलें; पण त्याच नानाने मला राजकारणाच्या डावपेचांत सपशेल हरवलें.' असे उद्गार त्यांनी मोठ्या दिलदारपणें व खेळाडू वृत्तीने काढले होते.

## शिक्षणासाठी राजधानींत

हे ज्या वेळीं वर्ध्यास शिकत होते त्या वेळीं तेथे फक्त इंग्रजी ४ वर्गांपर्यंतच सोय होती. त्यामुळे पुढील शिक्षणासाठी नागपूरला नील सिटी हायस्कूलमध्ये (आता धनवटे विद्यालय) इंग्रजी ५ व्या वर्गांत ह्यांनी प्रवेश मिळविला. या वेळीं तेथे महिषेकर नांवाचे एक शास्त्री होते. त्यांच्या गाईम्हशींच्या गोठ्यांत ह्यांना आपलें बिऱ्हाड थाटावें लागलें. वर्धा येथील आणखी इतरहि कांही विद्यार्थी ह्यांच्या बरोबर या महिषेकर शास्त्रीबुवांच्या गोठ्यांत राहत होते. आताच्या सारखीं भाराभर वह्यापुस्तकें त्या वेळीं विद्यार्थ्यांना जवळ बाळगावीं

लागत नसत. थोड्याशा सामुग्रींतहि गरजू विद्यार्थी उत्तम रीतीनें आपलें विद्यार्जन करूं शकत. मह्शिकर शास्त्र्यांच्या गोठ्यांत दीड आण्याची शिंदीची चापरी, वह्या पुस्तकें ठेवण्यासाठी तीनचार आण्यांची पांजऱ्याची पेटी आणि रात्रींच्या अभ्यासासाठी टिनाची एक पैशाची चिमणी (दिवा) या सामुग्रीवरच ह्यांनी आपलें हायस्कूलचें संपूर्ण शिक्षण पार पाडलें. तें पार पाडतांना कितीतरी अडचणींना ह्यांना तोंड द्यावें लागलें. ज्यांच्या घरीं राहावयाचें त्या मह्शिकर शास्त्र्यांची मर्जी संपादन करावयाची, येवढेंच नव्हे तर त्यासाठी त्यांचीं वाटेल तीं कामें बिनतक्रार करावयाचीं. अवास्तव खर्च होऊं न देण्याची दक्षता बाळगावयाची, सार्वजनिक नळावर सकाळींच स्नान आटोपून, एका छोट्याशा खाणावळींत जेवण करावयाचें! याशिवाय अन्य कितीतरी; पण त्यांची आठवण न करणेंच बरें!

## मैनाबाईच्या खाणावळींत

ज्या खाणावळींत हे भोजन करीत त्या खाणावळीची मालकीण मैनाबाई नांवाची एक गरीब बाई होती. ती मोठी भोळी व मायाळू होती. तिच्या संबंधींच्या गमती हे नेहमीं आम्हांला सांगत. मैनाबाई फोडणीचें वरण कधी कधी फारच 'फक्कड' करायची; पण नेहमींची तऱ्हा मात्र अशी होती की वाटीच्या तळाशीं बुडी मारली तरी डाळीचा एक कण सापडेल तर मग तें वरण कसलें! हे म्हणायचे, "आम्ही मुलं म्हणजे भारीच खोडकर! रोज कांही तरी सबब सांगून मैनाबाईची फजिती होईल असें करायचे व तिला अगदी भंडावून सोडायचे. कधी कधी स्वयंपाक चांगला झाला म्हणजे त्याच्यावर सर्वजण तुटून पडून जेवणावर इतका ताव मारायचा की, अखेरीस ती रडकुंडीस येई. कधी कधी 'तव्याला पोळी लावायची' पैज मारून भिजविलेल्या कणकेची शेवटची पोळी तव्यावर राहीपर्यंत आम्ही

मैनाबाईच्या कौशल्याची तारीफ करीत प्रत्येकजण १०-१२ पोळ्या फस्त करायचा ! कधी नुसती भाजी, तर कधी नुसतें फोडणीचें वरणच आम्ही संपवून टाकायचे ! अशा वेळीं मैनाबाई संतापून म्हणायची, 'मेल्यांनो, आज वरणांत वाण्याची पोरगी जास्त पडली वाटतें ?' (वाण्याची पोरगी म्हणजे गूळ). पण असें असलें तरी मैनाबाईबद्दल आम्हां सर्वांना जिव्हाळा वाटे. माझ्यावर तर तिचा लोभ विशेषच होता. कारण काय तर केव्हा केव्हा तिचा सर्व आठवडी बाजार मी आणून देत असें. या बाजारांतून उरलेले पैसे मी तिला परत करीत असें. त्यामुळे माझ्या प्रामाणिकपणाबद्दल तिला मुळीच शंका वाटेना. माझ्या ह्या प्रामाणिकपणाचा मोबदलाहि मला भरपूर मिळे. आम्ही मुलें जेवावयाला बसलों म्हणजे माझ्या ताटांत ऊन ऊन पोळी व तिच्यावर तुपाची धारहि जरा अधिकच पडायची ! मैनाबाईचा हा पक्षपात बाकीचीं मुलें थोडाच सहन करणार ! ते मैनाबाईवर पंक्तिप्रपंचाचा आरोप करून म्हणायचे 'मैनाबाई, असें मुळीच चालणार नाही हो ! एकटया नानालाच ऊन ऊन पोळी कां बुवा ? हा तर धडधडीत अन्याय आहे ! तो आम्ही नाही चालू देणार.' त्यावर मैनाबाई त्यांच्यावर वसकून म्हणायची, 'रांडलेकांनो ! नाना प्रामाणिक आहे. नानाचा प्रामाणिकपणा तुमच्या ठिकाणीं येऊं द्या. आपोआपच तुमच्याहि पानांत ऊन ऊन पोळी येऊन पडेल.' मैनाबाई असें म्हणायचाच अवकाश, आम्ही सर्व मुलें खदखदा हसूं लागायचीं !" मैनाबाईच्या स्वभावाच्या असल्या कितीतरी गमती ऐकून आमचीहि यथेच्छ करमणूक होई.

## नाट्यगृहाबाहेर जागता पहारा

महिषेकर शास्त्र्यांच्या गोठ्यांत असतांना 'आपण आपली नाटकें पाहण्याची हौस कशी भागवून घेतली' या संबंधींच्या

आपल्या करामती हे मोठ्या गमतीने सांगत. हे म्हणावयाचे "शास्त्रीबुवांना नाटकें पाहण्याची भारीच आवड. त्या काळीं नागपूरला एकहि नाटकगृह नव्हतें. एखादी नाटककंपनी आली म्हणजे तट्टयांचें तात्पुरतें थिएटर तयार केलें जाई. नाटककंपनीला महिषेकर शास्त्रीबुवांचा हमखास आश्रय मिळायचा! रात्रीं ही स्वारी नाटकास निघाली म्हणजे 'नाना, माझ्या बरोबर चल बरं' असा त्यांचा मला हुकूम व्हावयाचा. मग काय! हे नानाजी हातांत कंदील घेऊन त्यांना वाट दाखवीत समोर चालूं लागत. बरें, तो कंदिल तरी लहानसहान होता म्हणतां कां? चांगला फूटभर उंचीचा चौकोनी कंदिल होता तो! टिनाचा डबाच म्हणाना! चारी बाजूंना कांचा लावून आंत एक जळती चिमणी ठेवलेली असे. अशा ह्या अगडबंब कंदिलानें माझा हात दुखून यायचा. पण त्याला कांही इलाज नव्हता. शास्त्रीबुवा स्वतः नाटक पहाण्यास आंत निघून जात. पण बरोबर घेतलेल्या 'नानाला' मात्र चुकून एकदाहि नाटक दाखविण्याचा उदारपणा ते दाखवीत नसत. नाटक संपेपर्यंत थिएटरबाहेर जागता पहारा देण्याची ते या नानाला सक्त ताकीद देऊन ठेवीत.

## नाटकें पाहण्याची नामी युक्ति

अशा स्थितींत झोप घेण्याचीहि सोय नव्हती. जर कोणी शास्त्रीबुवांचा कंदिल उचलून नेला तर, त्यांच्या गोठ्यांतील नानांचें बिऱ्हाडहि हालण्याची भीति! मला तर नाटक पाहण्याची अनिवार इच्छा होई. पण तिकिट काढण्यास पैसे कोठले? अखेर चोरून नाटकगृहांत प्रवेश करण्याची मी नामी युक्ति शोधून काढली. थिएटरच्या मागील बाजूच्या तट्टयाला फट पाडून जवळच्या कंदिलासकट हळूच आंत घुसायचा व तेथेच उभा राहून नाटक पाहायचा! पण नाटकापेक्षा हातांतील कंदिल कोणाच्या धक्क्याने फुटूं नये याकडेच अधिक लक्ष

असायचें. शिवाय नाटक संपण्यापूर्वी शास्त्रीबुवांना संशय येऊं नये म्हणून ते बाहेर पडण्याच्या अगोदरच, थिएटरबाहेर नेमून दिलेल्या जागेवर जाऊन बसण्याची मी दक्षता बाळगायचा. अशा रीतीने मी माझी नाटक पाहण्याची हौस त्या वेळीं पुरी करून घेत असें."

ज्या वेळीं हे जुन्या नाटकांचें व नटांच्या अभिनयकौशल्याचें रसभरित वर्णन करूं लागत व मधून मधून गाण्यांच्या तानाहि घेत तेव्हा मात्र आमची चांगलीच करमणूक व्हायची! हे म्हणत, 'पूर्वींचीं नाटकें एकदा सुरू झालीं की दिवसच उजाडायचा. त्या वेळच्या नटांचे काय ते पल्लेदार आवाज! एकेका पदाला कमींतकमी चार चार पांच पांच वेळां तरी 'वन्स मोअर' मिळायचाच!'

## नाट्याची गोडी

नाट्यरसिकता हा ह्यांचा अभिजात गुण होता. त्यामुळे नाट्यवाङ्मयाकडे ते साहजिकच आकर्षिले गेले. पुढे कॉलेजांत व त्यानंतरहि 'नाट्यशास्त्र' हा ह्यांचा अत्यंत आवडीचा विषय झाला. कॉलिजमध्ये संस्कृत घेतल्यामुळे तर त्यांत आणखीच भर पडली. कालिदास, भवभूति व भास हे संस्कृत नाटककार व शेक्सपीयर हा आंग्ल नाटककार ह्यांच्या फार आवडीचे! त्यांच्या सबंध वाङ्मयाचा ह्यांनी सखोल अभ्यास केला होता.

## विद्यार्थिदशेतील वस्त्रभांडार

नागपूरला शिकत असतांना ह्यांचा खर्च फार काटकसरीचा असे. त्याची माहिती ऐकून कोणालाहि आश्चर्य वाटेल. दरमहाला ह्यांना मिळणाऱ्या सहा रुपयांच्या शिष्यवृत्तींत घरून दोन रुपयांची भर पडे. म्हणजे या आठ रुपयांतच महिन्याचा आपला खर्च बसवावा लागे. शाळेची फी, खाणावळीचा खर्च आणि इतर आवश्यक खर्च! या ८ रुपयांच्या वर ह्यांनी खर्चाला कधी शेंडी फुटूं दिली नाही. वर्षा-

काठी एक धोतरजोडी, दोन सदरे, व एक टोपी येवढेंच ह्यांचें वस्त्र-भांडार ! फार काय, पण ह्या वेळ पावेतों ह्यांच्या पायांनी चप्पलहि पाहिली नव्हती. कोटाचें दर्शन तर ह्यांना अजूनहि झालें नव्हतें. बी. ए. मध्ये गेल्यावर ह्यांनी आपला 'पहिला कोट' शिवला. त्या कोटाचें महत्त्व ह्यांना फारच वाटत असे. ह्या कोटाबरोबरच १॥ रुपयांचा एक बूटहि घेतला होता असें हे सांगत.

**आम्ही काय; शिंपल्यानं घुटी प्यायलेलीं माणसं !**

ह्यांच्या ह्या वस्त्रभांडाराचें वर्णन ह्यांच्या तोंडून मला एक दोनदां ऐकायला मिळालें. एकदा सहज विनोदाने मी ह्यांना म्हटलें, 'आपल्या मुलांच्या कपड्यालत्त्यांनी भरलेलीं कपाटें व त्यांचे बूट-स्लीपर पाहिले म्हणजे मला वाटूं लागतें की, मुलांच्या एका कोटाला सध्या जेवढा खर्च येत असेल, तेवढयांत त्या काळीं तुमचा एक वर्षांचा बहुधा सगळाच खर्च भागत असेल ! '

ह्यांनी कांहीच उत्तर न देतां फक्त एकच वाक्य उच्चारलें, 'तुझीं मुलं जन्मतःच तोंडांत चांदीचा चमचा धरून जन्माला आलीं ! आम्ही काय, शिंपल्यानं घुटी प्यायलेलीं माणसं !! '

**पहिलें लग्न**

इंग्रजी सहावींत असतांना वयाच्या १५ व्या वर्षीच यवतमाळ येथील त्या वेळचे सुभासाहेब बेलखडे यांच्या १० वर्षांच्या मुलीशीं ह्यांचें पहिलें लग्न झालें. या लग्नाला ह्यांची संमति नव्हतीच; पण आईवडिलांच्या आग्रहाने तें घडून आलें. लग्नाचें वऱ्हाड वर्ध्याहून बैलगाडीने यवतमाळला जात असतां वाटेंत एका नदीवर स्वयंपाक-पाण्यासाठी तें उतरलें.

**नवरदेव पळत सुटले**

वडीलमंडळी स्वयंपाकाची जुळवाजुळव करण्यांत दंग असतांना, इतके लहान व तेंहि शिक्षण पुरें न झाल्यामुळे लग्न करण्यास नाराज

असलेले हे भावी नवरदेव वडीलमंडळीचा डोळा चुकवून, कोठेतरी दडी मारण्यासाठी नदीवरून एकदम पळत सुटले. परंतु लगेच ही गोष्ट ह्यांचे मेव्हणे श्री. तात्याजी पारवणकर यांच्या ध्यानांत आली. त्यांनी ह्या नवरदेवाचा पाठलाग करून पकडून आणलें व पुन्हा असा प्रसंग घडूं नये म्हणून ह्यांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवली. पुढे एकदाचें लग्न होऊन 'सून' घरीं आली. पण लग्नप्रसंगीं वधूपक्षाकडून नवरदेवाकडील मंडळीची कांहीशी उपेक्षा झालेली दिसून येतांच ती ह्यांच्या स्वाभिमानी वृत्तीला खपली नाही व पुढे हे आपल्या सासुरवाडीला कधीच गेले नाहीत.

पुढे आम्ही वकिलीच्या कामासाठी ज्या ज्या वेळीं यवतमाळला मोटारने जात असूं त्या त्या वेळीं आपल्या 'पलायना'चें ठिकाण हे मोठ्या कौतुकाने मला दाखवीत असत.

### कॉलेजमध्ये प्रवेश

१९०२ सालीं मॅट्रिकची परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण होऊन ह्यांना राजनांदगांव दरबारची १० रु. दरमहाची शिष्यवृत्ति मिळाली. त्यामुळे गरीब परिस्थितींत पुढील शिक्षण घेण्याची आशा उत्पन्न झाली. ह्यांनी नागपूर येथील मॉरिस कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. नील सिटी हायस्कूलच्या इमारतींतच या कॉलेजचे वर्ग त्या वेळीं भरत असत. हे इंटरच्या वर्गांत दाखल झाले तरी वडिलांना मात्र ह्यांनी कॉलेजमध्ये न जातां 'छोटे साहेबाची नोकरी' करावी अशी इच्छा होती. त्यामुळे मिळणाऱ्या पगारांत आता तरी आपण सुखाचे दिवस पाहूं अशी आशा ह्यांचे वडील मनांत धरून बसले होते. पण शिक्षणाची प्रबळ महत्त्वाकांक्षा असल्यामुळे ह्यांनी नोकरी करण्याची वडिलांची इच्छा पुरी न करतां आपलें कॉलेज शिक्षण, मिळणाऱ्या १० रुपयांच्या शिष्यवृत्तींतून चालूं ठेवलें.

## गोठा गेला वाडा आला

कॉलेजमध्ये गेल्यावर मात्र महिषेकर शास्त्रीबुवांचा गोठा सोडून निकालस मंदिराजवळील एका वाड्यांत हे राहावयाला गेले. पूर्वीची मित्रमंडळीहि बरोबर होतीच. त्या वेळीं हा वाडा भुताटकीचा म्हणून प्रसिद्ध होता. रात्रीं अपरात्रीं व खास करून अमावास्या पौर्णिमेच्या रात्रीं या वाड्यांत भुतांचें प्रत्यक्ष दर्शन होतें अशी बोलवा होती. त्यामुळे कोणीहि त्या वाड्यांत राहण्यास धजत नसे. पण या विद्यार्थ्यांनी मात्र त्याची फिकीर न बाळगतां बेडरपणें त्याच वाड्यांत राहण्याचें ठरविलें. लोकप्रवादाप्रमाणें त्या वाड्यांत रात्रीं दिसणाऱ्या भुतांचें आपल्यालाहि दर्शन व्हावें म्हणून ही विद्यार्थी मंडळी रात्र रात्र जागून काढायची! पण एकदाहि त्यांना भूत दिसलें नाही. 'बरें झालें, भुतांच्या भीतीने तरी हा येवढा मोठा वाडा आपल्यास दरमहा प्रत्येकीं आठ आणे भाड्यांत वापरण्यास मिळाला' याचाच या विद्यार्थी मंडळींना विशेष आनंद वाटू लागला.

## संतचरणीं धांव

इंटरचा अभ्यास चालू असतां पाठीवरचा बंधू बापूराव याचें निधन झाले. त्याचें ह्यांना बरेंच दुःख झालें. पण ह्या एकाच दुःखाने यांची सुटका होणार नव्हती. बंधूचें दुःख विसरतात न विसरतात तोंच वडिलांनाहि जिवावरचें दुखणें होऊन अखेर त्यांतच त्यांचा अंत झाला. आता मात्र जात्याच हळुवार असलेल्या ह्यांच्या मनाला मोठाच धक्का बसला. आपल्यावरचें पितृछत्र गेलें या दुःखाने हे फार व्याकुळ झाले. वडिलांची महत्त्वाकांक्षा आपण पुरी केली नाही ही गोष्ट ह्यांच्या भावनाशील मनाला लागली. हे उदास बनले. अशी अवस्था असतांना, कॉलेजशिक्षणाला मध्येच रामराम ठोकून ह्यांनी

सेलुघोराड येथील संत केजाजी महाराजांच्या सहवासांत जाऊन राहण्याचा निश्चय केला.

## आयुष्यांतील क्रांतिकारी घटना

आपल्या ह्या निश्चयाप्रमाणे पुढे एके दिवशीं हे खरोखरच घोराड येथें केजाजी महाराजांजवळ जाऊन राहिले. 'मला कांही उपदेश व्हावा' अशी महाराजांजवळ ह्यांनी इच्छा व्यक्त केली. परंतु घोराडला राहून या हुशार मुलाच्या आयुष्याला भलतेंच वळण लागूं नये म्हणून केजाजी महाराजांनी, 'नागपूरला जाऊन तूं आपलें शिक्षण पूर्ववत् चालूं कर' हाच माझा तुला उपदेश आहे, अशी आज्ञा केली. महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून ह्यांनी नागपूरला जाऊन आपलें शिक्षण पुन्हा चालू केलें. ही घटना ह्यांच्या आयुष्यांत क्रांतिकारी ठरली असेंच म्हणावें लागेल. कारण भावी आयुष्यांत हे जे येवढे चमकले व ह्यांनी जो नांवलौकिक मिळविला तो मध्येच शिक्षण सोडून घोराडच्या कायम वास्तव्यांत ह्यांना कधीच मिळवितां आला नसता, असेंच केजाजी महाराजांनी ह्यांना दिलेल्या उपदेशावरून म्हणावें लागतें. माणसाच्या गोंधळलेल्या मनःस्थितीला योग्य मार्गदर्शन करून त्याला कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या संतांचीच राष्ट्राला गरज आहे. असे दिव्य दृष्टीचे व मनुष्याला कार्यप्रवण करणारे केजाजी महाराजांसारखे संत या भारतवर्षांत आणखी अवतीर्ण होतील तर नवभारताला त्यांच्याबद्दल केव्हाहि निस्सीम आदरच राहील.

## नीलकंठाचा शुभशकून

मध्येच सेलूघोराडला जाऊन राहिल्यामुळे ह्यांच्या अभ्यासांत बराच खंड पडला होता. सेलूघोराडहून हे परत नागपूरला आले तेव्हां

परीक्षेला फक्त तीनच महिने होते. अशा स्थितींत ह्यांनी परीक्षेची कसून तयारी केली. ज्या दिवशीं संस्कृतचा पेपर होता त्या दिवशीं कांही संस्कृत श्लोक चाळून पहावे या उद्देशाने ह्यांनी पुस्तक उघडलें मात्र. नेमका त्याच क्षणीं, एक नीलकंठ पक्षी ह्यांच्या डोक्यावर सारख्या घिरट्या घालून ओरडत होता. ही गोष्ट ह्यांना मोठीच शुभ-सूचक वाटली. कांहीतरी अनुकूल सूचनाच हा नीलकंठ पक्षी आपणास देत आहे असें ह्यांना वाटलें. उघडलेल्या पुस्तकाचें जें पान ह्यांच्या प्रथमच नजरेस पडलें त्यावरील सर्व श्लोक ह्यांनी मोठ्या उत्साहाने तावडतोब मुखोद्गत केले. त्यानंतर परीक्षेच्या हॉलमध्ये गेल्यावर ह्यांच्या हातांत जेव्हा प्रश्नपत्रिका पडली तेव्हा ती पाहतांच, सकाळीं पाठ केलेले श्लोकच त्या प्रश्नपत्रिकेंत असलेले आढळून आले. ह्या गोष्टीचा ह्यांना मोठा चमत्कार वाटला. 'कल्पनेपेक्षाहि उत्तम रीतीने आपण तो पेपर त्या दिवशीं सोडविला' असें हे म्हणत. या परीक्षेंत पहिल्या वर्गात पास होऊन ह्यांना १५ रु. ची शिष्य-वृत्तीहि मिळाली. हें जें उच्च यश मिळालें त्याला दैवाची अनुकूलता व संताचा आशीर्वाद तर कारण होताच; पण ह्यांच्या प्रयत्नाचीहि त्याला अवश्य जोड होती. इंटरच्या परीक्षेच्या वेळचे हे श्लोक पुढे आपल्या अंतःकरणांत इतके कोरल्या गेले की, कधी म्हणून त्यांचा आपल्यास विसर पडला नाही,' असें हे वारंवार आम्हांला सांगत.

संस्कृत भाषेवर ह्यांची भक्ति विशेष! कॉलेजमध्ये असतांना तर त्या भाषेवर ह्यांचें प्रभुत्व इतकें होतें की, ते संस्कृत गद्याचें पद्यांत सहज रूपांतर करीत. परीक्षेच्या वेळींसुद्धा हे अशा प्रकारचें कौशल्य प्रगट करीत. ह्यांच्या ह्या खास वैशिष्ट्यामुळेच वार्षिक परीक्षेंत ह्यांना उत्तम गुण मिळत असत. ह्यांच्या ह्या गुणामुळेच मॉरिस कॉलेजचे त्या वेळचे मुख्याध्यापक महामहोपाध्याय केशवराव ताम्हण यांचा ह्यांच्यावर विशेष लोभ जडला होता, व ते आपल्या ह्या कुशाग्रबुद्धि

२२७८९ २१३।५३

शिष्याची फारच प्रशंसा करीत असत. गुरुवर्यांचा हा आपल्या छात्रावरील लोभ अगदी अखेरपर्यंत तसाच टिकून होता.

## सुरत कॉंग्रेसच्या अधिवेशनांत

संस्कृत विषयाची मूळचीच गोडी असल्यामुळे त्याचें ह्यांनी पुढे चांगलें अध्ययन केलें. ह्यांच्या या भाषेच्या व्यासंगाचें कॉलेजमध्ये मोठें कौतुक होई. बी. ए. च्या वर्गांत असतांनाच ह्यांना सभा व्याख्यानांची गोडी लागली. त्याप्रमाणें चर्चा, वादविवाद व वक्तृत्व यांतहि ह्यांनी मनापासून भाग घेऊन आपल्या बुद्धीची धार अधिक तीक्ष्ण केली. त्यामुळे ह्यांच्या बुद्धीलाच नव्हे तर ह्यांच्या तेजस्वी वृत्तीलाहि बरीच चालना मिळाली. १९०७ सालीं सुरतेला कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें त्या सालीं नागपूरहून कांही तरुण मंडळी डॉ. मुंजे यांच्या नेतृत्वाखाली तेथे गेली होती. अधिवेशनांत फिरोझशहा मेहतांचा मवाळ पक्ष व लोकमान्यांचा जहाल पक्ष यांच्यांत मतभेद होऊन त्याचा शेवट खुर्च्याटेबलें फेकून दंगा करण्यांत झाला. त्या दंग्याचा बीमोड पोलिसांच्या मदतीने करण्यांत आला. दंगा सुरू होतांच सारे लोक भराभर बाहेर पडले. पण ' आम्ही नागपूरचे तरुण लोक मात्र अखेर-पर्यंत तसेच मंडपांत लोकमान्यांना सांभाळीत होतों' असें हे नेहमी आमच्याजवळ सांगत असत.

नागपुरांत एखादा नामांकित वक्ता आला आणि त्याचें व्याख्यान ह्यांनी ऐकलें नाही असें सहसा होत नसे. त्याचप्रमाणें इतर ग्रंथांचें वाचनहि हे नेहमीच करीत. पण आपल्या कॉलेजच्या अभ्यासांत ह्यांनी दुर्लक्ष होऊं न देण्याची विशेष दक्षता बाळगली होती. 'अभ्यासास नेमलेल्या पुस्तकांशिवाय विषयाला धरून असलेलें इतरहि विद्वान् लेखकांचें लिखाण वाचण्यांत आलें तर त्यामुळे विषयाचें सांगोपांग ज्ञान मिळून परीक्षा उत्तीर्ण होण्यास चांगली

मदत होते' असा उपदेश हे तरुण विद्यार्थ्यांना नेहमी करीत. याच पद्धतीने कॉलेजमध्ये अभ्यास करून परीक्षेत हे उत्तम यश मिळवीत. विद्यार्थीजीवनाविषयी ह्यांची एक विशेष धारणा होती. विद्यार्थ्यांनी स्वतःला चैनीची चट लावून घेऊं नये असें ह्यांना प्रामाणिकपणें वाटत असे. त्याच तत्त्वाला अनुसरून ह्यांनी आपलें विद्यालयीन जीवन फार काटकसरीने चालविलें. बी. ए. त असतांना ह्यांना मिळणाऱ्या १५ रुपयांच्या शिष्यवृत्तींतून काटकसर करून दोन रुपये हे घरीं मदत पाठवीत असत. इतरांना जसा उपदेश करावयाचा तसेंच स्वतःहि आचरण करावें हा ह्यांचा स्वभावविशेष होता.

**ग्रॅज्युएट झालों पण—**

बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर आता पुढील शिक्षण की नोकरी ही समस्या ह्यांच्या पुढे पुन्हा उभी राहिली. घरची परि-स्थिति अत्यंत गरीबीची. महिन्याचा खर्च निभावणेंहि मोठें कठीण काम. अशा स्थितींत आईवर यापुढे घरखर्चाची जबाबदारी टाकणें ह्यांना प्रशस्त वाटलें नाही. शिवाय वडिलांची इच्छा आपण 'छोटा साहेब' व्हावें अशी होती. त्या दिशेने प्रयत्न करावा म्हणून सहज ह्यांनी मुन्सफीसाठी एक अर्ज केला. आश्चर्याची गोष्ट अशी की, तात्बडतोब ह्यांना मुन्सफ नेमल्याचा हुकूम ह्यांच्या हातीं पडला. हा हुकूम पाहतांच वास्तविक आनंद व्हायचा. पण परिस्थिति त्याच्या उलट झाली. ह्यांचें मन द्विधा झालें. सरकारी नोकरीचें हें आमिष आपल्याला कायमचें जखडून टाकील असें ह्यांना वाटलें. अखेर या मोहांत पडायचें नाही असा निश्चय करून, घरांतील आर्थिक परि-स्थिति कमालीची विकट असतांहि घरीं चालून आलेली मुन्सफी ह्यांनी साभार परत केली. सरकारच्या गुलामगिरींत पिचत पडण्या-पेक्षा एलएल. बी. होऊन वकीली करावी व आपलें भावी जीवन

अधिक लोकाभिमुख व प्रज्वलित करावें असें ह्यांनी ठरविलें. त्याकरतां तूर्त केवळ ४० रु. दरमहा पगाराची शिक्षकाची नोकरी ह्यांनी नीलसिटी हायस्कूलमध्ये पत्करली. व या निश्चयाप्रमाणे वकिलीच्या अभ्यासाला सुरवातहि केली.

## मुन्सफ हो, वकिली काय कामाची ?

मुन्सफीसारखी चांगली नोकरी परत केल्याबद्दल कांही वडील-धारी मंडळी ह्यांच्यावर मोठीच नाराज झाली. त्यांनी ह्यांना बरींच दूषणें पण दिलीं. ते म्हणाले, 'अरे बाबा, सरकारी नोकरी मिळविण्यास किती सायास पडतात, किती लोकांच्या विनवण्या कराव्या लागतात. तुझें नशीब येवढें शिकंदर की विशेष खटाटोप न करतां मुन्सफीसारखी चांगली नोकरी तुझ्या पायाशीं चालून आली, पण तूं मात्र ती निष्फळ घालविलीस ! त्यांत तूं काय मिळविलेंस ? वकीलीच्या व्यर्थ मागे लागलास. मुन्सफ होऊन केदार घराण्याचें नांव उज्ज्वल करण्याचें सोडून भलताच उपद्व्याप तूं करीत आहेस.'

## माझ्या कर्तृत्वास बंधन नको !

ह्या सर्व विरोधकाना ह्यांनी मोठें बाणेदार उत्तर दिलें. त्यांना हे म्हणाले, "गुलामगिरीच्या बंधनांत पडून मला माझ्या उज्ज्वल भवितव्याला व महत्त्वाकांक्षेला मूठमाती द्यावयाची नाही. नशीब काढणें दैवाधीन असेल कदाचित्; पण कर्तृत्व दाखविणें मनुष्याधीन खास आहे. प्रयत्न केल्यास व चिकाटी धरल्यास या जगांत मनुष्यास अशक्य व असाध्य काय आहे ? माझ्या कर्तृत्वास मला विशाल क्षेत्र पाहिजे. त्या क्षेत्राला कोणतेंहि बंधन नको व कोणतीहि मर्यादा नको. एकदा का मी नोकरीच्या पाशांत अडकलों म्हणजे माझें जीवनकर्तृत्व संकुचित झालेंच म्हणून समजा. माझें मन त्यामुळे कोंडलें जाईल व

माझ्या साऱ्या आकांक्षा अतृप्त राहतील. तेव्हा मी जो कांही निर्णय घेतला तो पूर्ण विचारांतींच घेतला आहे; मला त्याबद्दल मुळीच खेद वाटत नाही. तुम्हीहि माझ्यावर त्याबद्दल नाराजी ठेवूं नये असें मला वाटतें."

## हे वकील झाले

वकीलीचा अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत ह्यांना नागपूर, हिंगणघाट आणि हुशंगाबाद या तीन ठिकाणीं शिक्षकाची नोकरी करावी लागली. मुलांना शिकविण्याची ह्यांना मोठी आवड व गोडी वाटूं लागली. हें कार्य करीत असतांना हे त्यांत पूर्ण समरस व तल्लीन होत. ह्यांची शिकविण्याची वैशिष्ट्यपूर्ण कला विद्यार्थ्यांना फारच प्रिय वाटे. विद्यादानाचें पवित्र कार्य करण्याकडे ह्यांची प्रवृत्ति अधिक झुकूं लागली. साहजिकच आपण प्रोफेसर व्हावें अशी ह्यांना इच्छा झाली. त्याप्रमाणे ह्यांनी एम्. ए. च्या अभ्यासास सुरवातहि केली होती. पण ऐन परीक्षेच्या वेळीं शाळाधिकाऱ्यांनी सुटी न दिल्यामुळे ह्यांना एम्. ए. चा नाद सोडावा लागला. प्रोफेसर होण्याची इच्छा अखेर तेथेच विराम पावली. वकीलीच्या अंतिम परीक्षेच्या वेळीं मात्र ह्यांनी आपली शिक्षकाची नोकरी सोडून दिली. १९०९ सालीं अलाहाबाद विद्यापीठांतून हे वकीलीची परीक्षा उत्तीर्ण झाले व अशा रीतीने नंतर ह्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या विशाल प्रांगणांत पदार्पण केलें.

## वकिलीची सनद

परीक्षा पास झाली. पण सनद काढून वकीलीचें ऑफिस थाटण्यासाठी पैशाची अडचण ह्यांच्या पुढे उभी राहिली. नुकतेंच धाकट्या बहिणीचें लग्न उरकविल्यामुळे होती नव्हती ती जवळची सर्व पुंजी संपली होती. त्यामुळे सनद काढण्यापुरतेहि पैसे जवळ

नव्हते. मग ऑफिस थाटण्याची गोष्ट तर दूरच ! अशा परिस्थितींत पुन्हा शिक्षकाचा पेशा स्वीकारून पैसे जमवावे असा ह्यांनी विचार केला. पण धाकट्या बहिणीचे यजमान श्री. वासुदेवराव चिमोटे ह्यांना हा विचार पटला नाही. ह्यांची अडचण दूर करण्याचें त्यांनी अभिवचन दिलें. त्याप्रमाणें परतफेडीच्या बोलीने आवश्यक तेवढी मदत त्यांच्याकडून घेऊन ह्यांनी वकीलीची सनद काढली. पुढे लगेच वर्धा येथे सोइस्कर ठिकाणीं दरमहा पंधरा रुपये भाड्याचें एक घर घेऊन व जुजबी सेकंडहँड सामानाची जुळवाजुळव करून ऑफिसची सजावट केली.

## कोर्टांत पहिलें पाऊल

अशा रीतीने सर्व पूर्वतयारी झाल्यावर ता. २९ एप्रिल १९१० रोजीं ह्यांनी वकील म्हणून वर्धेच्या कोर्टांत पहिलें पाऊल टाकलें. सुदैवाने कोर्टप्रवेशाचा हा पहिलाच मुहूर्त मोठा शुभ ठरला. पहिल्याच महिन्याच्या मिळकतीने वकीलीच्या धंद्यांत पुढे आपण चांगलें यश संपादन करूं असा ह्यांना आत्मविश्वास वाटूं लागला. ह्यांना आपल्या केवळ एक महिन्याच्या उत्पन्नाने सात्त्विक आनंद व्हावा, अशीच ही मिळकत होती. या सात्त्विक आनंदाबरोबरच ह्यांच्या अंतःकरणांतील कोणत्या तरी एका कोपऱ्यांत किंचित् खिन्नतेची छटा मात्र जरूर वास करीत होती. 'छोटा साहेब न होतां आपला नाना वकील होऊन सध्या चांगला पैसा मिळवीत आहे' हें गोड दृश्य पाहण्यास आपले वडील दुर्दैवाने हयात नाहीत, या विचाराने ह्यांना पराकाष्ठेची खिन्नता वाटे. मात्र, या खिन्नतेच्या ढगाला रुप्याची कडा होती. वडील जरी नव्हते तरी आईचें कृपाछत्र मात्र कायम होतें. जन्मदात्री आईच ती. प्रयाग क्षेत्रीं पितृतर्पण केल्याने मुलगा पित्याच्या ऋणांतून मुक्त होतो म्हणतात, पण आईच्या ऋणांतून मात्र

कांही केल्या मुलाची सुटका होत नाही, अशी आमच्या आर्यधर्माची शिकवण आहे. ह्यांनाहि ती मान्य होती. परंतु फूल नाही फुलाची पाकळी म्हणून आपल्या पहिल्या महिन्याच्या उत्पन्नांतून ह्यांनी आपल्या आईच्या हातांत सोन्याच्या भरीव पाटल्या करून घातल्या व आपल्या प्रेमळ मातेचा आशीर्वाद मिळविला.

मणी दुसरा

# माझें माहेर

## माझे वडील

माझे वडील रामचंद्रराव दाबके, मूळचे तळकोकणांतील वाग-मांडले येथील रहिवासी. लग्न झाल्यावर कोकण सोडून उद्योग-धंद्याच्या शोधार्थ मुंबईस कांही काल वास्तव्य केल्यावर पुढे योगा-योगाने मुंबईच्या विरुद्ध टोकाला म्हणजे छत्तिसगडांतील कांकेर संस्थानांत नोकरीच्या निमित्ताने येऊन राहिले. कांकेरला जाण्यापूर्वी मार्गांत नागपूर व रायपूर या दोन शहरीं त्यांना कांही काळ नोकरी करावी लागली. त्या काळचे प्रसिद्ध सुधारक रावबहादुर कोल्हटकर हे माझ्या वडिलांच्या परिचयाचे. त्यांच्याच आग्रहाने वडील मुंबईहून नागपूरला आले.

## आई-मावशींना मिडवाइफ़ीचें शिक्षण

माझी आई जानकीबाई. हिचें माहेर पुण्याचें. माझे आजोबा (आईचे वडील) सुधारणावादी होते. त्यांनी आपल्या सर्व मुलींना त्यांचीं लग्नें होईपर्यंत आपल्या ऐपतीप्रमाणें शिक्षण दिलें होतें. माझे बाबा नागपूरला आले तेव्हा त्यांच्या बरोबर आई व माझी मावशीहि आली होती. याच सुमारास नागपूरला डफरिन हॉस्पिटल उघडलें होतें. त्या वेळच्या परिस्थितीमुळे कोणतीच हिंदु मुलगी मिडवाइफ़ीचा कोर्स घेण्यास धजत नसे. एक तर तें

शिक्षण अगदीच कमी प्रतीचें समजलें जाई आणि दुसरें म्हणजे कोणी घंजलीच तर तिची हिंदुसमाजांत टिंगल होई: एवढेंच नव्हे तर बहिष्कारहि टाकल्या जाई. ही गोष्ट सुधारकी मताच्या रा. ब. कोल्हाटकरांना चांगलीच डाचत असे. माझी आई व मावशी या दोघींनाहि मिडवाईफीचें शिक्षण देण्याविषयी रावबहादुरांनी बाबांना आग्रहाची सूचना केली. या सूचनेचा बाबांना अनादर करवेना. त्यांनी या गोष्टीला आपली संमती दर्शविली आणि आई व मावशी मिडवाईफीच्या कोर्समध्ये दाखल झाल्या. हिंदु समाजांतून नागपूरला त्या वेळीं ह्या दोघीच असल्यामुळे त्यांना सवलतीहि बऱ्याच मिळत असत. त्यांना नेण्याआणण्यासाठी हॉस्पिटलमधून बैलटांगा येई. शिक्षक वर्गाकडून ह्या दोन हिंदु मुलींनी शिक्षण मध्येच सोडून जाऊं नये म्हणून त्यांची फारच बरदास्त होई. शिक्षण पुरें होऊन त्या परीक्षेंत पास झाल्या. त्याप्रीत्यर्थ एक दिवस सभा भरवून त्यांचा गौरव करण्यांत आला. त्याप्रसंगीं त्यांना प्रत्येकीं अडीच तोळे वजनाचें सुवर्ण पदक व धंद्याला आवश्यक अशा शस्त्रांची पेटीहि बक्षिस देण्यांत आली.

## बाबांना कांकेर संस्थानांत नोकरी

कांही कारणाने बाबांना नागपूर सोडून रायपूरला जावें लागलें. तेथे त्यांचे परिचित श्री. गणपतराव लोथे ह्यांच्या मध्यस्थीने एक नोकरी मिळाली. पण याच सुमारास जवळच्याच कांकेर संस्थानांत लायक व हुशार माणसाची गरज असल्यामुळे गणपतरावांनी माझ्या बाबांना रायपूरवरून तातडतोब कांकेरला पाठविलें. ह्याच कांकेरला बाबांचें पुढे कायम वास्तव्य झालें व तेथेच सन १८९८ च्या आक्टोबर महिन्यांत (कोजागरी पौर्णिमेस) माझा जन्म झाला. याच वेळीं बाबा कांकेर संस्थानचे बडे हुद्देदार होऊन त्यांच्या पगारांतहि बढती झाली. अर्थात् माझें चांगलेंच कोडकौतुक होई. मी आई

बाबांची जीव की प्राण झालें. मी जसजशी मोठी होत चाललें तसतशी माझ्या बाबांना माझ्या लग्नाची म्हणजे मला अनुरूप वर मिळण्याची विवंचना लागली. बाबा वर्षांतून बहुतेक एकदा तरी पुण्यामुंबईस जाऊन आपल्या आप्तमंडळीकडे माझ्यासाठी एखादा चांगला मुलगा मिळूं शकेल काय याचा तपास करीत. त्याप्रमाणे एक मुलगा त्यांनी पुण्याला पाहूनहि ठेवला होता. पण विधिसूत्र मात्र निराळेंच होतें.

## आमचा पुण्याचा प्रवास

आता मला १३ वें संपून १४ वें वर्ष लागलें होतें. त्या वेळच्या परिस्थितीनुरूप मी केव्हाच लग्नाची मुलगी झालें होतें. म्हणून त्या काळजीने बाबांनी 'आता बाबीचें लग्न उरकवलेंच पाहिजे' असा निश्चय केला व त्याला अनुसरून घरच्या सर्वच मंडळीसह त्यांनी पुण्याला जाण्याचें ठरविलें. वाटेंत वर्धा येथे बाबांचे स्नेही श्री. तानबा जबडे वकील ह्यांच्याकडे चार दिवस मुक्काम करून पुढे पुण्याला जाण्याचा बाबांचा विचार होता. त्याप्रमाणे आम्ही वर्ध्याला उतरलों.

## नांवाचा घोटाळा

तानबांना 'नानासाहेब' या नांवाने संबोधीत असत. आम्ही वर्धेला आल्याच्या दुसऱ्या दिवशींची गोष्ट. सायंकाळच्या वेळीं तानबाकडील एका मुलीने म्हटलें, 'आज नानासाहेब कचेरींतून घरीं पायींच येत आहेत.' तिचे हे उद्गार ऐकून नानासाहेब तर टांग्याने कचेरींत गेले होते मग ते पायीं कां आले, या कुतूहलाने मी समोरच्या दाराशीं जाऊन बाहेर पाहूं लागलें. पण नानासाहेब कांही दिसले नाहीत. त्यांच्याऐवजी दुसरेच कोणी एक गृहस्थ दारावरून जात होते. मी दारांत येतांच त्यांचें लक्ष माझ्याकडे गेलें व 'ही एक

अनोळखी मुलगी तानबाकडे कशी ?' या जिज्ञासेनेच ते गृहस्थ माझ्याकडे निरखून पहात पुढे निघून गेले. ते माझ्याकडे पाहत आहेत असें बघतांच मी घरांत परतलें. मात्र त्या गृहस्थांचा रुबाब मला मोठा आकर्षक वाटला. बंद गळयाचा कोट, डोक्याला फेटा व ऐटदार चालण्याची पद्धत पाहून मी क्षणभर स्तंभितच झालें. मी घरांत जाऊन 'कोठे आहेत ग नानासाहेब ?' असा त्या मुलीस प्रश्न केला. तेव्हा ती म्हणाली, 'अग, आपले नानासाहेब नसून ते केदार नानासाहेब आहेत ना आमच्या शेजारीं, त्यांच्याबद्दल बोललें मी. आताच नाहीत का ते गेले आपल्या दारावरून ?' त्या वेळीं कोण केदार नी काय याची मला कांहीच माहिती नव्हती. पण एक विचार मात्र माझ्या मनांत अगदीच तरळता चमकून गेला !

## लुडबुडे जोशी

तानबाकडे दुसरे दिवशीं सकाळीं गोपाळ भटजी नांवाचे एक लुडबुडे जोशी आले व त्यांनी नवीन पाहुण्यांची विचारपूस करण्यास सुरुवात केली. बोलतां बोलतां त्यांनी माझ्याकडे पाहून 'आमच्या केदाराला ही मुलगी चांगली शोभेल' असेंहि ते बोलून गेले. शब्द सहजच, पण त्यांनी मात्र माझ्या मनाला एक नाजुक धक्का देण्याचें कार्य केलें.

## वर्धा येथील उद्योन्मुख वकील

त्यानंतर बाबांशीं, तानबांशी बऱ्याच इकडच्या तिकडच्या गोष्टी करून गोपाळ भटजी निघून गेले. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की आम्हां पाहुणे मंडळींना घेऊन घरीं यावें असा तानबांना केदारांच्याकडून दुसरे दिवशीं निरोप आला. केदारांच्याकडे जाण्या-पूर्वी तानबाजवळ बाबांनी त्यांची विचारपूस केली. तानबांनी बाबांना

पाहिजे ती माहिती दिली. 'केदार हे वर्धा येथील एक उदयोन्मुख वकील आहेत. त्यांनी नुकतीच प्रॅक्टिसला सुरवात केली असली तरी लौकरच ते चांगल्या प्रतीचे वकील म्हणून चमकतील असा कयास दिसतो आहे. त्यांना प्रथम पत्नी असून ती असाध्य आजाराने अंथरुणास खिळली आहे. तिला दीड वर्षांचा एक मुलगाहि पण आहे. अशा स्थितींत दुसरें लग्न करावें अशी केदारांची इच्छा आहे.'

## आईबापांना पेंच

निरोप आल्याप्रमाणे आम्ही केदारांच्याकडे जाऊन आलों. दोन दिवसांनी आम्हांला त्यांच्याकडून जेवणाचें निमंत्रण आलें. पुरुषमंडळीचीं जेवणें आटोपल्यावर माजघरांत आम्ही बायकामंडळी जेवण्यास बसलों. त्या वेळीं त्या खोलींतून ह्यांची सारखी ये जा चालू होती. मी मात्र खाली मान घालून जेवत होतें. मान खाली असली तरी ह्यांच्या हालचाली मी तिरप्या नजरेने पाहत होतेंच. याप्रमाणे जेवणें आटोपून आम्ही घरीं आलों. दुसरे दिवशीं हे स्वतः तानबांकडे आले. ह्यांनी बाबांची भेट घेतली व त्यांच्याजवळ आपला लग्नाचा मनोदय व्यक्त केला. 'ह्यांना' काय उत्तर द्यावें याचा बाबांना मोठाच पेंच पडला. स्थळ तर उत्तम आहे, पण बिजवराला व तेंहि प्रथम पत्नी हयात असतांना आपण कसा काय होकार द्यावा यासंबंधी मोठीच अडचण बाबांपुढे उभी ठाकली. त्या वेळीं बाबा ह्यांना म्हणाले, 'आता तर आम्ही पुण्याला जात आहोंत. पुढे पाहूं काय तें. यासंबंधी आपण पत्रव्यवहार करूं.' बाबांच्या अशा उत्तराने ह्यांचें समाधान झालें नाही. तेव्हा एक युक्ती योजून बाबांनी पुण्यास न जातां दुसरीकडेच कोठे तरी जावें असा घाट घातला. कारण 'हे जर पुण्याला गेले तर हें स्थळ हातचें जाईल' अशी ह्यांची कल्पना झाली असावी.

## पुणें सुटलें प्रयाग धरलें

त्याप्रमाणे तानबांकडून मोठ्या शिताफीनें तो डाव ह्यांनी सिद्धीसहि नेला. पुण्यास न जातां 'तुम्ही काशीप्रयागची यात्रा करून घ्यावी.' असा तानबांनी बाबांना सल्ला दिला. त्याप्रमाणे पुण्याला जाण्याचा आपला बेत रद्द करून बाबांनी काशीयात्रेची तयारी केली. माझ्या आईला मात्र ही यात्रेची कल्पना फारच आवडली. प्रयागला जाऊन गंगेंत वेणीदान करण्याची तिची फार दिवसांची इच्छा होती. एक दोन दिवसांतच आम्ही अलाहाबादला जाण्यास निघालों. तो डिसेंबरचा महिना असून थंडी कडाक्याची होती. गाडी सकाळीं ५ ला सुटत असल्यामुळे आम्ही चारलाच स्टेशनवर जावयास निघालों. घरापासून कांही अंतरावर आमचा टांगा जातो न जातो तोंच टांग्या-च्या मागोमाग अंगांत ओव्हरकोट घातलेले व डोक्याभोवतीं मफलर गुंडाळून एक गृहस्थ येत होते.

## कोण ग आई, हे ?

आम्ही स्टेशनवर पोहोचून सामानसुमानासहित प्लॅटफॉर्मवर जाऊन बसलों. त्या ठिकाणींहि हे गृहस्थ आमच्या आसपास फेऱ्या घालतांना दिसले. आम्ही गाडीच्या डब्यांत बसल्यावर, आमचें सामान ठाकठीक लावून देण्यांतहि त्यांनी बरीच मदत केली. गाडी सुटेपर्यंत हे गृहस्थ खिडकीपाशीं उभे राहून बाबांशीं गोष्टी करीत होते. मी आईला हळूच विचारलें, 'कोण ग आई, हे ? मघापासनं आपल्या बरोबरच दिसताहेत ?' परंतु प्रकाश तितकासा नसल्यामुळे तिनेहि त्या गृहस्थांना ओळखलें नव्हतें. गाडी सुटल्यावर आईने बाबांना ते कोण म्हणून विचारलें. बाबांनी हसत म्हटलें, 'अग ते केदार !' ते गृहस्थ 'केदार होते' असें बाबांनी सांगतांच मी चांगलीच खजील झालें. त्यांनी माझ्याबद्दल बाबांजवळ मागणी घातली होती ही गोष्ट

मला वर्धेला कळून चुकली होती. ते बाबांशीं बोलत असतांना मी सारखी त्याच खिडकींतून बाहेर डोकावून पाहात होतें. माझ्या अशा वागण्यामुळे 'मी उद्धट मुलगी आहें असा तर त्यांचा माझ्याविषयीं ग्रह झाला नसेल ना !' असें मला वाटूं लागलें. त्यांचें माझें लग्न अद्यापि ठरलें नव्हतें, तरी वरील प्रकारच्या शंकाकुशंका माझ्या मनांत येऊन मी अगदी ओशाळून गेलें.

## 'तुझं लग्न थोडंच ठरलं आहे?'

गाडी सुटून ती स्टेशनामागून स्टेशनें मागे टाकीत होती. पण थोडयाच वेळापूर्वी सारखी चुळबूळ करणारी मी मात्र अगदीच गुपचूप झालें होतें. माझा चेहरा गंभीर व विचाराक्रांत झालेला पाहतांच बाबांच्या ध्यानांत त्याचें कारण आलें. ते मला म्हणाले, 'काय ग बाबे, तूं एवढी हिरमुसली होण्याचं काय कारण? तुझं केदाराशीं लग्न थोडंच ठरलं आहे म्हणून!'

## हा ईश्वरी योगच दिसतो!

प्रयागला जातांना आम्ही बिलासपूरला श्री. गणपतराव लोथे ह्यांच्या पत्नी सौ. गंगूबाई ह्या माझ्या आईच्या मैत्रीण असल्यामुळे थांबलों. त्यांच्याच आग्रहावरून पुढे तेथे आमचा १५ दिवस मुक्काम झाला. तेथून नंतर आम्ही प्रयागला गेलों. तेथे आईचा वेणीदान विधि आटोपल्यावर काशीयात्रेला गेलों. बाबांचा व ह्यांचा ठरल्याप्रमाणे पत्रव्यवहार सुरू होता. आम्ही काशीला असतांना ह्यांचें बाबांना पत्र आलें. त्यांत त्यांच्या पत्नीचें निधन झाल्याची हकीकत होती. ही गोष्ट इतक्या अचानक घडून आली याचें आईबाबांना आश्चर्य वाटलें. यानंतर पुन्हा दुसरें पत्र आलें. त्यांत असेंहि कळविलें होतें की, आम्ही पुढे गयेस न जातां परत वर्धेला यावें. या पत्रामुळे

'आपली बाबी केदारांच्याकडेच पडण्याचा ईश्वरी योग दिसतो; कदाचित् ती आपल्या पुढील आयुष्यांत मोठी भाग्यवान होईल' असें त्यांना वाटूं लागलें. व सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून त्यांनी ह्यांना होकारार्थी पत्र पाठविलें; व काशीला कापडचोपड खरेदी करून वर्ध्याला निघण्याची तयारी केली.

## वरसंशोधनाचा अधिकार वडलांचा !

आमचा हा प्रवास म्हणजे माझ्या लग्नाचें वऱ्हाडच होतें. तसें म्हटलें तर त्या वेळीं मी लग्नाच्या दृष्टीने अगदीच लहान नव्हतें. पण असें असलें तरी आईबाबांनी वरसंशोधनाच्या बाबतींत चुकूनहि माझी संमति घेतली नव्हती. तो काळच असा होता की लग्नाच्या बाबतींत मुलीची संमति घेण्याची आईबापांना जरूरीच भासत नसे. व या सामाजिक रूढीमुळे आपले विचार बोलून दाखविण्याची संधि मुलींना कधीहि मिळत नसे. असें असलें तरी आपल्या मुलीचें कल्याण होईल अशाच भावनेने आईबाप वरशोधन करीत असतात. म्हणून आपल्या मुलीला योग्य सहचर निवडण्याच्या बाबतींत, जगाचा सर्व दृष्टीने अधिक अनुभव असलेल्या तिच्या आईबापांनी स्वतःचाच अधिकार चालविला तर त्या काळच्या परिस्थितींत तसें करणें अगदीच गैर होतें असें म्हणतां येणार नाही. त्यांच्या असल्या अधिकाराचा एकूण समाजजीवनावर मोठाच अनिष्ट परिणाम झाला असें म्हणावें तर तेंहि सिद्ध करून दाखवितां येणार नाही. पण स्वतःच निवडलेल्या आजच्या सुधारलेल्या जमान्यांतील पतिराजाबरोबरचे आताच्या सुशिक्षित व प्रौढ मुलींचे संसार पाहिले म्हणजे मात्र त्यांच्या त्या निवडींत विवेक नसून विकारच असतो असेंच अनुमान काढणें भाग पडतें. येवढें मात्र खरें की तासागणिक नवीन विचारप्रवाह सुरू होणाऱ्या सध्याच्या नव्या जगांत जुनें तें सर्वच सोनें असेंहि मानणें योग्य

सं. क्र.

ठरणार नाही. बदलता काळ व बदलती विचारसरणी यांना अनुसरून आवश्यक त्या सुधारणा व आवश्यक ते बदल व्हायलाच पाहिजेत. प्रश्न येवढाच की तसें करतांना तात्त्विक भूमिकेचें अधिष्ठान सुटणार नाही येवढी खबरदारी घेतली म्हणजे झालें !

## मी सौ. रमा केदार झाल्यें !

आम्ही याप्रमाणे काशीवरून वर्धेला आलों. थोडयाच दिवसांत तिथिनिश्चय करण्यांत आला. ता. १२ फेब्रुवारी १९१२ या रोजीं गोरजमुहूर्तावर माझें ह्यांच्याशीं लग्न होऊन मी कु० कृष्णा दाबकेची सौ. रमा केदार झालें; व ह्यांच्या हातांत हात घालून मी गृहप्रवेश केला. मी नुसतीच रमा केदार झालें नव्हतें तर वकिलीणहि बनलें होतें. ह्यांच्या प्रतिष्ठेबरोबरच ह्यांच्या वाढत्या वैभवाची स्वामिनीहि झालें होतें. मला सासूबाईच्या हाताखाली राहूनच संसाराचे धडे घ्यावयाचे होते. लग्नानंतर तीनचार दिवसांनी आईबाबा कांकेरला निघून गेले. ते गेल्यावर मात्र आपण निराळयाच जगांत प्रवेश केला आहे याची मला जाणीव झाली. माहेरीं रोज सकाळीं चहा पिण्याची मला सवय असे. त्याप्रमाणे येथेहि सकाळीं आपल्यास आता चहा मिळेल म्हणून मी सारखी वाट पाहत बसलें. तोंच चहा तर दूरच राहिला, पण 'बसलीस काय ? धाकटी जाऊ कामधंदा करीत आहे; तूंहि तिला मदत कर' असा सासूबाईचा खणखणीत आवाज माझ्या कानांवर पडला.

---

# मणी तिसरा

# लग्नानंतर— !

## भाजी वानून ठेव

आतापर्यंतचा माझा काळ छत्तिसगडमध्येच गेल्यामुळे मराठी भाषेचें माझें ज्ञान यथातथाच होतें. त्यांतल्या त्यांत सासूबाईंच्या तोंडचे खास नागपुरी शब्द तर आकलन होणें मला फारच कठिण जाई. त्यामुळे माझी हरघडी कुचंबणा होई. एक दिवस त्यांनी मला 'भाजी वानून ठेव' असें सांगून त्या स्वयंपाकासाठी पाणी आणण्यास नळावर गेल्या. त्यांनी काय सांगितलें हें मला कांहीच कळेना. भाजीची टोपली समोर घेऊन मी आपली बघत बसलें. त्या आल्यावर मी स्वस्थ बसलेली पाहून लगेच म्हणाल्या, 'अशी पाहत काय बसलीस पिशावाणी ?' तेवढयांत हे आंत आले, व ह्यांच्याकडून 'वानणें म्हणजे चिरणें' हा शब्दपर्याय मला अनायासें कळला.

## माय, मी म्युनि०चा मेंबर निवडून आलों

माझ्या लग्नानंतर लवकरच हे म्युनिसिपालिटीचे सदस्य निवडून आले व ही बातमी सांगायला मोठ्या आनंदाने घरांत आले. हे आपल्या आईला म्हणाले, 'माय, आपल्या मोहल्ल्यांतून मी म्युनिसिपालिटीचा मेंबर म्हणून निवडून आलों.' सासूबाईंना मोठाच आनंद झाला व त्या म्हणाल्या, 'बरं झालं बाबा ! पण नाना, तू आता मेंबर ालास तेव्हा आपल्याकडील नळास यापुढे भरपूर पाणी येईलच !'

## ‘मोठा तालेवारच दिसतोस तूं!’

आमच्या घरांत पूर्णपणें जुन्या तऱ्हेचें वळण असून सोवळें ओवळेंहि बरेंच कडक होतें. सासूबाईंचा स्वभाव करारी व तापट होता पण अंतःकरणाच्या त्या प्रेमळ होत्या. तरी त्यांची घरांतली शिस्त मोठी कडक! मुलगा वकील होऊन मिळविता झाला तरी सासूबाईंची पूर्वींची वृत्ति कायमच होती. ‘आता घरकामाला नोकर ठेवूं’ असें ह्यांनी आईला सुचविलें. तेव्हा सासूबाईंनी लागलीच म्हटलें, ‘घरांत दोन सुना असतांना नोकर ठेवायचा! मोठा तालेवारच दिसतोस तूं!’ त्यांचें हें उत्तर कांही गैरवाजवी होतें असें समजतां येणार नाही. आजवर त्यांनी इतका पैसा पाहिला नव्हता. तो मिळूं लागल्यावर नोकरचाकरापायीं खर्च करणें त्यांच्या दृष्टीने पैशाचा खासच अपव्यय होता.

## सासूबाईंचें सोवळें ओवळें

माझें बाळपण सुखांत आणि लाडांत गेलेलें. इकडची काडी तिकडे करण्याची मला सवय नव्हती. त्यामुळे मला जड जाऊं लागलें. सासूबाईंच्या शिस्तीखाली घरांतील कामधंदा करतांना माझी मोठीच तारांबळ उडत असे. सोवळ्याओवळ्याचें तारतम्य सांभाळणें तर मला मोठेंच कठिण जाई. त्या बाबतींत माझ्याकडून बऱ्याच वेळां चुका होत आणि त्यामुळे सासूबाईंचा रोषहि पत्करावा लागे.

## मी शिकलेली मुलगी होतें

माझ्या लग्नानंतर मला अशी माहिती मिळाली की, ह्यांचें माझ्याशीं लग्न होण्याला सासूबाईंचा विरोध होता. कारण मी एक सुधारलेल्या वातावरणांतील व शिकलेली मुलगी होतें. माझें शिक्षण तें काय! चार वर्ग हिंदीचे व दोन वर्ग इंग्रजीचे, येवढेंच! पण

त्यांच्या दृष्टीने मी ‘ शिकलेली ’! सासूबाईंचा जरी माझ्या लग्नाला विरोध होता तरी हे आता घरांतील कर्ते पुरुष झाल्यामुळे व माझ्याशीं लग्न करण्याचा ह्यांचा दृढ निश्चय असल्यामुळे सासूबाईंचा नाइलाज होऊन त्यांना संमती देणें भाग पडलें. पण याचा परिणाम म्हणून, प्रारंभीं कांही दिवस मला सासुरवासाचा चांगलाच अनुभव मिळाला.

## गृहिणीजीवनाची कसोटी

कौटुंबिक जीवनांत ह्या गोष्टी सर्वसाधारणपणें घडत असतात. त्या सहन करण्याची शक्ति मुलींच्या ठिकाणीं जात्याच असते. तेव्हा मीच या गोष्टीला अपवाद कशी असणार ! भविष्यकालीन आशेवर लक्ष ठेवून, सासरीं सुरवातीचे दिवस कंठणें नवविवाहित मुलींना क्रमप्राप्तच असतें. मला असें वाटतें की, भट्टींतून तावून सुलाखून निघाल्याशिवाय सोन्याची कसोटी ठरत नाही त्याचप्रमाणे आम्हां बायकांचें जीवनहि, संसाराच्या सुरवातीला अशा तऱ्हेचे टक्केटोणपे सहन केल्याशिवाय मोलवान ठरूं शकत नाही. आपल्या वात्सल्याने ‘ गृह ’ला सार्थ करणारी गृहिणी या कष्टमय जीवनांतूनच प्रकट होत नाही काय ? आणि त्याचमुळे ‘ न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ” हें वचन मला ध्येयसूत्र वाटतें.

## चहा फक्त सर्दी खोकल्यासाठीच

माझी ही केविलवाणी स्थिति पाहून ह्यांना मात्र कसेंसेंच होई. मलाहि तें दिसत असे. पण ह्या गोष्टीला प्रकटपणें विरोध केल्यास घरांत संघर्ष निर्माण होण्याचा संभव होता. त्यामुळे ‘आपण बायकोचा कैवार घेतों’ असें सासूबाईंना चुकूनहि वाटूं नये याची हे चांगलीच दक्षता घेत आणि करायची ती गोष्ट मोठ्या चतुराईने

घडवून आणीत. माझ्या चहा पिण्याच्या सवयीचेंहि असेंच झालें. माझ्या लग्नाच्या अगोदर ह्यांच्याकडे चहा घेण्याची प्रथा नव्हती हें मागे सांगितलेंच आहे. चहा प्यायचाच झाला तर तो फक्त सर्दी-खोकल्यावर औषध म्हणूनच. मी चहा घेणारी आहें हें ह्यांना कळ-ल्यामुळे लग्नानंतर लवकरच ह्यांनी चहाची सामुग्री व उपकरणीं घरांत आणलीं व स्वतः रोज चहा घेण्याचें ठरवून आईकरवीं मला चहा तयार करण्यास सांगत. अशा रीतीने मोठ्या खुबीने ह्यांनी माझा चहाचा प्रश्न सोडविला.

## चुलीबाईला पहिलें नमन

एके दिवशीं रात्रीचा स्वयंपाक मीच करावा असा मला सासूबाईंचा आदेश झाला. ही सूचना ह्यांना फारच आवडली. आज आपली ही एक परीक्षाच आहे असें वाटून मी जरा अस्वस्थच झालें. पण उपाय नव्हता. सासूबाईंची आज्ञा होती ती ! लगेच मी सोवळें नेसून चुलीच्या आराधनेस लागलें. या वेळेपर्यंत पाकशास्त्राची मला नुसती तोंडओळखच होती. माझी अर्थातच तारांबळ उडाली. एक ना दोन अनेक विचारांचें काहूर माझ्या डोक्यांत उठलें. वाटलें, आईने माझें कोडकौतुक करून मला लहानाची मोठी केलें खरें, पण संसाराला आवश्यक तें शिक्षण मात्र दिलें नाही. मनांतल्या मनांत चुलीपाशीं बसून मी तिला दूषणेंहि दिलीं. आपल्या वेड्या मायेने तिने मुलीचे हातपाय भाजूं नयेत म्हणून तिला कधी चुलीजवळ जाऊं दिलें नाही; पण त्याचा परिणाम मात्र आज मला भोगावा लागत आहे. असा विचार येऊन माझ्या डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागल्या. मनांत विचार, डोळ्यांत पाणी, अशा स्थितींत मी चुलीवर स्वयं-पाकाचीं भांडीं ठेवूं लागलें. कसाबसा, जमला तसा मी स्वयंपाक तयार केला. माझ्या दृष्टीने तो चांगलाच झाला होता. पण मंडळी

जेव्हा जेवायला बसलो तेव्हा मात्र माझी पुरतीच फजिती झाली. कारण पोळ्या कच्च्या, भात पिचका व पिठलें खारट ढोण झालें होतें. जेवायला बसलेल्या मंडळींपैकी ह्यांच्याखेरीज इतरांनी, मला स्वयंपाकाच्या अज्ञानाबद्दल नांवें ठेवलीं व ती पानावरून उठून गेली. हे मात्र माझ्या 'सुग्रण'पणाबद्दल तोंड भरून स्तुति करीत पानावर तसेच बसून राहिले. त्यामुळे मी फारच खजील झालें व गुढग्यांत मान घालून चुलीजवळ गप्प बसून राहिलें.

## शिकलेल्या पोरींचा संसार वाऱ्यावरतीच !

तावडतोब सासूबाई आंत आल्या व 'चल, दूर हो' असें म्हणून त्या दुसऱ्या स्वयंपाकाला लागल्या. पण त्या वेळीं त्यांनी उच्चारलेलीं दोन वाक्यें माझ्या चांगलींच जिव्हारीं लागलीं. 'ह्या शिकलेल्या पोरींचा संसार वाऱ्यावरतीच होणार ! भटारखान्यांतील रोटया खाऊनच ह्या पोट भरणार !' हीं त्यांचीं बोलणीं तर मला बोचलींच पण आपण गृहकृत्यांत नैपुण्य संपादन करावें अशी तीव्र इच्छा मला त्यामुळे उत्पन्न झाली.

## नोकराने दाखविलेली सहानुभूति

मी केलेला तो स्वयंपाक अगदीच वाया गेला नाही. आमच्याकडे एक असाच कोणी म्हातारा मनुष्य राहात असे. त्याचें कोणीच नव्हतें म्हणून तो आमच्याकडेच पडलेला असे. त्याच्या वाटणीला तें अन्न गेलें. त्याच्या तोंडांत दांत नव्हते व तो मिठाचा फार भोक्ता होता. तेव्हा त्याला तो पिचका भात व खारट पिठलें फार मनापासून आवडलें. खाऊन त्याने समाधानाचा ढेकर दिला व म्हणाला, 'आज सूनबाईनी अगदी माझ्या मनासारखें जेवण केलें' कोणाकडून नसली तरी नोकराकडून कां होईना, दाखविलेली सहानुभूति पाहून माझ्या

मनाला थोडें तरी हलकें वाटलें. सासूबाईंनी केलेल्या स्वयंपाकांत घरांतील लोकांचीं जेवणें उरकलीं व ते नित्याप्रमाणे माजघरांत झोपले. माझी निजण्याची जागा स्वयंपाकाची खोलीच असल्यामुळे मीहि नंतर आपली खाट टाकून आडवी झालें. पण मला झोप कशी येणार ?

## त्या शब्दांची जादू

घडलेल्या प्रकारामुळे मी फारच कष्टी झालें होतें. माझी मलाच लाज वाटली. आणि स्वतःच्या दुर्बलतेची कीव आली. इतरांचीं खोचट व कुजट बोलणीं मला बोचत असलीं तरी ह्यांनी चालविलेल्या अवास्तव स्तुतीने मात्र मी गुदमरूनच गेलें. कांही केल्या मला झोप येईना. त्या वेळीं मला आईची आठवण झाली व मी मुसमुसून रडूं लागलें. माझें मुसमुसणें ह्यांना ऐकायला गेलें असावें. बाकीची मंडळी झोपी गेलेली पाहून ह्यांनी चोरपावलांनी खोलींत प्रवेश केला व जवळ येऊन अतिशय मधुर शब्दांनी हे माझें सांत्वन करूं लागले. माझ्याशीं बोलण्याचा ह्यांचा तो पहिलाच प्रसंग ! ह्यांच्या त्या प्रेमळ शब्दांची जादू कांही निराळीच होती. ह्यांच्या त्या शब्दांनी माझ्या मनाला बरेंच हायसें वाटलें.

## सासुरवाडीला भेट

आमच्या लग्नानंतर चार महिन्यांनी माझ्या बाबांकडून ह्यांना कांकेरला येण्याविषयीं आग्रहाचें निमंत्रण आलें. त्याप्रमाणे आम्ही कांकेरला जाण्यास निघालों. धमतरीला जाऊन पुढे ३६ मैलांचा प्रवास बैलगाडींतून करावा लागत असे. लग्नानंतर मी आता प्रथमच माहेरीं जात होतें. त्यामुळे केव्हा एकदांचें कांकेर येतें व मी आईच्या गळ्यांत जाऊन पडतें असें मला होऊन गेलें होतें. लग्न होईसतों आईला सोडून एक दिवसहि मी तिच्यापासून कधीच दूर झालें

नव्हतें म्हणून आईच्या भेटीसाठी माझा जीव आसुसला होता. त्यामुळे आम्ही रात्रीचा प्रवास सुरू केला. याचें कारण माझी उत्कंठा तर होतीच, पण दुसरें कारण असें की तिकडचे बैल दिवसांपेक्षा रात्रीच जोराने चालतात असा अनुभव आहे. ह्यांना जंगलांतून प्रवास करण्याचा प्रसंगच आजवर कधी आला नव्हता. सभोंवार दाट जंगल पाहून ह्यांना मौज तर वाटूं लागली; पण त्याबरोबरच जंगली श्वापदां-ची भीति पण वाटूं लागली. ह्यांनी हातांत एक चादर घेऊन आगपेटी जवळ ठेवली. उद्देश असा की, एखादें जनावर आलें तर चादर पेटवून त्याच्या अंगावर भिरकवतां येईल. ह्यांनी प्रसंगावधान राखलें होतें खरें पण तसला प्रसंग येण्यापूर्वीच, हवेच्या गार झुळकीने व घुंगरांच्या मंजुळ नादाने आम्हांला केव्हा झोप लागली हें कांहीच कळलें नाही.

माझा मोठा भाऊ कमलाकांत आम्हांला घ्यायला धमतरीला घरची बैलगाडी घेऊन आला होता. तो गाडी हाकीत होता. सोबतीला एक नोकर मात्र होता. मध्यरात्रीच्या सुमारास आस्वलांची जोडी रस्त्याच्या कडेला उभी असलेली त्यांच्या नजरेला पडली. 'हात हूत' असा आरडाओरडा करून नोकराने हातांतील जळत्या कोलिताला फुंकर घालून तें पेटविलें. गंमत अशी की, ती आस्वलांची जोडी विस्तवाला भिऊन जंगलांत पळून गेली.

दुसरे दिवशीं सकाळीं ही आस्वलांची गोष्ट ह्यांना कळली तेव्हा हे चांगलेच घाबरले. ह्यापुढे जवळ बंदुक घेतल्याशिवाय आपण कांही पुन्हा कांकेरला येणार नाही, असा निश्चय ह्यांनी बोलून दाखविला.

### माझी बाबी रोडावली असेल

रस्त्यांत जंगली फळांचा स्वाद घेत घेत आम्ही एकदांचे दीड दिवसाने कांकेरला जाऊन पोहोचलों. गाडी घराजवळ जातांच मी पटकन् उडी मारली व आंत जाऊन आईला कडकडून मिठी मारून

तिच्या कुशींत तोंड खुपसलें. जणूं चार महिने झालेला आईचा वियोग एका मिठींत मला भरून काढावयाचा होता! आईला वाटत होतें 'माझी बाबी आधीच किडकिडीत, नाजुक प्रकृतीची; ती आता अधिकच रोडावली असेल!' दोन्ही हातांनी तिने माझें तोंड वर करून ती माझ्याकडे न्याहाळून पाहूं लागली. तों तिच्या कल्पनेपेक्षा माझ्यांत निराळाच बदल झालेला तिला दिसून आला.

### कांकेरची नवलाई

कांकरचें सारेंच वातावरण ह्यांना नावीन्यपूर्ण वाटलें. आमच्या घरासमोर दिसणारा उंच डोंगर, झुळझुळ वाहणारी घरामागची नदी, हें दृश्य ह्यांना फार आवडलें. त्याप्रमाणें तेथील सुवासिक तांदळाचा भात व घरच्या वाडींतील ताजा भाजीपाला आणि फळ-फळावळीने ह्यांचें मन फारच प्रसन्न होई.

त्या काळीं कांकेरला कमालीची स्वस्ताई होती. दोन चार आण्यांत टोपलें भरून पिकलेले आंबे मिळत. भाजीबाजार तर कव-ड्यांनीच होत असे. त्याकरतां तांब्याच्या नाण्यांची कधीच फारशी गरज भासत नसे म्हटलें तरी चालेल. मिठाच्या मापांच्या बरोबरीने सुरेख टपोऱ्या दाण्यांची चारोळी मिळायची. ही स्वस्ताई पाहून ह्यांना मोठेंच नवल वाटलें.

### राजेसाहेबांच्या भेटीस—

बाबांच्या बरोबर हे एके दिवशीं तेथील महाराजा कोमलदेव यांच्या भेटीस गेले. तेव्हा राजेसाहेब अगदीच साध्या वेषांत राज-वाड्याबाहेर उभे होते. तेथे काम करणाऱ्या मजुरांना 'वो डाहर पतरा मनला डालो' (तिकडे दगड टाका) असा छत्तिसगडी भाषेंत हुकूम करीत होते. बाबांनी त्यांना लागलीच लवून मुजरा केल्यामुळे

ह्यांना तर आश्चर्यच वाटलें. बाबांनी महाराजांचा परिचय करून दिला तेव्हा ह्यांनी पण हात जोडून नमस्कार केला. नंतर राजेसाहेब तेथेच एका दगडावर बसले. त्यामुळे ह्या मंडळींनाहि खालीच जमिनीवर बसावें लागलें.

## श्वापदांना माझीच भीति वाटली !

थोडा वेळ औपचारिक बोलणें झाल्यावर महाराजांनी ह्यांना शिकार पाहण्यास येण्याचा आग्रह केला. महाराजांना शिकारीचा फार नाद. ह्यांनाहि शिकार पाहण्याची हौस वाटल्यामुळे ह्यांनी येण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं घरीं हत्ती आल्यावर हे शिकार पाहण्यास जंगलांत गेले. परंतु त्या दिवशीं एकहि शिकार न गवसल्यामुळे राजेसाहेबांपेक्षा ह्यांचीच मोठी निराशा झाली. घरीं आल्यावर हे माझ्या बाबांना म्हणाले, 'आज राजेसाहेबांबरोबर शिकारीस मी असल्यामुळे तुमच्या जंगलांतील एकहि श्वापद मला भिऊन बाहेर आलें नाही.' ह्यांच्या अशा विनोदी बोलण्याने बाबांना मोठी गंमत वाटली.

## कांकेरच्या मुक्कामांत

कांकेरच्या मुक्कामांत ह्यांनी तेथील बहुतेक स्थळें पाहिलीं. उंचच उंच पर्वतराजी, दऱ्याखोरीं आणि घनदाट जंगलें हींच तेथलीं प्रेक्षणीय स्थळें ! एके दिवशीं कांही मंडळीच्या आग्रहावरून डोंगरावर जाण्याचा बेत ठरला. डोंगर चढतांना श्रम जाणवूं नयेत म्हणून गाणीं म्हणत असतात. अशा प्रकारें या समूहगीतांच्या योगें खेळकर वातावरण निर्माण केल्या जातें. ह्यांनीहि या समूहगीतांत भाग घेतला व छत्तिसगढी गाणें मोठ्या मौजेने म्हणूं लागले. त्यामुळे इतर मंडळींना मोठी मौज वाटली. त्या वेळीं जें गीत गाईलें जात होतें तें असें होतें,

ग्रं. नं.

"डोंगरीना उपर दावा लागत है
खिडकीमें पडे अंजोर रे
सगाभाई हमरे ले लेहो जोहार रे ॥"

वास्तविक हें गाणें अर्थशून्य आहे; पण आपले श्रम हलके करण्यासाठी ते लोक असल्या ग्रामगीतांचा खूप उपयोग करतात. या गीताचा अर्थ असा: 'डोंगराच्या वर वणवा लागला आहे व त्याचा उजेड माझ्या घराच्या खिडकींत पडला आहे; माझ्या नातेवाईकांनो माझा रामराम घ्या."

अशा ह्या हेंगाडया पद्धतीचें गाणें हे समरसतेने म्हणूं लागले. कोण्याही लोकांशीं लौकरच समरस होऊन त्यांच्या चालीरीती समजून घेणें हा तर ह्यांचा स्वभावधर्म होता. त्यामुळे ह्यांच्याविषयीं दुजाभाव असा कोणालाच फार काळ वाटत नसे.

## जोगी गुम्फा

या डोंगरावर चढून गेलें म्हणजे वर चांगलें पठार आहे. तेथून खाली कांकेर गावचा देखावा मोठा नयनमनोहर दिसतो. वर शंकराचें एक पुरातन मंदिर असून लगतच एक जलाशयहि आहे. बरोबरच्या मंडळींनी तळयांत उडया मारून मनसोक्त पोहून घेतलें. ह्यांना मात्र ती कला अवगत नसल्यामुळे काठावर बसूनच त्यांची मौज पाहत राहावें लागलें. तेथे एक 'जोगी गुंफा' नांवाचें रमणीय स्थान आहे. त्या गुंफेंत कोण्याकाळीं होऊन गेलेल्या एका साधूच्या दगडी खडावा ठेवलेल्या आहेत. भाविक लोक त्यांची पूजा करतात. एक महाभाग या सुमारासहि बऱ्याच दिवसांपासून तपश्चर्या करीत असलेला आम्ही पाहिला. जंगलांतील कंदमुळें व फळें खाऊन त्याने आपली तपश्चर्या चालविली आहे असें आम्हांला सांगण्यांत आलें. या गुंफेची लांबी किती तरी मैल असून तिचें दुसरें टोक ओरिसा प्रांतांत आहे अशी आख्यायिका आहे. तें कांहीही असो ह्यांना मात्र हीं सर्व स्थळें फार आवडलीं.

## प्रवास दिवसालाच करायचा !

अशा प्रकारें १०–१२ दिवस कांकेरला पाहुणचार आटोपून आम्ही तेथून निघालों. ह्यांनी या वेळीं अगदी ठरवून टाकलें होतें की वाटेंत एक दिवस जास्त लागला तरी हरकत नाही, पण आता बैलगाडीने रात्रीचा प्रवास कसा तो करायचा नाही. ह्यांचा हा विचार मलाहि छानच वाटला. कारण बैलगाडीचा अखंड असा लांबचा प्रवास कंटाळवाणाच होतो. शिवाय वाटेंत एक दिवस अधिक मिळाला तर तेवढीच मौज ! या वेळीं गाडींत आम्ही दोघेच असल्यामुळे मनसोक्त बोलायला मिळणार होतें. शिवाय निघतेवेळीं आईने आमच्या बरोबर गोड व खाऱ्या खाद्य पदार्थांचा साठा पण भरपूर दिला होता. ह्यांच्या आवडीचे वाटल्या डाळीचे लाडू व खुसखुशीत चिवडयाचा डबा समोर ठेवून त्यांचा समाचार घेतघेत आमच्या गप्पागोष्टी चालत होत्या.

## माझ्या गुरुजींची गम्मत

ह्यांनी माझ्या शाळेबद्दलची माहिती विचारायला सुरवात केली. त्याप्रमाणे शाळेंतील मुलींची एक एक गोष्ट सांगून झाल्यावर आमचे एक म्हातारे 'अटके' गुरुजी होते त्यांची हकीकत मी सांगू लागलें. वाक्य बोलतांना एखाद्या शब्दाजवळ ते जे अडखळायचे ते 'आ–आ'च करीत राहयचे बराच वेळ. आम्हांला त्यांची बरीच गंमत वाटे. ते शाळेंत आल्यावर आम्हांला अभ्यास नेमून द्यायचे व विडा खाऊन टेबलावर पाय ताणून खुशाल घोरूं लागायचे. अशा वेळीं त्यांचें तोंड उघडें राही. मग आम्हां मुलींना त्यांची खोडी करण्याची हुक्की येई. हळूच लहानसा कागदाचा बोळा करून त्यांच्या तोंडांत टाकून द्यायचा. त्यांची झोंप उघडली म्हणजे तोंडांतला कागद विडा समजून ते चघळूं लागत. त्यांचें कागद चघळणें सुरू झालें

म्हणजे आम्हांला हसें आवरेनासें होई व आम्ही साऱ्याच मुली बाहेर धूम ठोकीत असूं. आमचें पोटभर हसून झाल्यावर आम्ही वर्गांत आलों म्हणजे ते म्हणायचे, "तुम सब लडकियाँ एकसाथ और एक वखत पर बाहर कैसे जाते ?" आम्ही मुली त्यांना काय सांगणार ? गुरुजींची ही गोष्ट ऐकून ह्यांना बरीच गंमत वाटली.

**बाळपणचे खेळ**

मी सांगत असलेल्या गोष्टी हे मोठ्या कुतूहलाने व तन्मयतेने ऐकत होते. श्रोता चांगला मिळाल्यावर वक्त्याला हुरूप येणारच ! त्यामुळे मी सुद्धा गोष्टी सांगतांना बरीच रंगून गेलें. त्यानंतर मी ह्यांना तिकडे खेळल्या जाणाऱ्या कांही क्रीडाप्रकारांचें वर्णन सुरू केलें. ह्या वेळपावेतों ह्यांनी खमंग चिवड्याचा डबा अर्ध्याहून अधिक रिकामा केला होता.

नागपूरकडे 'भराडी गौर' नांवाचा एक खेळाचा प्रकार आहे. तसाच छत्तिसगडांत श्रावण महिन्यांत मुली हा खेळ खेळतात. मुली नाना प्रकारचीं, रंगीबेरंगी फुलें गोळा करतात व जिच्याकडे गौरापार्वती बसली असेल तिच्या घरीं सायंकाळच्या सुमाराला जाऊन मूर्तीला फेर घालून बसतात. नंतर आपल्या परडींतलें एका जातीचें फूल किंवा पान हातांत घेऊन—

'मोरे गौरा तो मांगे, चंपाकेरे फुलवा,
काहेके बरना, हरदीके बरना,
हरदीके बरनामें चंपा के फुलवा '

अशा गीताने सर्व जातीच्या फुलांचीं नांवें घेऊन फुलें वाहायचीं. नववे दिवशीं पार्वतीजवळ एक कोवळी काकडी ठेवून दहाव्या दिवशीं पार्वतीला 'बाळ' झाल्याचा उत्सव मानायचा व विसर्जन व्हायचें !

दुसरा खेळ पौषी पौर्णिमेला 'सुवानाच' म्हणून खेळल्या जातो. सुवा म्हणजे पोपट. या खेळाला पोपटनृत्य म्हणतां येईल. लहान लहान मुलेंहि हा खेळ खेळतात. काठीला बारीक घुंगरू बांधून ती काठी जमिनीवर आपटून—

' छोरी के छेरा छेर वरेली '

म्हणून घरोघरचें धान्य गोळा करतात व त्यांत वनभोजनाची मौज मारतात.

अशा तऱ्हेने बरेच खेळ मी लहानपणीं खेळत असे. तें ऐकून हे म्हणाले, ' तूं एकंदर बरीच खेळकर होतीस म्हणायची ! ' त्यावर मी ह्यांना म्हणालें, ' मला मात्र आपल्याकडील मुलींचे कोणतेच खेळ खेळतां येत नाहीत. '

## संसारांतील स्त्रीची भूमिका

तेव्हा हे एकदम म्हणाले, " म्हणजे ! अजूनहि खेळ खेळण्याची तुझी इच्छा आहेच ? तुझी तर आता संसाराच्या खेळाला सुरवात झाली आहे. ज्या हौसेने आणि उत्साहाने लहानपणचे खेळ खेळलीस तितक्याच हौसेने व उत्साहाने आता संसारांच्या खेळांत तुला भाग घ्यायला हवा ! त्यांत तूं प्राविण्य मिळवावेंस अशी माझी तुझ्या बाबतींत अपेक्षा आहे. आपला संसार सुखाचा आणि समाधानाचा करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्याकरितां आवश्यक भूमिका आता तुला स्वीकारली पाहिजे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट मी तुला सांगतों. ती म्हणजे संसारांतील स्त्रीचा त्याग. स्त्रीच्या त्यागावरच गृहसुखाची उभारणी होऊं शकते. अशा विशिष्ट चाकोरींतून जाणाऱ्या स्त्रीलाच थोरपणाची प्राप्ति होऊन ती एक आदर्श गृहिणी बनूं शकते."

ह्यांचे हे थोर, उदात्त विचार आकलन करण्याइतकी माझी बुद्धि त्या वेळीं प्रगल्भ झाली नव्हती. पण ह्यांच्या सुविचारांचा जो थोडा फार अर्थ माझ्या ध्यानांत आला त्यामुळे मात्र आपण 'सुगृहिणी' पदाला सुयोग्य बनावें अशी महत्त्वाकांक्षा माझ्या अंतःकरणांत प्रगट झाली. ह्यांचा त्या वेळचा तो उपदेश म्हणजे माझ्या भावी जीवनाचा एक महामंत्रच होता! हे पुढे म्हणाले,—

## संसारसुखाचा मूलमंत्र

"पुरुषांचा विवेक व स्त्रीचा त्याग हाच संसारसुखाचा मूलमंत्र आहे. स्त्री स्वार्थी बनली तर कुटुंबांतील व्यक्तींना ती आपलेपणाने वागवूं शकणार नाही. स्वतःच्या सुखापुढे ती दुसऱ्यांच्या सुखाची पर्वाही करणार नाही. यामुळे कुटुंबांतील स्नेहभाव नष्ट होतो आणि तसल्या कुटुंबाची अधोगति होते. म्हणून स्त्रीला उत्कृष्ट गृहिणी बनायचें असल्यास ती त्यागाची मूर्तिमंत देवता बनली पाहिजे. तसेंच संसारांत पतिपत्नीने एकमेकांचीं मतें ओळखून वागलें तरच संसारनौका उत्तम रीतीने आपला मार्ग आक्रमण करते." असें म्हणून ह्यांनी मला कण्व मुनींनी शंकुतलेला पतिगृहीं पाठवितांना केलेल्या उपदेशाचा सुंदर श्लोक म्हणून दाखवून त्याचा सुबोध रीतीने अर्थहि सांगितला. तो श्लोक असाः—

'शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने ।
भर्तुर्विप्रकृताऽपि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः ॥
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भोगेष्वनुत्सेकिनी
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः ॥'

अशा तऱ्हेने ह्यांच्याकडून मिळालेला तो उपदेश मी माझ्या हृदयाच्या गाभाऱ्यांत साठवून ठेवला आहे. मला मिळालेली ती एक अलौकिक देणगीच होती! किंबहुना, आयुष्यांत कधीहि रिते न

होणारे असे ते बोधामृताचे कुंभच होते !! खरेंच, त्यागवृत्ति संसारांत गोडी निर्माण करण्याचें साधन नव्हे काय? एकाच आत्म्याचीं दोन अंगें या भावनेने पतिपत्नींनी आपलें वर्तन ठेवलें तर संसारांत अखंड सुखाची निर्मिति होणें अशक्य आहे काय? एक दुसऱ्याकरतां आहे, ही भावना पतिपत्नींनी आपल्या ठायीं निर्माण करावी म्हणजे संसारसुख कांही लांब नाही. कदाचित् कांही वाचकांना माझे हे त्यागमय जीवनाचे विचार रुचणारहि नाहीत. पण माझ्या आयुष्यांत मला लाभलेल्या अनुभवाने मी असें म्हणत्यें की स्त्रीच्याच केवळ नव्हे तर पुरुषी जीवनांतहि त्यागाला थोर पद आहे. अरे पण, विचारांच्या भरांत मी फारच लांब वाहावत गेलें आहें, चला मी आता तुम्हांला फिरून आमच्या बैलगाडींतल्या संवादावर आणून सोडतें.

**मनावर दडपण पडलें**

या वेळीं ह्यांनी जो हा उपदेश केला त्याच्या भाराखाली माझें मन अक्षरशः भारावून गेलें होतें. आपल्या अंगीं येवढी पात्रता येईल की नाही या विचाराने मी किंचित् गंभीर झालें, कांहीशी चिंतामग्न झालें. माझी ही मनःस्थिति ह्यांच्या तावडतोब लक्षांत आली. हे म्हणाले, "कसला एवढा विचार चालला आहे? कसली तरी चिंता असल्याचें दिसतें आहे! कदाचित् माझा उपदेश पचनीं पडण्याइतकी आपली तयारी नाही असें तर तुला वाटत नाही? तसें असलें तर तूं त्याची काळजी करूं नकोस!" माझ्या मनांतील विचारप्रवाह ह्यांनी अचूक ओळखले होते. ह्यांच्या तीक्ष्ण नजरेतून मी आपलें अंतःकरण लपवूं शकलें नाही.

**तें दडपण नाहीसें झालें**

माझी मनःस्थिति ह्यांनी पुरती ओळखली, आणि म्हणून ते मला दिलासा देण्याच्या हेतूने म्हणाले, 'या उपदेशाचें ग्रहण करण्याची

पात्रता हळूहळू तुझ्या ठायीं निर्माण होईलच ! घरीं गेल्यावर मी तुला संस्कृत व इंग्रजी शिकविणार आहें.' एवढें बोलून ह्यांनी विषय बदलविला व मला माझ्या मैत्रिणींविषयी आणखी कांही माहिती विचारली. मला शिकविण्याची ह्यांची इच्छा ऐकून मलाहि हुरूप वाटला व मी मनांतली काळजी सोडून पुनः आपल्या गोष्टींना सुरवात केली.

## दोघीशीं माझें 'बधलें' होतें.

मला पुष्कळ मैत्रिणी होत्या, पण जीवाभावाच्या दोघीतिघीच होत्या. त्यांच्याशीं माझें 'बधलें' होतें. ('सखु' जोडण्याचा आपल्याकडे प्रकार आहे ना, तसलाच हा) राजेसाहेबांची मामेबहीण व मुख्य दिवाणाची कन्या यांच्याशीं माझें अनुक्रमें पांच फुलांनी (मरवा) व गंगाजलाने बधलें होतें. पांचफूल मैत्रिणीकडील मंडळींचा अजूनहि माझ्यावर मुलीप्रमाणे लोभ आहे. तिच्या आईला, या खेपेला मी भेटायला गेलें असतां, तिची मुलगी सासरीं असल्यामुळे मला पाहतांच रडूं कोसळलें. ह्या लोकांत मुलगी लग्न होऊन सासरीं गेली म्हणजे कांही खास कारणाशिवाय माहेरीं येत नाही. त्यामुळे अर्थातच मायलेकींच्या भेटीचे प्रसंग वारंवार येत नाहीत. 'तुम्ही तरी माझ्या बाबतींत असें करणार नाहीना !' माझा हा अल्लड प्रश्न ऐकून ह्यांना एकदम हसायला आलें.

## माहेर म्हणजे स्त्रीचा अभिमान

आम्हा बायकांना माहेरचा भारीच अभिमान. एकदा माहेरचा विषय निघण्याचा अवकाश, किती बोलूं नि किती नाही असें त्यांना होऊन जातें. माझेंच पहा ना ! माहेरचा विषय निघाल्याबरोबर माझें चऱ्हाट नकळत लांबतच चाललें. कांकेरला माझें बाळपण गेल्यामुळे,

रंग्याचा उल्लेख येतांच माझ्या साऱ्या गतस्मृति एकदम उफाळून आल्यास नवल तें कसलें ? माहेर हा शब्दच बायकांना इतका गोड वाटतो, की त्या आपल्या संसारांत व मुलाबाळांत रंगून गेल्या असल्या तरी त्यांच्या अंतःकरणांत माहेरची ती मधुर अनुभूति कुठे तरी वावरत असतेच ! एक वेळ पुरुष पत्नीकरता आपल्या आप्तांची उपेक्षा करील; पण स्त्री मात्र स्वतःच्या माहेरचा अभिमान कधीहि विसरणार नाही.

---

## मणी चवथा

# प्रबळ आशावाद

### मिरचीने गैरसमज केला

आम्ही कांकेरहून घरीं आल्यावर ह्यांना मूळव्याधीच्या विकाराचा त्रास झाला. सासूबाईनी निदान केलें की 'चारोळीच्या खाण्यामुळे हा विकार जडला असावा. कारण कांकेरला चारोळीचे पदार्थ ह्यांच्या खाण्यांत जास्त आले होते. त्यावर टोळीच्या ढेपीची धुरी देऊन मूळव्याधीला आराम पडला. एकंदर कांकेरचा प्रवास ह्यांना बराच आवडलेला दिसला. तेथील एकेक गम्मत सांगण्यांत तर हे बरेच दंग होत. रोज जेवतांना माझ्या आईने केलेल्या नवीन नवीन पदार्थांची ह्यांच्याकडून हटकून तारीफ होत असे. चण्याचें पीठ व धण्याचें कूट समभाग घेऊन त्यांत बेताचें मीठ घालून, हें मिश्रण मुटकळ बनेल इतपत तेलांत भिजवून तें ढोबळया मिरच्यांत भरून त्या तेलांतच शिजवायच्या. त्या मिरच्या ह्यांना भारीच आवडल्या होत्या. पण प्रथमच एके दिवशीं आईने रात्रीच्या जेवणांत ह्यांच्या पानावर देठासकट वाढलेल्या त्या मिरचीला ह्यांनी बराच वेळ हात लावला नव्हता. परंतु 'ही मिरची तर खाऊन पहा' असें जेव्हा ह्यांना आग्रहपूर्वक सांगण्यांत आलें तेव्हा त्याची चव घेतल्यावर हे आश्चर्य दाखवून उद्गारले, 'अरे वा ! ह्या वस्तूबद्दल माझ्या मनांत भलताच संशय आल्यामुळे मी तिला स्पर्श केला नाही.' ह्यांचें हें बोलणें ऐकून आम्हा सर्वांची हसतां हसतां पुरेवाट झाली. ही गोष्ट सासूबाईजवळ

सांगितली तेव्हा त्यांनाही हसूं आवरलें नाही. परंतु रोज चालणारें हें कांकेरपुराण सासूबाईंना तितकेंसें आवडलेलें दिसलें नाही.

## माझें शिक्षण सुरू झालें

वर्धेला आल्यावर कांही दिवसांनी आपल्या निश्चयाप्रमाणे ह्यांनी मला संस्कृत व इंग्रजी शिकविण्यास सुरवात केली. आधीच सासूबाईंचा मी शिकलेली म्हणून माझ्यावर भारी रोष. त्यांत ह्या शिक्षणाने तर अधिकच भर घातली. पण ह्यांची मात्र जबरदस्त इच्छा की मी शिकलेंच पाहिजे. त्यामुळे माझी मोठी कुचंबणा व्हावयाची! इकडे आड व तिकडे विहीर असें मला झालें होतें. तरीपण आता माझी आकांक्षाहि वाढलेली होती व शिक्षणाची गोडीहि मला लागली होती. त्यामुळे शिक्षण सोडावें असें मला वाटेना. शिवाय ह्यांची शिकविण्याची हातोटी इतकी विलक्षण व चटकदार होती की त्यांत मी आपोआपच रमूं लागलें. त्यामुळे प्रसंगविशेषीं घरांतील कामधंद्याकडे दुर्लक्षहि होत असे. त्याचा परिणाम सासूबाई माझ्यावर रागावण्यांत होई. कारण उघडच होतें की सासूबाईंच्या जुन्या वळणाच्या स्वभावाला माझें शिक्षण कांही मानवलें नाही.

## सासूबाईंचा वेगळाचार

एके दिवशीं तर माझ्यावर मोठा अकल्पित प्रसंग ओढवला. त्यामुळे मी चांगलीच भांबावून गेलें. नित्याप्रमाणे हे कोर्टांत गेल्यावर सासूबाईंनी घरांतील सामानाची वाटणी करून आपल्या धाकट्या मुलासुनेसहित त्या दुसऱ्या घरांत राहावयाला गेल्या. या वेगळाचाराला 'मीच कारणीभूत झालें' असें वाटून मी मोठी त्रस्त झालें. सायंकाळीं हे कोर्टांतून घरीं आल्यावर झालेला एकूण प्रकार ह्यांच्या ध्यानांत आला. पण त्याबाबत माझ्याशीं एक अवाक्षरहि न बोलतां हे आल्यापावलींच आपल्या आईकडे गेले व जसें कांहीच घडलें नाही

अशाप्रमाणे आईशीं गप्पागोष्टी करून घरीं परत आले. माझ्यावर हा अनवस्था प्रसंगच ओढवला असें मला मात्र वाटायला लागलें. एक वेळीं एक व दुसरे वेळीं दुसराच असे नाना विचार माझ्या मनांत गर्दी करूं लागले. 'आता आपणाला शिकण्यास कांही अडथळा राहिला नाही' असें एकवेळ वाटे. 'पण येवढ्या लहान वयांत येवढा मोठा संसार आपण कसा सांभाळूं शकूं' असें वाटून मन भीतीनें थरारून जाई. असे परस्परविरोधी विचार मनांत येऊन कांही न सुचून मीं अखेर ह्यांना म्हटलें, 'माझ्यावर रागावून सासूबाई घरांतून निघून गेल्या. मी त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या पायावर डोकें ठेवून त्यांची माफी मागतें म्हणजे त्या घरीं येतील.' माझें हें बोलणें शांतपणें ह्यांनी ऐकून घेतलें आणि निर्विकार मनाने माझ्याकडे पहात म्हणाले, 'तूं धीर सोडूं नकोस. प्रत्येक घडामोडींत कांही तरी ईश्वरी संकेत असतोच हें लक्षांत ठेव!' आणि असें म्हणून 'मला भूक लागली. जेवणाची तयारी कर' अशी आज्ञा केली. ह्यांच्या ह्या खेळकर वृत्तीमुळे माझ्या मनावरचें ओझें बरेंच कमी झालें व मी स्वयंपाकाला लागलें.

### कर्तव्यबुद्धि कायमच राहिली

आई व धाकटा भाऊ अशा रीतीने जरी वेगळे राहूं लागले तरी हे आपली जबाबदारी विसरले नाहीत. भावाच्या संसाराची काळजी ह्यांनी सदैव वाहिली आणि न चुकतां त्यांच्या संसाराला आर्थिक मदत केली. आपल्या आईबद्दलची निष्ठा ह्यांच्या मनांत अढळ होती. हे आपलें मातेविषयीचें कर्तव्य करण्यास कधी चुकले नाहीत. आई-विषयीचा ह्यांचा आदरभाव अखेरपर्यंत तसाच कायम होता.

### ओंकारेश्वराची यात्रा

वरील घटना घडून आल्यानंतर तीनचार महिन्यांनी नाताळ-च्या सुटींत ह्यांनी ओंकारेश्वर, उज्जैन वगैरे ठिकाणीं जाण्याचा बेत

केला. आपल्या आईला यात्रा घडवावी या उद्देशानें सासूबाईंनाहि बरोबर घेऊन आम्ही यात्रेला निघालों. वाटेंत सासूबाईंच्या सोवळया ओवळयाची चांगली व्यवस्था ठेवल्यामुळे त्या फार प्रसन्न होत्या. शिवाय आताशा माझ्यावरचा पूर्वीचा त्यांचा रोषहि पुष्कळच कमी झाला होता, नव्हताच म्हटला तरी चालेल. त्या मला आता प्रेमानें वागवूं लागल्या. याचें कारण काय असेल तें असो, पण मला असें वाटतें की दूरच्या माणसाबद्दल आपोआपच प्रेम उत्पन्न होत असतें. आमचा वेगळाचार होऊन सासूबाई वेगळया राहूं लागल्या त्यामुळे त्यांची माझ्याविषयीची पूर्वीची भावनाहि बदलली असावी. यामुळे ह्यांनी त्या वेळीं उच्चारलेल्या वचनाची मला स्मृति होऊन गतघटनें-तील 'ईश्वरी संकेता'चा प्रत्यय आला. ओंकारेश्वरीं सासूबाईंनी शंकराला अभिषेक केला व आपल्या मोठ्या सुनेला पुत्रप्राप्ति व्हावी यासाठी नवसहि केला.

## नव्या घराची सुरवात

यात्रेवरून आम्ही घरीं परत आल्यावर पुढे वर्धा येथे स्वतःचें घर बांधण्याचा ह्यांनी विचार ठरविला. त्या वेळीं केवळ ३०० रुपयांचीच आमच्याजवळ माया होती. येवढ्या रकमेंतच ह्यांनी घर बांधण्याचा निश्चय केला व तो तडीसहि नेला. परिस्थितीपुढे हताश होणें ह्यांना ठाऊकच नव्हतें. कोणतीहि अडचण येवो तिला धैर्यानें तोंड देऊन तींतून निभावून जावयाचें अशी ह्यांची वृत्ति बनली होती. घराला सुरवात होतांच, पैशाबद्दल आम्हीं शंका व्यक्त केली. ह्यांनी त्याच क्षणीं उत्तर दिलें की, 'तुम्हांला त्याची काळजी नको; मी समर्थ आहें.' ह्यांचें नशीबहि मोठें शिकंदर होतें. त्याच सुमारास ह्यांना वणी तहसिलींतून एक दोन मोठ्या केसेस मिळाल्या. त्यांसाठी ह्यांना वरचेवर वणीस जावें लागे. तेथून पैसे आणावे व

घरकामास लावावे असा क्रम किती तरी दिवस चालू होता. त्या वेळीं वणीचा प्रवास मोठा खडतर होता. आगगाडी अगर मोटारीची सोय नव्हती. वरोडयाहून दोन मरतुकडया घोडयांच्या टांग्यांतूनच तो प्रवास करावा लागे. शिवाय ह्या प्रवासांत वाटेंत एक पाटणची मोठी नदी आडवी असल्यामुळे पावसाळयांत तिला ओलांडून जावयाचें म्हणजे मोठेंच कठिण कर्म !

### देव तारी त्याला कोण मारी

वणीला केसची तारीख सांभाळणें व इकडे घरकामाच्या खर्चाची तरतूदही करणें अशीं दोन्ही कर्तव्यें पार पाडणें ह्यांना भाग पडे. त्यासाठी कोणत्याहि प्रकारच्या अडचणीची ह्यांनी कधी तमा बाळगली नाही. एकदा तर वणीला जातांना पाटणच्या नदीला पूर असतांना ह्यांचा डोंगाच उलटण्याचा प्रसंग आला होता. पण आयुष्याची दोरी बळकट होती म्हणूनच त्या जीवावरच्या संकटांतून परमेश्वराने ह्यांना निभावून नेलें आणि पैशाच्या अडचणींतूनहि मुक्त केलें. कारण या केसमध्ये ह्यांना यश आणि पैसा दोहोंची चांगलीच प्राप्ति झाली.

### नशीबाचा योग

पैशाचा संग्रह करणें ही गोष्ट आयुष्यभरांत ह्यांना कधी साधली नाही. पण त्याबरोबरच ईश्वराने ह्यांना कधीच अडचणींतहि ठेवलें नाही. ह्या गोष्टीचा टोकताळा मला नेहमीच घडायचा ! प्रसंगविशेषीं अशी अडचण निर्माण होई तेव्हा हे म्हणायचे, 'मी ईश्वराकडे अर्जी केली आहे; माझी अडचण तो निभावून नेणारच !' आणि आश्चर्य असें की पक्षकाराच्या रूपाने एखादा दाता लागलीच प्रगट व्हावयाचा !

## सासूबाईंच्या नवसाची फलप्राप्ती

अशा रीतीने सुमारें वर्षभर हें घर बांधण्याचें काम मोठ्या धूमधडाक्याने सुरू होतें. तें आता जवळजवळ पुरें होत आलें होतें. याच सुमारास ओंकारेश्वरीं सासूबाईंनी केलेला नवस 'सफल' होण्याचा सुदिन उगवला. ता. २६ सप्तेंबर १९१३ रोजीं सासूबाईंनी दुसऱ्या नातवंडाचें मुखावलोकन केलें. आजीला जरी दुसरा नातू झाल्याचा आनंद झाला होता तरी ह्यांना मात्र मुलीची आवड असल्यामुळे आपला आनंद ह्यांनी प्रयत्नपूर्वक व्यक्त करण्याचें टाळलें व म्हणाले, 'आपल्याला तर बुवा ह्या वेळीं मुलगीच हवी होती !'

ह्यांच्याप्रमाणेच मलाहि मुलीची आवड होती. तीन मुली होऊन त्यांपैकी एकहि लाभली नाही. त्यामुळे मुलीचें कौतुक करण्याचें भाग्य आम्हांला लाभलें नाही. पण हें खरें असलें तरी मुलींच्या लग्नाच्या घोर अडचणींतून आमची अनायासें सुटका झाली हें तितकेंच खरें नाही काय ? आजीने आपल्या इच्छेप्रमाणे नातवाचें पाळण्यांतलें नांव 'विनायक' व आवडतें नांव 'बाबू' ठेवलें.

## आम्ही पुरुष आशावादी असतों

यानंतर कांही दिवसांनी सासूबाई आजारी पडल्या. औषधोपचार करण्यासाठी आम्हीं त्यांना आमच्याकडे आणलें. मी त्यांची मनापासून शुश्रूषा केली. थोडयाच दिवसांत त्यांना बरें वाटलें. मी त्यांची जी मनोभावें सेवा केली त्यामुळे त्यांचा माझ्याविषयीचा पूर्वग्रह पार बदलून गेला. घरांत आता मोठें प्रसन्नतेचें वातावरण खेळत होतें. सासूबाइचा झालेला हृदयपालट पाहून हे एके दिवशीं मला म्हणाले, 'पाहिलंस, मायचा तुझ्याविषयीचा अनुकूल ग्रह व्हावयास कांही काळ तरी विभक्तपणाची जरूरी होती. एका घराचीं

दोन घरें झालीं तेव्हा मलाहि वाईट वाटलें होतें. पण आम्ही पुरुष आशावादी असतों. तुम्हां बायकांप्रमाणे आम्ही मुळूमुळू रडत बसत नाही.' हे जें बोलत होते तें मला कमीपणा आणण्याच्या दृष्टीने नव्हते. तर माझ्या ठिकाणीं धैर्य निर्माण करण्याच्या उद्देशानेच बोलत होते. ह्यांच्या एकूण बोलण्याचें सार म्हणजे एवढेंच की, 'मनुष्याने नेहमीच आशावादी असावें; पण मनाचा निग्रहहि अवश्य ठेवावा.'

लवकरच घर तयार झालें व त्याची 'वास्तुशांत' करून आम्ही सर्व मंडळी स्वतःच्या नव्या घरांत राहावयास गेलों. या घराबरोबरच आपल्या धाकट्या भावालाहि ह्यांनी घर बांधून दिलें.

## मणी पांचवा

# वृत्तिदर्शन

अपेक्षन्ते न च स्नेहं न पात्रं न दशान्तरम् ।
सदा लोकहिते युक्ता रत्नदीपा इवोत्तमाः ॥
—सुभाषित

### सासूबाईंचा स्वर्गवास

मध्यंतरीं ३–४ वर्षांचा काळ गेल्यानंतर सासूबाई पुन्हा आजारी पडल्या. या वेळीं त्यांची प्रकृति फारच बिघडली होती आणि आता वयहि होत आलें होतें. त्यांनी आपल्या व्रतवैकल्याचीं उद्यापनें करून टाकण्याची इच्छा दर्शविली. त्यांच्या इच्छेनुसार तीं सर्व पूर्ण करण्यांत आलीं. पण शिवरात्रीच्या व्रताचें उद्यापन करायला अवसरच न मिळाल्याने तेवढें एक माझ्यावर सोपवून, त्या माउलीने आम्हांला शुभाशीर्वाद देऊन एक दिवस आपला देह ओंकारेश्वर-चरणीं ठेवला.

### वज्रादपि कठोराणि

सासूबाई गेल्यावर पुढे थोड्याच दिवसांत आमच्या घरांत पुन्हा एक तशीच घटना घडून आली. १९१८ सालीं इन्फ्लुएंझाने देशभर भयंकर कहर उडवून दिला होता. एक तरी मनुष्य दगावलें नाही असें घर क्वचितच सुटलें असेल. त्या धुमाकुळींत आमच्या घरांतील एक कोवळा जीव—सात महिन्यांची गोड मुलगी—बळी

पडली. ह्यांना मुलीची अतिशयच आवड असल्यामुळे ती गेल्याचें दुःख ह्यांना फारच जाणवलें. किती तरी दिवसपर्यंत बेबीची आठवण हे विसरले नव्हते. त्या सुमारास नुकतीच गडकऱ्यांची 'राजहंस माझा निजला' ही कविता 'मनोरंजन' मासिकांत प्रसिद्ध झाली होती. ती जेव्हा हे वाचूं लागले तेव्हा ह्यांचें अंतःकरण भरून आलें. 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' ह्या भवभूतीच्या वचनाप्रमाणे ह्यांच्या मनाची ठेवण होती.

### बाबांचाहि अंत झाला

मागे सांगितल्याप्रमाणे इन्फ्लुएंझाने आपल्या तडाख्यांतून एकहि खेडें सोडलें नव्हतें. खेड्यापाड्यांतूनहि सारखीच शोककथा ऐकायला येत होती. कांकेर संस्थानातहि त्याचा धुमाकूळ सुरू झाला. त्यांतच माझा मोठा भाऊ कमलाकांत निवर्तला. मुलगा सोडून गेल्यावर माझ्या वडिलांनी हायच खाल्ली. त्यांना पुत्रशोक असह्य होऊन एक वर्षाच्या आंतच त्यांचाहि अंत झाला. वडील आजारी असतांना ह्यांना कांकेरहून तार आली. त्या वेळीं हे वर्धेचे डॉ. मारोतराव यांना बरोबर घेऊन तात्बडतोब कांकेरला पोहोचले. पण म्हणतात ना विधिलिखित कांही टळत नाही. तेव्हा व्हायचें होतें तें झालेंच! आता यापुढे आईला तेथे एकटें राहणें योग्य नव्हतें, म्हणून ह्यांनी तिच्या सर्व पसाऱ्याची आवराआवर करून सर्व चीजवस्तूसह आईला घेऊन ते वर्धेला आले.

### आमच्या घरची चोरी

त्यानंतर लौकरच अक्षय्यतृतीयेच्या रात्रीं आमच्या घरीं चोरी झाली. चोरांनी आमच्या झोपण्याच्या खोलींतून तिजोरी बाहेर नेऊन फोडली होती. सकाळीं ही गोष्ट जेव्हा कळून आली तेव्हा ह्यांना भयंकर धक्का बसला. कारण आईचा सारा ऐवज तिजोरींतच

ठेवल्याचें ह्यांना माहित होतें. आधीच दुःखाने होरपळलेल्या बाईचें सर्वस्व आपल्या घरांतून चोरीस जावें याचें ह्यांना अतिशयच वाईट वाटूं लागलें. त्या घाबरलेल्या मनःस्थितींत हे मला म्हणाले, 'आता केवढं अपयश आलं आपल्या पदरीं ! आपण केलं सारं सदिच्छेनं; पण झालं भलतंच ! काय करावं, कांही सुचत नाही मला !!' त्यावर मी म्हणालें, 'इतकं कांही घाबरायला नको. आईच्या साऱ्या वस्तु मी दोन दिवसांपूर्वीच तिच्या स्वाधीन केल्या होत्या; त्या अगदीच सुरक्षित आहेत.'

## न भीतो मरणादस्मि

माझें हें बोलणें ह्यांनी जेव्हा ऐकलें तेव्हा कोठे ह्यांचा जीव खाली पडला व चेहेऱ्यावर समाधान दिसूं लागलें. परमेश्वराला धन्यवाद देत ते उद्गारले, 'आज माझी लाज राखली गेली ही तुझीच कृपा !' आपलें यश कोणत्याहि प्रसंगीं मलिन होऊं नये याविषयी आस्था-पूर्वक जपण्याची ही मनोवृत्ति पाहून ही आठवण लिहीत असतांना मला चारुदत्ताच्या 'न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः' ह्या वचनाची सहजगत्या आठवण होते.

## निढळाच्या घामाची कमाई !

या चोरीमुळे आमचें वास्तविक विशेष असें नुकसान झालें नव्हतें. कारण आधल्या दिवशीं संध्याकाळीं चैत्रगौरीच्या हळदी-कुंकवाला जातांना मला सगळेच दागिने घालून जाण्याची इच्छा झाली होती. आणि त्याप्रमाणे सरी, ठुशी, पुतळ्यांची माळ, नथ वगैरे घालून मी गेलें होतें. घरीं परत आल्यावर तिजोरी उघडण्याचा कंटाळा आला म्हणून अंगावरील दागिने दुसरीकडे ठेवून दिले होते. ही गोष्ट ह्यांना सांगितली तेव्हा हे स्मित करीत म्हणाले,

'जातील कशा? निढळाच्या घामाच्या पैशांनी मिळविलेल्या वस्तू आहेत त्या!'

**जमिनीची भारीच हौस**

१९१९ च्या २६ डिसेंबरला तिसरा मुलगा वसंत ऊर्फ दादा ह्याचा जन्म झाला. या वेळीं ह्यांनी वर्ध्याजवळ 'आंजी' येथे जमिनीची खरेदी केली. ह्यांना स्वतःला मालगुजार होण्याची भारी आवड! आयुष्यांत ह्यांना जितक्या कांही महत्त्वाकांक्षा होत्या त्यांत मालगुजार बनण्याची महत्त्वाकांक्षा फार प्रबळ होती, असें दिसून येत असे. त्याला अनुसरून प्रसंग येतांच ह्यांनी दादाच्या जन्माच्या वेळींच शेतीबरोबर एक मालगुजारी हिस्साहि खरेदी केला. जमीन खरेदी करण्याचें ह्यांना एक प्रकारें वेडच लागलें होतें असेंच म्हटलें पाहिजे. कारण कुठे 'जागा विकण्याची आहे' अशी माहिती ह्यांना समजण्याची खोटी की हे आपले ती जागा पाहून लगेच तिच्या खरेदीची भाषाहि सुरू करीत.

**हौसेला मोल नाही, पण बंधन हवेंच!**

एकदा आम्ही महाबळेश्वरला गेलों असतांना, तेथे घर बांधण्याची ह्यांना इच्छा झाली. ह्यांचें असें म्हणणें होतें की, 'आपला वाढता संसार आहे तेव्हा एखाद्या थंड हवेच्या ठिकाणीं स्वतःचें घर असणें अत्यंत आवश्यक आहे' या उद्देशाने तेथे एक मनाजोगी जागा विकत घेतली, पण तिच्यावर घर कांही उभारणें झालें नाही. आणि अखेर ती जागा गेली. करायचें मनांत आलें की करून टाकावें आणि मागाहून त्याची निराळ्या तऱ्हेने विल्हेवाट लावावी असें कांही बाबतींत तर नेहमी घडे. जमिनींच्या बाबतींतहि असेंच होई. तेव्हा अशा प्रसंगीं मला ह्यांच्या या कृतीला बंधन घालण्याची आवश्यकता भासत असे.

### एक भयंकर केस

मागे लिहिल्याप्रमाणे धंद्यांत ह्यांना चांगलेंच यश मिळूं लागलें होतें. एक उत्तम वकील म्हणून ह्यांची गणना आता होऊं लागली. हे दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही प्रकारच्या केसेस उत्तम रीतीने चालवीत; पण विशेषतः खुनाचे खटले यशस्वी रीतीने चालविण्यांत ह्यांचा हातखंडा होता. अशीच एक खळबळजनक केस सुरवातीला ह्यांनी चालविली.

वर्ध्याजवळील येळीकेळी ह्या खेडेगावीं एका तरुण पाटलाचा त्याच्या बायकोने आपल्या नोकराच्या मदतीने खून केला. आरोपीच्या बचावाचें काम ह्यांच्याकडे आलें. आजपर्यंतच्या सर्व केसेसमध्ये ह्यांनी आपल्या कौशल्याने आरोपीची सुटका केली असेंच मला आढळून येई व त्याबद्दल मला अभिमानहि वाटे. पण ही केस मात्र ह्यांनी चालवूं नये असें मला वाटत होतें. कारण ह्या केसमध्ये आरोपीने जो आपल्या नवऱ्याचा खून केला होता तो अत्यंत अमानुष व किळसवाणा होता. त्यामुळे त्या बाईबद्दल माझ्या मनांत भयंकर घृणा उत्पन्न झाली होती. आपलें इच्छित कार्य साधण्यासाठी त्या बाईने आपल्या नोकराला घरांत आटाळयावर तीन दिवसपर्यंत लपवून ठेवलें होतें. ह्या गोष्टीचा सुगावा लागूं नये म्हणून त्या बाईने पूर्ण दक्षता घेतली होती. त्याच्या खाण्यापिण्याची व इतर सर्व व्यवहारांची व्यवस्था आटाळयावरच मोठ्या शिताफीने केली होती. योग्य संधि मिळतांच दोघांनी मिळून पाटलाचा कुऱ्हाडीने खून केला. अशा बाईला केलेल्या कृत्याबद्दल शिक्षा झालीच पाहिजे असें माझें मत होतें.

### हेंच तर आमचें कसब

त्याप्रमाणे मीं ह्यांना म्हटलें की, 'ज्या बाईने आपल्या नवऱ्याचा खून केला तिला सोडविण्यांत अन्याय होत नाही काय ?'

त्यावर हे म्हणाले की, 'आम्ही ह्या गोष्टीचा विचार करायला लागलों तर आम्हांला धंदाच सोडावा लागेल. अशाच केसेसमध्ये आमचें खरें कसब दाखविण्यास वाव मिळतो. त्याशिवाय एक जीव वांचविण्याचें आम्हांला पुण्यहि मिळत नाही काय ?'

## केवढा हा बेडरपणा !

ह्यांनी त्या बाईची केस कोर्टांत उत्तम रीतीने चालविली आणि ती बाई पूर्ण निर्दोषी सुटली. तिची तुरुंगांतून सुटका झाल्यावर ह्यांनी तिला आमच्याकडे आणवली. तिचा तो विद्रूप अवतार पाहून मला कसेंतरीच झालें. तिच्या डोक्याचे केस कापून टाकण्यांत आले होते. हातांत बांगड्या नव्हत्या व अंगावर गुडघ्यापर्यंत एक जाडेंभरडें वस्त्र होतें. तिला लुगडें व बांगड्या देण्यास ह्यांनी मला सांगितलें. त्याप्रमाणे तिला त्या वस्तू देऊन तिच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली. ती १७ । १८ वर्षांची मुलगी होती. पण झालेल्या प्रकाराचा तिच्या मनावर कोणताच परिणाम दिसून येत नव्हता, याचें मला फारच आश्चर्य वाटलें. जरी तिच्याबद्दल माझ्या मनांत अनुकूल ग्रह नव्हता तरी ती एक स्त्री आहे ह्या भावनेने व तिच्या पुढील आयुष्याला योग्य वळण लागावें या इच्छेने तिला कांही मार्गदर्शन करावें असें वाटून, ती जायला निघाली तेव्हा मीं तिला विचारलें की, 'आता तूं ह्यापुढे काय करणार आहेस ?' माझ्या प्रश्नाला तिने जें उत्तर दिलें तें ऐकून मी थक्कच झालें. तिने मोठ्या बेडरपणाने म्हटलें; 'काय करणार म्हणजे ? मी आता दुसरा नवरा करणार !'

## लोकमान्यांचें स्वागत

या ठिकाणीं मला एक आठवण द्यावीशी वाटते. ती म्हणजे बहुतेक लो. टिळक मंडालेच्या तुरुंगांतून बंधमुक्त होऊन पुण्यास परत जाण्याच्या वेळची असावी. लोकमान्य वर्धेवरून जाणार असल्यामुळे

त्यांचें वर्धा स्टेशनवर स्वागत करण्यांत यावें असा ह्यांचा विचार होऊन ह्यांनी तो प्रतिष्ठित लोकांसमोर बोलून दाखविला. त्याला बऱ्याच मंडळीं-नी संमति दिली व स्वागताची मोठ्या उत्साहाने तयारी सुरू झाली.

लोकमान्यांविषयीची ह्यांची भक्ति व श्रद्धा जाज्वल्य होती. विद्यार्थिदशेंतच ह्यांच्या मनांत त्या महापुरुषाविषयीच्या श्रद्धेने मूळ धरलें होतें. आणि यापुढील ह्यांचें राजकीय जीवन पाहूं जातां तें लोकमान्यांच्या मत-पुरस्काराने रंगलेलें आहे असेंच आपणांला आढळून येतें.

## मलाहि इच्छा झाली, पण–!

तेव्हा, त्या आपल्या नेत्याचें स्वागत यथोचित पद्धतीने झालें पाहिजे अशी ह्यांची आकांक्षा असणें साहजिक होतें व त्याची मोठ्या धडाक्याने सुरवातहि झाली. त्या वेळचा ह्यांचा उत्साह मोठा दांडगा होता. तो पाहून आपणहि लोकमान्यांचें प्रत्यक्ष दर्शन घ्यावें अशी मला तीव्र इच्छा उत्पन्न झाली. पण माझ्या या इच्छेची पूर्ति होईल की नाही हाच एक मोठा प्रश्न होता. कारण वर्धा हें जिल्ह्याचें गाव असलें तरी त्या काळांत तेथील महिलावर्ग सुधारलेला नव्हता. त्यांनी कोणतीहि गोष्ट केली की, ती टीकेला पात्र होई. मग सार्व-जनिक कार्यांत भाग घेणें तर दूरच !

## पुरुष समाजांत स्त्रिया म्हणजे भ्रष्टाचार!

बरें, असा कोणी प्रयत्न केलाच तर तो टीकेचा विषय होई. पुरुष मंडळी तर नांव ठेवीतच; पण बायका देखील कुत्सितपणें बोला-यच्या ! पुरुष समाजांत बायकांनी जायचें म्हणजे केवढें पाप ! तो एक भ्रष्टाचार समजला जाई ! वर्धा येथे त्या वेळीं अशा बुरसटलेल्या विचारसरणीची जुनी पिढी होती. त्यामुळे मला ह्यांच्याजवळ गोष्ट काढायला धीरच होईना ! मनांत इच्छा तर प्रबळ होती आणि तळमळहि

वाटत होती. पण ही गोष्ट बोलून कशी दाखवावी हेंच मला सुचेना! हे आपणाला परवानगी देणार नाहीत, अशी मला शंका वाटत होती. पण अखेर मनाचा हिय्या करून मीं ह्यांच्याजवळ माझी इच्छा बोलून दाखविली. पण पहात्यें तों मला अगदीच उलटा अनुभव आला.

## ह्यांनी परवानगी दिली

मीं स्टेशनवर येण्याची गोष्ट काढतांच ह्यांनी मोठया आनंदाने परवानगी दिली. एवढेंच नव्हे तर 'आणखी कांही स्त्रिया येत असतील तर त्यांनाहि तुझ्या बरोबर घेऊन चल' अशी ह्यांनी मला सूचनाहि केली. ह्याच्या या परवानगीमुळे मला आनंद तर झालाच पण त्याहिपेक्षा मला ह्यांच्या निर्भय वृत्तीचा व तिजमधून प्रसृत होणाऱ्या प्रगत विचारसरणीचा अभिमान वाटला. लागलीच मी घरोघरीं जाऊन लोकमान्यांच्या स्वागतप्रसंगाला स्टेशनवर चलण्याचा कांही मैत्रिणींना आग्रह केला. माझ्या आग्रहाचा कुणी फारसा विचार केला नाही. कारण त्यांना रूढीचा बागुलबोवा भेडसावीत होता. तरीपण तीन भगिनींनी आपली तयारी दर्शविली, पण ती फार मुष्किलीने! बाकीच्यांनी अगदी एकच ठरीव उत्तर दिलें! त्या म्हणाल्या, 'आपण असलं भलतंसलतं कांही केलं नाही बाई आजवर! अन् आता कसं करणार!' पण एवढेंच नव्हे तर त्यांनी मला उपदेशामृताचे (!) घोट पाजण्यासहि कमी केलें नाही. महिलाजनांतील हा अनुत्साह पाहून मी अंमळ निराशच झालें. पण ह्यांनी मात्र मला उत्तेजन देऊन माझी निराशा पार घालवून टाकली.

## काय ह्यांची ती धांदल!

एकदाचा लोकमान्यांच्या आगमनाचा दिवस उजाडला. ह्यांची धांदल कांही विचारूच नका. ह्यांचा स्वभावच भारी गडबडया!

कोणतीहि गोष्ट करायची ठरली की, ती पार पाडतांना ह्यांची अशी धांदल नेहमीच उडायची! ह्यांच्या स्वभावाचें हें एक वैशिष्टयच होतें. ह्यांची अशी गडबड पाहून ह्यांच्याबरोबरच आपण जावें असें वाटून मींहि आपली तयारी केली. गाडी सकाळलाच येणार असल्या-मुळे, हे मोठया लगबगीने बाहेर पडले व 'तूं आपल्या मैत्रिणींसह ये' असें सांगून निघूनसुद्धा गेले.

### स्टेशनवरील एक 'अपूर्व दृश्य'

त्याप्रमाणे नंतर आम्ही चौघीजणी स्टेशनवर गेलों. मनांत संकोच होताच. तरी मोठा धीर धरून आम्ही स्टेशनवर जाऊन पोहो-चलों. स्टेशनवर लोकमान्यांच्या स्वागतार्थ बराच विशाल जनसमूह लोटला होता. सारें स्टेशन चैतन्याने नुसतें फुलून गेलें होतें. एवढया मोठ्या पुरुषसमुदायांत मी व माझ्याबरोबरीच्या त्या तिघी अशा आम्ही चारच स्त्रिया उमटून दिसत होतों. त्यामुळे तेथील जो तो आमच्याकडे पाहून मोठाच अचंबा करतांना दिसूं लागला. कित्येकांना तर आमचें आगमन म्हणजे एक 'अपूर्व दृश्य' आहे असें वाटल्यामुळेच ते गालांतल्या गालांत हसतहि होते. ह्या गोष्टीचा आम्हाला संकोच वाटून आम्ही नंतर प्लॅटफॉर्मच्या एका बाजूला उभ्या राहिलों. इतक्यांत ह्यांचें लक्ष आमच्याकडे गेलें व जेथून लोकमान्यांचें दर्शन आम्हांला चांगल्या तऱ्हेने घडूं शकेल अशा जागीं आम्हांला नेऊन उभें केलें. इतक्यांत लोकमान्यांची गाडी प्लॅटफॉर्मवर आली आणि 'लोकमान्य टिळक की जय' या निनादाने सारें स्टेशन दुमदुमून गेलें!

### लोकमान्यांच्या गळयांत पहिला हार

लोकमान्यांच्या स्वागताचें नेतृत्व ह्यांच्याकडेच होतें. त्यामुळे लोकमान्यांच्या गळयांत पहिला हार घालून ह्यांनी त्यांचें स्वागत केलें.

त्यानंतर इतरांनी हार घातल्यावर ह्यांनी लोकमान्यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली. लोकमान्यांनी छोटेंसें उद्बोधक भाषण केलें व ते आपल्या डब्यांत गेले. त्याबरोबर गाडीनें स्टेशन सोडलें व त्यांच्या जयघोषानें स्टेशनचें आवार पुन्हा एकदा निनादून गेलें.

## मला काय वाटलें !

लोकमान्यांच्या स्वागतासंबंधीची ही आठवण सामान्य जरी वाटत असली तरी मला तिचें वैशिष्ट्य निराळ्या दृष्टीने वाटतें. तें म्हणजे असें की, आम्ही स्टेशनवर गेलों ही गोष्ट त्या प्रसंगानंतर किती तरी दिवस तेथे एक चर्चेचा विषय होऊन बसली होती. ह्या गोष्टीची मला खंत कशी ती वाटली नाहीच पण उलट मला एक नवीन दृष्टि मिळाली. समाजाच्या गतानुगतिक मनोवृत्तीचा खास परिचय मला त्या वेळीं घडला. असें वाटूं लागलें की सामर्थ्यशाली प्रतिकार निर्माण झाल्याखेरीज आमचें हें जिणें संपुष्टांत येणार नाही. या प्रतिकारक्षम वृत्तीची चुणूक मी माझ्या पतीच्या ठिकाणीं पाहिली आणि म्हणून ह्यांच्याविषयी मला निरंतर अभिमान वाटत राहिला.

## वर्धा शाखेचे 'अध्यक्ष'

ह्यानंतर लोकमान्यांच्या चळवळींत मोठ्या अहमहमिकेनें ह्यांनी भाग घेतला. प्रांतांत व विशेषतः वर्धा जिल्ह्यांत जहाल टिळकपंथीय म्हणून सन १९२० सालापूर्वी लोकमान्यांच्या होमरूल लीगच्या वर्धा जिल्हा शाखेच्या अध्यक्षपदाची कामगिरी ह्यांच्याचकडे होती.

## गांधीयुगास सुरुवात !

१९२० ऑगस्ट १ ला लोकमान्यांचें निधन झाल्यानंतर हिंदी राजकारणांत महात्मा गांधींचें युग सुरू झालें. लोकमान्यांची 'जशास तसें' ही तत्त्वप्रणाली मागे पडून महात्माजींच्या सत्यअहिंसेच्या तत्त्व-

प्रणालीचा देशांत उदोउदो होऊं लागला. इंग्रजांशीं शांततेच्या मार्गानें असहकारिता करावी असें धोरण महात्माजींनी अवलंबिलें. त्यांना अनुयायीहि भरपूर लाभले. सबंध देशांत असहकारितेने नुसतें रान उठवून दिलें. याच वर्षी डिसेंबरमध्ये नागपूरला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. तें मोठें क्रांतिकारी ठरलें. ह्या अधिवेशनाला आम्ही मुद्दाम वर्धेहून नागपूरला आलों होतों.

### मित्रकर्तव्य पार पाडलें

त्या वेळीं तेथील मेयो हॉस्पिटलमधील डॉ० मुकद्दम ह्यांच्याकडे आम्ही उतरलों होतों. ते ह्यांचे बाळपणचे सवंगडी. परस्परांत जीवश्च कंठश्च स्नेह वसत होता. त्या सुमारासच डॉ० मुकद्दम टायफॉईडने आजारी पडले. त्यांची पत्नी नुकतीच निवर्तल्यामुळे घरांत त्यांची व त्यांच्या लहान मुलांची देखभाल करण्यास कोणीच नव्हतें. आजारी अवस्थेंत डॉक्टरांना शुश्रूषेची फार आवश्यकता होती. म्हणून मित्राची अडचण जाणून ह्यांनी डॉक्टरांची प्रकृती सुधारेपर्यंत मला तेथेच ठेवलें. हे रोज संध्याकाळीं वर्धेहून नागपूरला येत असत. अशा रीतीने स्वतः अडचण सोसून, एवढेंच नव्हे तर त्रास भोगूनहि, ह्यांनी मित्रासंबंधींचें आपलें कर्तव्य पूर्ण केलें.

लवकरच डॉ० मुकद्दम त्या आजारांतून बरे झाले. त्यांची प्रकृति सुधारल्यावर मी वर्धेला आलें.

### माझा आजार

मला नागपूरलाच संग्रहणीचा विकार सुरू झाला होता. तो घरीं आल्यावर अधिक बळावला. ह्यामुळे माझी प्रकृति हळूहळू खंगत चालली. डॉक्टर–वैद्यांचे होते नव्हते ते सारे उपाय झाले. पण कशानेच गुण येईना. माझ्या आजाराची सर्वांनाच चिंता वाटायला लागली. ह्यांच्या मनावर तर फारच परिणाम झाला होता. आधीच

[library stamp]

ह्यांचें मन इळवें! त्यामुळे तर ह्यांना कांहीच सुचेना! आई माझ्या जवळच होती. माझ्या दुखण्याला उतार पडत नाही व कोणताच उपाय लागूं होत नाही हें जेव्हा सर्वांना कळून चुकलें तेव्हा एके दिवशीं ती डोळ्यांत पाणी आणून ह्यांना म्हणाली, 'बाबीला देवाब्राह्मणासमोर तुमच्या स्वाधीन केली. आमच्यापेक्षा तिची काळजी तुम्हांलाच! तुम्ही तिच्या प्रकृतीला गुण यावा म्हणून वाटेल ते उपाय केलेत पण नशीबाचा कोप म्हणा की आणखी कांही म्हणा गुण कसा तो येत नाही. माझ्या आयुष्यांतला हा एकच एक धागा आता उरला आहे, तोहि आता तुटण्याच्या बेतांत आला आहे. दैव अनुकूल असलें तर सारेंच ठीक होईल. अन् दैवच कोपला तेथे मग कोण काय करणार? तेव्हा तिच्या बिमारीसाठी कांही उपचार करून पाहण्याची माझी इच्छा आहे. माझ्या हाताला यश यायचें असलें तर आपल्या पायाच्या पुण्याईने ती अशा स्थितींतूनहि बरी होईल. तेव्हा तिला माझ्या पदरांत घालावी असें माझें तुम्हांला सांगणें आहे.'

## ह्यांची भारावलेली मनःस्थिति

आईच्या सांगण्याप्रमाणे मला ह्यांनी तिच्याबरोबर नाशकास पाठविण्याची व्यवस्था केली. साधींसुधीं दुखणीं असलीं तरी ह्यांचें मन गांगरून जायचें! त्यांत तर माझें हें दुखणें जीवावरचेंच आहे असें डॉक्टरांनी निदान केलें होतें आणि तसें उघड दिसतहि होतेंच! त्यामुळे नाशिकला जाण्याचे दिवशीं हे फार बेचैन होते. स्टेशनवर पोहोचवायला आले तेव्हा निरोप देतांना धड बोलण्याचेंहि ह्यांच्या भारावलेल्या मनाला साधत नव्हतें. त्यांचें मन काळजीने नुसतें भरून गेलें होतें. आणि म्हणून डोळ्यांची अर्थशून्य हालचाल करीत शून्यमनाने हे माझ्या शेजारीं उभे होते. मी परत वर्धेला येईन की नाही? या शंकेने ह्यांच्या मनाने ठाव सोडला होता. ह्यांची त्या वेळची

मनःस्थिति आजही माझ्या डोळयासमोर जशीच्या तशी उभी रहाते.

## ईश्वरी सूत्र !

पण ईश्वरी इच्छा तशी नव्हती ! आमचे ऋणानुबंध ईश्वराने पक्के ठेवले होते. ह्यांच्या प्रेमळ सहवासांत माझ्या आयुष्याचीं कांही वर्षें जावीं असेंच ईश्वरी सूत्र होतें ! आणि त्यामुळे नाशिकला गेल्या-वर थोडयाच दिवसांत माझ्या प्रकृतींत सुधारणा होऊं लागली. माझें प्राक्तन म्हणा, आईची निरपेक्ष सेवा म्हणा, हवेचा बदल म्हणा, परमेश्वराची कृपा म्हणा अथवा ह्यांच्या एकनिष्ठ प्रेमाची पुण्याई म्हणा मी त्या जिवावरच्या आजारांतून बरी झाल्यें व चार महिन्यांनी माझी प्रकृति निकोप होऊन मी माझ्या घरीं वर्धेला परत आल्यें.

घरीं आल्यावर महात्माजींच्या देशव्यापी चळवळीने वर्धा शहर दुमदुमून गेलें होतें असें माझ्या निदर्शनास आलें.

## विदेशी कापडाच्या होळया पेटल्या

नागपूरला भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत देशाने महात्मा-जींच्या नेतृत्वाला मान्यता दिली असल्यामुळे लौकरच देशांत सर्वत्र चरख्यावर सूत कातणें, विदेशी कपडयावर बहिष्कार पुकारून त्यांच्या होळया पेटविणें, ह्या गोष्टी सर्रास सुरू झाल्या. वर्धेचे श्रीमान् सेठ जमनालाल बजाज यांनी नागपूर कॉंग्रेसच्या आधीच रायबहादुरी सोडली होती. आता ते महात्माजींचे अनुयायी बनले होते. त्यांच्या पत्नी श्रीमती जानकीबाई यांनीहि महात्माजींचें अनुयायित्व पत्करून वर्धा येथे स्त्रियांच्यासाठी हाताने सूत काढण्याचा वर्ग सुरू केला होता. मीहि त्या वर्गांत जाऊं लागलें. घरींहि एक चरखा आणून फावल्या वेळीं त्यावर मी सूत काढीत असें. महात्माजींच्या विदेशी कपडयांचा बहि-ष्कार पटल्यामुळे आमच्या घरांत यापुढे विदेशी कपडे व विदेशी

वस्तु शक्यतोंवर येऊं न देण्याची मी दक्षता घेऊं लागलें. ह्या कामीं ह्यांचेंहि मला मनःपूर्वक सहकार्य मिळत होतें. परंतु माझें चरखा फिरवीत बसणें मात्र ह्यांना तितकेंसें आवडत नव्हतें.

## आता तूं खरी देशसेविका दिसतेस !

एक दिवस मी सूत कातीत बसलें असतां ह्यांची स्वारी कोर्टांतून घरीं आली. मी सूत काढण्यांत दंग झालेली पाहून हे मला म्हणाले, 'आता तूं खरी देशसेविका झालेली दिसतेस! स्वराज्य मिळण्यास आता मुळीच विलंब लागणार नाही.' ह्यांच्या या औपरोधिक बोलण्याचा मला किंचित् राग आला. मी म्हणालें, 'तर मग महात्मा गांधींसारख्या येवढया मोठया महात्म्याने जी एवढी चळवळ सुरू केली ती निरर्थकच म्हणायची ?' यावर ह्यांनी मला भलें मोठें व्याख्यान ऐकवलें व शेवटीं म्हणाले, 'ठीक आहे, चालूं द्या तुमचें हें सूत कातणें. तुमच्या ह्या सुताने तुम्ही आता स्वराज्याचा स्वर्गच गाठणार आहांत.'

## म. गांधींचें हें एक फॅड आहे

माझ्या मनांत असहकारितेच्या चळवळींत भाग घेण्याची फार इच्छा होती. पण त्या बाबतींत ह्यांचा नूर अगदीच न्यारा होता. त्यामुळे अर्थातच माझा नाइलाज झाला. पण एवढें मात्र खरें की सूत काढण्याव्यतिरिक्त इतर देशप्रेमाच्या व तत्संबंधी गोष्टींबद्दल मला ह्यांच्याकडून सतत उत्तेजन मिळत राहिलें. महात्माजींचा विदेशी मालावरचा बहिष्कार ह्यांना मान्य होता. पण केवळ सुत काढण्याने व खादीचा प्रसार करीत राहिल्यानेच देशस्वातंत्र्य हस्तगत होईल या गोष्टीवर ह्यांचा कधीच विश्वास बसला नाही. उलट महात्मा गांधींचें तें एक 'फॅड' आहे असेच उद्गार हे नेहमी काढीत !

मणी सहावा

# वर्धा नगरपालिकेंतील कामगिरी !

## हे म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष झाले

प्रायः सर्वच म्युनिसिपालिटयांत अंदाधुंदीचा कारभार चालूं असतो, असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाही. वर्धा म्युनिसिपालिटी तरी याला अपवाद कशी राहणार ! १९१२ ते १८ पर्यंतच्या सहा वर्षांच्या काळांत हे म्युनिसिपालिटीचे सदस्य असतांना तिच्या सभांना हजर राहत. त्या सहा वर्षांच्या कालांत ह्यांना तेथील अनागोंदी कारभाराचें चांगलेंच प्रत्यंतर आलें. ह्यांच्या वृत्तीला ही बेबंदशाही बिलकूल सहन झाली नाही. येवढेंच नव्हे तर तिजविषयी मनस्वी चीड उत्पन्न होऊन तिला अजिबात नष्ट करण्याचें ह्यांनी ठरविलें. एखादी गोष्ट करायचें एकदा निश्चित केल्यावर ती केलीच पाहिजे असा ह्यांचा करारी स्वभाव असल्यामुळे ते पुनः १९२१ मध्ये म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीला उभे राहिले. त्यांत निवडून आल्यानंतर रा. ब. नायडूंच्या विरुद्ध अध्यक्षपदासाठी सामना देण्याचें ह्यांनी ठरविलें. अर्थात् हा सामना मोठया आणीबाणीचा होता. कारण रा. ब. नायडू हेच अध्यक्ष असावेत हा जणूं वर्धा म्युनिसिपालिटीचा शिरस्ताच ठरून गेला होता. पण ह्या खेपेला ह्यांनी त्यांचा पराभव करून त्यांची अध्यक्षपदाची 'मक्तेदारी' काढून घेतली.

## अध्यक्षाचा आदर्श !

हे नुसते 'सह्याजीराव' अध्यक्ष नव्हते. अध्यक्षपदीं जाऊन नुसता मानमरातब व चैन प्राप्त करावी अशी कल्पना ह्यांच्या मनाला शिवणेंहि शक्य नव्हतें. म्युनि.चा कारभार आदर्शवत् करणें हें ह्यांचें ध्येय होतें. तशी आकांक्षा बाळगून ह्यांनी कार्याला सुरवात केली होती. हे स्वतः जातीने सर्व कारभारांत लक्ष घालीत. त्यामुळे बऱ्याच गोष्टींत सुधारणा होऊन एकंदर सर्व कारभाराची कार्यक्षमता वाढली. ह्यांच्या चोख व तडफदार कामामुळे इतर सदस्यांवर चांगला परिणाम झाला व नोकरवर्गावर चांगलाच वचक बसला. खाबू-पणाची निंद्य वृत्ति—जी आजवर संपूर्ण म्युनिसिपल कारभारांतून बोका-ळली होती—तिला तर पुराताच आळा बसला. आपण अधिकाराच्या उच्च जागीं–अध्यक्षपदीं–असलों तरी आपली भूमिका लोकसेवकाची आहे ही गोष्ट हे कधीच विसरूं शकले नाहीत. आणि ह्यांच्या भविष्य-कालीन यशस्वी सार्वजनिक जीवनाची सुरवात तेथूनच झाली.

## पाण्याची अडचण दूर केली

वर्ध्यास पाण्याचें फारच दुर्भिक्ष्य असे. उन्हाळयांत विहिरी आटत व नळांनाहि पुरेसें पाणी येत नसे. त्यामुळे लोकांचे फार हाल होत. जनतेची ही अडचण लक्षांत घेऊन ह्यांनी ह्याच गोष्टीला प्राधान्य दिलें व आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीची सुरवात केली. तेव्हा पी. डब्ल्यु. डी. कडे असलेलें वॉटरवर्क्स ह्यांनी म्युनिसिपालि-टीच्या खात्यांत सामील करून घेतलें. जरूर तेथे खर्चांत काटकसर करून पैशांची बचत केली, व म्युनिसिपालिटीवर असलेला कर्जाचा बोजा दूर करून तिला प्रथम कर्जमुक्त केलें. पाणीपुरवठ्यासाठी थोड्याच दिवसांत कांही हजार रुपयांची नवीन यंत्रसामुग्री खरेदी करून पुण्याचे तज्ज्ञ श्री. नारायणराव माने यांच्या देखरेखीखाली

जुनें वॉटरवर्क्स अधिक कार्यक्षम केलें व ह्यांच्या आईच्या कल्पनेप्रमाणे नुसता आपल्याच घरचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविला नाही तर सर्व वर्धा नगरीची ही अडचण दूर केली.

## संस्थाचालकाची जबाबदारी !

वर्धेला आमच्याकडे दररोज संध्याकाळीं १० । १५ लोक ह्यांच्याशीं गप्पा मारायला आले नाहीत असें सहसा होत नसे. हे कचेरींतून घरीं येण्यापूर्वीच ही मंडळी येऊन बसलेली असायची. ह्यांचें कचेरींतून येणें झाल्यावर चहाफराळ आटोपला की हे समोरच्या व्हरांड्यांत झोपाळ्यावर जाऊन बसत. मंडळी ह्यांच्या सभोवार बसत. घरीं येणाऱ्या मंडळींत विशेषतः महंमदभाई, काळे, माने, शेंडे व देशपांडे मास्तर हे नित्य येणारे असत. या मित्रमंडळीच्या मेळाव्यांत ह्यांच्या गप्पाविनोदाला अशी भरती यायची की विचारतां सोय नाही. केव्हा केव्हा गंभीर विषयावर चर्चा चाले तर कांही प्रसंगीं तेथे हजर असलेल्या एखाद्या व्यक्तीवर ह्यांच्याकडून टीकेची सरबत्ती व्हायची ! आपल्या अशा बोलण्याने त्या व्यक्तीच्या मनावर काय परिणाम होईल याबद्दल तेवढ्या वेळेपुरता ह्यांच्या मनांत विचारच येत नसे. इतर मंडळीची मात्र चांगलीच करमणूक होई व ते हास्याचे कल्लोळ उठवीत. अशा हास्यविनोदांत म्युनिसिपल राजकारणाचा विषय निघाला म्हणजे हे आपल्या मित्रमंडळीसमोर पुढील विचार मांडीत असलेले मला ऐकूं येत, 'कोणतीहि लहान अगर मोठी संस्था असो, तिचे चालक आणि व्यवस्थापक प्रामाणिक व निःस्वार्थ बुद्धीने काम करणारे पाहिजेत; तेव्हाच ती संस्था ऊर्जितावस्थेस येऊं शकते. माणसाने त्याग केला तरच सार्वजनिक कार्य उत्तम रीतीने पार पडूं शकतें. म्युनिसिपालिटीच्या कारभारांत तर या गोष्टींची अत्यंत जरूर असते.'

## लुचपतखोरीला आळा

खाबूपणा व लुचपतखोरी या गोष्टींची ह्यांना मनस्वी चीड होती. त्यामुळे अध्यक्षपदाचीं सूत्रें हातीं घेतल्याबरोबर या दोन्ही प्रकारांना ह्यांनी आळा घातला. या बाबतींत ह्यांचा जो कडकपणा मला दिसून आला तो खालील गोष्टीवरून स्पष्ट होईल.

## मी तुला माफी करूं शकत नाही

एका कांजीहौसच्या (कोंडवाडा) चौकीदाराने एका इसमाची गाय अल्पशी लाच घेऊन रात्रींच्या वेळीं सोडून दिली. ही गोष्ट ह्यांच्या कानावर आल्याबरोबर ह्यांनी त्या चौकीदाराला बोलावलें व पोलिसच्या स्वाधीन करण्याचा आपला निश्चय त्याला सांगितला. त्यामुळे तो चौकीदार फार घाबरला व ह्यांच्या पायावर डोकें ठेवून गुन्हा माफ व्हावा अशी विनंती करूं लागला. आपली घरांतील अडचणहि ह्यांना त्याने सांगितली. पण ह्यांनी त्याच्या गुन्ह्याबद्दल यत्किंचितहि दया दाखविली नाही. उलट त्याला निक्षून सांगितलें की, 'तुझ्या गुन्ह्याबद्दल मी माफी देऊं शकत नाही. तूं लाच तर घेतलीसच पण गुरें रात्रीं सोडूं नयेत ह्या नियमाचाहि भंग केलास. तेव्हा तुला सजा झालीच पाहिजे. परंतु तुझी घरची अडचण मात्र मी स्वतः निभावून नेण्यास तयार आहें.'

## निष्ठुर वाणींतील मृदु अंतःकरण !

असें म्हणून ह्यांनी मला बाहेर हाक मारली व मला सांगितलें की, 'जोपर्यंत हा मनुष्य तुरुंगांत राहील तोपर्यंत त्याच्या कुटुंबाची जबाबदारी तुला सांभाळावी लागेल.' तो मुसलमान चौकीदार शिक्षा होऊन तुरुंगांत गेल्यावर त्याच्या बायकोमुलांचा सांभाळ आम्हीं केला. त्याच्या बायकोचें बाळंतपण सुद्धा मलाच करावें लागलें. पुढे तो

चौकीदार सुटून आला. त्याला दुसरी नोकरी लागेपर्यंत आम्ही त्याला २० रु. महिना बरेच दिवसपर्यंत देत होतों.

## काय तो ह्यांचा जमदग्नीचा अवतार !

आता निरनिराळया अशा बऱ्याच सुधारणा वर्धा शहरांत होऊं लागल्या. गावांतील खाचखळग्यांनी भरलेल्या सडका व लहान रस्ते दुरुस्त होऊं लागले. त्यांतच आमच्या घरासमोरील सडकदुरुस्तीचें कामहि चालूं झालें. त्या सडकेपासून कांही फूट अंतरावर आमचें घर होतें. तेव्हा ठेकेदाराने, सडकदुरुस्तीबरोबरच आमच्या घरापर्यंतचा आमचा खाजगी रस्ताहि मुरूम टाकून व एंजिन फिरवून दुरुस्त केला. कोर्टांतून आल्यावर जेव्हा ही गोष्ट ह्यांच्या नजरेस पडली तेव्हा ह्यांची मन:स्थिति अगदीच विचित्र झाली. माझ्या कयासाप्रमाणे ह्यांना समाधान तर वाटलें नाहीच, पण उलट ह्यांचा चेहरा क्रोधाने लाल झालेला दिसला. काय तो ह्यांचा त्या दिवसाचा जमदग्नीचा अवतार ! ह्यांचें सारें अंग त्या स्थितींत थरथर कापत होतें. उच्च स्वरांत मोठया रागानेच मला हाक मारून म्हणाले, 'तुला ही नसती उठाठेव कोणी सांगितली ? वर्धा म्युनिसिपालिटी म्हणजे आपल्याच घरची शेती तुला वाटली काय ? हा जो रस्ता तूं दुरुस्त करवून घेत-लास त्यामुळे माझ्या नांवाला केवढा कलंक लागेल याची तुला कल्पना तरी आहे काय ? लोकांची जर यामुळे माझ्याविषयी विकृत भावना झाली तर त्यांत त्यांचा काय दोष ? त्यांचें तसें करणें योग्यच नाही का ठरणार ?"

## इसका पूरा बिल ले आव !

ह्यांचा त्या दिवशींचा तो राग पाहून मी तर सर्दच झालें. तोंपर्यंत इतक्या भयंकरपणें रागावतांना ह्यांना मी आजवर कधीच

पाहिलें नव्हतें. भीतभीतच पण अत्यंत सौम्यपणें मीं म्हटलें, 'हा रस्ता दुरुस्त करण्यास मीं कोणासहि कांही म्हटलें नाही. येवढें मात्र खरें कीं तो दुरुस्त होत असतां मीं त्याला 'नको' पण म्हटलें नाही.' यानंतर ह्यांनी सडकेच्या ठेकेदाराला बोलावून त्याला दरडावून प्रश्न केला की, 'हमारे सडकपर तुमने क्यों एंजिन घुमाया ?' ठेकेदाराने उत्तर दिलें, "यह मकान म्युनिसिपालिटीके अध्यक्षसाबका है, करके हमने यह रास्ता दुरुस्त किया है.' हे त्यावर म्हणाले, 'तुमने यह बहोत गलती की है. इसका जो कुछ बिल हुआ होगा वो हमारे पास फौरन ले आव.' आणि असें म्हणून हे आपल्या ऑफिसरूममध्ये गेले. मींहि नंतर तेथून काढता पाय घेतला.

## अतिचांगुलपणा दुर्गुण ठरावा काय ?

जगांत चांगलीं व वाईट अशा दोन्ही स्वभावाचीं माणसें असतात. आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून शिस्त, प्रामाणिकपणा व नियमितपणा हे गुण अंगीं बाणवून दुसऱ्यास त्या गुणांचें अनुकरण करावयास लावतात तीं माणसें चांगलीं. ह्याच्या उलट अधिकाराच्या जोरावर स्वतःचा स्वार्थ साधून घेऊन जे दुसऱ्यासहि स्वार्थी, अप्रामाणिक व बेशिस्त बनवितात तीं माणसें वाईट हें उघडच होय ! वाइटांना जसे अनेक शत्रू असतात तसेच चांगल्यांनाहि पण अनेक शत्रू असतात. येवढेंच काय पण चांगल्या लोकांना पाण्यांत पाहणारे लोकच अधिक प्रमाणांत असतात. सज्जन लोकांच्या भलेपणानेच अधिक शत्रू निर्माण होतात असें म्हटलें पाहिजे. 'अतिचांगुलपणा हा सुद्धा एक दुर्गुणच ठरतो !' हा जगाचा नियमच आहे की काय असें कांही वेळां वाटतें. हें सर्व तत्त्वज्ञान सांगण्याचें कारण येवढेंच की, या गोष्टीचा आम्हांला प्रत्यक्षच अनुभव आला. ह्यांच्या म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षीय कारकीर्दींत एक मोठा विलक्षण प्रसंग आमच्यावर बेतला

होता. तो म्हणजे ह्यांचें वाढतें वर्चस्व सहन न होऊन आणि पुढील निवडणुकींत ह्यांनी पुन्हा आपलें डोकें वर काढूं नये म्हणून नसते उपद्व्याप करून ह्यांना बदनाम करणाऱ्या शत्रुपक्षाची हीन कारवाई !

## नगर-संरक्षक दलाची उभारणी

याच सुमारास वर्धा येथे चोरांचा फारच सुळसुळाट झाला होता. पोलिस बंदोबस्त म्हणावा तसा नव्हता. ही परिस्थिति पाहून ह्यांनी स्वतः डी. एस. पी. कडे तक्रार केली पण उपयोग झाला नाही. चोरांचा धुमाकूळ चालूच होता, अखेरीस गावांतील प्रतिष्ठित नागरिकांची ह्यांनी एक सभा बोलावून त्यांच्या सहाकार्याने आपल्या नेतृत्वाखाली एक 'नगर संरक्षक पथक' उभारलें. यानंतर रोज रात्रीं ह्या पथकासमवेत हे स्वतः देखील पहाऱ्यावर जाऊं लागले. ह्यांचें हें कृत्य आम्हांला मात्र मोठें धाडसाचें व धोक्याचें वाटलें. माझ्या मनांत तर ह्या गोष्टीने धडकीच भरली. ह्यांच्याजवळ मीं शंका प्रदर्शित केली. तेव्हा थोड्याच दिवसांत ह्यांनी बंदुकीचा परवाना मिळवून तिच्यासह हे पहाऱ्यावर जाऊं लागले. त्यानंतर चोरांचा सुळसुळाट ऐकूं येईनासा झाला. तेव्हा आपोआपच शहरांतील रात्रीचे पहारे बंद पडले. मात्र एके दिवशीं सकाळीं एक भयंकर बातमी आमच्या कानावर पडली, त्यामुळे मी तर चांगलीच गांगरून गेलें.

## आमच्या घरावर दरोडा पडणार !

त्या दिवशीं रात्रीं आमच्या घरावर दरोडा पडणार असून ह्यांच्या जिवाला धोका निर्माण होणार आहे ही ती भयंकर बातमी होती. सुदैवाने हे त्या दिवशीं एका केससाठी बाहेरगावीं गेले असल्यामुळे त्यांतल्यात्यांत आम्हांला कांहीसें बरें वाटलें. हा प्रकार तरी

काय आहे हेंच मला कळेना ! गावगुंडांनी उठविलेली ही हूल आहे की हितशत्रूंनी ह्यांच्या विरुद्ध रचलेला हा एक डाव आहे ह्याचा अंदाजच करतां येईना. चोरांना ह्यांनी दहशत बसविली तिचा तर हा परिणाम नसावा ! असेंहि मनाला वाटूं लागलें. या आणि अशा अनेक विचारांनी मी बेचैन झालें.

## मध्यरात्रीं दारावर धक्के बसले

पोलिसमध्ये वर्दी द्यावी की काय असा विचार माझ्या मनांत डोकावून गेला. त्याप्रमाणे आमचे एक परिचित वॉटरवर्क्सचे श्री. माने यांना सांगितलें. त्यांनाहि उठलेली ही हूल खरी की खोटी याची शंका वाटून पोलिसांना न कळवितां त्यांनी वॉटरवर्क्सच्या २०–२५ कामगारांचा पहारा आमच्या घराभोवतीं रात्रीं बसविला. भीतीमुळे घरांतील आम्ही मंडळी अर्थातच जागी होतों. मध्यरात्रीनंतर बाहेर एकदम गडबड ऐकूं येऊन आमच्या दारावर जोराजोराने धक्के बसूं लागले. त्यामुळे तर आमची खात्रीच झाली की ठरल्याप्रमाणे दरोडेखोर आले. आमची तर घाबरगुंडीच उडाली. आता आपली धडगत नाही हें आम्हांला पुरतें कळून चुकलें. तरी देखील मनाला सावरून बाहेरील वस्तुस्थितीचा कानोसा आम्ही घेऊं लागलों. तों ते बाहेरील आवाज परिचितांचे ऐकायला येत होते. त्यामुळे हिंमत आली व आम्हीं दार उघडण्याचें धैर्य केलें. पाहतों तों बाहेर २००–३०० लोकांचा जमाव दारासमोर उभा होता. ते सर्व लोक ह्यांचे हितचिंतक असून, मोठ्या आपुलकीने ह्यांची चौकशी करीत होते. ते म्हणाले, "आताच थोड्या वेळापूर्वी आपल्या घरावर दरोडा पडून मोठीच दुर्घटना घडून आली अशी बातमी गावांत पसरल्यामुळे आम्ही धावून आलों. केदारसाहेबांना आमची भेटण्याची इच्छा आहे." तेव्हा त्यांना सांगण्यांत आलें की, 'साहेब घरीं नसून परगावीं गेले आहेत; आणि

आम्ही घरांतील सर्व मंडळी सुरक्षित आहोंत.' ह्या एकंदर प्रकारामुळे तावडतोब आमच्या लक्षांत आलें की ही अफवा उठवून ह्यांना भीति घालण्यासाठीच हितशत्रूंनी रचलेला हा एक डाव आहे. आलेल्या मंडळींचे आभार मानून त्यांना परत जावयास सांगितलें.

## या गोष्टीकडे दुर्लक्ष करणेंच उत्तम !

दुसरे दिवशीं हे घरीं आल्यावर ह्यांना आम्ही रात्रीचा सारा प्रकार सांगितला. पण काळजी, विषाद यांपैकी एकाची नुसती छटाहि ह्यांच्या तोंडावर दिसून आली नाही. ह्यांनी येवढेच उद्गार काढले की, "खोटया अफवा उठवून दुसऱ्याबद्दल आपली सूडबुद्धि उगवून घेणाऱ्या लोकांचा एक वर्ग असतो. अशा तामसी वृत्तीच्या लोकांना मुळीच महत्व देण्यांत येऊं नये. त्यांची वृत्तीच इतकी दुष्ट असते की, दुसऱ्याच्या चांगल्या कार्यांत नसतीं विघ्नें निर्माण करण्यांतच त्यांना एक प्रकारचा आनंद वाटत असतो. अर्थात् त्यांच्या ह्या हीन व क्षुद्र मनोवृत्तीकडे शहाण्या माणसांनी दुर्लक्ष करणें हाच मार्ग उत्तम !"

## अध्यक्षपदावर असतांना

वर्धा म्युनिसिपालिटींत ह्यांनी एकंदर १३ वर्षे कार्य केलें. त्यांत १९२१ ते २३ पावेतोची अध्यक्षीय कारकीर्द वजा जातां बाकीच्या वेळीं ते सदस्य होते. अध्यक्षीय कारकीर्दीचीं तीनच वर्षे, पण तीं अनेक दृष्टींनी चिरस्मरणीय आहेत. ह्या अवधींत ह्यांनी विविध प्रकारचीं लोकोपयोगी कार्यें करून जनतेच्या सुखांत तर भर टाकलीच; परंतु भाविकालीन पदाधिकाऱ्यांसमोर एक तेजस्वी आदर्शहि निर्माण करून ठेवला. त्या संपूर्ण कार्यांचा समग्र उल्लेख करणें प्रस्तुत स्थळीं शक्य नसलें तरी कांही कामगिऱ्यांची माहिती थोडक्यांत द्यावी असें मला वाटतें.



वर्धा येथे वकिलाच्या वेषांत (सन १९२०)

## गोवधबंदी व मोफत औषधोपचार

ह्यांनी अगदी प्रथमच गोवधबंदीचा ठराव वर्धा म्युनिसिपल सभेंत मांडला व तो पासहि करून घेतला. लागलीच त्याचे नियम तयार करून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

तसेंच आजारी अवस्थेंत गरीब जनतेचे फार हाल होत. त्यांना औषधपाणी मिळण्याची मारामार पडत असे. तेव्हा त्यांना फुकट औषध पुरविण्यासाठी एक आयुर्वेदीय दवाखाना उघडण्यांत आला. ह्या गोष्टी दिसायला फार साध्या आहेत, परंतु त्या गोष्टींच्या मागे असलेली दृष्टि अत्यंत विशाल आणि उदात्त आहे. स्वातंत्र्याच्या कालानंतर आज भारतांत गोवधबंदी व आयुर्वेदीय दवाखान्यांची सुरवात शक्य झाली. परंतु ह्या गोष्टी ह्यांनी मात्र ब्रिटिश राजवटींतच आपल्या धडाडीने शक्य करून दाखविल्या होत्या.

## शहरदुरुस्तीची योजना

त्याचप्रमाणे वर्धा शहराची वाढ करण्यासंबंधीहि ह्यांची एक योजना होती. त्या उद्देशाने स्वस्त दराने जागेची खरेदी करण्याचें निश्चित केलें होतें. पण ह्याच सुमारास ह्यांची अध्यक्ष-पदाची मुदत संपल्यामुळे ती योजना तशीच स्थगित झाली. पुढे म्युनिसिपालिटीची निवडणूक सुरू झाली व तिच्यासाठी हे पुन्हा उभे राहिले. ह्या वेळीं मात्र बऱ्याच जणांनी ह्यांना कडवा विरोध केला. कारण अगदी उघड होतें. ह्यांचीं लोकोपयोगी कार्यें प्रामाणिकपणाने होत असल्यामुळे खाबू लोकांना आपला स्वार्थ साधतां येईना! त्यामुळे हे कारभारांत नकोत आणि अधिकारपदावर तर नकोतच असें बहुतेकांना वाटून त्यांनी ह्यांच्या विरुद्ध लोकमत तयार करण्याचा चंग बांधला. त्या कुटिल

लोकांच्या कारस्थानाचा व प्रचाराचा कांही एक परिणाम न होतां हे पुनरपि निवडून आलेच. परंतु ह्यांना इतका जबरदस्त विरोध करण्यांत आला की त्यामुळे अध्यक्षपद लाभणें ह्यांना शक्य झालें नाही. तें रा. ब. नायडूंकडेच गेलें.

रा. ब. नायडूंच्या कारकीर्दींत ह्यांनी मुक्रर केलेली जागा पुढे भरमसाट किमतींत खरेदी करण्यांत आली. त्या गोष्टीला ह्यांनी बराच विरोध केला होता. पण त्याचा कांही फायदा झाला नाही.

## लोकशाहीचें दर्शन !

ह्यांनी आपल्या म्युनिसिपल कारभारांत संपूर्णपणें लोकशाही आणून दाखविली होती. वास्तविक म्युनिसिपालिटी म्हणजे सर्वस्वी लोकांचाच कारभार ! पण प्रत्यक्ष प्रकार मात्र ह्याच्या उलट असतो. सामान्य जनतेच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणें अथवा शहराची वाढ करण्याच्या उद्देशाने स्वस्त दराची जागा वाटेल त्या भावाने खरेदी करणें ह्यांत कितीशी लोकशाही आहे ? पण ह्यांनी ह्या सर्व निंद्य प्रकारांना चाट देऊन म्युनिसिपालिटीच्या अंतर्गत कारभारांत अनेक सुधारणा केल्या व तिला अधिक लोकाभिमुख करण्याचे सतत प्रयत्न केले.

## गव्हर्नरांच्या मानपत्रास विरोध

जिथे आपली सदसद्विवेकबुद्धि आपल्याला नमायला होकार देत नाही, त्या ठिकाणीं कधीच नम्र व्हायचें नाही हा ह्यांचा बाणा होता. आपल्या मनाला जें पटत नाही तें हे कधीच करीत नसत. या वृत्तीमुळे ह्यांच्या आयुष्यांत नेहमीच विरोधाचे प्रसंग येत. त्या प्रसंगांना हे नेहमी तोंड देत. माघार घेणें ह्यांना माहीतच नव्हतें. असाच एक प्रसंग गव्हर्नरसाहेबांना मानपत्र देण्याच्या वेळीं उपस्थित झाला.

रा. ब. नायडू हे अध्यक्ष असतांना गव्हर्नरसाहेबांना मानपत्र देण्याचा प्रश्न त्यांनी म्युनि. च्या सभेंत उपस्थित केला. पण या गोष्टीला ह्यांनी जोराचा प्रतिकार केला. म्युनि. चे दुसरे एक सदस्य श्री. गोविंदराव चरडे यांनीहि ह्यांच्या विरोधी ठरावाला पाठिंबा दिला. वर्धा शहरांत याप्रमाणे ह्या दोघांनी एकूण लागोपाठ तीन सभा भरवून रा. ब. नायडूंचा डाव उधळून लावण्याची ज़य्यत तयारी करून ठेवली. शेवटीं ता. २०–८–२५ रोजीं सभा घेऊन तींत गव्हर्नरांना मानपत्र देण्याचा प्रश्न कांही काळ अनिर्णित ठेवावा अशा आशयाचा ठराव मंजूर करण्यांत आला. पुढे ज्या वेळीं गव्हर्नरांची स्वारी वर्धेला आली त्या वेळीं अर्थातच मानपत्र देण्यांत येऊं शकलें नाही.

# मणी सातवा

# प्रांतिक राजकारणांत पदार्पण

'संभवत्यभिजातानामभिमानो ह्यकृत्रिमः'

—कथासरित्सागर

## कर्तृत्वाचें नवें दालन

पुढे ह्यांच्या कर्तृत्वाला म्युनिसिपालिटीचें क्षेत्र अपुरें पडूं लागलें. ह्यांची दृष्टि आता प्रांतिक राजकारणाच्या विशाल क्षेत्राकडे वळूं लागली; आणि हें स्वाभाविकच होतें. बी. ए. झाल्यावर 'वकील होण्यापेक्षा मुन्सफ हो' असें ज्या वेळीं वडीलधारी मंडळी सांगूं लागली त्या वेळीं 'माझ्या कर्तृत्वक्षेत्राला बंधन नको' अशा प्रकारचें ह्यांनी दिलेलें तें तेजस्वी उत्तर म्हणजे ह्यांच्या सुप्त अंतःशक्तीचे बोलच होते असें मला आज वाटूं लागतें. त्या दृष्टीने ह्यांच्या विचारांचा आणि कर्तृत्वाचा ओघ हळूहळू प्रांतिक राजकारणाकडे वळूं लागला.

त्यानंतर १९२६ मध्ये दिल्ली असेंब्लीची निवडणूक आली. त्या निवडणुकीमध्ये प्रचारकार्य करण्याची कामगिरी ह्यांनी आपणावर घेतली होती. ऐन ह्याच सुमाराला आर्वी येथील हिंदु-मुसलमानांच्या दंग्याची केस कोर्टांत दाखल झाली. त्या केसमध्ये हे आरोपीतर्फे काम चालवीत होते.

## आर्वी येथील 'दंगा'

१९२५ सालीं वर्धा जिल्ह्यांतील आर्वी गावीं हिन्दुमुसलमानांचा दंगा झाला. काकडआरतीला मुसलमानांकडून विरोध झाल्याने साध्या बोलाचालीला पटकन् दंग्याचें स्वरूप प्राप्त झालें होतें. हा दंगा केल्याचा व त्यांत तीन मुसलमानांचे खून केल्याचा असे दोन आरोप आर्वीच्या प्रतिष्ठित हिंदु नागरिकांवर लादण्यांत आले होते. १९२६ मध्ये ती केस वर्धेच्या कोर्टांत सुनावणीस निघाली. ती केस चालविण्यासाठी मुंबईचे सुप्रसिद्ध बॅ. बॅप्टिस्टा हेहि आरोपीतर्फे आले होते. याशिवाय प्रांताचा प्रमुख वकीलवर्गहि त्या केसला सहाय्य करीत होता. हे त्या केसमध्ये प्रामुख्याने काम चालवीत होते. त्या प्रसंगाची एक गम्मत माझ्या स्मरणांत आहे.

## आइस्क्रीममध्ये हळदीची पावडर ?

एके दिवशीं आमच्याकडे बॅ. बॅप्टिस्टा व इतर वकीलमंडळींना पार्टी देण्यांत आली. त्या प्रसंगीं इतर खाद्य पदार्थांबरोबर आइस्क्रीम तयार केलें होतें. पण बॅप्टिस्टासाहेबांना आमचें ब्राह्मणी पद्धतीचें आइस्क्रीम कांही पसंत पडलेलें दिसलें नाही. तें खात असतांना त्यांनी तोंड वेडेवाकडें केलेलें दिसत होतें. मला कळेना की ते असें कां करीत आहेत ! तसें पाहिलें तर माझ्या मताने आइस्क्रीम तर अगदीच सुंदर साधलें होतें. त्याचा सुंदर केशरी रंग व वेलचीचा सुवास तर फारच अप्रतिम वाटत होता. आणि एवढें असूनहि त्यांनी तें खातांना असें कां करावें बरें ? पण अखेर माझें शंकानिरसन त्यांनी स्वतःच केलें. त्यांत घातलेल्या केशरवेलचीचा सुवास त्यांना आवडला नसावा किंवा त्यांना तें कळलेंहि नसावें. ते म्हणाले, 'ह्यांत हळदीची पावडर घातली आहे काय ?' किंचित् स्मित करून ह्यांनी त्यांचा गैरसमज दूर केला. आइस्क्रीममध्ये व्हॅनिलाचा उपयोग करणें मला तोंपावेतों

माहीत नव्हतें. घरीं जेव्हा जेव्हा केशरी आइस्क्रीम करण्यांत येतें तेव्हा तेव्हा मला या प्रसंगाची हटकून आठवण होते.

## डॉ. मुंजे निवडून आले

१९२६ मध्ये दंग्याची ही केस चालवीत असतांना दिल्ली असेंब्लीची जी निवडणूक झाली तिच्यासाठी डॉ. मुंजे व बॅ. मोरूभाऊ अभ्यंकर हे दोन प्रतिस्पर्धी उमेदवार उभे होते. त्या वेळीं ह्यांनी डॉ. मुंज्यांना मदत करण्याचें ठरविलें. त्यासाठी मुंजे कंपूच्या वीस-पंचवीस मंडळींचा तळ वर्षेला आमच्या घरीं कांही दिवस होता. कोणालाहि एकदा मदत करण्याचें ठरविलें की, मग हे आपल्या स्वतःच्या प्रकृतीचीहि फारशी फिकीर करीत नसत. निवडणुकीच्या दिवसांत प्रचारकार्य एवढ्या हिरीरीने करायचें की आपल्या धंद्या-कडेहि ह्यांचें दुर्लक्ष सहजच होई. या वेळीं ह्यांनी दौरे काढण्याचा सपाटा सुरू केला व ठिकठिकाणीं व्याख्यानें दिलीं. त्याचा परिणाम असा झाला की कॉंग्रेसचे उमेदवार एवढे मोठे लोकाग्रणी बॅ. अभ्यं-कर पण त्यांचा सुद्धा पराभव होऊन डॉ. मुंजे प्रचंड बहुमताने निवडून आले.

## पुढचें पाऊल

दिल्ली असेंब्लीच्या निवडणुकीनंतर ह्यांनी जिल्ह्यांत व प्रांतांत सुद्धा चांगलाच लौकिक संपादन केला होता. स्थानिक राजकारणांतून यापुढे प्रांतिक राजकारणांत आपलें पुढचें पाऊल टाकावें अशी आकांक्षा ह्यांना वाटूं लागली. १९२७ सालीं मध्यप्रांत कायदे-मंडळाची निवडणूक आली व तिच्यासाठी एक उमेदवार म्हणून हे उभे राहिले. त्या वेळीं ह्यांना अपेक्षेबाहेर मतें मिळालीं व कॉंग्रेसच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पाडाव करून ह्यांना दणदणीत विजय

मिळाला. हा ह्यांचा मोठाच वैयक्तिक विजय होता. हा केवळ ह्यांचा विजयच नव्हता तर लोकांची ह्यांच्यावरील भक्ति व श्रद्धा यांचें तें पुरेपूर प्रत्यंतरच होतें !

## एक ओझरता विचारतरंग !

पुढे थोड्याच दिवसांत कौन्सिलची बैठक सुरू झाली. डॉ. ई. राघवेंद्रराव व बॅरि. रामराव देशमूख ह्यांचें प्रांतांत पहिलें मंत्रिमंडळ स्थापन झालें. कौन्सिलच्या बैठकीसाठी हे वर्धेहून नागपूरला येऊन राहत. मलाहि एकदा ह्यांनी कौन्सिलची बैठक पाहण्यासाठी नागपूरला आणलें होतें. प्रथमच मी कौन्सिलगृहांत गेल्यामुळे तेथील देखावा व तेथे चालत असलेलें कामकाज पाहून मला एकंदर वातावरण अपूर्व वाटलें. तेथील कामकाजाविषयी मला त्या वेळीं कांहींच कल्पना नसली तरी मोठी मौज वाटत होती. आपले यजमान प्रांताच्या राजकारणांत आहेत याबद्दल मला सहर्ष अभिमान वाटल्यावांचून राहिला नाही. मला जरी असा अभिमान वाटत होता तरी एक गोष्ट मात्र त्या वेळीं माझ्या मनांत चमकून गेल्याशिवाय राहिली नाही. ती म्हणजे ह्यांच्यासारख्या विद्वान व कर्तृत्ववान राजकारणी पुरुषाला प्रांताच्या राज्यकारभारांत मंत्रिपद कां मिळूं नये ? मला असें वाटण्याचें एक कारणहि होतें. तें म्हणजे असें की, कांही दिवसांपूर्वी पुण्याचे विद्वान साहित्यिक श्री. चिपळूणकर ह्यांचें 'चातुर्वर्ण्याश्रमा' वर वर्धा येथे मोठें विद्वत्तापूर्ण व उद्बोधक भाषण झालें. त्याप्रसंगीं हे अध्यक्ष होते. त्यांच्या त्या व्याख्यानाची, ह्यांनी अध्यक्षपदावरून आपल्या समारोपाच्या भाषणांत जी सांगोपांग चर्चा केली होती ती अत्यंत मूलगामी व विद्वत्तापूर्ण होती असेंच मत त्या वेळीं वर्ध्यांत सुशिक्षित वर्गांत सर्वतोमुखीं झालें होतें. वास्तविक त्या वेळीं वर्धा येथे चिपळूणकरांच्या ह्या व्याख्यानाला अध्यक्ष म्हणून

वयोवृद्ध व विद्वान् गृहस्थ नव्हते असें नाही. प्रण त्यांपैकी कोणीहि ह्या व्याख्यानाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी घेण्यास पुढे आलें नाही. अखेर ती कामगिरी ह्यांनाच पार पाडावी लागली. त्यामुळे कायदेमंडळाच्या सभागृहांत मी गेलें असतां वरील विचार सहजींच माझ्या मनांत आला.

## माझी मनीषा पूर्ण झाली !

माझी ही महत्त्वाकांक्षा सफळ होण्यास फारसा कालावधि लागला नाही. लौकरच म्हणजे १९२८च्या ऑगस्ट महिन्यांत कायदेमंडळाच्या बैठकी सुरू झाल्या. तेव्हा मंत्रिमंडळांत बदल होऊन राव-रामराव ऐवजी राव-केदार मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. ही आनंदाची बातमी लगेच वर्ध्यास पोहोचली. ही बातमी ऐकून, कौन्सिलगृहांतील आपली ओझरती इच्छा परिपूर्ण झाल्याचें विशेष समाधान मला वाटलें. त्या शिवाय नुकतेंच आमच्या घरांत एका नूतन बालकाचें आगमनहि झालें होतें. वसंताच्या पाठीवर ९ वर्षांनी ता. २८ आगस्ट १९२८ ला हा जन्मला होता. बऱ्याच वर्षांनी हा पुत्रलाभ झाल्यामुळे मी आधीच खुषींत होतें. त्यांतच ह्यांना मंत्रिपद मिळाल्याची बातमी ऐकून तर माझ्या आनंदाला पारावारच उरला नाही. योगायोग असा की, ज्या दिवशीं मुलाचा नामकरण विधि वर्ध्याला करण्यांत आला त्याच दिवशीं नागपूरला ह्यांच्या मंत्रिपद स्वीकारण्याचा शपथविधि झाला. संध्याकाळीं हे नागपूरहून घरीं आल्यावर आमच्या घरांतील सारें वातावरण ह्या दुहेरी आनंदाने नुसतें फुलून गेलें होतें.

## 'छोटी चढाई'

लौकरच ह्यांचें कामकाजाचें दप्तर नागपूरहून 'लहान उन्हाळ्या' निमित्त सप्टेंबरमध्ये पचमढीला गेलें. त्या वेळीं वर्षांतून दोनदा मंत्र्यांचीं दप्तरें पचमढीला जात असत. एकदा, एप्रिल ते जून अखेर

व नंतर सप्टेंबर महिन्यांत. हा दुसरा मुक्काम दीड एक महिन्यांचा असायचा! या पचमढीवरील मुक्कामांचा अनुक्रमें 'मोठी चढाई' व 'छोटी चढाई' असा उल्लेख केला जात असे. ह्या छोटया चढाई-च्या वेळीं ह्यांनी मलाहि आपल्याबरोबर पचमढीला नेलें होतें. एक महिन्याच्या छोटया 'राजाला' घेऊन जरी मी पचमढीसारख्या थंड हवेच्या ठिकाणीं गेलें होतें तरी तेथे माझी कोणत्याहि प्रकारची गैरसोय होऊं नये याची ह्यांनी पूर्ण दक्षता घेतली होती. सहा आठवडयांचा तेथील मुक्काम आटोपून आम्ही नागपूरला परत आलों. वर्ध्याच्या जुन्या कोंदट वातावरणापेक्षा नागपूरचें नवीन मोकळें वातावरण मला फारच आवडलें. आमच्या घरगुती राहणींतहि बदल झाल्यामुळे नवीन तऱ्हेची घराची सजावट करणें व त्याशिवाय नवीन नवीन लोकांचा परिचय होणें, नवीन विचार, चालीरीति माहित होणें, आणि सभा व्याख्यानें वगैरे नानाप्रकारच्या गोष्टींत माझा वेळ कसा निघून जाई हें माझ्या ध्यानींहि येत नसे.

## मंत्री असतांनाची कामगिरी

हे आपणावरील मंत्रिपदाची जबाबदारी अत्यंत दक्षतेने पार पाडीत होते. ह्यांच्याकडे जीं खातीं सोपविण्यांत आलीं होतीं त्यांपैकीं शिक्षण व अबकारी या दोन खात्यांत अल्पकाळांतच ह्यांनी बऱ्याच सुधारणा करून दाखविल्या. प्रथम दारूबंदीच्या प्रश्नांत लक्ष घालून एक नवीनच कायदा पास करून प्रयोग म्हणून पहिल्यांदा ह्यांनी द्रुग जिल्ह्यांत दारूबंदी अंमलांत आणली.

त्याचप्रमाणे शिक्षणप्रसाराकडेहि ह्यांनी मोठया तत्परतेने लक्ष दिलें. तो तर ह्यांचा मोठा आवडीचा विषय होता. शिक्षणप्रसार प्रांतांत फार मोठया प्रमाणावर झाला पाहिजे, निदान साक्षरतेचें प्रमाण तरी वाढलें पाहिजे अशी ह्यांची प्रथमपासूनच विचारसरणी

होती. तेव्हा या गोष्टीकडे ह्यांनी मोठ्या आत्मीयतेने लक्ष घातलें. सबंध प्रांतांत दौरा करून लहान लहान खेड्यांतहि प्राथमिक शिक्षणाच्या शाळा काढण्यास लोकांना ह्यांनी चांगलेंच उत्तेजन दिलें. त्या बरोबरच त्या कामीं जास्तींत जास्त सरकारी मदत देण्यांत ह्यांनी कसूर केली नाही. तसेंच मोठमोठ्या गावीं ग्रँट्स देऊन दुय्यम इंग्रजी शाळा व हायस्कुलें काढण्यास व तीं कार्यक्षम होण्यास ह्यांनी मनःपूर्वक प्रोत्साहन दिलें.

### मंत्रिमंडळ अल्पजीवि ठरलें

अशा रीतीनें हे आपल्या स्वीकृत कार्यांत मग्न झाले. परंतु मंत्रिमंडळ पक्षांत एकोपा नसल्याने मंत्र्यावर केव्हा राजीनामा देण्याची पाळी येईल याचा नेम नव्हता. मंत्रिपदाचा स्वीकार करून पुरे सहा महिने होत नाहीत तोंच मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव येण्याची कुणकुण कानावर येऊं लागली. पक्षाच्या अंतःस्थ मतलबी कारवायां-मुळे अविश्वासाचा ठराव आपण हाणून पाडूं अशीहि ह्यांना उमेद नव्हती. तसा ठराव आला असता तर कदाचित तो मंजूरहि होऊं शकला नसता. पण अशा प्रकारचा खेळखंडोबा आपल्या बाबतींत व्हावा हें ह्यांच्या मानी स्वभावाला रुचलें नाही. शिवाय कायदेमंडळांतील सदस्यांचें म्हणावें तसें जोरदार पाठबळ नसल्यामुळे या मंत्रिपदाला चिकटून राहण्यांत अर्थ नाही, असें ह्यांचें मन ह्यांना सांगूं लागलें. तेव्हा ही गोष्ट स्वतःवर ओढवून घेण्यापेक्षा राजीनामा देऊन मोकळें होणें अधिक चांगलें असा विचार करून ह्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

### उद्या तुला एक नवीन बातमी कळेल !

हें राजीनामा प्रकरण घडलें, त्या वेळीं आमच्याकडे जे त्याचे पडसाद उमटायचे त्यांवरून कांहीतरी भानगडी सध्या चालू आहेत

असें मला दिसून येत होतें. कारण त्या दिवसांत कौन्सिल सदस्यांची सारखी येजा आमच्याकडे सुरू असायची. शिवाय हेहि कांहीसे विचारमग्न दिसत होते. ह्यांची अशी विचारमग्न मनःस्थिति दिसली की, मी कयास बांधायची की कांहीतरी विशेष महत्त्वाची कामगिरी ह्यांना पार पाडायची आहे. आणि माझा तो अंदाज नेमका खरा ठरायचा! याचा ठोकताळा मला नेहमी येत असे. या वेळींहि तसेंच झालें. ह्यांनी राजीनामा देण्याच्या दोन दिवस अगोदर ह्यांचे सहकारी मंत्री ई. राघवेंद्रराव रात्रींच्या वेळीं आमच्याकडे आले. बराच वेळ-पावेतों दोघांचें एकांतांत खलबत चालूं होतें. राव निघून गेल्यावर देखील ह्यांचें ऑफिसमध्ये वाचन चालू होतें. दुसरे दिवशींहि राव आले पण फार वेळ न थांबतां दहापांच मिनिटांत ह्यांच्याशीं बाहेरच बोलून ते निघून गेले व हे लागलीच आपल्या झोपण्याच्या खोलींत आले.

लगेच मी ह्यांना 'राव आताशा रोज रोज कां येतात?' असा सहज प्रश्न केला. त्यावर कांही एक न बोलतां 'उद्या तुला एक नवी-नच बातमी कळेल' एवढेंच बोलून हे नेहमीच्या सवयीप्रमाणे ३–४ मिनिटांतच झोपीं गेले. ही नवीन बातमी कोणती असावी या विचाराने मला मात्र नीटशी झोप आली नाही.

## 'मी मंत्रिपदाचा त्याग केला!'

दुसरे दिवशीं सकाळीं चहाच्या वेळीं रावकडून फोन आला. फोनवर रावशीं बोलून हे लगेच मला म्हणाले, 'मीं माझ्या मंत्रि-पदाचा राजीनामा देऊन टाकला.'

ह्यांनी हे शब्द इतक्या सहजतेने उच्चारले की जसें कांही झालेंच नाही. राज्यशासनाचा सर्वांत श्रेष्ठ अधिकार, पण कपड्या-वरील धूळ झटकावी इतक्या बेफिकीरपणाने ह्यांनी त्याचा त्याग केलेला पाहून मला मोठाच विस्मय वाटला. कालची 'नवीन बातमी'

की जिनें मला जिज्ञासा लावली होती ती हीच याचा उलगडा मला आता झाला. त्यानंतर नित्याप्रमाणे स्नान भोजन उरकून हे कौन्सिलच्या बैठकीला गेले. मात्र या दिवशीं ट्रेझरी बेंचवर ह्यांची स्वारी कौन्सिल सदस्यांना न दिसतां, इतर सदस्यांच्याच बेंचवर हे दिसले. तें पाहून सारे आश्चर्यचकित झाले. कारण राजीनामा दिल्याची बातमी अजून बाहेर फुटली नव्हती.

## 'मी माझें सत्त्व कदापि विसरणार नाही!'

राजीनामा दिल्यानंतर एके दिवशीं मी ह्यांना म्हणालें, "राजीनामा देण्याची तुम्हीं जरा घाईच केली, असें नाही कां वाटत तुम्हाला?" त्यावर ह्यांनी जें उत्तर दिलें तें मोठें विचारणीय होतें. त्या उद्गारांतील ह्यांची निःस्पृहता मला मोठी वेधक वाटली. हे म्हणाले, "मला कांही स्वाभिमान आहे की नाही! कसाहि प्रसंग आला तरी मी माझें सत्त्व कदापि विसरणार नाही!"

## मणी आठवा

# नागपूरला कायम वास्तव्य

**नागपुरांत—**

मंत्रिपद गेल्यानंतर परत वर्धेला न जातां आम्ही नागपूरलाच कायमचे स्थायिक झालों. वर्धा येथे जाऊन पुन्हा तेथे वकिली करावी ही गोष्ट ह्यांच्या महत्त्वाकांक्षी व स्वाभिमानी वृत्तीला मुळीच रुचली नाही. एकदा पुढे टाकलेलें पाऊल मागे घ्यावयाचें नाही हा ह्यांचा बाणा होता. त्याला अनुसरून चालून आलेल्या संधीचा फायदा घेण्याचें ह्यांनी ठरविलें व १८ वर्षांची वर्ध्याची प्रॅक्टिस सोडून नागपूरला ती सुरू केली.

मंत्री म्हणून नागपूरला येण्यापूर्वीहि नागपूर येथे वकिली करण्याचा ह्यांचा विचार असून एक भाडयाचें घरहि येथे पाहून ठेवलें होतें. पण त्या वेळीं वर्धेच्या लोकांनी वर्धा न सोडण्याचा आग्रह केल्यामुळे ह्यांचा निरुपाय झाला होता; पण परमेश्वरी संकेताचें कार्य कोणत्या काळीं कसें घडून येतें हें तरी कोण सांगू शकणार! ह्यांना प्रांताचे मंत्री बनूनच नागपूरला यायचें होतें, असेंच म्हणणें भाग पडतें. मनुष्याला उत्कर्षाच्या उच्च शिखरावर चढविण्याला हा परमेश्वरी संकेतच कारणीभूत होतो, असें मला वाटतें.

**अल्पावकाशांतच धंद्याचा जम**

नागपूरला ह्यांनी वकिलीला सुरवात केली त्या वेळीं नागपुरांत बरेच प्रथितयश वकील होते. त्यांची वकीली व्यवस्थितपणें चालू होती.

या वकील लोकांच्या मेळाव्यांत परठिकाणाहून येऊन स्वतःचा मार्ग यशस्वीपणाने आक्रमावयाचा हें काम खरोखरीच कठीण होतें. इतकेंच नव्हे, तर तसें करणें म्हणजे एकपरी मोठेंच धाष्टर्य करण्यासारखें होतें. पण शंकाकुशंकांची बाधा ह्यांच्या मनाला कधींच शिवली नाही. करायचें असें एकदा ठरल्यावर, केवढयाहि अडचणी समोर येवोत मग माघार म्हणून कशी ती घ्यायची नाही! त्याला अनुसरून ह्यांनी वकीलीला धडाक्याने सुरवात केली व आपल्या धंद्याचें बस्तान ठीक बसविलें. एक दोन महिन्यांतच ह्यांना अनपेक्षित यश मिळून ह्यांच्या भविष्यकालीन यशाची मुहूर्तमेढ रोवली गेली व ही यशोध्वजा अशीच निरंतर फडकत राहील अशी ह्यांना खात्री वाटूं लागली.

## कीर्तिगंगेचें विशाल स्वरूप

अल्पावधींतच ह्यांचें कर्तृत्व चमकलें व ह्यांचें नांव सर्वतोमुखीं व्हायला लागलें. नागपुरांतील प्रथमश्रेणीच्या वकील मंडळींत ह्यांची आता प्रामुख्याने गणना होऊं लागली. आपल्या कर्तृत्वाच्या बळावर नागपुरांतील नामांकित वकीलांमध्येहि ह्यांनी वचक निर्माण केला; इतकेंच नव्हे, तर विशेष मान्यता संपादन करून 'विक्रमार्जित-सत्वस्य स्वयमेव मृगेन्द्रता' ही वीरपुरुषाची ध्येयसाधना प्रगट करणारी उक्ति ह्यांनी आपल्या बाबतींत सार्थ करून दाखविली ! चाळीस वर्षांपूर्वी सुरू झालेला यशाचा झरा या दीर्घकालांत सुकला तर नाहीच, पण उत्तरोत्तर एकसारखा वाढतच गेला, तो इतका की, अखेर त्याला कीर्तिगंगेचें विशाल स्वरूप प्राप्त झालें.

## यशाचें रहस्य

ह्यांच्या यशाचें रहस्य काय, असा जर कोणी प्रश्न केला तर मी त्यांना सांगेन की, सचोटी आणि दानत हे मानवी चारित्र्याचे

दोन मूलभूत घटक ह्यांच्या ठायीं प्रकर्षाने आढळून येत. या गुणांनीच ह्यांना थोर केलें; या गुणांनीच ह्यांना कीर्तिशिखरावर आरूढ केलें. कोणतीहि केस असो, एकदा हातीं घेतली की, तिच्या सफलतेसाठी चिकाटीने तिच्यामागे लागायचें अशी ह्यांची रीत असे. निव्वळ पैशावर नजर ठेवून केस चालविणें ही गोष्ट ह्यांच्या दानतीला कधीच पटली नाही.

**मानवी जीवनाची इतिकर्तव्यता काय ?**

वकीलीच्या धंद्यांत पैसा आणि कीर्ति ह्यांच्या पाठीसच लागली म्हणाना ! पण पैसा मिळवून चैन करणें, एवढीच मनुष्याच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे असें ह्यांनी कधीहि मानलें नाही. यापेक्षाहि अधिक कांही निराळें, श्रेष्ठ व पवित्र कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी मनुष्यमात्रावर आहे, अशी ह्यांची मनोभूमिका होती. आपल्याला कांही तरी परोपकारी कर्तृत्व करावयाचें आहे या भावनेनेच हे वकीलीच्या प्रांगणांत उतरले होते.

**धंद्यांतील कसब**

कितीतरी क्लिष्ट व गुंतागुंतीचे खटले ह्यांनी चुटकीसरशीं यशस्वी करून दाखविले. याला कारण ह्यांची तेजस्वी बुद्धिमत्ता आणि अभ्यासू वृत्ति तर होतीच, पण ह्यांच्या ठायीं वसत असलेल्या विविध गुणांचा समुच्चयहि कारणीभूत होत होता. या गुणांमुळेच ह्यांच्या व्यक्तित्वाची छाप दुसऱ्यावर पडून ह्यांचा मार्ग सहज सुकर होई. अशिलांना खोटया गोष्टी सांगून व त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन पैसा न लुबाडण्याचा प्रामाणिकपणा, हातीं घेतलेल्या केससाठी श्रमांची पराकाष्ठा करून ती पूर्ण यशस्वी करून दाखविण्याची चिकाटी, कायद्याचें पूर्ण आकलन करून न्यायाधीशाला आपला मुद्दा पटवून देण्याची उत्कृष्ट कला, प्रतिस्पर्धी वकिलांना शब्दांच्या

कात्रींत पकडून त्यांची त्रेधातिरपिट उडवून आपली बाजू बळकट करण्याची विलक्षण हातोटी, साक्षीदारांना उलटसुलट प्रश्न विचारून त्यांच्याकडून हवें असलेलें वदविण्याची कुशलता आणि अमोघ वक्तृत्व इत्यादि वकीलीच्या धंद्याला आवश्यक अशा गुणांमुळेच ह्यांच्या यशोमंदिराच्या पायऱ्या बांधल्या गेल्या असें मी मोठ्या अभिमानाने म्हणतें.

## दोन मतदारसंघांतून निवडणूक

तथापि नुसता धंदाच करीत राहणें ह्यांना आयुष्यांत कधीच मानवलें नाही. आपल्या कर्तृत्वाला बंधन पडणार नाही याची हे सतत दक्षता घेत. त्यामुळे ह्यांची बुद्धि नेहमी विशाल क्षेत्राकडेच धाव घेत असे. त्याला अनुसरून कायदेमंडळाची १९३० मधील निवडणूक पुन्हा लढविण्याचा ह्यांनी निर्धार केला. महात्मा गांधींच्या नेतृत्वाने सारा देश भारावून जाऊन कायदेभंगाची देशव्यापी चळवळ उग्र रूप धारण करीत होती. महात्माजींनी पुन्हा कौन्सिलबहिष्कार पुकारला होता. अशा परिस्थितींत, वातावरण सर्वतोपरी प्रतिकूल असतांना, निवडणूक लढविणें फारच धाष्ट्याचें काम होतें. पण ह्यांच्या उभ्या आयुष्यांत मला भीति हा विकारच कधी आढळून आला नाही. ह्यांनी आपल्या स्वभावाला अनुसरून हा निर्धार केला आणि निवडणुकीप्रीत्यर्थ होणाऱ्या संघर्षाला हे तयार झाले.

## 'शठं प्रति शाठ्यम्'

बाळपणापासून प्रतिकूल परिस्थिति ह्यांच्या भोवती असल्याने तिच्यांतून मार्ग काढणें ह्यांना भाग पडत असे. आणि त्यामुळे ह्यांच्यांत ही झुंझार वृत्ति सहजच निर्माण झाली होती. या वृत्तीमुळे लोकमान्यांच्या 'शठं प्रति शाठ्यम्' या नीतीचा अनुनय करणेंच ह्यांना मानवलें व ह्यांनी निवडणुकीची तयारी केली.

१२१३ ऑ.२३ १२३

## 'मला पैसे हवेत !'

एके दिवशीं, दुपारीं कोर्टातून हे फार घाईतच घरीं आले. तसेंच मजजवळ येऊन म्हणूं लागले की, 'तुझ्या जवळ पैसे असल्यास मला आता हवे आहेत.' मला कांही कळेना की ह्यांना पैशाचें एवढें काय काम येऊन पडलें होतें तें ! त्या वेळीं मजजवळ पैसे होते, पण ह्यांना सांगूं की नको हाच मला पेंच पडला होता. त्याला एक कारण होतें. तें म्हणजे असें की, त्या वर्षी चांदीच्या किंमती बऱ्याच म्हणजे तोळयाला साडेसहा आणे इतक्या उतरल्यामुळे चांदीचीं भांडीं करून घ्यावीं हा माझा हेतु होता. मुद्दाम त्यासाठी कांही रक्कम बाजूला काढून ठेवली होती. ह्यांना असला कांही घरगुती खर्च करणें फारसें आवडत नसे. म्हणून ह्यांना नकळत असलीं कामें मी करवून घेई. एकदोन दिवसांत चांदी खरेदी करूं व भांडीं बनवून घेऊं असा माझा बेत होता. पण तो दिवस येण्याचा बाजूलाच राहिला.

ह्यांनी पैशाची निकड लावलेली पाहून मीं ह्यांना विचारलें, 'पैसे हवेत तरी कशाला ?' त्यावर हे म्हणाले, 'कौन्सिल निवडणुकीसाठी मी दोन जागांवरून उभा राहणार आहें. त्यासाठी आताच मला 'नॉमिनेशन पेपर्स' भरावयाचे आहेत. तुझ्या जवळ असतील ते पैसे मला दे, बँकेंतून आणावयास सवड नाही.' ह्यांच्या मनाचा एकदा निश्चय ठरला की तेथे माझी कांही मात्रा चालत नसे. त्या वेळीं सुद्धा तसेंच झालें. मला निमूटपणें ती सारी रकम ह्यांच्या स्वाधीन करावी लागली. पैसे हातांत पडण्याचाच अवकाश, हे तडक निघून गेले. पण माझ्या मनांत विचारचक्र सुरू झालें की, 'आमच्या घरांत पुन्हा निवडणुकीची धामधूम सुरू होणार !'

## पूर्वीचे विरोधी पण आता मित्र

निवडणूक असली म्हणजे आम्हा घरांतल्या मंडळींना कांही उसंत मिळायची नाही. अमके आले नि तमके आले असेंच दिवसभर चालायचें आणि त्यांचें करतां करतां आमचा जीव मेटाकुटीस यायचा ! नुकतेच वर्धेचे रा. ब. नायडू—ह्यांचे जुने प्रतिस्पर्धी पण आता मित्र बनलेले—यांना 'कौन्सिल ऑफ स्टेट'च्या निवडणुकींत यश मिळवून देण्यासाठी ह्यांनी फारच परिश्रम घेतले होते. त्या वेळीं नायडू व त्यांच्या सहकारी मंडळींचा धूमधडाका आमच्याच येथे पडला होता. त्यांतून जरा उसंत मिळत नाही तोंच ह्यांची पुन्हा निवडणूक तयारच !

## दोन्ही निवडणुकींत विजय

ह्या वेळीं ह्यांनी नऊ म्युनिसिपालिटया व वर्धा अर्बन ह्या दोन्ही जागांहून निवडणूक लढविण्याचें ठरविलें व त्याप्रमाणे निवडूनहि पण आले.

मागील खेपेस कायदेमंडळांतील ह्यांची मंत्रिपदाची कामगिरी जरी अल्पकालीन होती तरी कौन्सिलसदस्य म्हणून ह्यांनी जें कर्तृत्व प्रगट केलें होतें तें लोकांच्या समोर होतेंच ! त्या वेळीं हिंदुस्थानांत आलेल्या सायमन कमिशनला ह्यांनी कडक विरोध दाखविला व त्यावर कौन्सिलगृहांत दणदणीत भाषण केलें. ह्याशिवाय अनेक सरकारी धोरणावर ह्यांची टीका होई. ह्यांच्या ह्या लोकहितैषी कामगिरीमुळेच दोन्ही मतदार–केन्द्रांतून प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करून हे विजयी झाले होते. अर्थातच एका जागेचा राजीनामा देऊन त्या जागीं पुलगावचे शिवरामप्रसाद पहेलवान या गृहस्थांना ह्यांनी निवडून आणलें. त्याचप्रमाणे रा. ब. नायडूंना देखील कायदेमंडळासाठी एका मतदार केंद्रांतून निवडून आणण्यास ह्यांनी बरेच परिश्रम घेतले.

कार्यपूर्ततेकरिता ह्यांनी परिश्रमाची कधीच पर्वा केली नाही. सर्व संकटांना तोंड देऊन स्वतःला किंवा आपल्या उमेदवाराला निवडून आणणें हेंच अशा वेळीं ह्यांचें ध्येय राहत असे. ह्यांची इच्छा-शक्ति एवढी दांडगी होती की, त्यापुढे ह्यांना कसल्याच संकटाची पर्वा वाटत नसे.

## मोटार पंक्चर झाली

ह्या ठिकाणीं मला एक प्रसंग आठवतो, तो असा की, रा. बं. नायडूंच्या करता प्रचार करीत असतांना ह्यांचें एका गावीं संध्याकाळीं व्याख्यान ठरलें होतें. त्याप्रमाणे आगाऊ कांही लोकांना पाठवून सर्व व्यवस्था करण्यांत आली होती. कोर्टाचें काम आटोपून हे मोटारने जावयाला निघाले. व्याख्यानाचा कार्यक्रम आटोपल्यावर परत निघून यावयाचें असल्यामुळे सामानसुमान कांहीएक बरोबर न घेतां हे पांचसहा मंडळींना घेऊन निघाले. मोटार भर वेगांत चालली होती. तसेंच ह्यांच्या मनांतील निवडणुकीच्या विचारांनीहि ह्यांचें मन व्यग्र होतें. असल्या प्रसंगीं व्याख्यान वगैरेचा कार्यक्रम असला म्हणजे ह्यांच्या उत्साहाला सीमाच राहत नसे.

शहरापासून कांही दूर गेले नाही तोंच मोटारचीं चाकें फटाफट पंक्चर होऊं लागलीं; ट्यूब्स पार फाटून गेल्या. त्यामुळे गाडी चाल-विणें अशक्य झालें.

## ह्यांचा उत्साह मात्र कायमच !

खेडेगाव आडमार्गांत असून पुढील रस्ता फारच आडवळणाचा व खराब होता. बरोबरच्या मंडळींचा उत्साह मावळून ती नागपूरला परत जाण्याची भाषा बोलूं लागली; पण ह्यांचा उत्साह मात्र कायमच होता. ह्यांनी त्यांना इतर निवडणुकीच्या प्रसंगीं निर्माण झालेल्या

अडचणींचे दाखले देऊन, त्यांतून आपण कसे पार पडलों हें सांगितलें व त्यांचीं मनें पुढील प्रवासाला प्रवृत्त केलीं.

## गवताच्या पेंड्यांनी मोटार चालविली

लगेच गवताच्या पेंडया आणविल्या व त्या मोटारच्या चाकांत भरीत भरीत हळूहळू मोटार चालविण्यास लावून हे लोक नियोजित स्थळीं जाऊन पोहोचले. अशा परिस्थितींत मोटार उलटून जीवाला धोका होईल या गोष्टीचा विचारहि ह्यांच्या मनांत डोकावला नाही.

## 'ही संधिच मिळाली नसती !'

व्याख्यानाचा कार्यक्रम आटोपल्यावर हे आपल्या सोबतच्या मंडळींना म्हणाले, 'पहा, आज आपण जर परत गेलों असतों तर येथे जमलेल्या लोकांना आपलीं मतें व तत्त्वें जीं इतक्या उत्तम रीतीने पटवून देतां आलीं तीं पटविण्याची संधिच मिळाली नसती.'

त्या रात्रीं मंडळींना तेथे थंडींतच अंथरुणपांघरुणाशिवाय राहावें लागलें. घरीं आल्यावर घडलेली गोष्ट म्हणजे एक मजेदार प्रसंग अशाच रीतीने वर्णन चाललें होतें. संकटाचे डोंगर पुढे उभे असतांहि दिलेलें वचन आणि अंगीकारलेलें कार्य पार पाडतांना हे जी धडाडी आणि चिकाटी दाखवीत त्यामुळे यश ह्यांच्या बाजूलाच धावून येत असे. महिना महिना लोक राहूनहि प्रचारकार्य होत नसे तेथे ह्यांच्या एका व्याख्यानाने सारी उलथापालथ होऊन जाई. प्रतिस्पर्ध्यांची बाजू कितीहि बळकट असो ह्यांच्या प्रभावी वाणीने अखेर ती खिळखिळी झालीच म्हणून समजा !

## माझ्या नाकीं नव यायचे !

अशा रीतीने निवडणुकीची मोहीम तर संपली. पण आता पक्षस्थापनेच्या वाटाघाटी सुरू झाल्या. त्यासंबंधीचा ऊहापोह रात्रं-

दिवस आमच्याकडे चालू झाला. त्यासाठी बाहेरगावच्या कांही कौन्सिल सदस्यांचा मुक्काम आमच्याकडेच ठरलेला. त्याबरोबरच इतर लोकांचीहि वर्दळ सुरू असायची. त्यांत निरनिराळ्या जातीचे व धर्मांचे आणि नाना स्वभावाचे लोक असत. त्यांची सर्व प्रकारें व्यवस्था ठेवतां ठेवतां मात्र माझ्या नाकीं नऊ येई.

ठाणे ७७८६

## नायडूंना पक्षपुढारी बनविलें

निवडणुकीनंतर मंत्र्यांची नांवें गव्हर्नरला सादर करण्याकरता कौन्सिलमध्ये एक संघटित पक्ष स्थापन करावयाचा होता. त्याला अनुसरून मोठ्या प्रयत्नाने ह्यांनी एक पक्ष स्थापन केला. पक्ष ह्यांनीच स्थापन केल्यामुळे हे पक्षाचे पुढारी बनून मंत्री होणार हें क्रमप्राप्तच होतें. आम्हांलाहि ह्या बाबतींत कांही शंका नव्हती. पण रा. ब. नायडू यांनी ह्यांच्यापाशी पक्षाचा पुढारी बनण्याची आपली इच्छा व्यक्त केली व ह्यांनी तें मान्यहि केलें. कोणी कांहीहि मागितलें व ह्यांनी तें दिलें नाहीं असें कधी झालें नाही. तेव्हा मित्रत्वाच्या नात्याने ह्यांनी नायडूंना तसें वचन दिलें. पक्षाच्या सभेंत नायडूंना विरोध असून सुद्धा ह्यांनी त्यांना पक्षाचा पुढारी बनविलें असें मला स्मरतें.

## ह्यांचें नांव यादींतून गाळलें

पुढे गव्हर्नर साहेबांना सादर करण्याकरता मंत्र्यांची यादी तयार करण्याचा प्रश्न उपस्थित झाला. त्याप्रमाणे कांही निवडक लोकांची यादी ह्यांच्या सल्ल्याने तयार झाली. ह्यांचें अर्थातच यादींत प्रामुख्याने नांव होतें. रा. ब. नायडूंनी पक्षपुढारी या नात्याने ही यादी गव्हर्नरांना सादर केली. पण जेव्हा गव्हर्नराकडून मंत्र्यांचीं नांवें जाहीर झालीं तेव्हा तिच्यांत ह्यांचें नांवच नव्हतें.

## ‘मी तुम्हांला दोन हात दूरच ठेवणार !’

डॉ. ई. राघवेन्द्रराव हे त्या वेळीं प्रांताचे होम मेंबर होते. सर्व सत्ता व राज्यकारभाराचीं सारीं सूत्रें आपल्याच हातीं असावीं ही त्यांची जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे त्यांचीं सर्व कारस्थानें त्याच दिशेने चालत असत.

पक्ष स्थापन केल्यानंतर हे रावांना भेटायला गेले होते. रावांशीं ह्यांची चांगलीच मैत्री होती. राव ह्यांना म्हणाले, ‘काय केदार, आता तुम्ही मंत्री बनणारच !’ हे म्हणाले, ‘होय, पण एक गोष्ट मात्र तुम्ही ध्यानांत ठेवा की, तुम्ही सरकारी मनुष्य आहांत आणि मी तर लोकनियुक्त प्रतिनिधि आहें. तेव्हा मी तुम्हांला नेहमी दोन हात दूरच ठेवीन !’

रावांची सरकारधार्जिणी मनोवृत्ति ह्यांच्या चांगल्या परिचयाची होती. आणि त्यामुळेच ह्यांनी रावांना तसा सडेतोड जबाब दिला. दुसऱ्याच्या हातचें बाहुलें बनून राहणें व त्याच्या ओंजळीने पाणी पिणें ही गोष्ट ह्यांच्या मानी स्वभावास कधीच खपली नाही. स्वतंत्र व बाणेदार वृत्तीला अनुसरूनच ह्यांनी रावांना वरीलप्रमाणे सडेतोड उत्तर दिलें. अर्थातच हें बोलणें रावांना रुचलें नसावें. त्यांनी रा. ब. नायडूंवर नंतर आपला प्रभाव पाडून त्यांना आपल्या काबूत आणलें.

## नायडूंनी धोका दिला

ज्या नायडूंना ह्यांनी परिश्रमांची यत्किंचितहि फिकिर न करतां निवडणुकींत यश मिळवून देऊन आपलें मित्रकार्य पार पाडलें, तेच नायडू अखेरीस रावांच्या कच्छपीं लागले. ज्या जनतेच्या भरवशावर आपण कौन्सिलमध्ये निवडून गेलों त्या जनतेची सेवा करून ‘आपण खरेखुरे लोकप्रतिनिधि आहों’ ही आपली भूमिका सतत सांभाळावी

अशा ह्यांच्या उज्ज्वल विचारसरणीला नायडूंकडून हरताळ फासल्या जाणार नाही अशी ह्यांची स्वाभाविकच अपेक्षा होती.

## अपकाराची फेड उपकाराने

ह्यांचा जीवन-चित्रपट जेव्हा माझ्या दृष्टीसमोर उभा रहातो तेव्हा मला एक गोष्ट मात्र प्रामुख्याने दिसून येते की, ह्यांच्या चांगुलपणाचा आणि परोपकारी वृत्तीचा फायदा किती तरी लोक नेहमीच घ्यायचे. ही गोष्ट केवळ राजकारणाच्या बाबतींतच नव्हे तर इतर अवांतर प्रसंगींहि मला दिसून येई. ह्यांच्या एक प्रकारच्या अशा भोळसरपणाच्या (!) स्वभावाबद्दल मी ह्यांना हटकलें, तर आपल्या मनाच्या अभिजात दिलदारवृत्तीने ह्यांनी मला येवढेंच उत्तर द्यावें की, 'अशा गोष्टी चालायच्याच. कोणी क्षुद्रपणा दाखविला तर आपण त्याची भरपाई क्षुद्रपणाने न करतां उलट त्याच्यावर उपकाराच्या ओझ्यानेच करावी. त्यांतच आपली खरी प्रतिष्ठा असते.'

परंतु ह्यांच्या ह्या विशिष्ट विचारसरणीमुळेच ह्यांना राजकारणांत इतर संधिसाधु व वेळ येईल त्याप्रमाणे आपल्या स्वभावास मुरड घालणाऱ्या लोकांनी अग्रेसरत्व मिळूं देण्यास नेहमीच खोडे घालावे व त्यामुळे ह्यांच्या उत्कर्षाचा मार्ग कंटकमय होत असावा असेंच मला वाटतें. मात्र, येवढी गोष्ट खरी की, ह्यांनी स्वतःला पटलेल्या तत्त्वांची उपासना आमरण करण्यांतच आपल्या जीविताची अखेरपर्यंत इतिकर्तव्यता मानली व त्यांतच हे स्वतःला धन्य मानीत.

---

## मणी नववा

# गूढ घटनांच्या पूर्वसूचना

दरवर्षी आम्ही उन्हाळयांत थंड हवेच्या ठिकाणीं जात असूं. यावर्षी (१९३०) ह्यांनी पुण्याला राहण्याचें ठरविलें होतें. कारण उन्हाळयाचे सुटींतहि ह्यांना कोर्टाच्या कामानिमित्त वरचेवर नागपूरला यावें लागत असे. त्यामुळे पुणें किंवा नाशिक हींच दोन ठिकाणें आताशी ह्यांना उन्हाळयाकरिता सोयीचीं पडत होतीं. त्याप्रमाणें पुण्याला डेक्कन जिमखान्यावर बंगला घेऊन आम्ही सर्वच मंडळी दोन महिन्यांसाठी तेथे गेलों. तेथे गेल्यावर थोडयाच दिवसांत आमच्या दादाला अचानक सडकून ताप भरला व तो घाबरा झाला. मुलाच्या अंगांतील ताप व त्याची तगमग पाहून हे फारच घाबरून गेले. डॉक्टरला बोलावण्यास निघाले असतां पायांत पादत्राण घालण्याचीहि भ्रांत ह्यांना राहिली नाही. ह्यांचें नेहमी असेंच असे. कोणालाहि थोडें जरी बरें नसलें तरी हे स्वतःच फार घाबरून जात. एरव्ही नेहमीच संयमी असलेल्या ह्यांच्या मनाचा तोल अशा वेळीं सहज सुटून जातांना माझ्या नजरेस येई.

### ऑपरेशनच्या नांवानेच धडकी भरली

असेच एकदा आम्ही माथेरानला गेलों होतों. जाऊन आठ दिवसहि झाले नसतील. आमच्या एका मुलाच्या पोटांत एकाएकीं

दुखूं लागलें. ह्यांनी तिथल्या डॉ. भागवतांना त्याला दाखविलें. डॉक्टरांनी सांगितलें, 'हा अपेंडिसायटिस्‌चा अॅटक आहे. मुंबईला नेऊन ऑपरेशन करून घ्यावें लागेल.' ऑपरेशनचें नांव ऐकतांच ह्यांच्या मनांत धडकीच भरली. दवाखान्यांतून येतांच हे मला म्हणाले, 'आजच्या आज निघालें पाहिजे, तयारीला लाग.' त्याप्रमाणे आम्ही दोन महिन्यांचें अगाऊ भाडें देऊन ठरविलेला बंगला सोडून मुंबईला जाण्यास निघालों. गाडींत मुलाला शौचास झालें व नंतर थोडयाच वेळांत त्याचें पोटाचें दुखणें थांबलें. असा ह्यांचा दुखण्याच्या बाबतींत भारीच घाबरट स्वभाव होता. कोणाला लहानशी ठेच जरी लागली तरी ह्यांचें मन कळवळून जाई.

## मनाची मृदुता !

राजकारणाच्या रंगणांत धडाडी दाखविणारी ह्यांची कणखर मनोवृत्ति कौटुंबिक जीवनांत मात्र कमालीची कोमल होती. बरें, ही वृत्ति फक्त आपल्या आप्तांविषयीच होती असेंहि नाही. घरचा नोकर असो वा बाहेरचा त्रयस्थ असो, सर्वांविषयी एकच मायेचा कळवळा ह्यांच्या ठिकाणीं दिसून येत होता.

आमच्या येथील जमादारीण एकदा आजारी पडली. त्या वेळीं मी बाहेरगावीं गेलें होतें. ह्यांनी डॉक्टरला बोलावून तिच्या औषध-पाण्याची सोय तर केलीच, पण स्वतः जातीने तिचा रोज समाचार घेऊन औषध व पथ्यपाण्याची व्यवस्थाहि हे स्वतःच पाहत होते.

आजारी माणसाला बरें वाटेपर्यंत ह्यांना चैनच पडत नसे. लौकर गुण यावा म्हणून हे परमेश्वराची प्रार्थनाहि करीत. आपली पुण्याई खर्चीं घालून आजाऱ्याला उठविण्याची ह्यांच्या मनाची सदा धडपड चालत असे. आपली पुण्याई खर्चून आजाऱ्याला बरें वाटावें

यासाठीं जसे झटत तसेच हे आपली इच्छाशक्तिहि पणास लावीत असत. याबद्दलचें प्रत्यंतर मला अनेकदा दिसून आलें.

## 'हा काय चमत्कार!'

मी अखिल भारतीय महिला परिषदेच्या अधिवेशनास प्रतिनिधि म्हणून मुंबईस गेलें होतें. एक वर्षाचा राजा माझ्या बरोबर होता. मी प्रतिनिधिनिवासामध्ये न थांबतां आमचे परिचित श्री. विठ्ठलराव शेंडे यांच्याकडे उतरलें होतें. मुंबईला गेल्याच्या दुसऱ्याच दिवशीं संध्याकाळच्या वेळीं मुलाची प्रकृति बिघडून अतिशय चिंताजनक झाली. त्यामुळे मला कांहीं सुचेनासें झालें. मी अगदी घाबरून गेलें. रडूं लागलें. घरीं तार करावी की काय असा विचार माझ्या मनांत आला. पण डॉक्टरांनी सकाळपर्यंत प्रकृतीचें मान पाहून मग कळवावें, अशी माझ्या मनाची समजूत घातली. डॉक्टरांच्या बोलण्याने मला धीर वाटला. तरी ती रात्र मीं काळजींतच घालविली.

दुसरे दिवशीं मुलाची प्रकृति बरी दिसली म्हणून तार न करतां पत्राने घरीं कळविण्याच्या विचारांत मी होतें. इतक्यांत आमच्या प्रकृतीची विचारणा केलेली अशी ह्यांचीच तार आली. हा काय चमत्कार आहे असें वाटून आम्ही स्तंभितच झालों. काल संध्याकाळीं मुलाची प्रकृति एकाएकीं बिघडते काय व आज सकाळीं अचूक त्यासंबंधीची ह्यांच्याकडूच विचारणा होते काय आणि ती देखील बुलढाण्यावरून. सारेंच आश्चर्यकारक!

## ईश्वरेतून मिळालेला संदेश

पुढे भेटीअंतीं याबद्दल खुलासा झाला. तेव्हा कळलें की, मुलाची प्रकृति बिघडली त्या दिवशीं हे केससाठी बुलढाण्याला गेले होते. संध्याकाळच्या सुमारास हे कांहीं मंडळीशीं बोलत डाकबंग-

त्याच्या समोर उभे होते. त्या वेळीं एकदम हवेंतून ‘कोणीतरी हुंदके देत आहे’ असा ह्यांना भास झाला व त्यामुळे ह्यांचें सारें शरीर शहारलें. या घटनेमुळे ह्यांना वाटूं लागलें की, आज घरीं कोणाला तरी बरें नसावें. ह्यांना अशी शंका आली. पण वाऱ्याची दिशा पश्चिमेकडून असल्याचें ध्यानांत येतांच मुंबईला गेलेल्या मंडळी-विषयीचा हा संदेश असावा अशी ह्यांच्या मनाची खात्री झाली. लगेच तार करून आमच्या प्रकृतीची चौकशी करण्याचें ठरवून रात्रभर आपली इच्छाशक्ति ह्यांनी पणास लावली.

इतर प्रसंगींहि असे अनुभव मला वारंवार यायचे. त्यावरून माझा नक्की ग्रह झाला की, ह्यांच्या इच्छाशक्तीचा प्रभाव पडूनच मुलाच्या प्रकृतीला आराम पडला असावा. ह्यांच्या मनाची सात्विकता आणि पावित्र्य यांमुळेच शेकडों कोस दूर असलेल्या व्यक्ती-विषयीच्या संवेदना ह्यांना अचूक मिळत असत. त्याचप्रमाणे ह्यांच्या इच्छाशक्तीचें सामर्थ्यहि तितकेंच प्रभावी ठरत असे.

## ह्यांचें भविष्य खरें ठरलें

कांही प्रसंगीं तर पुढे घडणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगांचें ह्यांनी केलेलें अनुमान बहुधा खरें ठरत असे. स्वप्नाच्या खरेपणाचा पडताळा तर ह्यांना नेहमींच येत असे. या संबंधीची एक घटना अशी.

नागपूर म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षपदासाठी एकदा हे उभे राहिले होते; पण त्यासाठी विशेष असा खटाटोप ह्यांनी केला नव्हता. ज्या दिवशीं निवडणूक होती, त्या दिवशींच सकाळीं आम्ही घरची मंडळी चहा घेत असतांना हे म्हणाले, ‘आजच्या निवडणुकींत मी हारणार आहें.’ निवडणुकीच्या बाबतींत असली भाषा ह्यांच्या तोंडीं आम्ही कधीच ऐकलेली नव्हती. तेव्हा आम्ही सर्वच आश्चर्यानें

ह्यांच्या तोंडाकडे पाहूं लागलों. तेव्हां ह्यांनी आम्हांला त्याच सकाळीं पडलेलें स्वप्न सांगितलें. तें स्वप्न असें की, हे मोटारमध्ये बसून चालले होते. वाटेंत एक नदी आडवी आली. तिला मोठा पूर असून पाणी पुलावरून चाळलें होतें. त्या पुलावरून जावें की नाही याचा विचार करीत ह्यांनी मोटार थांबविली. इतक्यांत दुसरी मोटार भरधाव येऊन ती नदीपार निघून गेली व लागलीच त्या नदीचें पाणी ओसरलेलें दिसलें. नदीपार झालेल्या मोटारींत खादीची पांढरी टोपी घातलेला एक मुसलमान गृहस्थ बसलेला होता. हे त्या मोटारीकडे पाहतच राहिले व इतक्यांत ह्यांची झोप उघडली.

ह्यांच्या या स्वप्नाचें प्रत्यंतर बरोबर मिळालें. त्या निवडणुकींत श्री. समीउल्लाखान हे निवडून आले. त्यांच्या डोक्यावर नेहमीच खादीची टोपी असते.

## आमची मनःस्थिति

आम्ही पुण्याचा मुक्काम आटोपून घरीं आलों. आता आमच्या-'भय्या'ला फॅराडे हाऊसचें इलेक्ट्रिकल इंजिनीयरींगचें शिक्षण घेण्यासाठी विलायतला पाठविण्याचा ह्यांचा विचार झाला. त्याप्रमाणे त्याला पोहोचवायला आम्ही घरची सर्वच मंडळी मुंबईला गेलों होतों. प्रथमच तो आमच्यापासून दूर–दूरच नव्हे तर परदेशांत—जायचा हा विचारच मुळी आम्हांला सहन होत नव्हता. माझ्या डोळ्यांना सकाळपासून पाण्याच्या धारा लागल्या होत्या. ह्यांच्या हळुवार मनाला तर ही जाणीव तीव्रतेने भासत होती. भय्याच्या मनावरहि ह्या गोष्टीचा फारच परिणाम झालेला दिसला. जरी उच्च शिक्षणासाठी त्याला जावयाचें होतें व नवीन चालीरीती, नवीन देश, इत्यादि पाहायला मिळणार होते तथापि आपलें घर, आपली जिव्हाळयाची आप्तमंडळी यांना सोडून 'आपण परदेशीं लांब जाणार आहों' हा

विचार मनांत येऊन त्याचें मन भारावून जाणें साहजिकच होतें.

## प्रेमाचा निरोप

सकाळीं अकराच्या सुमाराला आम्ही 'बॅलार्ड पियर' धक्क्यावर गेलों. रीतसर सर्व तपासणी होऊन तो बोटींत बसला. कांही वेळाने बोटीचा कर्णा वाजला व प्रवासी खेरीज करून इतर मंडळी खाली उतरली. आम्हीहि भय्याला 'प्रकृतीला जपत जा व सविस्तर पत्र पाठवायला विसरूं नकोस' असें पुन्हा पुन्हा सांगून खाली उतरलों. असें वारंवार सांगण्याचें कारण म्हणजे एवढेंच की, तो बोलण्याच्या बाबतींत जितका मोकळा आणि अघळपघळ आहे, तितकाच लिहिण्यासवरण्याच्या बाबतींत कंटाळा करणारा आहे. म्हणून तीनतीनदा त्याला त्याविषयी सांगावें लागलें. नंतर जड अंतःकरणाने त्याला निरोप देऊन आम्ही खाली उतरलों. तो बोटीच्या डेकवर उभा राहिला. तेथून त्याची दृष्टि आमच्याकडेच लागली होती. त्याने आमच्याकडे बघायचें व आम्ही त्याच्याकडे बघायचें! फारच झालें तर हातांनी खुणा करावयाच्या! त्या वेळीं आम्ही परस्पर आपल्या मनांतील भाव आमच्या दृष्टिद्वारेंच एकमेकांना कळवीत होतों. नंतर दोन तासांनी एकदाची बोट हालली व निरोप देण्याकरता धक्क्यावर जमलेल्या आमच्यासारख्या कितीतरी लोकांचे 'प्रेमळ जीव' सांभाळून घेत बोटीने मुंबईचा किनारा सोडला. बोट आमच्या दृष्टिपथाच्या बाहेर निघून गेल्यावरच आम्ही परतलों.

## 'केस कापत नसाल तरच मुंज!'

भय्या विलायतला गेल्यानंतर दादाची मुंज करण्याचें ठरलें. दादाचें मुंजीचें वय होऊन गेलें होतें. त्यामुळे ती नागपूरलाच करून घेण्याचा विचार ठरला. बाकी दोघांच्या मुंजी नाशकास केल्या होत्या.

दादा लहानपणीं फार हट्टी ! कोणापुढे कधीच न नमण्याची त्याची वृत्ति. ह्यांनाहि बरेच वेळां त्याच्यापुढे नमतें घ्यावें लागत असे. मोठमोठया केसीस लढवितांना व राजकारणांत लोकांना चीत करणारें ह्यांचें प्रभावी अस्त्र या मुलापुढे मात्र निष्प्रभावी ठरत असे.

मुंजीच्या वेळींहि अशीच गम्मत झाली. 'माझ्या डोक्यावरील केस काढून तें गुळगुळीत करणार नसाल तरच मी मुंज लावून घेईन' असें त्याने अगोदरच ह्यांच्याकडून कबूल करवून घेतलें होतें. डोक्या-वरील केस कायम ठेवून मौंजीबंधनाचा विधि झालेला आमच्या पाह-ण्यांत कांही ठिकाणीं आल्यामुळे आम्हींहि त्याची ती अट मान्य केली.

## 'चौलविधि झालाच पाहिजे !'

पण ऐनवेळीं भटजींना ही गोष्ट पसंत पडली नाही. त्यांनी असें सांगितलें की 'चौलविधि होत नाही तोंपर्यंत बटु मौंजी-बंधनाकरितां योग्य ठरत नाही. तरी तो विधी झालाच पाहिजे.' भटजींचा असा आग्रह आणि मुलाचा तसा हट्ट. यामुळे त्या दोघांत वितंडवाद सुरू झाला. ह्यांनी आपल्या परीने दोघांची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. दोघेहि आपला हेका सोडीनात. प्रसंगाचा बेरंग होण्याचीच वेळ ती. ह्यांच्यापुढे ही नवीनच समस्या निर्माण झाली. ह्यांनी दादाला धाकदपटशा दाख-विण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला की, तो तेथून जो सटकला तो थेट न्हाणीघरांत जाऊन दार बंद करून बसला. इकडे मुंजीची घटका भरत आलेली. मांडवांत मंडळी जमूं लागली. शेवटीं ह्यांना आपला विचार बदलावा लागला.

ह्यांनी मुंजीसाठी मुद्दाम विद्वान् शास्त्री बोलाविले होते. त्यांची योग्य ती संभावना करून ह्यांनी त्यांची बिदागी केली. ते गेल्यावर ह्यांनी

"दादाला' बाहेर येण्यास विनविलें. नंतर एकंदर विधि नेहमीच्या घरच्या पुरोहिताकडून आटोपून घ्यावा लागला.

## मुलांत कोणाचे गुण उतरले?

दादाचा हा हट्टी स्वभाव पाहून मी एक दिवस सहज विनोदाने ह्यांना म्हणालें ' हा एवढा कोणासारखा हट्टी झाला आहे?' हे चटकन् हसून म्हणतात, 'बापाचे गुण उतरले आहेत; आणखी काय!'

ह्याच अनुषंगाने ह्यांनी स्वतःच्या लहानपणचा एक प्रसंग सांगितला. हे म्हणाले, 'मी दहा वर्षांचा असतांना मला नाटकाला जायचें होतें. त्यासाठी आईला पैसे मागितले. ते तिने दिले नाहीत. म्हणून मीं हट्टाने घरांतील साऱ्या सामानाची फेकाफेक सुरू केली. त्यामुळे माझ्या पाठीवरच मला नाटक पहायला मिळालें.'

## तेंच तर गूढ आहे!

"माझा मुलगा 'बापसे बेटा सवाई' निघाल्याचा मला आनंदच वाटेल." ते म्हणाले. 'पण तुम्ही तर त्याच्यापुढे नमतें घेतां?' त्यावर हे म्हणाले, "तेंच तर गूढ आहे. मी नमतें घेतों म्हणजे मी मुलाला प्रतिकार करूं शकत नाही असें नाही. तर त्याच्या स्वतंत्र विचारसरणीला बंधन घालण्याची माझी इच्छा नाही. मुलांच्या मनोवृत्तीची वाढ मोकळेपणानेच व्हावयाला हवी, असें माझें मत आहे."

## अजब मिश्रण

विधात्याने ह्यांच्या मनाची रचनाच मोठी गुंतागुंतीची केली होती असें मला वाटतें. घरीं नेहमी घडणाऱ्या कित्येक प्रसंगांतून त्याचें प्रत्यंतर मला मिळे. धार्मिक विधीप्रमाणे सर्व कार्यें व्हावीं असें

जरी ह्यांना वाटे तरी हे गतानुगतिक नव्हते. तशीच प्रतिकार वृत्ति जरी ह्यांच्या हाडीमासीं खिळली असली, तथापि दुसऱ्यांचे अपराध विसरण्याची उदार वृत्ति पण ह्यांच्या ठायीं होती. ह्यांच्या धर्मभावना तीव्र होत्या तशीच देवावरील निष्ठाहि आमरण टिकून होती. पण एक गोष्ट खरी की, हे देवभक्त असले तरी देवभोळे मात्र नव्हते.

ह्यांची निस्सीम ईशनिष्ठा व तदनुसार ह्यांचें आचरण ह्या संबंधीचे ह्यांच्या आयुष्यांतील एकदोन प्रसंग मुद्दाम देत आहे. १९३२ च्या सुमारास ह्यांनी काशी क्षेत्राला जाऊन श्रीविश्वेश्वराचें दर्शन घेण्याचा विचार ठरविला. बारा ज्योतिर्लिंगांपैकी आतापावेतों ह्यांनी आठ तरी ज्योतिर्लिंगांचें दर्शन घेतलें होतें. निदान वर्षाकाठीं एका तरी शंकराच्या पवित्र स्थानाला जावयाचें असा ह्यांचा संकल्प होता. त्याप्रमाणे ह्यांनी काशीला जाण्याचें ठरविलें तेव्हा मी माझ्या शिवरात्रीव्रताची उजवणूकहि तेथे उरकवून घेण्याचा विचार केला. सासूबाईंनी माझ्यावर 'शिवरात्र' सोपविली होती ती काशीला उजवावी असा माझा संकल्पच होता. ठरल्याप्रमाणे आम्ही मोटारने जावयाला निघालों. जबलपूरपर्यंत आमची मोटार चांगली गेली. तेथे गेल्यावर मात्र ती बिघडली. त्यामुळे शिवरात्रीच्या दिवशीं काशीला जाऊन पोहोचणें अशक्य झालें. ह्या मध्येच अडथळा उत्पन्न झाल्यामुळे मला तर वाईट वाटलेंच, पण माझ्यापेक्षा ह्यांनाच जास्त वाईट वाटलें. त्याहि प्रसंगांत ह्यांनी आपल्या मनाचें समाधान राखलें. हे मला म्हणाले, 'चांगल्या कामालाच बहुधा अनेक अडचणी व संकटें येत असतात. माणसाच्या मनांतील सारेच हेतू सहजासहजीं सफल व्हावयाला लागले तर परमेश्वराच्या अस्तित्वाचा आपणाला विसरच पडेल !! विश्वेश्वराच्या मनांतून आपल्याला फक्त दर्शनच द्यावयाचें आहे; तुझ्या व्रताचें उद्यापन करून घ्यायचें नसेल !!'

ह्यांच्या या बोलण्याने माझ्या चटकन् ध्यानांत आलें की, आपण व्रताला सुरुवात केली तेव्हा बारा वर्षांनी त्याची उजवणूक करायचें ठरविलें होतें. सध्या तर दोन वर्षांचा अवधि आहे. मी ह्यांना याबद्दल बोललें. तेव्हा हे म्हणाले, 'ईश्वरी चमत्काराचा महिमाच अगम्य आहे. सामान्य जनाला त्याचें आकलन होणें कठीणच!'

## गंगामाईचें पवित्र दृश्य

पुढे दोन तीन दिवसांनी मोटार दुरुस्त झाल्यावर आम्ही काशीला गेलों. त्या पवित्र स्थळाचें वर्णन काय करावें! गंगामाईचें स्नान, त्रिकाळ काशीविश्वेश्वराचें दर्शन, संध्याकाळीं नावेंतून गंगामाईच्या त्या विशाल पात्रांत जलविहार! सारेंच पवित्र वातावरण!! सर्व गोष्टी पाहून व त्यांचा अनुभव घेऊन आपलें उर्वारित आयुष्य अशा पवित्र ठिकाणींच घालवावें असे ह्यांनी उद्गार काढले. अशा पवित्र स्थळीं ह्यांच्या मनाची अवस्था नेहमी अशीच उल्हसित होत असे. .

## विठ्ठलाच्या मंदिरांत

याचप्रमाणे आम्ही पंढरपुरला जात असूं तेव्हा तेथेहि मंदिराच्या गाभाऱ्यांत विठ्ठलमूर्तीचें दर्शन व हरिनामाचा गजर ऐकला म्हणजे ह्यांची स्थिति तशीच होत असे. विठ्ठलाच्या मूर्तीकडे तास न् तास अनिमिष नेत्रांनी हे पहात रहायचे! 'संसारांत जर खरा आनंद कोठे असेल तर तो या ठिकाणींच! व्यवहारांतील साऱ्या उपाधी सोडाव्यात व या राउळांत बसून विठ्ठलाच्या स्वरूपांत तन्मय व्हावें, असें मला फार फार वाटतें,' असें हे म्हणत. मानवी जीवनाची केवढी ही सोज्वळ महत्त्वाकांक्षा!!

## एक अमेरिकन संन्यासी

असेच एकदां आम्ही केसनिमित्त बैतुलला गेलों होतों. तेथून २०, २५ मैलांवर नर्मदाकाठीं असलेलें एक रमणीय स्थान आम्ही पाहण्यास गेलों. खडकावर महादेवाचीं बरींच लिंगें असून जवळच एका कुटींत भगवीं वस्त्रें परिधान केलेला एक अमेरिकन मनुष्य राहात असलेला दिसला. त्याच्या कुटींत जाऊन आम्ही त्याची भेट घेतली. स्मित वदनाने त्याने आमचें स्वागत केल्यावर त्या ठिकाणीं येऊन वास्तव्य करण्याचा आपला उद्देश त्याने ह्यांना सांगितला. हिंदुधर्माचें अध्ययन व परिशीलन करण्याचा त्याचा उद्देश होता. पुढे त्या विषयासंबंधाने दोघांत सुमारें तास दीड तास चर्चा झाली. चर्चा संपल्यावर त्या अमेरिकन गृहस्थाला फारच आनंद झाल्याचें दिसलें. आम्ही जावयास निघालों तेव्हा तो अमेरिकन गृहस्थ मनःपूर्वक ह्यांचे आभार मानून म्हणाला, 'येथे सहा महिने हिंदुधर्मग्रंथांच्या सतत परिशीलनाने जें ज्ञान मला मिळवितां आलें नाही तें आज आपल्या बरोबर केवळ एक तास चर्चा करून मला प्राप्त झालें.'

## जेथे तुम्ही तेथे मी

मोटारमध्ये बसून आम्ही तेथून निघालों. ह्यांचें मन जरा गंभीर झाल्यासारखें दिसलें. नर्मदातीरावरील ह्या शांत निसर्गसौंदर्याचा ह्यांच्या भावनामय मनावर परिणाम झाला असावा असा माझा तर्क झाला. आणि तो खराहि होता. तितक्यांत हेच मला म्हणाले, 'हिमालयांत जाऊन निवांतपणें ज्ञानर्जनांत आयुष्य घालवावें असें मला फार वाटतें. हा अमेरिकन गृहस्थ नाही का आपला देश व परिवार सोडून इतक्या दूर आला? माझीहि अशीच इच्छा आहे. पण तुझ्या संमतिशिवाय तसें करतां येणार नाही. तूं देशील का मला परवानगी?" ह्यांचा प्रश्न ऐकून मी बरीच गंभीर झालें व ह्यांना म्हणाले, 'मलाहि बरोबर नेत असाल

तर माझी परवानगी.' त्यावर हे म्हणाले, 'तूं आपलें घरदार, मुलंबाळं सोडून कशी येणार?' त्यावर मी म्हणालें, 'आता आपलीं मुलें मोठीं झालीं आहेत, त्यांची नको काळजी. मी काय त्यांना जन्मभर पुरणार आहें? जेथे तुम्ही तेथे मी!'

### हरिद्वार-हृषिकेशची यात्रा

यानंतर चार सहा महिन्यांनी आम्हाला हृषिकेशला जाण्याचा योग आला. तेथे आमच्या परिचयाचे जोशी नांवाचे एक गृहस्थ सर्वसंगपरित्याग करून संन्यस्त वृत्तीने राहत होते. त्यांचा मुद्दाम शोध करून आम्ही त्यांना भेटलों. त्यांची ती विरक्त स्थिति पाहून मला ह्यांच्या मागच्या बोलण्याची आठवण झाली व माझ्या पोटांत धस्स झालें. खरोखरच ह्यांच्या ठिकाणीं वैराग्य निर्माण होऊन हे हिमालयांत आले तर काय होईल, ह्याची कल्पनाहि मला करवेना; एवढेंच नव्हे तर मला एकदम रडूंच कोसळलें!

### माझें मनःसामर्थ्य मोठें आहे!

त्या जोशीबुवांच्या कुटींतून बाहेर आल्यावर माझ्या मनाची दुर्बलता मीं ह्यांना सांगितली आणि म्हटलें, 'तुम्हांलाहि पण तें साधणार नाही. बायकांचें मन हळवें आणि कोमल असतेंच म्हणा, पण तुमचें मन तर आपल्या मुलाबाळांविषयी फारच कोमल आहे. तुम्हांलाहि त्यांना सोडून जाववणार नाही!' त्यावर हे निश्चयी मुद्रेने ताडकन् म्हणाले, "मी मनाने कोमल असलों तरी मायेचे हे पाश एका झटक्यांत तोडून टाकण्याचें दांडगें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे, हें तूं विसरूं नकोस. शिवाय मी हिमालयांत राहिलों तरी वैभवानिशींच राहीन!"

### ह्यांची उपासना

हे महादेवाचे निस्सीम उपासक होते. बी. ए. च्या वर्गात असतांनाच ह्यांनी सोमवार व्रत अंगीकारलें होतें. सोमवारीं संध्याकाळीं

स्नान करून व धूतवस्त्र परिधान करून आम्ही दोघें रुद्राभिषेकाला बसत असूं. त्या वेळीं हे जे मंत्र म्हणत त्यांनी आमचें देवघर निनादून जात असे. सारें वातावरण कसें अगदी गंभीर, शांत व प्रसन्न होऊन जाई! शंकराला आळवीत असतांना मध्येच ह्यांचा कंठ सद्गदित होई. ह्यांच्या कंठांतून निघत असलेले मंत्रांचे ते गोड मधुर स्वर माझ्या कानांत आजहि घुमत आहेत.

## माशीने दिलेली सूचना

आपल्याप्रमाणे आपल्या मित्रमंडळींनाहि सोमवारचा उपवास करण्याचा हे उपदेश करीत. असले उपवास वगैरे करण्याला ह्यांच्या मनावरील बाळपणचे संस्कार तर कारण होतेच होते; पण ही गोष्ट ह्यांच्या बुद्धीलाहि पटलेली होती. हीं धार्मिक कृत्यें हे बुद्धिपुरस्पर करीत असत. कारण त्यांमुळे आत्मबल वाढून मनाला शांति व समाधान मिळतें असें ह्यांचें मत होतें. बाहेर गावीं गेले असले तरी ह्यांच्या या कार्यक्रमांत सहसा खंड पडत नसे.

सिमल्याला १९२८ सालीं मंत्र्यांची परिषद झाली होती. त्या परिषदेला हे मध्यप्रांत सरकारचे एक मंत्रि म्हणून गेले होते. तेथे एके दिवशीं सकाळीं एका ठिकाणीं उपाहाराला जावयाचें होतें. गडबडींत तो दिवस सोमवार आहे याचें ह्यांना स्मरण राहिलें नाही. मोटारमध्ये बसायला जातात तोंच एका माशीने ह्यांच्या ओठाला स्पर्श केला. त्यामुळे ह्यांना तात्काळ स्मरण झालें की, आज सोमवार आहे. नकळत आपल्याकडून कांही तरी खाण्याचा प्रमाद आज घडला असता. पण ही ईश्वरीच योजना की, त्याबद्दल आपल्याला ही अचानक सूचना मिळाली. या गोष्टीचें ह्यांना मोठेंच गूढ वाटलें. सिमल्यावरून परत आल्यावर ही घटना ह्यांनी मला सांगितली.

## मणी दहावा

# ग्रंथ-हव्यास

आम्ही बनारसचा प्रवास आटोपून नागपूरला आल्यावर येथे १९३३ सालीं नाटयाचार्य कै. काकासाहेब खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अधिवेशन भरलें होतें. ह्यांना या संमेलनाच्या स्वागतोपाध्यक्षपदाचा मान अधिवेशनाच्या स्वागत मंडळाने दिला होता. वाङ्मयीन क्षेत्रांतील व विशेषतः संस्कृत वाङ्मयाची ह्यांची अभिरुचि व त्या क्षेत्रांतील ह्यांची संशोधनात्मक दृष्टि, यांमुळेच ह्यांना स्वागतमंडळाने हा बहुमान दिला असावा, असें मला वाटतें. कायदेशास्त्र आणि साहित्यशास्त्र यांचा संगम, इतरत्र क्वचितच दृष्टीस पडणारा, ह्यांच्या ठिकाणीं मात्र अगदी दर्शनीय असा झाला होता. हे निष्णात कायदेपंडित असले तरी अभिजात साहित्यिकहि होते. साहित्य हा ह्यांचा अत्यंत आवडीचा विषय! कोर्ट-कचेरीचीं सारीं कामें सांभाळून हे साहित्याचा परामर्श नेहमीच मोठया आवडीने घेत होते. वर्धेला असतांनाच आपल्या इतर मित्रमंडळींच्या सहकार्याने 'सुमती' नांवाचें एक साप्ताहिक व 'सुबोध' नांवाचें एक मासिक चालविलें होतें. या दोन्हीहि नियतकालिकांतून ह्यांनी विविध प्रकारचें गंभीर आणि ललित लिखाण केलें आहे. विद्यार्थी-दशेपासूनच ह्यांना कविता

करण्याचा नाद होता. मराठीप्रमाणेच संस्कृत व इंग्रजी या दोन भाषांमधूनहि हे चांगली काव्यरचना करीत.

वाचनाचा हव्यास तरी केवढा!

एखाद्या मोठ्या शहरीं आम्ही गेलों की तेथे असलेल्या ग्रंथालयाला ह्यांनी भेट दिली नाही असें सहसा होत नसे. त्या प्रसंगीं हे मला म्हणायचे, 'असें वाटतें की, कांही दिवस वकीली सोडून द्यावी व ग्रंथालयांत नोकरी धरून ज्ञानलालसेची भूक मनसोक्त वाचन करून शमवून घ्यावी.' इतका वाचनाचा ह्यांना हव्यास! पुस्तकांची केवढी आवड! विविध प्रकारचें ज्ञान अहर्निश मिळविण्याची ह्यांची नेहमी धडपड चालत असे.

हे ग्रंथ म्हणजे ज्ञानभांडार

प्रवासाच्या प्रसंगीं ह्यांची ग्रंथांची खरेदी आपली ठरलेलीच! मीं एखादी नवीन वस्तु घेण्याची गोष्ट काढली की लागलीच हे म्हणायचे, 'आपल्या गावीं तर या सर्व वस्तू मिळतातच, तुम्हां बायकांना सामान घेण्याचा भारीच सोस. शहाण्या माणसांनी बायकांना घेऊन कोठे जाऊं नये!' मला असा उपदेश करायचे मात्र; पण तेंच पुस्तकाचें दुकान दिसलें की, 'आता आलोंच बघ,' म्हणून आंत जायचे ते चांगले गठ्ठाभर पुस्तकांची खरेदी करूनच, तब्बल दोन तासांनी बाहेर पडायचे! असला अनुभव मला नेहमीच यायचा. ह्यांनी केलेली पुस्तकांची ही खरेदी पाहून मी खोटेंच रागावून म्हणायची, 'तुम्ही वाटेल तशीं पुस्तकं खरेदी करतां आणि मला मात्र मुलांच्याशाठी एक देखील खेळणें घेऊं देत नाही.' त्यावर हे हसून म्हणायचे, 'अग, आजचीं खेळणीं मुलें उद्या मोडून तोडून फेकूनहि देतील. या पुस्तकांचें तसें नाही. हीं पुस्तकें म्हणजे प्रत्यक्ष

ज्ञानभांडारच होत. मनुष्याची वैचारिक श्रेष्ठता वाढविणारीं तीं प्रभावी साधनें आहेत. त्यांपासून माझ्या, तुझ्या आणि किती तरी जणांच्या ज्ञानांत नित्य भर पडायला मदतच होईल !'

## आमच्या घरचें ग्रंथभांडार

पुस्तकांविषयीची ह्यांची ही श्रद्धा आणि आवड पाहिली म्हणजे ह्यांच्या या बोलण्यावर काय बोलावें तेंच मला सुचत नसे. ग्रंथांचें हें माहात्म्य स्वयंसिद्धच नाही काय ?

वेदान्त ग्रंथापासून तों ललित वाङ्मयांतील सामान्य प्रकारांपर्यंत सर्वच तऱ्हेचा ग्रंथसंग्रह ह्यांनी आपल्या संग्रहीं करून ठेवला आहे.

## यशस्वी वकील कसा होतो ?

ह्यांच्या लिहिण्याच्या टेबलावर कायद्यांच्या ग्रंथांचा खूप ढीग पडलेला असे. त्यांतच महाभारताचें एखादें पर्व किंवा होनाजी बाळ, रामजोशी यांचा लावणीसंग्रहहि आढळून येई. वेळांत वेळ काढून ह्यांचें सर्व प्रकारचें वाचन चालू राही. ह्यांना वाचनाचा कंटाळा असा मला कधीच आढळून आला नाही. हे नेहमी म्हणत की, 'वकिली पेशांतल्या लोकांना विविध वाचन-मननाची फार गरज असते. चौफेर ज्ञान मिळविल्याखेरीज वकिलाला आपल्या धंद्यांत यशस्वी होतां येणार नाही.'

आपल्या धंद्याव्यतिरिक्त ह्यांना अधिक वेळ मिळाला असता तर साहित्यक्षेत्रांत ह्यांच्याकडून पुष्कळ कामगिरी पार पडली असती. पण इतकें असूनहि ह्यांच्या ठायीं कार्याचा उरक चांगला असल्यामुळें ते मधूनमधून साहित्याबाबत लिहीतच. माझी तर अशी उत्कट इच्छा होती की, ह्यांच्याकडून भरपूर वाङ्मयनिर्मिति व्हावी. त्याविषयी मी ह्यांना सदोदित म्हणतहि पण असें. माझ्या इच्छा आणि

आशा मागेपुढे सफल झाल्याहि असत्या. पण पुढे हे राजकारणी व मुत्सद्दी डावपेचांतच अधिक तरबेज झाल्यामुळे माझी ती महत्त्वाकांक्षा पुरी होण्याचा योग मात्र मला लाभूं शकला नाही. हे धुरंधर राजकारणी व सव्यसाची कायदेपंडित म्हणूनच ह्यांची प्रसिद्धी व्हावयाची होती असेंच म्हणावें लागेल !

## तीन 'सरां'विरुद्ध एक केदार

ह्यांच्याकडे आताशा मोठमोठ्या केसेस येऊं लागल्या होत्या. १९३३ मध्ये एक खटला हुशंगाबाद कोर्टांत चालूं झाला. त्याचें कारण असें की, सरदार दिवाणसिंग मफ्तून या 'रियासत' पत्राच्या संपादकाने भोपाळच्या नबाबाविरुद्ध कांही मजकूर आपल्या पत्रांतून प्रसिद्ध केला होता. त्यांत त्याने नबाबावर संस्थानांतील राज्यकारभाराबाबत कडक टीका केली होती.

ती टीका मर्मी झोंबल्यामुळे नबाबाने चिडून जाऊन दिवाणसिंगाविरुद्ध फौजदारी कारवाई सुरू केली. त्या प्रकरणीं कोर्टाने दिवाणसिंगाला दोषी ठरवून त्याला तीन वर्षांची स. म. ची शिक्षा दिली.

नंतर नागपूर येथील हायकोर्टांत त्याने अपील आणलें. त्या वेळीं आरोपीतर्फे हे काम काम चालवीत होते. भोपाळ दरबारातर्फे सर तेजबहादूर सप्रू, सर सी. पी. रामस्वामी अय्यर व सर अब्दुल रहिमान असे तीन 'सर' आणि इतर वकील होते.

ही केस बरीच गाजली व ती बरेच दिवस चालूं होती. पण अखेर ही अपील केस ह्यांनी जिंकली.

## आय. सी. एस. ची आई होण्याची महत्त्वाकांक्षा

राजकारण व व्यवसायांतील वाढती जबाबदारी आणि त्याचबरोबर समाजकार्य सांभाळणें, यांमुळे ह्यांना स्वस्थता कशी ती मिळेना. या वेळीं आमचा बाबूराव बी. ए. झाला होता. त्याला बॅरिस्टरीच्या

शिक्षणासाठी विलायतला पाठविण्याचा ह्यांचा विचार ठरला. पण माझी महत्त्वाकांक्षा मात्र अगदी निराळी होती. त्या वेळच्या परिस्थितींत आय्. सी. एस्. ची आई म्हणवून घेण्याची मला भारी आवड होती. त्याप्रमाणे बाबूला तो कोर्स देण्याचा मीं ह्यांना आग्रह केला. भय्याचा एंजिनीयरिंगचा कोर्स पुरा होण्याला अजून अवकाश होता. तेव्हा त्याला घरीं बोलावण्यांत आलें व त्याच्या-बरोबर बाबूला पाठविण्याचें ठरलें.

## हिंदु संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान

भय्या घरीं आल्यावर थोड्याच दिवसांनी दोघांचीहि जाण्याची तयारी झाली. मुलांना परदेशांत पाठवितांना एका बाबतींत मात्र हे फारच दक्षता घेत. त्यांनी तिकडे जाऊन परधर्मीय वारें घरांत आणूं नये याविषयी हे कसोशीने जपत असत. मुलांच्या हातांत गीता देऊन त्यांच्या हातून तशा शपथा करवून घेत. हिन्दु धर्म व हिंदु संस्कृति यांविषयीचा ह्यांचा अभिमान फार जाज्वल्य होता. त्यामुळे हिंदु संस्कृतीला विसंगत अशी कोणतीहि गोष्ट आपल्याकडून घडूं नये यांविषयी हे फार सावध असत. 'हिंदु धर्मांतल्या कोणत्याहि जातीच्या मुलीशीं तुम्हीं लग्न केलें तरी चालेल, पण परधर्माची ब्याद मात्र माझ्या घरांत चालणार नाही' असें ह्यांनी मुलांना निक्षून बजावलें होतें. हा 'आचारधर्म' आमच्या दोन्ही मुलांनी कसोशीने पाळला हें मला स्वाभिमानाने सांगावेंसें वाटतें. या स्वतंत्र विचाराच्या युगांत, परदेशच्या स्वैर वातावरणाचा अनुभव घेतलेल्या आमच्या मुलांनी आपल्या पित्याची आज्ञा अक्षरशः पाळली, ह्याचें श्रेय आमच्या घरांतील पूर्वापार संस्कारांनाच देणें भाग आहे.


## बाबूरावाचें परदेशीं प्रस्थान

याप्रमाणे त्यांची सर्व तयारी झाल्यावर आम्ही त्यांना मुंबईला

पोहोचवायला गेलों. या वेळीं दोन्ही मुलें जात होतीं तरी आमच्या मनावर तितकासा परिणाम झाला नव्हता. कारण भय्याने सांगितलें होतें की, तिकडच्या 'लॅंड लेडीज' फारच ममताळू असून अतिशय काळजी घेतात. शिवाय अगदी पहिल्यांदा जो एक सुखदु:खाचा आवेग येत असतो तो दुसऱ्यांदा तेवढा भासत नसावा. यामुळे त्यांना निरोप देण्याच्या वेळीं आमचीं मनें विशेष अशीं भारावलीं नव्हतीं.

## मुलांचा वियोग जाणवला

तथापि घरीं परत आल्यावर मात्र घर अगदी ओकें ओकें वाटायला लागलें होतें. ह्यांना याची जाणीव बरेच दिवस होत होती. बाहेरचीं कामें आटोपून हे घरांत आले म्हणजे मला म्हणायचे, 'आपण मुलांना शिक्षणासाठी लांब पाठवतों खरें, पण त्यांच्यावांचून घर अगदीच सुनें वाटतें. मुलं नसल्यानं घरांत बरं वाटत नाही.' त्यावर मी एकदा ह्यांना म्हणालें, 'आपलीं मुलं शिक्षणासाठी कांही दिवस दूर झालीं आहेत त्याचं तुम्हांला इतकं वाईट वाटतं. मुलीचं लग्न करून तिला कायमची सासरीं पाठवितात तेव्हा आईबापांना कसं वाटत असेल ! आपल्या मुली वांचल्या नाहीत म्हणून त्या वियोगदु:खापासून आपली सुटका झाली आहे. तसं असतं तर माहीत नाही तुमच्या मनाची काय स्थिति झाली असती ती !' या माझ्या बोलण्यावर हे म्हणत, 'खरं आहे तुझं म्हणणं' आणि त्या नुसत्या कल्पनेनेच ह्यांचें मन भारावून जाई. पुढे घरांत सुना आल्यावर त्यांच्याविषयीहि ह्यांचें मन कोमल भावनेने नुसतें भरून येई. वात्सल्यभावनेची व वियोगप्रसंगांची जाणीव असल्यामुळे स्वत: होऊन त्यांना नेहमी माहेरीं पाठविण्याची काळजी घेत. फार काय, केसनिमित्त जर ह्यांना सुनांचें माहेर असलेल्या बाजूला जाण्याची वेळ आली तर स्वतःच त्यांना पोहोचवून पण देत असत.



कुटुंबियांसह (सन १९४७)

ह्यांचीं मतें जरी रूढिप्रिय असलीं तरी हे अगदीच प्रतिगामी नव्हते. त्यामुळे आधुनिक चालीरीतींप्रमाणे वागण्याचा ह्यांनी सुनांना कधी प्रतिबंध केला नाही. मुलांना दिलेल्या सवलती सुनांनाहि ह्यांनी दिल्या होत्या. मात्र एका विशिष्ट मर्यादेच्या पलिकडे कोणत्याहि गोष्टीचें उल्लंघन झालेलें ह्यांना खपत नसे.

घरांत वावरणारी सून आपली मुलगीच आहे असें मानून हे तिच्या सर्व सुखसोयींकडे अगत्याने लक्ष पुरवीत. इतकेंच काय पण घरांतील मुलेंबाळें आणि इतर मंडळींना नेहमीच सुखी, समाधानी आणि आनंदी पाहण्यांतच ह्यांच्या मनाला एक प्रकारची शांति व समाधान वाटत असे. धंद्यानिमित्त ह्यांना नित्य बाहेरगावीं जाण्याचे प्रसंग येत, तेव्हा बहुधा मीहि ह्यांच्या बरोबर राहीं. तरीपण ह्यांचा ओढा मात्र घराकडेच विशेष असायचा. अशा वेळीं मी ह्यांना म्हणे, 'तुम्ही हिमालयांत जाऊन राहण्याच्या गोष्टी तर बोलतां; पण घराकडेहि तुमचा तेवढाच ओढा आहे! हें विसंगत नव्हे काय?' यावर त्यांनी एका वेळीं पुढील स्वरचित कविता म्हणून घराबद्दलची आपली भावना व्यक्त केली.

देवा देशिल एक गोष्ट मजला, याची न अन्या वरा।
छोटें प्रेमळसें कुटुंब मजला दे देवदेवेश्वरा॥
स्वर्गालाहि कुटुंबसौख्य न तुले पृथ्वीस थारा कुठे।
काशी हीच असे, प्रयाग, मथुरा सारींच तीर्थें इथे॥

—१९३३

## मणी अकरावा

# अभ्यंकरांची निवडणूक

१९३४ मध्ये पुन्हा दिल्ली असेंब्लीची निवडणूक आली. १९२६ प्रमाणे या वेळींहि डॉ० मुंजे व मोरुभाऊ अभ्यंकर ह्या दोघां-मध्ये हा लढा होणार होता. दोघांनीहि आमचेकडे वारंवार येऊन 'निवडणुकींत आम्हांला मदत करा' अशी ह्यांना आपापल्या परीने विनंती चालविली होती.

या वेळीं या निवडणुकीपासून अलग राहण्याचें ह्यांनी ठरविलें होतें. तथापि मला मात्र अशी शंका वाटत होती की, डॉ० मुंजे यांच्या आग्रहानें हे बहुतेक त्यांना मदत करायला तयार होतील. डॉ० मुंजांचें गोड गोड बोलणें व मोरुभाऊंचा खणखणीत आवाज माझ्या कानावर सारखा पडत असे.

### 'मोरुभाऊंनाच मदत करा ना!'

मोरुभाऊ हे ह्यांचे बाळपणचे मित्र. घरीं आले म्हणजे ह्या दोघांत अरे तुरेनेच बोलणें व्हावयाचें. त्या दोघांमधील हा अकृत्रिम स्नेह पाहून मला त्यांच्याविषयी आपलेपणा वाटायचा. तेव्हा ह्यांनी मोरुभाऊंना मदत करावी असें मला वाटू लागलें होतें. म्हणून 'निवडणुकीच्या घुमश्चक्रींत तुम्हांला स्वस्थ कांही बसवणार नाही. तेव्हा या खेपेला डॉ० मुंज्यांना मदत न करतां कांग्रेसचे उमेदवार मोरुभाऊंनाच मदत करा ना!' असें मीं ह्यांना म्हटलें, येवढेंच नव्हे तर तसा आग्रहहि केला.

## 'मी तुम्हांला धन्यवाद देतों'

त्यावर हे फक्त हसले. योगायोग असा की, त्याच दिवशीं मोरुभाऊ आमच्याकडे आले. त्यांना पाहतांच हे म्हणाले, 'मोरु, तुला मीं मदत करण्याचें ठरविलें आहे. तसा मला घरांतून आग्रहाचा आदेश पण मिळाला आहे. मोरुभाऊंना त्याबद्दल फार आनंद झाला. लगेच ते घरांत आले व मला म्हणाले, 'वहिनी, तुम्हीं माझ्यासाठी फार मोठी कामगिरी केली. बंडूनानाचें (मोरुभाऊ ह्यांना त्या नांवाने संबोधीत) मन वळविलें याबद्दल मी तुम्हांला मनःपूर्वक धन्यवाद देतों. तुम्हीहि बायकांमध्ये माझ्यासाठी प्रचारकार्य अवश्य करायला पाहिजे.'

## माझी 'अल्पशी कामगिरी

मोरुभाऊंना ह्यांनी मदत करण्याचें वचन दिलेलें ऐकून मला अतिशय आनंद झाला. पण स्वतः स्त्रीवर्गात प्रचारकार्य करण्या-संबंधी मात्र मी गप्प राहिलें. वर्धा येथे लोकमान्यांच्या स्वागतानंतर स्त्रियांमध्ये जागृति करण्याची थोडीबहुत चळवळ ह्यांच्याच प्रेरणेने मीं चालविली होती. नागपूरला आल्यावर समाजकार्यात थोडाबहुत भाग घेत होतें तेवढाच! मात्र, निवडणुकीसाठी प्रचार करण्याचें कार्य अद्याप कोणतेंच केलें नव्हतें. घरांत राहूनच मोठया उत्साहाने ह्यांच्या निवडणुकीच्या दिवसांत जी काय जबाबदारी येईल ती पार पाडीत असें येवढेंच. पण मोरुभाऊंनी सूचना केली व त्यासंबंधी ह्यांचा विचार घेतां ह्यांनीहि प्रचारकार्य करण्याकरतां मला परवानगी दिली. माझ्या शक्तीप्रमाणे जमली तशी अल्पशी कामगिरी मीं केली ह्यांनी मात्र मोरुभाऊंना तनमनधनें मदत केली.

## मोरुभाऊंचा रुपया खरा!

निवडणुकीचा निकाल जाहीर झाला त्या दिवशीं मोरुभाऊंच्या अभिनंदनार्थ नागपूरला चिटणीस पार्कमध्ये जाहीर सभा भरली होती.

त्या सभेंत मोरुभाऊंचें अभिनंदन करतांना ह्यांनी एक मार्मिक वाक्य उच्चारलें होतें. तें अजूनहि मला जसेंच्या तसें आठवतें. हे म्हणाले, 'आज डॉ. मुंज्यांचा खोटा रुपया बाजारांत चालेनासा झाला. मोरुभाऊंच्या खऱ्या रुपयालाच आज बाजारांत किंमत आली.'

## वहिनी, घरीं येऊन आभार मानीन

मीहि या सभेला मुद्दाम गेलें होतें. सभा संपतांच मोरुभाऊ गर्दीतून वाट काढीत माझ्याजवळ येऊन म्हणाले, 'आजचा हा दिवस दिसण्याला वहिनी, तुम्हीच कारणीभूत आहांत. तुम्ही जर नानाला मला मदत करण्याचा आग्रह केला नसता तर ही निवडणूक जिंकणें मला फारच कठीण गेलें असतें. या वेळीं येथे मी तुमचे औपचारिक आभार मानतों. फुरसतीने घरीं येऊन मग मी तुमचे अगदी मनापासून आभार मानीन!' मीं मोरुभाऊंना म्हटलें, 'आभार मानण्यासारखी कोणतीच कामगिरी माझ्याकडून झाली नाही. मीं जें काय केलें असेल तें माझें एक कर्तव्य समजूनच मीं केलें.'

मोरुभाऊंच्या तोंडची आभाराची भाषा ऐकून मला बरें वाटलें नाही. तेव्हा तो विषय बदलविण्यासाठी त्यांच्या पायाला बांधलेली पट्टी पाहून मीं तिची चौकशी केली. त्या वेळीं त्यांनी मला एक गमतीदार उत्तर देऊन हसायला लावलें.

## मुंबईहून बरें होऊन आल्यावर घरीं या.

मोरुभाऊंच्या पायाला वाहाणा चावून जखम झाल्यामुळे पट्टी बांधण्यांत आली होती. त्यांना असलेल्या मधुमेहाच्या विकारामुळे दुर्दैवाने हीच जखम पुढे प्राणघातक ठरली. डॉक्टरांच्या सल्ल्यावरून पायाचें ऑपरेशन करण्याकरता त्यांना मुंबईला नेण्याचें ठरलें. ही गोष्ट आम्हांला कळल्यावर ह्यांनी मला मोरुभाऊंच्या भेटीस जाण्यास

सांगितलें. त्याप्रमाणे मी त्यांच्याकडे गेलें. मला पाहतांच 'बंडूनाना आला नाही काय ?' असें मोरुभाऊ मला म्हणाले. ते कोर्टांतून परस्पर स्टेशनवर येऊन आपणास भेटणार आहेत' असें मीं त्यांना सांगितलें. बोलणीं चालू असतांना मोरुभाऊ मला म्हणाले, 'वहिनी, माझ्या बिमारीमुळे मीं तुमचे आभार मानण्यासाठी तुमच्याकडे येऊं शकलों नाही याची मला लाज वाटते.' त्यावर मीं त्यांचें सांत्वन करून त्यांना म्हटलें, 'मुंबईहून बरे होऊन आल्यावर आमच्याकडे तुम्ही भोजनासच या.'

### 'आजच्या अभिषेकाचा संकल्प.'

पुढे मोरुभाऊ मुंबईस गेल्यावर त्यांची प्रकृति दिवसेंदिवस खालावतच जात असल्याची बातमी वर्तमानपत्रांतून यायची. आम्ही आमच्या नित्यनेमाप्रमाणे एका सोमवारीं शंकराच्या अभिषेकाला बसलों असतांना हे मला म्हणाले, 'आजच्या अभिषेकाचा संकल्प मोरुभाऊंच्या प्रकृतीला आराम पडावा अशी प्रार्थना करूनच मी सोडणार आहें. त्यांच्या प्रकृतींत सुधारणा होण्याविषयी तूंहि शंकराची प्रार्थना करीत जा.'

### विचार करावा एक पण घडतें दुसरेंच

पण माणसाच्या आशा आणि इच्छा सिद्धीस जातात असें थोडेंच आहे. 'मनसा चिन्तितमेकं दैवमन्यद्विचिन्तयेत्' या कठोर सत्याची प्रतीति त्या वेळीं आली. २ जाने. १९३५ रोजीं मध्यप्रांताचा हा राजकारणी मोहरा काळाच्या भक्ष्यस्थानीं पडल्याची दुःखद वार्ता आमच्या कानांवर वज्रासारखी आदळली.

### 'गड आला पण सिंह गेला'

त्या दिवशीं सायंकाळीं नागपूरला धंतोलीवरील पटवर्धन मैदानावर मोरुभाऊंच्या निधनानिमित्त शोकसभा भरली होती. मीहि

ह्यांच्या समवेत त्या सभेला गेलें होतें. सभेंत मोरुभाऊंच्या भव्य छायाचित्रासमोर त्यांच्या गुणवर्णनपर बरींच भाषणें झालीं. त्यांत ह्यांचेंहि भाषण झालें. 'निवडणुकीचा गड आम्हीं जिंकला. पण त्यापायीं आमचा सिंह मात्र आम्ही गमावून बसलों' असे सार्थ उद्गार ह्यांनी काढले.

## मित्रप्रेमाने भरलेलें यांचें मन

सभेहून आम्ही घरीं आलों. कपडे वगैरे न काढतांच हे आपल्या खोलींत जाऊन बसले. बराच वेळ झाला तरी हे बाहेर आले नसलेले पाहून मी ह्यांना बोलवायला खोलींत गेलें. पाहातें तर तेथे मला वेगळेंच दृश्य दिसलें. आपल्या बालपणच्या सवंगडयाच्या निधनाचें ह्यांना मनस्वी दुःख झालें होतें. मुखावर विषण्णता आणि शब्दांत कातरता निर्माण झाली होती. मी जवळ जाऊन उभी राहिलें तेव्हा ते मला म्हणाले, 'आपल्या प्रांतांतील एक धडाडीचा, कर्तृत्ववान राजकारणी पुरुष हरपल्याचें मला आज फार फार वाईट वाटतें.'

ह्यांची ही हळुवार व कोमल वृत्ति पाहून एकदा मी ह्यांना म्हणालें, 'मोरुभाऊंविषयी तुम्हांला येवढें प्रेम व आपुलकी वाटत असतांना तुम्ही तर मागे त्यांना मदत न करतां डॉ. मुंजांना केली होती हें कसें?' त्यावर हे गंभीरपणे उत्तरले, 'अग त्यांत व्यक्तिगत संबंधाचा प्रश्न नसतो. तो केवळ राजकारणाचा प्रश्न असतो. राजकारणांत तेवढयापुरता मित्र शत्रू व शत्रू मित्र होतो.

## या नवीन कपडयांची काय जरूर!

निवडणुकीचे हे दिवस थंडीचे होते. ह्यांचे गरम कपडे बरेच जुने झाले असल्यामुळे मी दोन चांगल्यापैकी वुलन सूट शिववून घेतले होते. एके दिवशीं हे प्रचार कार्यासाठी बाहेर जाणार होते.

त्या वेळीं मी एक सूट बाहेर काढून ठेवला होता. कपडे घालण्याचे वेळीं तो नवीन सूट ह्यांच्या नजरेला पडल्याबरोबर हे माझ्यावर रागावून म्हणाले, 'मला गरम कपडे असतांना हे नवीन कपडे करून घेण्याची तुला काय जरूरी होती ? नाही तरी फालतु कामांत खर्च करण्याचीच तुला सवय आहे. बरें, खर्च तरी किती करून बसलीस ?'

माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी ह्यांना खोटाच आकडा सांगून टाकला. ह्यांना स्वतःला कोणत्याहि बाबतींत डामडौल किंवा बडेजाव दाखविणें या गोष्टींचा मोठाच तिटकारा होता. कपड्यांच्या बाबतींतहि असेंच असे. भारी किंमतीचे कपडे हे स्वतःकरतां पसंत करीत नसत. त्यामुळे ह्यांना करून दिलेल्या कपड्यांची किंमत वाजवीपेक्षा नेहमीच कमी सांगावी लागे. अशा प्रकारचा 'खोटेपणा' मला मुद्दाम कधी कधी करावा लागे. त्यामुळे कपड्यांच्या खऱ्या खोट्या किंमतीविषयी ह्यांना सहसा संशय येत नसे. घरगुती व्यवहारज्ञान ह्यांना यथातथाच होतें. तेव्हा माझ्या बोलण्यावर ह्यांनी कांहीच उत्तर न देतां स्वतःच कपाटांतून एक जुना सूट खसकन काढला व तो घालून हे बाहेर निघून गेले. ह्यांच्या अशा स्वभावामुळे माझी मात्र बरीच कुचंबणा व्हावयाची ! मुद्दाम तयार करविलेला चांगला सूट वापरावयाचा नाही असाच कांही दिवसपर्यंत ह्यांनी हट्ट चालविला होता. पण ह्यांची ही काटकसर फक्त स्वतःपुरतीच. इतरांकरिता मात्र या गोष्टीचा कधी विचारच ह्यांच्या मनांत येत नव्हता.

ह्यांच्या अशा हट्टी स्वभावाप्रमाणे ह्यांचा दुराग्रहीपणाहि मोडून काढावयास मला मोठे प्रयत्न करावे लागत. त्यांत कांही प्रसंगीं माझा विजय होई तर कांही प्रसंग असे असत की, त्या वेळीं मला निमूटपणें हार खावी लागे.

एका मुलाला ह्यांच्याकडून शिफारसपत्र हवें होतें. त्याला ज्या ऑफिसमध्ये नोकरी हवी होती, त्या ऑफिसच्या अधिकाऱ्याविषयी ह्यांचा चांगला ग्रह नव्हता. त्यामुळे त्या मुलानें बरेच वेळां येऊन विनंति केल्यावरहि हे शिफारसपत्र लिहून देण्याला कबूल होईनात. शेवटीं मुलाने मला गाठून साहेबांकडून शिफारसपत्र मिळवून देण्याची मला विनंति केली. त्याची एकंदर हकिकत ऐकून मला कीव आली व त्याचें काम करून देण्याचें मी कबूल केलें पण माझ्यापुढे मोठाच पेच पडला. तो ह्यांच्याकडून कार्यभाग कसा साधावा याचाच! तरी संधि पाहून मी ह्यांच्याजवळ त्या मुलाच्या शिफारसपत्राविषयी बोलणें काढलेंच. हे त्या क्षणीं माझ्यावर चिडून म्हणाले, 'तुला वाटल्यास दहा पंधरा रुपयांची मदत महिन्याला देत जा; माझी ना नाही. पण ह्या असल्या भलत्याच भानगडींत पडत जाऊं नकोस. मी टाकलेला शब्द फुकट गेलेला मला खपणार नाही.' अशा तऱ्हेचा ह्यांचा मानी स्वभाव असला तरी स्वतःकडून एकादे वेळीं कोणत्याहि कारणाने झालेल्या चुकीची जाणीव झाल्यास पश्चात्तापाने ह्यांचें मन दग्ध होई. चूक लहानशी जरी असली तरी हे त्याबद्दल प्रांजळपणे खेद व्यक्त करीत. आपल्या चुकीचें परिमार्जन करण्याला हे नेहमी तत्पर असत. पण ह्याकरता तशा प्रकारच्या संधीची गरज असेच. अशी संधि मला एकदा अचानक चालून आली.

## जाऊं दे, तो गरजू आहे!

आमच्याकडे सकाळपासून संध्याकाळपर्यंत लोकांची सारखी ये जा सुरू असायची. कोर्टाच्या कामानिमित्त तर लोक येतच, पण इतर गरजू लोकहि बरेच येत. या सर्व लोकांच्या योग्य त्या गरजा पुरविण्याचा ह्यांनी विडाच उचलला होता की काय नकळे! विन्मुख असा कोणीच बहुधा जात नसे. असाच एके दिवशीं एक गृहस्थ

घरीं आला व आपली घरगुती अडचण सांगून ह्यांच्याकडून चेक घेऊन गेला. ह्यांना चेकवर वाटेल त्या रकमेचा आंकडा घालण्यास कांहीच अडचण वाटत नसे. याहिवेळीं तसेंच झालें. याबद्दल मी तक्रार केली असतां हे म्हणाले, 'जाऊं दे, तो गरीब असून त्याला पैशाची फार गरज आहे.'

## पडत्या फळाची आज्ञा

ह्यांचें हें बोलणें मी पकडून ठेवलें व या संधीचा फायदा घेऊन म्हणाले, 'सारींच माणसं गरीब व गरजू असतात. त्या शिफारसपत्र मागणाऱ्या मुलास मात्र एक बोटभर चिठ्ठी लिहून देण्यास तुम्ही कठोर झालां होतां. मी उच्चारलेला 'कठोर' हा शब्द ह्यांना बराच लागलेला दिसला. पण मी तो बळेंच वापरला होता. कारण त्या मुलाकडून मला कळलें होतें की, त्याने बऱ्याच जणांचीं शिफारसपत्रें घेतलीं होतीं. पण ह्यांच्याच पत्राचा जास्त उपयोग होणार होता. मी असें बोलतांच हे म्हणाले, 'ठीक आहे. तूं माझा पाठपुरावा केला आहेस, तर देतों लिहून. मग तर झालं ना?' त्यानंतर ह्यांनी एक चार ओळींचेंच शिफारसपत्र लिहून त्याला दिलें. त्यामुळे त्या मुलाला ताबडतोब नोकरी मिळाली.

## 'माझें मोठ्यांतलें मोठें वशीकरण'

मला असले प्रसंग नेहमींच येत. त्या वेळीं मला फार सावधानपूर्वक वागावें लागे. प्रसंग साधून ह्यांच्या वृत्तीला आवश्यक ती मुरड द्यावी लागत असे. त्यामुळे बहुतेक घरगुती प्रश्न अतिशय सुलभपणे सुटत. या अनुभवावरून माझी अशी पक्की खात्री झाली आहे की, पत्नीने आपल्या पतीच्या स्वभावाची ठेवण कोणत्या स्वरूपाची आहे, याचा अभ्यास करून त्याप्रमाणे आपली वागणूक ठेवली तर सहसा

संघर्षाला जागा रहात नाही. महाभारतांत एके ठिकाणीं द्रौपदी–सत्यभामेचा संवाद आला आहे. त्यांत सत्यभामा द्रौपदीला विचारते, "आम्हांला एक पती सांभाळणें कठीण जातें आणि तूं आपल्या पांचहि पतींना कशी मुठींत ठेवतेस? ते तर तुझ्या म्हणण्याच्या बिलकूल बाहेर नाहीत. असें कोणतें वशीकरण तुझ्याजवळ आहे?' त्या वेळीं द्रौपदीने दिलेलें उत्तर मोठें मननीय आहे. ती विचारसरणी प्रत्येक पत्नीने अंगिकारावी इतक्या योग्यतेची आहे असें मला वाटतें. द्रौपदी म्हणाली, 'वशीकरण असें मजजवळ कांही नाही. मी आपल्या पतींच्या मनाशीं व जीवनाशीं एकरूप होण्याचा अभ्यास केला आहे. तेंच माझें मोठ्यांतलें मोठें वशीकरण होय!'

## पुरुषवर्गाची जबाबदारी

स्त्रियांप्रमाणेच पुरुषवर्गावरहि सुखी जीवन निर्माण करण्याची जबाबदारी आहे. त्यांनीहि आपल्या पत्नीच्या मनाची, भावनांची जाणीव ठेवून त्यांना सन्मानपूर्वक वागविण्याची दक्षता घेतली पाहिजे. म्हणजेच समानतेचें सहकार्य उदयास येईल व प्रत्येक घर प्रेमाचें व सुखाचें वसतिस्थान झालेंच म्हणून समजा.

## सुखी संसाराचें सार!

सहजीवनाला आवश्यक अशीच ह्यांची उदार मनोरचना होती हें मला मोठ्या अभिमानाने सांगावेसें वाटतें. प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करण्याची ह्यांना सवय असल्यामुळे बाहेरच्या जगांत अनुभवास येणारी ह्यांची झुंझार व कणखर वृत्ति घरीं मात्र फार मृदु व मिळतें घेणारी असे. घरांतील संघर्ष टाळण्यासाठी हे आपली वृत्ति प्रसंगाला अनुकूल करून घेत असत. त्यामुळे आमच्या घरांत नेहमीच प्रसन्न वातावरण नांदत असे.

## मणी बारावा

# काँग्रेसमध्ये प्रवेश

### डॉ. खरे यांची भेट

दिल्ली असेंब्लीच्या निवडणुकीनंतर १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वयें पुढे १९३७ च्या आरंभीं प्रांतिक कायदेमंडळाची निवडणूक आली. ह्यांनी पुन्हा ही निवडणूक स्वतंत्रपणे लढविण्याचें ठरविलें होतें. याच सुमारास एक घटना घडून आली. त्या वेळचे काँग्रेस पुढारी व काँग्रेस निवडणूक मंडळाचे अध्यक्ष डॉ. खरे यांनी ह्यांची भेट घेतली. त्यांनी ह्यांना काँग्रेसचे सदस्य होऊन काँग्रेस तिकिटा-वर निवडणुकीस उभें राहण्याची सूचना केली.

### ह्यांची संमति

या निवडणुकींत मध्यप्रांतांतून डॉ. राघवेन्द्रराव, रा. ब. नायडू व उमरावतीचे श्री. बाबासाहेब खापर्डे या तिघा सरकारपक्षीय उमेद-वारांच्या विरुद्ध काँग्रेसचे उमेदवार उभे करण्याचा डॉ. खरे यांचा विचार होता. यांपैकी एक जागा ह्यांनी लढवावी असा डॉ. खरे यांचा आग्रह होता. वास्तविक हे स्वतंत्रपणेच निवडणुकीला उभे राहणार होते हें मागे सांगितलेंच आहे. आणि असें स्वतंत्रपणें उभें राहूनहि रा. ब. नायडूंना पराजित करण्याइतपत आत्मविश्वास

ह्यांच्या ठिकाणीं होता असें दिसत होतें. पण डॉ. खऱ्यांनी ह्यांना दिलेल्या माहितीनुसार ह्यांनी आपला विचार बदलवून हे कॉँग्रेसच्या तिकिटावर उभे राहण्यास तयार झाले. ती गोष्ट अशी की, डॉ. खरे यांचा मानस सरकारी पक्षाच्या तीन उमेदवारांविरुद्ध निवडणूक लढविण्याचा असला तरी कॉँग्रेसच्या गोटांतील कांही लोकांचें मत असें होतें की, डॉ. राघवेन्द्रराव व रा. ब. नायडू यांच्या जागा कॉँग्रेसने लढवूं नयेत. फक्त खापर्डे यांच्या विरुद्ध मात्र कॉँग्रेसने आपला उमेदवार उभा करावा. हें धोरण डॉ. खरे यांना पसंत पडलें नाही. ही गोष्ट त्यांनी ह्यांना सांगतांच ह्यांनाहि या विसंगत वर्तनाची चीड आली आणि ह्यांनी कॉँग्रेस श्रेष्ठींच्या या धोरणाचा प्रतिकार करण्यासाठी कॉँग्रेसच्या तिकिटावर उभें राहण्यास संमति दिली.

## स्वार्थी कॉँग्रेसवाल्यांचा विरोध

तरी पण ह्यांच्या उमेदवारीला कॉँग्रेसमधीलच कांही स्वार्थी लोकांचा विरोध होता. त्यांचें म्हणणें असें होतें की, 'केदारांनी कॉँग्रेस-साठी कांहीच त्याग केला नाही. उलट त्यांचा कॉँग्रेसला विरोधच होत आला. अशा रीतीने ह्यांच्या उमेदवारीला खो देण्याचा स्वार्थी प्रयत्न कॉँग्रेसवाल्यांकडून जरी झाला तरी रा. ब. नायडूंना सामना देईल असा लायक उमेदवार आर्वी तहसिलींतून दुसरा कोणीच नसल्याचें या लोकांना कळून चुकलें होतें. म्हणूनच ह्यांच्या कॉँग्रेस उमेदवारीला विरोध करण्याचें त्यांनी नाइलाजानें सोडून दिलें.

## मी कॉँग्रेसचा उमेदवार झालों

कॉँग्रेसच्या प्रतिज्ञापत्रकावर सही करून हे घरीं आले. घरीं येतांच 'मी कॉँग्रेसचा उमेदवार म्हणून आर्वी तहसिलीची निवडणूक लढविणार आहें. तेव्हा माझ्यासाठी स्वस्तपैकी खादी आणून तावड-

तीन कपडे तयार करवून घे,' अशी ह्यांची सूचना झाली. हे काँग्रेसला मिळाल्याचें ऐकून मला फार आनंद झाला. मी ह्यांना म्हटलें, 'तुम्ही आता खादी वापरणार् तर! माझ्यासाठीहि खादीच्या साड्या आणाव्या लागतील काय?' त्यावर हे म्हणाले, 'हा तुझा प्रश्न आहे. तुला वाटेल तसें कर!'

ह्यांच्या सांगण्याप्रमाणे मी खादी विकत घ्यायला बाजारांत गेलें. पण ह्यांच्या अंगाचें माप बसेल अशी रुंद पन्ह्याची खादी मिळेना. शेवटीं तुकडे तुकडे जोडूनच कपडे शिवावे लागले.

## तिरंगी झेंडा मोटारवर लागला

त्याच वेळीं कांग्रेसचा तिरंगी झेंडा आणून आमच्या मोटारला लावला. या वेळीं एक गोष्ट मात्र प्रामुख्याने माझ्या लक्षांत आली. ती म्हणजे आम्ही कांग्रेसवाले झालों म्हणून माझ्याकडे नेहमीं येणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या बायकांचें येणें आतांसें बरेंच कमी झालें होतें. पण पुढे कांग्रेसने अधिकार ग्रहण केल्यावर मात्र तें पूर्ववत् चालूं झालें.

## कुटिल कारवायांतून पार

या निवडणुकीच्या वेळीं मी ह्यांच्या बरोबर असल्यामुळे तिच्यामधील अनेक अडचणी व संकटें यांचा मला चांगलाच अनुभव मिळाला. कायदेमंडळाची ही ह्यांची शेवटचीच निवडणूक ठरली. ह्यांचे प्रतिस्पर्धी त्या वेळीं मंत्रिपदावर असल्यामुळे निवडणूक एकंदरींत आणीबाणीचीच होती असें म्हटलें पाहिजे. रा. ब. नायडू मंत्रिपदावर असल्यामुळे सरकारचें सर्व बळ त्यांच्या पाठीशीं होतें यांत संशय नाही. त्याशिवाय त्यांनी वाटेल त्या मार्गांचा सर्रास उपयोग करून घेतला तो निराळाच! खेडेगावांतील गरीब व अशिक्षित

लोकांना निरनिराळीं प्रलोभनें व प्रसंगीं धाकदपटशा दाखविण्यासहि सरकारी यंत्राने मागेपुढे पाहिलें नव्हतें. ह्यांना त्याबद्दल मनस्वी चीड येऊन त्या कारवाईला ह्यांनी हरकतहि घेतली होती. पण सत्तेची नशा चढलेल्यांना आपल्या फायद्यापुढे इतरांच्या न्याय्य हक्कांची व नीतिअनीतीची चाड राहील तेव्हा ना! अशा प्रतिकूल परिस्थितींत ह्यांना निकराचा सामना द्यावयाचा होता. पण या अडचणींची ह्यांनी मुळीच तमा बाळगली नाही. तर संघर्षातच आपलें व्यक्तिमत्व अधिक उठावदार दिसेल या जाणिवेने ही निवडणूक लढविण्याला ह्यांना अधिक जोम आला. या काळांत, ह्यांना विशेष जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत होत्या. दोन्ही मुलांचें शिक्षण विलायतेंत चालूं होतें. त्यामुळे कौटुंबिक अडचणींची फार मोठी जबाबदारी ह्यांच्या शिरावर होती. त्यामुळे धंद्याकडे दुर्लक्ष करून भागण्यासारखें नसलें तरी ह्यांना महिना दीड महिना आर्वीला तळ ठोकून बसावेंच लागलें. चिकाटी, चातुर्य व चतुरस्त्र स्वभाव यांच्या योगें ह्यांनी लोकांचीं मनें आपल्याकडे खेचून घेतलीं. पण आपली चाकोरी सोडून जर एखादा सरकारी अधिकारी वागूं लागला तर त्याला वेळींच खडसावून त्याची खोडकी जिरविण्यासहि ह्यांनी मागेपुढे पाहिलें नाही. स्वतःच्या प्रचारासाठी अहोरात्र कष्ट सोसून, जेवणाखाण्याची किंबहुना झोपेचीहि फिकीर न करतां प्रसंगविशेषीं पायीं सुद्धा ह्यांनी प्रवास केला. अशा प्रकारें अभ्रांतून बाहेर पडणाऱ्या भूतलावरील सूर्यकिरणांप्रमाणे आपल्या तेजस्वी व्यक्तिमत्वाचीं किरणें ह्यांनी लोकहृदयावर नेऊन भिडविलीं.

**'अहो, ते केदार आहेत!'**

निवडणुकीचे दिवस जसजसे जवळ येऊं लागले तसतसे लोकांचे नाना तर्कवितर्क कानावर येऊं लागले. कोणी म्हणत, 'नायडूच

निवडून येतील; त्यांच्या पाठीशीं सरकारचें बळ आहे.' तर दुसरे कांही लोक मोठ्या विश्वासानें उद्गार काढीत की, 'अहो, ते केदार आहेत! आजवर अशा अनेक निवडणुकी लढवून ते यशस्वी झाले आहेत. प्रतिस्पर्धी बहुतेक त्यांच्या समोर टिकाव धरूं शकत नाही.'

## मतदानाचा दिवस उजाडला

८ फेब्रुवारी १९३७ हा मतदानाचा दिवस उजाडला. त्या दिवशीं सोमवार असल्यामुळे आम्हांला विशेष समाधान वाटलें. कारण सोमवार हा अत्यंत शुभ व आमच्या दृष्टीने भाग्याचा असा दिवस आम्ही मानतों. आमच्याकडे कोणतेंहि महत्त्वाचें कार्य असलें आणि मेघराजाची कृपा झाली नाही असें सहसा घडत नसे. मला या योगायोगाचा नेहमी अनुभव येई. त्याचप्रमाणे या वेळींहि आधल्या दिवशीं मेघराजाचें आगमन झालेंच! जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें होतें.

## आम्हांला पेट्रोल मिळणार नाही

मतदारांची मतदान केंद्रावर नेआण करण्यासाठी ६०।७० भाड्याच्या मोटारी येऊन उभ्या होत्या. हजारांच्यावर काम करणारी आमची चाहती मंडळी आली होती. इतकेंच नव्हे तर नागपूर प्रां. कां. क. चे त्या वेळचे अध्यक्ष डॉ. खरे हे मुद्दाम त्या दिवशीं आर्वीला आले होते. पण आधल्या दिवशीच्या पावसाने झालेल्या चिखलांतून या मोटारींचा कितपत उपयोग करतां येईल याच विवंचनेंत आम्ही होतों. या विवंचनेंत असतांनाच दुसरी एक बातमी आमच्या कानांवर येऊन आदळली. ती अशी की, आम्हांला आर्वींत पेट्रोल मिळणार नाही. कारण आर्वींत पेट्रोल न मिळूं देण्याची कार-

वाई प्रतिस्पर्धी लोकांकडून करण्यांत आली होती. ह्या बातमीनें ह्यांचा धीर खचला नाही. ह्यांनी रातोरात वर्धा–अमरावती येथे माणसें पाठवून पेट्रोलचा पुरेसा साठा आणविला. सकाळीं आभाळ स्वच्छ होऊन चक्क ऊन पडलें, मोठ्या धूमधडाक्याने मतदानाला सुरुवात झाली. मतदानकेंद्रावर मतदारांची एकसारखी रीघ लागली होती. ह्यांची निवडणूक संपल्यानंतर प्रांतांतून इतर ठिकाणीं उभे असलेल्या कांग्रेस उमदवारांच्या निवडणुकीसाठीहि ह्यांनी प्रचार-कार्य करून त्यांच्या निवडणुकींतील यशाचा मार्ग निष्कंटक केला होता.

### आमचा मूक प्रवास

त्यानंतर कांही दिवसांनी निवडणुकीचा निकाल ऐकण्यास आम्ही दोघे मोटारने वर्ध्यास जावयास निघालों. पण हा प्रवास नेहमीप्रमाणे गप्पागोष्टींत व विनोदांत मात्र झाला नाही. आमची मनःस्थितीच त्या दिवशीं चमत्कारिक झाली होती. मनावर कसलें तरी दडपण पडल्यासारखें वाटत होतें. निवडणुकीचा निकाल कसा काय लागतो इकडेच आमचें लक्ष लागून राहिलें होतें. त्यामुळे इतर कशांतच मन लागेना. सबंध प्रवासांत एक चकार शब्दहि आम्ही एकमेकांशीं बोललों नाही. इतकेंच काय पण प्रवासांत मोटारींत बसल्यावर निदान दोन चार वेळ तरी ह्यांनी तपकीर ओढली नाही असें सहसा होत नसे. पण त्या दिवशीं मात्र ह्यांना त्या तपकिरीची चुकून एकदाहि आठवण झाली नाही. आणि ती वेळच तशी आणी-बाणीची होती. आमच्या भवितव्याची त्या दिवशीं परीक्षाच होणार होती. पैसा, प्रकृति आणि प्रतिष्ठा सारीं कांही पणाला लावून या निवडणुकीच्या यज्ञवेदीवर हे उभे होते. ही यज्ञदेवता संतुष्ट होऊन तिने दिलेलें पसायदान ग्रहण करूनच आम्हाला आमच्या जीवनाची सफलता साधावयाची होती.

रा. ब. नायडूंसारख्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्याशीं हा सामना असल्यामुळे या निवडणुकीकडे सबंध प्रांताचेच डोळे लागले होते. आम्हांला मात्र एकाच गोष्टीने जास्त बेचैन केलें होतें. ती म्हणजे प्रांतांत कांही ठिकाणीं मतदानाच्या पेटयांत गडबड होऊन त्यांतील मतपत्रिकांची अफरातफर झाल्याची वदंता उठली होती. तसा प्रकार आमच्या पेटयांच्या बाबतींत होतो की काय हीच धास्ती आमच्या मनाला वाटत होती.

या मनःस्थितींत आम्ही वर्धा येथे जाऊन पोहोचलों. निकालाच्या जागीं लोकांची झुंबडच आम्हांला दिसून आली.

## ह्यांचा अपूर्व विजय

अनेक लोक अनेक तर्क करीत. त्यांचीं बोलणीं आमच्या कानांवर येत. विरोधी पक्षाकडील मंडळी हर्षोन्मादांत नुसती नाचतबागडत होती. आपल्या उमेदवाराचा विजय ठरलेलाच, असा त्यांना जबर-दस्त विश्वास वाटत होता. आमच्याकडील लोकांची मात्र याच्या-विरुद्ध मनःस्थिति होती. त्यांच्यावर विषादाची छाया पसरलेली दिसून येत होती. केदारसाहेब ही निवडणूक हरणार असेंच जणूं त्यांचे निस्तेज चेहरे आम्हाला दर्शवीत होतें. पण ही परिस्थिति फार वेळ टिकली नाही. प्रतिपक्षाच्या साऱ्या कारवाया पंगू ठरून अखेर सत्या-चाच विजय झाला. मतमोजणी पुरी होतांच 'केदार प्रतिपक्षाचा पाडाव करून विजयी झाले' अशी अधिकृत घोषणा करण्यांत आली. नंतर ह्यांच्या जयजयकाराने तेथील वातावरण नुसतें दुमदुमून गेलें.

## 'त्या' हारतुऱ्यांनी ह्यांचें स्वागत

ही घोषणा ऐकतांच ह्यांना मनापासून आनंद झाला. थोडयाच क्षणांपूर्वी विषण्णतेने ग्रासलेलीं आमचीं मनें एकदम टवटवीत झालीं.

सुकलेल्या वेलीला जीवन मिळतांच ती जशी टवटवीत होते तसेच आमचे चेहरेहि आता टवटवीत व तजेलदार झाले. प्रतिस्पर्धी व त्यांचे साथीदार यांच्या मनःस्थितीचें वर्णन न करणेंच इष्ट! रा. ब. नायडूंच्या स्वागतार्थ त्यांनी आगाऊ आणून ठेवलेले हारतुरे अखेर लोकांनी मोठ्या जयजयकाराने ह्यांच्याच गळ्यांत घातले!

## महात्माजींकडून अभिनंदन

यानंतर आम्हाला मदत करणाऱ्यांचे आभार मानून व त्यांचा निरोप घेऊन या विजयानंदाची सुखद अनुभूति घेत घेत सायंकाळीं आम्ही नागपूरला परत आलों. नागपूरला आल्यावर मी ह्यांना पंचारतीने ओवाळलें व मीठमोहऱ्यांनी ह्यांची दृष्ट काढली. त्या दिवशीं रात्रीं आमच्या येथे जणू दिवसच उजाडला होता. खुद्द डॉ. खरे आणि इतर किती तरी लोक आमच्या घरीं येऊन ह्यांचें अभिनंदन करून गेले. भारतांत गाजलेल्या आर्वीच्या या निवडणुकींत आपल्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्याचा पराभव करून ह्यांनी कांग्रेसचें नांव प्रांतांत उज्ज्वल केल्याबद्दल खुद्द महात्माजींकडूनहि ह्यांना अभिनंदनपर संदेश आला होता.

## कांग्रेसचें अधिकारग्रहण

या निवडणुकीनंतर कांग्रेसचें पहिलें 'खरे मंत्रिमंडळ' अधिकारावर आलें. पूर्वी फक्त दोनच मंत्री असत. पण १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वयें आता सर्व खातीं लोकप्रतिनिधींकडे सोपविण्यांत आल्यामुळे आता सात मंत्र्यांचें मंत्रिमंडळ बनविण्यांत आलें होतें.

## मणी तेरावा

# नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु

पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः
स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः
नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः
परोपकाराय सतां विभूतयः ॥
—सुभाषित

### हे 'कुलगुरु' झाले

कायदेमंडळाच्या निवडणुकीनंतर नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूची निवडणूक आली. विद्यापीठाची आपल्याकडून कांहीतरी सेवा घडावी या उद्देशाने ह्यांनी कुलगुरूपदासाठी उभें राहण्याचें ठरविलें. त्या वेळचे कुलगुरु डॉ. सर हरिसिंग गौर यांच्याशीं ह्यांना सामना द्यावयाचा होता. डॉ. गौर यांचें सरकारदरबारीं बरेंच वजन असून त्यांच्या कायदेपांडित्याची चांगलीच ख्याति होती. असें असलें तरी या जबरदस्त प्रतिस्पर्ध्याचा पराभव करून हे विद्यापीठाच्या निवडणुकींत विजयी झाले. या निवडणुकीच्या वेळीं ह्यांना कांग्रेस मंत्रिमंडळाचा पाठिंबा होता. निवडणूक जिंकून हे जेव्हा घरीं आले त्या वेळीं ह्यांच्या मुखावर आनंद व उत्साह नुसता ओसंडत असलेला मला दिसला. कायदेमंडळाच्या निवडणुकी ह्यांनी मोठ्या अहमहमिकेने जिंकून दाखविल्या असल्या तरी या यशाने मात्र ह्यांना किती-

तरी अधिक आनंद झाला होता असेंच मी म्हणेन. आणि हें अगदी स्वाभाविकच होतें! शिक्षणक्षेत्र ह्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचें असल्यामुळे या क्षेत्रांत आपणाला प्रभावी असें कांही कार्य करून दाखवितां येईल असा ह्यांच्याठायीं आत्मविश्वास प्रगट झाला होता.

## गुरुजींचा आशीर्वाद

कुलगुरूच्या निवडणुकींत यश मिळविल्याबद्दल ह्यांच्यावर चोहोंकडून अभिनंदनांचा सारखा वर्षाव होत होता. ह्यांचे परमपूज्य गुरुजी महामहोपाध्याय केशवरावजी ताम्हण यांच्याकडून स्वरचित आशीर्वादात्मक श्लोक आला त्यामुळे तर ह्यांचें अंतःकरण सद्गदित झालें. तो श्लोक असा—

'प्राप्तं वादिगणे यशोमतिमता चन्द्रोज्ज्वलं श्रीमता।
शीलं चारुतरं वचश्च भवतो लोकप्रशंसास्पदम् ॥
साचिव्यं भवता कृतं क्षितिभुजां केदारधीमत्तया।
स्थाने प्राज्ञवरैर्भवान् कुलगुरोः पीठे समरोपितः॥'

## गुरुवर्य ताम्हण

एके दिवशीं सकाळीं स्वतःच गुरुजी आमच्या घरीं आले. त्या वेळीं हे आपल्या ऑफिसमध्ये कोर्टाच्या कामांत गर्क होते. गुरुजी आले आहेत असें कळतांच हातांतील काम सोडून हे लगबगीने बाहेर आले. आपल्या पितृतुल्य गुरूला पाहतांच अत्यंत आनंदाने ह्यांनी त्यांच्या पायावर मस्तक ठेवलें. गुरुजींना अतिशय वार्धक्यामुळे दुसऱ्यांच्या सहाय्यावांचून चालतां येत नव्हतें. ह्यांनी त्यांचा हात धरून त्यांना बैठकीच्या खोलींत आणून बसविलें. मला हाक मारली व गुरुजींना नमस्कार करण्याची सूचना केली. मी गुरुजींना वांकून नमस्कार केला व बाजूला नतमस्तक उभी राहिलें. त्यांनी

त्या वेळीं ह्यांना आपल्या गोड शब्दांनी लोकोत्तर यश व उज्ज्वल कीर्ति संपादन करण्याचा उपदेश केला. गोदुग्धप्राशन झाल्यानंतर ते जायला निघाले तेव्हा आम्ही दोघांनी फिरून त्यांना नमस्कार केला. त्या वेळीं त्यांनी आपल्या या प्रिय शिष्याला तोंड भरून आशीर्वाद दिला. तो देतांना त्यांना आपण दिलेल्या शिक्षणाची आपल्या शिष्याकडून फलनिष्पत्ति झाल्याचें साभिमान कौतुक वाटल्याचें दिसून आलें.

## गुरुऋणाबद्दल कृतज्ञता

गुरुवर्यांवर नितांतश्रद्धा व अमर्याद भक्ति असल्यामुळे आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या पदवीदान समारंभाच्या वेळीं गुरुऋणाची अल्पशी फेड म्हणून विद्यापीठाकडून ह्यांनी म. म. केशवरावजी ताम्हण यांना 'डॉक्टरेट'ची बहुमानाची पदवी अर्पण केली.

## युनिव्हर्सिटी कोर्टांतील पहिलें भाषण

निवडून आल्यानंतर युनिव्हर्सिटी कोर्टाच्या पहिल्या सभेंत ह्यांचें कुलगुरु (व्हाईस चँसलर) म्हणून पहिलें भाषण झालें. त्यांत ह्यांनी विद्यापीठासंबंधीचें आपलें, ध्येय, धोरण, आकांक्षा आणि कर्तव्य यांचें संपूर्ण दिग्दर्शन केलें. तें येथील 'महाराष्ट्र' पत्रावरून देत आहें.

"देशाचें व्यावहारिक जीवन आणि विद्यापीठ यांच्यामध्ये फारकत झालेली दृष्टीस पडते. ती नाहीशी करण्याकरता विद्यापीठाला ज्ञानाची प्रगति आणि प्रचार करणारी संस्था बनविणें आवश्यक आहे. तशा प्रकारची संधि आपण मला कुलगुरु पदावर निवडून आणून दिली असेंच मी समजतों.

"या विद्यापीठाचे अध्यापक हे जीवनाच्या व्यावहारिक अंगावर परिणाम करणारें शिक्षण आपल्या विद्यार्थ्यांना देतील व तशा प्रकारचें

शिक्षण मिळविलेले विद्यार्थी देशाच्या जीवनविकासाला हातभार लावण्यास समर्थ व्हावेत अशी माझी आकांक्षा आहे. ती थोडयाफार अंशाने जरी आमच्या विद्यापीठाने सफल केली तरी मी स्वतःला दववान समजेन.

## हल्लींचें उच्च शिक्षण म्हणजेच चैन

"शिक्षक, लेखक, राजकारणी, वकील किंवा अध्यापक पैदा करणें" विद्यापीठाचें ध्येय पूर्वकाळीं समजलें जात असे. परंतु तेवढयाने आज आपलें समाधान होणें शक्य नाही. देशाच्या सद्यःस्थितींत अशा प्रकारचें शिक्षण म्हणजे मी निव्वळ चैन समजतों. या चैनीचीहि आपल्याला गरज ग्राहे. पण ती चैन आहे हें ओळखून आपल्याला वागलें पाहिजे. आजपर्यंत आपल्या विद्यापीठांनी राजकर्त्यांना हवा असलेला माल पैदा केला. पण, विद्यापीठाच्या घटनेंत आमूलाग्र बदल करण्याचा काळ आता येऊन ठेपला आहे.

## विद्यापीठें व जीवनविकास

"विद्यापीठाचें वातावरण विद्वत्तापूर्ण असलें पाहिजे असें ज्यांना वाटतें, त्यांना मी नम्रतापूर्वक एक गोष्ट सुचवूं इच्छितों. ती ही की, विद्यापीठाबद्दलच्या जुन्या कल्पना सर्व जगभर आज बदलून गेल्या आहेत. ऑक्सफोर्डसारखें प्राचीन विद्यापीठ सुद्धा परिवर्तनशील कालाच्या तावडींतून सुटूं शकलें नाही. राष्ट्राच्या हृदयाशीं विद्यापीठें समरस झालीं पाहिजेत. देशापुढे असलेल्या प्रगतीच्या ध्येयाची पूर्ति जर विद्यार्थ्यांनी आत्मसात केली नाही तर भावी काळांत देशाच्या सद्यःस्थितीस अनुसरून अशी कार्यक्षमता विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं हल्लींच्या शिक्षणाने कशी निर्माण होईल? ॲरिस्टॉटल, शंकराचार्य, कणाद किंवा पाणिनि यांच्या कैवल्यवादाची चर्चा करावयाला आज जगाला

सवड नाही. देशाच्या सद्यःस्थितींत विद्वत्तेच्या प्रशांत वातावरणाची अपेक्षा करणें चुकीचें आहे. राजकीय, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय जीवनाच्या विकासाकडे लक्ष देणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे.

## श्रीमंतांची मिरास नको

" समाजांतील संपन्न वर्गाची, सरकारकडून जे फावडयाने पैसे ओढतात किंवा त्याच्या कृपेवर ज्यांचें लक्ष लागून गेलें आहे. अशा लोकांची विद्यापीठ ही मिरास होऊन बसावी अशी माझी इच्छा नाही. विद्यापीठाचीं द्वारें श्रीमंतांप्रमाणेच गरीब विद्यार्थ्यांनाहि खुलीं असावींत म्हणजे शिक्षणाचा प्रसार निष्प्रतिबंध होईल, असें माझें म्हणणें आहे. विद्यापीठ हें आपल्या समाजाच्या पुनरुज्जीवनाचें केंद्र होईल अशा रीतीने नव्या ध्येयांच्या पायावर त्याची पुनर्घटना केली पाहिजे. हें माझें स्वप्न आहे. तें मूर्तावस्थेस आणण्याच्या कामीं आपण सर्वांनी मला मदत करावी अशी माझी विनंति आहे. "

## औद्योगिक शिक्षणाची सोय

प्रांतांतील एक दानशूर नागरिक व कामठीचे रहिवासी रा. ब. डी. लक्ष्मीनारायण यांनी नागपूर विद्यापीठाला ३० लक्ष रुपयांची देणगी दिली होती. आठ वर्षेंपर्यंत त्या देणगीचा योग्य तो उपयोग करण्यांत न आल्यामळे ती तशीच पडून होती. ह्यांनी मात्र कुलगुरु-पदावर आल्याबरोबर आपलें लक्ष प्रथम तिकडे वेधलें. दात्याची इच्छा अशी होती की, या देणगीचा उपयोग औद्योगिक शिक्षणासाठी व्हावा. त्याप्रमाणे तिचा योग्य विनियोग करण्याची योजना ह्यांनी आखली.

## ह्यांची योजना

प्रांतांत औद्योगिक शिक्षणाची मुळीच सोय नव्हती. तेव्हा त्याची सोय करण्यासाठी ह्यांनी एक महत्त्वाची योजना आखून ती

तावडतोब अमलांत आणली. विद्यार्थ्यांना उच्च औद्योगिक शिक्षण घेण्याकरता एक टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयूट ह्यांनी काढण्याचें ठरविलें.

शहरापासून सुमारें चारपांच मैलांवर अमरावती रोडवर जागा खरेदी करून दसऱ्याच्या सुमुहूर्तावर भूमिपूजन विधि आटोपला आणि इमारतीच्या बांधकामाला सुरुवात झाली.

### लॉ कॉलेजची इमारत

तसेंच लॉ कॉलेजकरता स्वतंत्र इमारत नव्हती. त्यामुळे त्याचे वर्ग विद्यापीठाच्या हॉलमध्ये भरवावे लागत असत. अर्थात् यामुळे विद्यार्थ्यांना फारच अडचण होत असे. ही अडचण ह्यांनी तावडतोब दूर केली. कॉलेजकरता स्वतंत्र इमारत बांधून देऊन, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी त्या इमारतीला जोडूनच वसतिगृह बांधण्यांत आलें. त्यामुळे बाहेरगावच्या विद्यार्थ्यांचा राहण्याचा प्रश्न आपोआपच सुटला.

### ह्यांचें कार्यव्यापृत जीवन

विद्यापीठांतील महत्त्वाचीं कामें करीत असतां इतरहि बऱ्याच जबाबदाऱ्या ह्यांना सांभाळाव्या लागत होत्या. कार्यांचा व्याप ह्यांच्या भोवती नेहमी पडलेला असायचाच ! ह्याच वेळीं मध्यप्रांत कायदे मंडळांतील प्रधानमंत्री डॉ. खरे व त्यांचे महाकोशलीय सहकारी मंत्री ह्यांच्यांत बेबनाव होऊन वादळ निर्माण झालें होतें. त्यांच्यांत तडजोड घडवून आणावयाची मोठीच जबाबदारी ह्यांच्यावर येऊन पडली.

### आमच्याकडील मंगल कार्य

याच वेळीं आमच्या घरांतील पहिलेंच कार्य निघालें. आमचा भय्या विलायतहून आपला 'इलेक्ट्रिकल इंजिनियरींग' चा कोर्स

पुरा करून घरीं आला होता. त्याचें लग्न इंदूर मुक्कामीं तेथील रा. ब. भांडारकर, माजी हायकोर्ट जज्ज, यांच्या मुलीशीं ठरलें. नुकतीच आर्वीची निवडणूक झाल्यामुळे आम्ही आर्थिक दृष्टीने त्या वेळीं जरा अडचणींतच होतों. पण ईश्वराने आमची ती अडचण निभावून नेली. एक मोठी खुनाची केस ह्यांच्याकडे आली आणि त्यामुळे आमचा पैशाचा प्रश्न सहजच सुटला.

## 'व्याही-भोजन' सोडून निघाले

इंदूरला भाड्याचा बंगला घेऊन ह्यांनी मला व मुलांना लग्नाची पूर्वतयारी करण्यास पाठवून दिलें. ह्यांना वेळ नव्हताच म्हटलें तरी चालेल. हे इतर पाहुणे मंडळीप्रमाणेच लग्नाच्या आधल्या दिवशीं येऊन तेथे हजर झाले. २ मे १९३८ रोजीं यथाविधि भय्याचें लग्न होऊन आम्हांला पहिली सून आली.

आजवर आम्हांला घरांत मुलीची जी उणीव मासत होती ती तर भरून निघाली. शिवाय आमची मुलीची हौसहि पुरी झाली, याचा आम्हां दोघांना फार आनंद झाला.

लग्नसमारंभानंतर व्याही भोजन व्हावयाचें होतें. पाहुणेमंडळी पण गेली नव्हती. नागपूरहून त्या वेळचे पंतप्रधान डॉ. खरे यांच्याकडून ह्यांना ताबडतोब नागपूरला निघून या अशी महत्त्वाची तार आली. त्याचप्रमाणे आणखी कांही तारा आल्या होत्या म्हणून हे एकदम नागपूरला निघून गेले! हे निघून गेल्यामुळे मला तर वाईट वाटलेंच, पण आमच्या व्याह्यांनीहि त्याबद्दल खेद व्यक्त केला.

## घटनाबाह्य कृत्यांचा निषेध

याच सुमारास खरे मंत्रिमंडळांत बेबनावाचें व अविश्वासाचें वातावरण हळूहळू निर्माण होऊन त्यांतूनच अखेर 'खरे प्रकरण' उद्भवलें.

(हें खरे–प्रकरण सर्वश्रुतच आहे!) आपल्या अमोघ वक्तृत्वानें आजवर ह्यांनी कॉंग्रेसची बाजू उचलून धरली होती; पण पुढे कॉंग्रेस-श्रेष्ठींच्या घटनाबाह्य अरेरावी धोरणावर सडकून टीका करून त्या धोरणाचा निषेध करावयासहि ह्यांनी कमी केलें नाही. यामुळे आपणावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल याची ह्यांनी फिकीर बाळगली नाही, असेंच मला दिसून आलें. डॉ. खऱ्यांना या प्रकरणांत अखेरपर्यंत ह्यांची साथ होती ही गोष्ट कॉंग्रेसश्रेष्ठींना रुचली नाही. त्यामुळे डॉ. खऱ्यांच्या बरोबर ह्यांनाहि कॉंग्रेसमधून बाहेर पडावें लागलें.

सर्व सत्ता आपल्याच हातीं केंद्रित झाली पाहिजे ही लोकशाहीला विरोधी असलेली गोष्ट ह्यांना मुळीच खपली नाही. कॉंग्रेस-मधून बाहेर पडल्यावर ह्यांना विशेष जोर आला. आपल्या टोकदार लेखणीने व जोरदार वाणीने या गोष्टींचा खरपूस समाचार घेऊन ह्यांनी कॉंग्रेसश्रेष्ठींच्या अरेरावी धोरणावर चांगलाच विदारक प्रकाश पाडला.

## महाविदर्भाची मागणी

या सुमारास असेंब्लीगृहांत यांचीं भाषणें होत. त्या संबंधीची थोडी माहिती येथे दिल्यास ती वावगी होणार नाही. खरे–मंत्रि-मंडळानंतर प्रांतांत शुक्ला मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. यानंतरच्या असेंब्लीच्या एका बैठकींत बॅरिस्टर रामराव देशमुख यांनी वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत मिळून आठ जिल्ह्यांचा एक सलग मराठी बोलणाऱ्या लोकांचा मध्यप्रांत किंवा महाविदर्भ प्रांत निर्माण करण्याची मागणी करणारा ठराव आणला होता. या ठरावाला ह्यांनी मनःपूर्वक पाठिंबा दिला होता. संयुक्त महाराष्ट्राची पहिली पायरी म्हणूनच ह्यांनी त्या ठरावाला पाठिंबा दिला. कालांतराने मुंबई, महाराष्ट्र, निजाम

हैद्राबादेंतील मराठवाडा व पोर्तुगीजांच्या सत्तेखालील गोवा प्रांत, या सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या प्रदेशांचा एक संयुक्त महाराष्ट्र बनेल तेव्हा त्यांत वऱ्हाड–नागपूरच्या आठ जिल्ह्यांच्या महाविदर्भानेंहि सामील व्हावें अशी ह्यांची विचारसरणी होती.

ह्यांची ही महाविदर्भाची कल्पना ह्यापूर्वीहि ह्यांनी यवतमाळ जिल्हासभेच्या (यवतमाळ डिस्ट्रिक्ट असोसिएशन) १६ व्या अधिवेशन प्रसंगीं ता. २३ डिसें. ३८ रोजीं अध्यक्षपदावरून भाषण करतांना मोठ्या जोरदार रीतीने मांडली होती. वऱ्हाडच्या शेतकऱ्यांस त्यांच्या त्या वर्षीच्या नापिकीबद्दल प्रांतिक सरकारकडून मालकाळीची सूट देणें किती अगत्याचें आहे, हें सांगतांना त्या वेळच्या शुक्ला मंत्रिमंडळाकडून महाराष्ट्रीयांवर किती घोर अन्याय होतो याबद्दल आपले विचार स्पष्टपणें मांडतांना हे म्हणाले, "सत्य व अहिंसेच्या पायावरील कांग्रेस सरकारने राज्याच्या धोरणांत (शेतकऱ्यांना मालकाळीची सूट देण्याच्या) बदल केला नाही तर गेल्या १८ महिन्यांचा कांग्रेस राजवटीचा अनुभव व्यर्थ गेला असेंच म्हणणें भाग आहे. मध्यप्रांत सरकारच्या कारभारांत आज महाराष्ट्रीय तेवढा अस्पृश्य समजला जात आहे! चार हिंदी प्रधानांत पांचवा एक महाराष्ट्रीय आहे. पण तोहि बिचारा त्या चौघांच्या ओंजळीने पाणी पिणारा म्हणून! आपलें म्हणणें कोसलीय मंत्री ऐकत नाहीत तर या पांचव्या महाराष्ट्रीय प्रधानाने स्वतःच्या स्वाभिमानास जागून राजीनामा देऊन मोकळें व्हावें. पण ते तसें कां करीत नाहीत याचें कारण कळत नाही.

### मध्यप्रांताची अस्वाभाविक रचना

प्रांतिक सरकारांत आज महाराष्ट्रीयांची गळचेपी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणांत सुरू झाली आहे. ही गळचेपी होण्याचें कारण

म्हणजे मध्यप्रांताची अस्वाभाविक रचना होय. इंग्रजांनी ही अन्याय्य रचना केली असली म्हणून कांग्रेसने त्या अन्यायांत भर कां घालावी ? प्रांतांतल्या प्रांतांत नागपूर व महाकोशल असे भेद करण्याचें कारण काय ? शुद्ध मराठी बोलणाऱ्या लोकांचा केवढा तरी भूप्रदेश कांग्रेसने महाकोशलमध्ये घातला आहे. मला प्राचीन वाङ्मय वाचण्याचा थोडा छंद आहे. पण महाकोशल हा शब्दप्रयोग माझ्या वाचनांत आला नाही. कोशल येवढाच शब्द आढळतो. महाराष्ट्राच्या धर्तीवर कांग्रेसने हा नवा शब्द निर्माण केलेला दिसतो. यापेक्षा मध्यप्रांतांतील मराठी भाषेचे जिल्हे व वऱ्हाडचे चार जिल्हे मिळून एक प्रांत बनविण्याकरिता एकादें सीमा कमिशन नेमलें तरच हिंदी भागाकडून होणाऱ्या जाचांतून महाराष्ट्रीयांची सुटका होईल. भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व कांग्रेसला मान्य आहे. म्हणून आपली ही मागणी तिला अमान्य करतां येणार नाही. मी स्वतः स्थाननिष्ठ वा जातिनिष्ठ नाही हें सांगतों. पण, महाराष्ट्रीयांची असली अवहेलनाहि मी सहन करणार नाही. मध्यप्रांत सरकारने एक मेडिकल एक्झामिनेशन बोर्ड नेमलें. त्याच्या नऊ दहा सभासदांत फक्त एकटाच महाराष्ट्रीय आहे व हा जो एकटाच आहे तोहि बिलासपुरास राहणारा ! इंडस्ट्रियल सर्व्हेच्या नऊ दहा सभासदांतहि एकच महाराष्ट्रीय आहेत. आणि तेहि सागरचे सुभेदार ! यावरून प्रांताचें राजकारण कोणीकडे चाललें आहे हें पहा.”

## ही प्रादेशिकता काय दर्शविते ?

अशीच एक जोरदार टीका करून ह्यांनी मध्यप्रांत असेंब्लीच्या १९३९ च्या मार्च महिन्यांत भरलेल्या एका बैठकींतील अंदाजपत्रकावर बोलतांना सरकारच्या प्रांतीयतेवर विदारक प्रकाश टाकला. सरकारची ही प्रादेशिकता जेव्हा ह्यांनी चव्हाट्यावर आणली तेव्हा

हे व पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्यांत चांगलीच झटापट झाली. मिश्र ह्यांचे आरोप खोडण्याचे प्रयत्न करूं लागले. पण त्यांचा तो प्रयत्न फुकट गेला. सरकारच्या अरेरावीच्या धोरणाला उद्देशून हे म्हणाले, " सरकारने नेमलेल्या औद्योगिक निरीक्षण समितीवर एकाच महाराष्ट्रीयाची नेमणूक करण्यांत आली आहे. मला प्रांतीयवाद माजविण्याची इच्छा नाही फक्त वस्तुस्थितीचें मी निदर्शन करीत आहे. समितीवर मराठी भागांतील प्रतिनिधि नेमावयास नको होता काय ? मराठी विभागांतले रहिवासी म्हणून मद्रासी व हिंदुस्थानी त्या भागाचे प्रतिनिधि होऊं शकतील काय ? सरकारच्या या धोरणाचा मी निषेध करतों. महाकोशलच्या बाबतींत असा पक्षपात झाला आहे काय ?

यावर पं. मिश्र उठून म्हणाले, गेल्या २५ वर्षांत तेंच झालें. त्यांच्या या विधानाचा तात्काळ इन्कार करतांना पं. मिश्रांचें तें विधान खोटें आहे असें मोठ्या आवेशाने ह्यांनी असेंब्लींत एकदा नव्हे दोनदां बजावलें. यानंतर दुसऱ्याहि एका अशाच प्रकारच्या नियुक्तीबद्दल तीव्र शब्दांत निषेध प्रगट केला तेव्हा विरोधी पक्षाकडून ह्यांना अडथळा करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. तेव्हा हे म्हणाले, " माझ्यावर जळफळण्यांत काय अर्थ आहे ! "

## हिम्मत असेल तर खटला भरा

असेंब्लींत ह्यांनी काढलेले हे जळजळीत उद्गार ऐकून लगेच पं. मिश्रा यांनी सभागृहांत प्रांतीयवाद उकरून काढूं नये अशी ह्यांना विनंति केली. तेव्हा हे ताडकन् म्हणाले, 'ना. दिवाण हे प्रांतीयवादाबद्दल गुन्हेगार असतांना सभागृहांत हा वाद माजवूं नका असें म्हणणें मोठेंच आश्चर्याचें आहे.' यावर आपण प्रांतीयवाद पसरविला असा आपल्यावर आरोप करतांना तसें एकादें उदाहरण दाख-

वून घ्यावें असें मिश्रांनी ह्यांना आव्हान केलें. तेव्हा 'तुमच्या या आव्हानाचा मी स्वीकार करतों' असें ह्यांनी बाणेदारपणानें पं. मिश्रांना उत्तर दिलें. इतकेंच नव्हे तर पुढे हे असेंहि म्हणाले की, 'मिश्रांना असें एकादें उदाहरण पाहिजेच असेल तर तें वैद्यक परीक्षा मंडळांत सांपडेल.' याहि गोष्टीचा मिश्रांनी इनकार केला, तेव्हा 'मी केलेला प्रांतीयतेचा आरोप अजून करतों,' असे उद्गार काढून हे पुढे म्हणाले, 'मी त्याबद्दल वर्तमानपत्रांतून लेख लिहितों. हिम्मत असेल तर मिश्रांनी माझ्यावर कोर्टांत खटला भरावा.' मी हें विधान पूर्ण जबाबदारीनेच करीत आहें.

## विदर्भ महाविद्यालयांतील भाषण

विद्यापीठाचे कुलगुरु या नात्याने अमरावतीला किंग एडवर्ड कॉलेजच्या (आता विदर्भ महाविद्यालय) सम्भेलनप्रसंगीं मी ह्यांच्या समवेत गेलें होतें. तेव्हा ह्यांनी त्या सम्भेलनाच्या अध्यक्षपदावरून जें भाषण केलें, त्यांतहि कांग्रेसच्या धोरणाचा परामर्ष घेतला होता. त्या भाषणांतील महत्त्वाचा एक उतारा मुद्दाम खाली देत आहें. हे विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले, "स्वतंत्र विचारसरणीच्या या काळांत तुम्हांपैकी बहुतेकांचा जन्म झाला आहे हें तुमचें मोठें भाग्य होय. स्वयंनिर्णय हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. तेव्हा आपला हा हक्क आपण कसा उपभोगावा याच गोष्टीचा विचार करणें तुम्हाला आवश्यक आहे. त्याकरतां आपल्याठायीं प्रबल मनःसामर्थ्य निर्माण करणें हें तुमचें आद्यकर्तव्य होय, असें मला वाटतें. 'नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः' हें गीतेचें प्रतिपादन आहे. या तत्त्वाचें परिपालन उदयोन्मुख राष्ट्रांतील प्रत्येक तरुणाने केलेंच पाहिजे. तुम्हांला जें शिक्षण मिळतें त्याचा उद्देश तुम्हांला भिक्षु अथवा संन्यासी बनविणें हा नव्हे. व्यक्तीला निष्क्रिय बनविणें हें कांही शिक्षणाचें ध्येय नाही.

कॉलेजमधून पदवीधर होऊन ज्या वेळीं तुम्ही वास्तववादी जगांत प्रवेश कराल त्या वेळी त्यांतील भीषण परिस्थितीशीं टक्कर द्यायला तुम्हांला तयार राहिलें पाहिजे.

## कालप्रवाह ओळखा

"तुम्ही आपल्या सभोवताली नजर टाकल्यास तुम्हांला आढळून येईल की, आपला देश बौद्धिक गुलामगिरीच्या तावडींत सापडला आहे. आणि त्यामुळे दिवसेंदिवस निष्क्रियतेकडे त्याची घसरगुंडी होत आहे. आपल्या देशांतील एक मोठी व्यक्ति–वास्तविक जिचे आपण फार ऋणी आहोंत–तीच आपल्याला भूतकालीन अंधःकारांत खेचत असलेली दिसत आहे.

"पण कालाचा रोख ओळखून तुम्हांला आपला जीवनक्रम आखावयाचा आहे. याकरता योग्य मार्ग दाखविणाऱ्या थोर नेत्यांची राष्ट्राला गरज आहे. ते थोर नेते कोणते? ते थोर नेते तुमच्यांतून निर्माण व्हावयाचे आहेत. तुमच्यांतून असें तेजस्वी नेतृत्व उत्स्फूर्त झालें पाहिजे. जागोजाग आश्रम स्थापून व संन्यस्त वृत्तीने राहून राष्ट्राची ही गरज भागणें शक्य नाही. आज आपल्या देशांतहि आश्रम आहेत, पण हजारों वर्षांमागील भूतकाल ह्यांना प्रत्यक्षांत आणावयाचा आहे असें दिसत आहे. ह्या आश्रमीय संस्कृतीचें वर्णन करूं गेल्यास खालीलप्रमाणे करतां येईल. तें असें—

नित्यं चरखा–तक्ली–शिक्षा ।
सत्यमहिंसा विहिता दीक्षा ।
लुंगीवसनं कंथा शयनम् ।
दुग्धसेवनं कूर्चं वर्धनम् ॥
भज स्वराज्यं भज स्वराज्यं । त्यागधिया त्वं भज स्वराज्यम् ।

" ही भूमिका ठेवून राष्ट्रांत तेजस्वी उपदेश देणारे ऋषि निमाण होऊं शकतील काय? राष्ट्राला स्वातंत्र्याप्रत नेण्याला हें नेतृत्व प्रभावी ठरेल काय ? नाही. तेव्हा मला वाटतें, राष्ट्राची ही जबाबदारीची धुरा तुम्ही विद्यार्थ्यांनी आपल्या खांद्यावर घेऊन निष्ठेने व कर्तव्यभावनेने वाहून नेली पाहिजे. त्यांतच तुमचा व तुमच्या राष्ट्राचा तरणोपाय व उत्कर्ष आहे. "

मणी चवदावा

# कुलगुरुपदावर—!

'न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः'

—सुभाषित

## वंदेमातरम् विद्यार्थ्यांचा प्रश्न

विद्यापीठांतील ह्यांची राजवट सुरू होऊन वर्ष होत नाही तोंच ह्यांना एका अत्यंत बिकट व महत्त्वाच्या प्रश्नाला तोंड द्यावें लागलें. हा बिकट प्रश्न म्हणजे हैद्राबाद संस्थानांतील उस्मानिया विद्यापीठांतील "वंदेमातरम् विद्यार्थ्यांचा" होय. सुमारें पांचशें हिंदु विद्यार्थी आपल्या वसतिगृहांत वंदेमातरम् हें राष्ट्रगीत म्हणत असल्याबद्दल त्यांना विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी तेथे शिक्षण घेण्यास मनाई केली. या प्रतिबंधामुळे त्यांच्या शिक्षणांत खंड पडला व ते सारे विद्यार्थी मोठ्या विवंचनेंत पडले. आपल्या शिक्षणाची सोय लावावी या उद्देशाने त्यांनी अर्थातच दुसऱ्या विद्यापीठाकडे धांव घेतली. पण त्यांपैकी एकाहि विद्यापीठाने त्यांना प्रवेश दिला नाही. फार काय, बनारस हिंदु विद्यापीठाने सुद्धा या हिंदु विद्यार्थ्यांना आपल्या विद्यापीठांत समावेश करून घेण्यास साफ नकार दिला.

## ह्या 'कुलगुरूं'नी आश्वासन दिलें

या सर्व परिस्थितीमुळे ते बिचारे निरपराधी विद्यार्थी अगदी हतबुद्ध झाले. अखेर शेवटचा प्रयत्न म्हणून ते नागपूर विद्यापीठ-

कडे आले. येथेहि जर आपली दाद लागली नाही तर आपलें फार मोठें नुकसान होईल याच मनःस्थितींत त्यांनी कुलगुरूंची भेट घेतली. पण त्यांना अनुभव मात्र अगदी निराळा आला. कारण एकंदर झालेला प्रकार व त्यांच्या झालेल्या अवहेलनेची करुण कहाणी ऐकून ह्यांचें मन अतिशय द्रवलें व तावडतोब आपल्या विद्यापीठांत त्यांना प्रवेश देण्यांचें ह्यांनी आश्वासन दिलें. तें आश्वासन ऐकतांच त्या निरुत्साही झालेल्या मुलांचीं मनें आनंदित झालीं. न्यायाची चाड असणारा व उदार मनाचा एक तरी कुलगुरु देशांत आहे याबद्दल त्यांच्या मनांत ह्यांच्याविषयी मोठा आदर उत्पन्न झाला.

## 'विरोधाच्या वावटळींत'

केवळ राष्ट्रगीत म्हटल्याबद्दल त्या विद्यार्थ्यांवर उस्मानिया विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून जो अन्याय करण्यांत आला होता त्याची ह्यांना मनस्वी चीड आली. त्यांची ती अडचण दूर करण्याचा ह्यांनी निर्धार केला व त्याप्रमाणे प्रयत्न सुरू केले. परंतु प्रांताचे गव्हर्नर म्हणजे विद्यापीठाचे कुलपति ह्यांना मात्र ह्यांचें हें करणें आवडलें नाही व त्यांनी उघडउघड विरोध केला. हिंदुस्थानांतील इतर विद्यापीठांकडूनहि ह्यांच्या ह्या कृत्याला नापसंती दर्शविण्यांत येत होती. इतकेंच नव्हे तर खुद्द महात्मा गांधींनाहि ह्यांची ही राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेली धडाडीची कारवाई खपली नाही. त्यांचें असें म्हणणें होतें की, उस्मानिया विद्यापीठांतील हिंदु विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठांत प्रवेश दिला तर मुसलमानांच्या भावना आपल्याकडून निष्कारण दुखविल्या जातील. उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरू व हैद्राबाद संस्थानचे मुख्य दिवाण सर अकबर हैदरी ह्यांनी महात्माजींना आपलें वजन खर्चे करून उस्मानिया विद्यापीठाच्या हिंदु

विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठांत दाखल करून घेण्यांत येऊं नये अशी कारवाई करण्याची गळ घातली होती.

## 'मी मुलांचें नुकसान भरून काढीनच !'

हें प्रकरण चालू असतांनाच एके दिवशीं मी ह्यांना प्रश्न केला की "कायहो हा प्रश्न तुम्ही कसा काय तडीस लावणार आहां ?" त्यावर हे म्हणाले, "चोहोंकडून होणारा विरोध पाहून मी कदाचित् माझ्या निश्चयापासून ढळेन अशी तुला शंका वाटते काय ? पण मी तुला हें सांगतों की विद्यार्थ्यांना दिलेलें वचन मी पूर्ण करणारच. मी केलेला संकल्प तडीस नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन व मुलांचें झालेलें नुकसान भरून काढीन." त्यावेळचा ह्यांचा आत्मविश्वास व चिकाटी किती दांडगी होती हें मला ह्यांच्या बोलण्यावरून दिसून आलें. त्या दिवसांत ह्यांच्या जिवाची विलक्षण धडपड चालू होती ! एकच ध्यास ह्यांनी घेतला होता. विद्यार्थ्यांची शक्यतों लवकर सोय लावायची !

सर्व दृष्टीने होत असलेल्या विरोधास न जुमानतां व प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करतां आपल्या स्वतःच्याच हिंमतीवर ह्यांनी त्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांत प्रवेश दिल्याचें जाहीर केलें.

त्यानंतर त्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांत प्रवेश देतां येण्याकरता विद्यापीठाच्या कायद्यांत योग्य तो फेरबदल करून घेतला. प्रांतांतील निरनिराळ्या महाविद्यालयांत त्यांना भरती करण्याची व्यवस्था केली. तसेंच त्यांच्याकरता खास वर्ग भरवून त्यांच्या शिक्षणाची सोय करून दिली. आणि त्यांचें वर्ष फुकट जाऊं नये म्हणून ऑगष्ट महिन्यांत खास परीक्षाहि ठेवली. हें सर्व करायला ह्यांना अत्यंत खटपट व मेहनत करावी लागली. आपली सर्व कर्तृत्वशक्ति पणाला लावून मुलांना दिलेलें वचन ह्यांनी पूर्ण करून दाखविलें.

### ‘मुलेंच मुलें आणि फुलेंच फुलें!’

अशा रीतीने त्या विद्यार्थ्यांच्या सर्व अडचणींचा निरास होऊन त्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग बिनधोक झाल्यावर त्यांना झालेला आनंद व वाटत असलेला आदर व्यक्त करण्याकरता ते सर्व विद्यार्थी एके दिवशीं सायंकाळच्या सुमारास आमच्या बंगल्यावर ‘वंदे मातरम्’चा जयघोष करीत आले. ‘व्हाईस चान्सलर साहब की जय” अशा गगनभेदी आरोळ्यांनी आमचें समोरचें आंगण अक्षरशः दुमदुमून गेलें होतें. साऱ्या अंगणांत कॉलेज कुमारांचे प्रसन्न चेहरे दृष्टीस पडत होते. आपल्या अंतःकरणांतील सारी कृतज्ञता जणूं ते मुक्तपणें व्यक्त करीत होते असेंच त्या वेळीं मला वाटलें. हे बाहेर येऊन त्या विद्यार्थ्यांच्या मेळाव्यांत जाऊन उभे राहिले असतां त्या सर्वांनी भक्ति-भावाने ह्यांना वंदन केलें. ह्यांच्या गळ्यांत पुष्पहार घालून व ह्यांच्या-वर फुलें उधळून त्यांनी आपली कृतज्ञता प्रगट केली. देशाच्या भावी पिढीचा तो येवढा मोठा जमाव व त्यांनी उधळलेलीं असंख्य फुलें इतस्ततः पसरलेलीं दिसत होती. त्या प्रसंगाचें वर्णन एकाच वाक्यांत होऊं शकेल. ‘आमच्या अंगणांत मुलेंच मुलें नि फुलेंच फुलें!’

### विद्यार्थ्यांच्या मेळाव्यांत

ह्यानंतर ह्यांचें विद्यार्थ्यांच्या त्या मेळाव्यांत स्फूर्तिप्रद लहानसें भाषण झालें. एकूणएक विद्यार्थी अगदी तटस्थ वृत्तीने ह्यांचें उप-देशपर भाषण एकाग्रचित्ताने श्रवण करीत असलेला दिसून येत होता. तो एकंदर देखावाच मोठा गंभीर आणि उदात्त होता. प्राचीन काळच्या गुरुकुलांतील वातावरण असेंच पवित्र आणि शांत राहत असावें अशी कल्पना मला तेव्हा आली. एक तपोनिष्ठ आचार्य आपल्या शिष्यांना जीवनग्रंथाचें रहस्यच स्पष्ट करून सांगत आहे की काय असें मला त्याप्रसंगीं वाटल्यावांचून राहिलें नाही. त्या वेळीं त्या विद्या-

र्थ्यांच्या मुखावर जो आनंद आणि उत्साह मला दिसून आला तो माझ्या स्मरणांतून कधीहि जाणार नाही. ह्या वंदेमातरम् घटनेचें एक स्मृतिचिन्ह म्हणून पुढे त्या विद्यार्थ्यांनी ह्यांचा एक भव्य फोटो तयार करवून तो ह्यांना अर्पण केला.

## माझी स्फूर्तिदेवता

हा फोटो नित्य माझ्या डोळ्यांसमोर असून त्या पवित्र प्रतिमेपुढे बसूनच मी आमच्या गेल्या चाळीस वर्षांचा जीवनपट या पुस्तकाच्या रूपाने चित्रित करीत आहे. हा जीवन चित्रपट उत्तम रीतीने चित्रित व्हावा यासाठी ह्यांच्या प्रेमळ आशीर्वादाशिवाय माझी अन्य कोणती याचना असणार! ह्यांचा तो आशीर्वादच माझी ही इच्छा पूर्ण होण्यास माझी स्फूर्तिदेवता होऊन मला अहर्निश मार्गदर्शन करीत राहील असा मला दृढविश्वास आहे.

## मुंबईची कुलगुरु परिषद

अशा रीतीने हैदराबादच्या हिन्दू विद्यार्थ्यांचा बिकट प्रश्न ह्यांनीं मोठ्या तडफेने सोडविल्यावर मग मात्र ह्यांची चोहीकडून प्रशंसा होऊं लागली. कितीतरी अभिनंदनार्चीं ह्यांना आलेलीं पत्रें त्या वेळीं मी मोठ्या कुतुहलाने वाचून काढलीं. सन १९३९ च्या मार्च महिन्यांत मुंबईला देशांतील निरनिराळया विद्यापीठांच्या कुलगुरूंची परिषद झाली होती. त्या परिषदेंत विद्यापीठांच्या इतर प्रश्नांबरोबर नागपूर विद्यापीठांतील 'वंदेमातरम्' विद्यार्थ्यांचाहि प्रश्न चर्चेला निघाला. उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरु सर अकबर हैदरी हेहि परिषदेला उपस्थित होते. वंदेमातरम् विद्यार्थ्यांचा प्रश्न जेव्हा परिषदेंत चर्चेला आला, तेव्हा ह्यांनी त्यासंबंधीचें आपलें समर्थन अत्यंत मुद्देसूद रीतीने व बिनतोड केलें. या वेळींच सर्व कुलगुरूंना

झालेल्या एका उपाहार प्रसंगीं मुंबईच्या गव्हर्नरांनी ह्यांच्याशीं हस्तांदोलन करतांना 'वंदेमातरम्' प्रश्नाचा उल्लेख करून ह्यांच्याजवळ "Mr. Kedar, you made a unique history in your nation" असे प्रशंसोद्गार काढले.

## चि. बाबूरावाचें आगमन

वरील परिषदेस निमंत्रण असल्यामुळे मीहि ह्यांच्याबरोबर गेलें होते. याच महिन्यांत बाबूराव आपला बॅरिस्टरीचा अभ्यासक्रम पुरा करून येणार होता. तेव्हा त्याला घेण्यासाठी मी मुंबईसच थांबलें. तो आल्यावर त्याला घेऊन मी घरीं आलें.

माझी महत्त्वाकांक्षा पुरी व्हायची नव्हती म्हणूनच की काय, बाबूराव दोन वेळां आय. सी. एस्. च्या परिक्षेला बसूनहि त्याचा अपेक्षित अनुक्रम लागूं शकला नाही. वडिलांच्या इच्छेप्रमाणे शेवटीं तो बॅरिस्टर झाला. आपल्या वाढत्या धंद्याला हातभार लावायला बाबूरावचा आता उपयोग होणार याचा ह्यांना फार आनंद झाला. लगेच त्याला सनद काढून देऊन त्याच्याकरतां एक वेगळेंच ऑफिस थाटून दिलें.

पुढे कांही दिवसांनंतर त्याला हायकोर्टांत प्रवेश मिळाला. त्या वेळीं धंद्यांतील कौशल्य व त्यांतील नैपुण्यसंपादनाबद्दल ह्यांनी त्याला जी उद्बोधक माहिती दिली ती फार महत्त्वाची होती. एका सुटीच्या दिवशीं आम्ही सर्व मंडळी एकत्र जेवायला बसलों असतां हे त्याला म्हणाले,

## वकीलीच्या यशस्वितेची गुरुकिल्ली

"वकिलीचा धंदाच असा आहे की त्यांत यश मिळविण्यासाठी अतोनात श्रम करावे लागतात. कायद्याचें ज्ञान आत्मसात् केल्याशिवाय कुणालाच यशस्वी वकील होतां येणार नाही. आणि

यासाठीच प्रथम प्रथम श्रमांची पराकाष्ठा करावी लागते. यशाचा मार्ग सोपा नसतोच मुळी ! बरें, एवढेंच नाही, तर त्या बरोबरच वकिलाला इतर विषयांचेंहि ज्ञान असणें तितकेंच आवश्यक आहे. त्याशिवाय त्याच्या ज्ञानाला पूर्णत्व येऊं शकत नाही. त्याला डॉक्टरीचें, बंदुक चालविण्याचें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान अवश्य पाहिजे. खुनांच्या खटल्यांत तर अशा माहितीची फार जरूरी पडते.

"मनुष्यस्वभावाची पारख असणें ही गोष्टहि फार महत्त्वाची आहे. संतापासून अट्टल डाकूपर्यंत सर्वांचाच संबंध येत असल्याने त्यांच्या स्वभावांची घडण कशी आहे ती ओळखण्याची कला वकिलांना अवगत झाली पाहिजे. तसेंच अशिलांशी आपली वागणूक नेहमी प्रामाणिकपणाचीच असावी, त्यांची कोणत्याहि प्रकारांनी फसवणूक करूं नये, म्हणजे साहाजिकच आपल्यावरील त्यांचा विश्वास दृढ होतो.

"कोर्टाशीं वागतांना कोर्टाचा मान ठेवून वागावें. खोटया-नाटया गोष्टी सांगण्याचा कधी प्रयत्न करूं नये. कोर्टाशीं भांडण्याचा प्रसंग होतां होईतों येणार नाही असेंच वागावें. पण एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवा, की कोर्टानें अपमान केल्यास तो मुळीच सहन करतां कामा नये. याविषयींचा माझा स्वतःचाच अनुभव मी सांगतों.

"दमोला मी एक खुनाची केस चालवीत होतों. साक्षीदाराची उलटतपासणी करण्यांत मला जज्ज फार त्रास देऊं लागला. मी त्याला पुष्कळ समजावून पाहिलें, पण तो आपला हेका सोडीना. तेव्हा मी त्याला बेधडक बजावलें, 'तूं या केसमध्ये कांहीहि निकाल दे. मी हायकोर्टात माझ्यातर्फे निकाल लावून घेईन. I care two straws for lower courts.' त्याने माझ्या अपेक्षेप्रमाणे निकाल विरुद्धच दिला. हायकोर्टाने मात्र माझ्याच तर्फे निकाल दिला.

"माझ्या सांगण्याचा सारांश एवढाच की, आपल्याला जें करायचें तें प्रामाणिकपणाने आणि श्रमपूर्वक करावें. केस घेतल्या-नंतर तिचा पूर्ण अभ्यास करून ती कशी चालवावी याचा खोल विचार केला पाहिजे. केस चालविण्यापूर्वी आपला बचाव ठरवून ठेवला पाहिजे व त्याला अनुसरून सरकारी साक्षीदारांची उलट तपासणी केली पाहिजे."

## त्रिपुरी कॉंग्रेस

यावर्षी त्रिपुरीची कांग्रेस झाली. या कांग्रेसला आम्ही उभयतां केवळ प्रेक्षक म्हणूनच गेलों होतों. हें कांग्रेसचें ५२ वें अधिवेशन म्हणून ५२ हत्ती रथाला जुंपून अध्यक्ष सुभाषचंद्र बोस ह्यांची—नव्हे ते आजारी असल्यामुळे त्यांच्या छायाचित्राची, मिरवणूक काढण्यांत आली होती. मंडपाच्या बाहेर लोकांच्या आग्रहावरून ह्यांना भाषण करावें लागलें. हे भाषण करावयास उभे राहिले तेव्हा स्वतःच्या धिप्पाड शरीरयष्टीला अनुसरून हे म्हणाले, 'आताच राष्ट्राध्यक्ष सुभाषबाबू ह्यांच्या रथाला ५२ हत्ती जुंपण्यांत आले होते. पण तुमच्या समोर उभा असलेला हा ५३वा हत्ती आहे.' ह्यांच्या या विनोदी वाक्याने लोकांत जोराचा हास्यकल्लोळ उठला. सुभाषबाबूं-वर कांग्रेसश्रेष्ठींनी या अधिवेशन प्रसंगीं जो अन्याय केला त्याबद्दल ह्यांनी नंतर आपल्या भाषणांत कांग्रेसश्रेष्ठींची खरपूस हजेरी घेऊन त्यांच्या त्या कारवाईचा कडक शब्दांत निषेधहि केला.

## फॉरवर्ड ब्लॉकची पहिली परिषद

या अधिवेशनानंतर सुभाषबाबू व कांग्रेसश्रेष्ठी यांच्यांतील मतभेद अधिकच वाढले. अखेर त्याचा परिणाम सुभाषबाबू कांग्रेस-मधून बाहेर पडण्यांत झाला. त्यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' नांवाचा नंतर

एक स्वतंत्र पक्ष आपल्या नेतृत्वाखाली स्थापन केला. त्या पक्षाच्या नागपूर प्रांतांतील संघटनेची जबाबदारी त्यांनी ह्यांच्यावरच सोपविली होती. पुढे कांही दिवसांनी या फॉरवर्ड ब्लॉकची पहिली परिषद नागपूरला भरविण्यांत आली. त्या परिषदेचें अध्यक्षस्थान सुभाषबाबूंकडेच होतें. तेव्हा त्यांचा मुक्काम आमच्याकडेच होता. त्या चार पांच दिवसांत आमच्या घराला एखाद्या यात्रेचेंच स्वरूप प्राप्त झालें होतें. सकाळपासून रात्रीचे बारा वाजेपर्यंत लोकांची आमच्या येथे सारखी ये जा सुरू होती. ही परिषद यशस्वी करण्यासाठी ह्यांनी चांगलेच परिश्रम घेतले होते. या कामीं श्री. रुईकर प्रभृति मंडळींचेंहि ह्यांना बरेंच साह्य मिळालें होतें.

## सुभाषबाबूंना 'मराठी पाहुणचार'

सुभाषबाबू आले त्या दिवशीं जेवायला बसले असतांना ह्यांनी त्यांना म्हटले, 'बाबूसाहेब, हमारे यहाँ तो खाली दाल, भात, कढी बनती है' त्यावर सुभाषबाबू खदखदून हसले. एक दिवस त्यांना व इतर मंडळींना आमच्याकडे मेजवानी देण्यांत आली. त्या वेळीं पाट मांडून पंगत बसविली होती. त्यांच्या पात्राभोवतीं आमच्या सूनबाईने फुलांची मेहराप काढून विशेष सजविलें होतें. उदबत्त्यांचा घमघमाट आणि रांगोळ्यांचा तो थाट पाहून ते फार खूष झाले. महाराष्ट्रीय पद्धतीचें सर्वरुचिसमाविष्ट असें जेवण त्यांना फार पसंत पडलें. त्यांचा स्वभाव फारच संकोची व लाजाळू असावा असाच माझा त्यांच्याविषयी समज झाला असल्यामुळे त्यांच्या व्यवस्थेबद्दल मी विशेष जागरूक असें.

सुभाषबाबू आमच्याकडून गेल्यानंतर पक्षाच्या कामाबाबत ह्यांच्याशीं त्यांचा पत्रव्यवहार सुरू असावा असें मला दिसून येत होतें. त्याप्रमाणे एके दिवशीं एका माणसाकरवीं त्यांचेकडून ह्यांना

एक महत्त्वाचें पत्र आलें. तें पत्र महात्मा गांधींना पोहचतें करण्या-बद्दल सूचना होती. त्याप्रमाणे ह्यांनी दुसरे दिवशीं स्वतः सेवाग्रामला जाऊन तें पत्र महात्माजींच्या स्वाधीन केलें.

## नाट्यसंमेलनांतील भाषण

याच वर्षी नागपूरला येथील अभिनव नाट्यमंदिरातर्फे श्री. कारखानीस यांच्या अध्यक्षतेखाली तिसावें नाट्यसंमेलन भरलें होतें. हे त्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. नाटक हा तर ह्यांचा लहानपणापासूनचा आवडीचा विषय! नाट्यशास्त्राचाहि ह्यांनी बराच अभ्यास केला होता. एक दोन नाटकें पण लिहावयाला घेतलीं होतीं. परंतु तीं तशींच अपुरीं पडून राहिलीं.

याच संमेलनाच्या वेळीं नाट्यप्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ ह्यांच्याच अध्यक्षतेखाली होऊन नटसम्राट बालगंधर्व यांनी त्याचें उद्घाटन केलें होतें. ह्यांचें त्या वेळचें भाषण फारच विनोदी व नाट्यपूर्ण झालें होतें. त्यांत नाट्यवाङ्मय व नाट्यप्रयोग याबद्दल आपल्यास किती नितांत आवड आहे याचें स्पष्टीकरण करतांना 'आपल्याला नाटकांत काम करण्याची संधि आतापर्यंत आली नाही व यापुढे येणार नाही' म्हणून खेद व्यक्त केला होता. याच नाट्य-संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणांत ह्यांनी सांगितलें, "श्रीविष्णूच्या नाभिस्थ कमलांतून चार वेद निर्माण झाले, ही पौराणिक आख्यायिका आपणास माहीत आहे. हिंदुस्थानच्या नाभिस्थानीं असलेल्या नागपुरांतून बदललेल्या सामाजिक जीवनांत संस्कृतीस पोषक असा पंचम वेद निर्माण व्हावा अशी जर नागपूरकरांनी महत्त्वाकांक्षा बाळगली तर ती अयोग्यशी वाटणार नाही. भरतमुनीच्या दृष्टीने नाट्यशास्त्र हा पंचम वेद आहे." या शब्दांत नाट्यशास्त्राची महती वर्णन करून पुढे असेंहि सांगितलें की, "हिंदुस्थानांतील

नाट्यकलेचा इतिहास आर्य संस्कृतीच्या अगदी प्रारंभापासून सुरू होतो. तुलनात्मक दृष्टीने पाहिल्यास जगाच्या रंगभूमीवर भारतीय रंगभूमीचा दर्जा अति उच्च ठरेल. कालिदास, भवभूति यांच्यासारख्या अलौकिक नाटककारांनी आपल्या प्रतिभेने भारतीय रंगभूमीचें नांव अजरामर करून ठेवलें आहे!"

याच भाषणांत नंतर महाराष्ट्रांत व मध्यप्रांतांत नाट्यकलेचा उदय व विकास कोठे व कसा झाला यासंबंधीच्या माहितीचा तपशीलवार ऊहापोह ह्यांनी केला.

या सम्मेलनाच्या एकदोन वर्षे अगोदर नव्यानेच नागपुरांत स्थापन झालेल्या अभिनव नाट्यमंदिरातर्फे 'नाटक व नाट्यतंत्र' ह्या विषयावर एक व्याख्यानमाला गुंफण्यांत आली होती. त्या मालेंत ह्यांचीं ग्रीक नाट्यतंत्रावर अतिशय मनोरंजक व उद्बोधक अशीं तीन व्याख्यानें झालीं.

## सूक्ष्म कलादृष्टीचा प्रत्यय

नाट्याबद्दलची ह्यांची भक्ति सहजोद्भव होती. रसिकता हा ह्यांचा अभिजात असा गुण होता. ललित कलांविषयींचें ह्यांचें ज्ञान फार मार्मिक होतें. या गोष्टींचें प्रत्यंतर मला प्रसंगविशेषीं नेहमींच येई.

ह्यांच्या कुलगुरुपदाच्या राजवटींत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नृत्यपटु उदयशंकर व भारतांतील प्रसिद्ध गायक पं. ओंकारनाथ यांचा सन्मान करण्याच्या प्रसंगीं ह्यांनी त्या त्या शास्त्रासंबंधी अत्यंत विचारपरिप्लुत भाषणें केलीं. त्या भाषणांवरून ह्यांच्या ठायीं कला-दृष्टि किती सूक्ष्मपणें वास करीत होती याबद्दल त्या शास्त्रांतील पारंगतांनी प्रशंसोद्गार काढले.

ह्यांची ही सांगोपांग चर्चा असलेलीं भाषणें ऐकलीं म्हणजे मला फार आश्चर्य वाटे. कामाचा प्रचंड व्याप सांभाळून इतर विषयांचा हे अभ्यास तरी केव्हा करीत असत हेंच मला कळत नसे. त्याबद्दल मीं ह्यांना कधी म्हटल्यास हे म्हणायचे, 'अभ्यासापेक्षाहि निरीक्षण महत्त्वाचें असतें. प्रत्येक गोष्टीकडे सूक्ष्मपणाने पाहण्याची सवय माणसाने स्वतःला लावून घ्यायला हवी. त्यामुळे त्या गोष्टीचें संपूर्ण ज्ञान सुलभपणें होतें. अभ्यास थोडा पण त्याचें मनन जास्त असावें.'

## सुनीलचा जन्म झाला

या वेळीं आमच्या घरांत आनंदाचें गोड वातावरण निर्माण झालें होतें. चि. भय्याला मुलगा होऊन त्याचें 'सुनील' असें नांव ठेवलें. नातू झाल्याचा आनंद कांही वेगळाच होता! ह. भ. प. पांगारकरांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे आम्हांला 'दुधाची मलई' लाभली होती. ह्यांनी आपला आनंद व्यक्त करण्याकरितां नूतन नातवावर काव्य केलें तें ह्यांच्याच हस्ताक्षरांत सोबत देत आहें.

## कुलगुरूचें पहिलें पर्व संपलें

ह्यांच्या विद्यापीठांतील कुलगुरुपदाची कामगिरी तीन वर्षेपर्यंत धडाक्याने गाजत राहिली. विद्याक्षेत्रांत नवीन नवीन सुधारणा व नवीन नवीन योजना सारख्या सुरू होत्या. या अनेक योजनांपैकी 'मेडिकल कॉलेज'ची ह्यांची एक योजना होती. उच्च वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी प्रांतांतील विद्यार्थ्यांना परप्रांताकडे धाव घ्यावी लागत असे. ती उणीव दूर करण्याचा ह्यांनी निश्चय केला. पण याच सुमारास ह्यांची कुलगुरुपदाची मुदत संपल्यामुळे ही योजना अपुरीच राहिली.

ह्यांची ही सांगोपांग चर्चा असलेलीं भाषणें ऐकलीं म्हणजे मला फार आश्चर्य वाटे. कामाचा प्रचंड व्याप सांभाळून इतर विषयांचा हे अभ्यास तरी केव्हा करीत असत हेंच मला कळत नसे. त्याबद्दल मीं ह्यांना कधी म्हटल्यास हे म्हणायचे, 'अभ्यासापेक्षाहि निरीक्षण महत्त्वाचें असतें. प्रत्येक गोष्टीकडे सूक्ष्मपणाने पाहण्याची सवय माणसाने स्वतःला लावून घ्यायला हवी. त्यामुळे त्या गोष्टीचें संपूर्ण ज्ञान सुलभपणें होतें. अभ्यास थोडा पण त्याचें मनन जास्त असावें.'

## सुनीलचा जन्म झाला

या वेळीं आमच्या घरांत आनंदाचें गोड वातावरण निर्माण झालें होतें. चि. भय्याला मुलगा होऊन त्याचें 'सुनील' असें नांव ठेवलें. नातू झाल्याचा आनंद कांही वेगळाच होता! ह. भ. प. पांगारकरांच्या शब्दांत सांगायचें म्हणजे आम्हांला 'दुधाची मलई' लाभली होती. ह्यांनी आपला आनंद व्यक्त करण्याकरितां नूतन नातवावर काव्य केलें तें ह्यांच्याच हस्ताक्षरांत सोबत देत आहे.

## कुलगुरूचें पहिलें पर्व संपलें

ह्यांच्या विद्यापीठांतील कुलगुरुपदाची कामगिरी तीन वर्षेपर्यंत धडाक्याने गाजत राहिली. विद्याक्षेत्रांत नवीन नवीन सुधारणा व नवीन नवीन योजना सारख्या सुरू होत्या. या अनेक योजनांपैकी 'मेडिकल कॉलेज'ची ह्यांची एक योजना होती. उच्च वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी प्रांतांतील विद्यार्थ्यांना परप्रांताकडे धाव घ्यावी लागत असे. ती उणीव दूर करण्याचा ह्यांनी निश्चय केला. पण याच सुमारास ह्यांची कुलगुरुपदाची मुदत संपल्यामुळे ही योजना अपुरीच राहिली.

Nasik
25-5-39

~~आज~~ नातवास पाहून — आजोबास काय वाटले ?

म्हणोत मन बापुडे । निगतसार संसार हा ।
करोत कुणि घोषणा सुपथ एक संन्यास हा ।
हिणोत कवि गाऊनी विजनवास-सौख्यास ही ।
वदोत बहु संत, ते असुखपूर्ण सारी मही ॥ १

अनंत सुखभोग जें विहित मानवां धर्मतो ।
वदे, वहण जरी परी कृत विलोच, चालितो ।
नको वसाति बंधुनी चापके तारुणीच्या गळा ।
मिळेल तरि एकही सुख-निधान्च खरखास-ला ॥ २ → आरखख्याने

असेल पहिले खरें कुणि म्हणोत दुजें खरें ।
नको! मुलिंच वाद हा, करित तत्त्व-चर्चा पुरे ।
सुनील-मुख पाहणें गमतसे सार सृष्टीतले ।
नको आणिक सौख्य तें तरि असें मला एकले ॥ ३

the name of my grandson

JBKewtw

## मणी पंधरावा

# कुलगुरुपदाची दुसरी राजवट

### हे पुन्हा निवडून आले

हे पुन्हा दुसऱ्यांदा कुलगुरूच्या निवडणुकीसाठी उभे राहिले. या वेळीं ह्यांच्या उमेदवारीला बराच विरोध करण्यांत आला होता. याचें कारण उघडच होतें. ह्यांचीं विद्यापीठांतील कामें धडाडीने व चोखपणें चालूं होतीं. शिवाय वंदेमातरम् प्रकरणीं ह्यांनी सरकारी धोरणाची मुळीच पर्वा न करतां आपल्या हिंमतीवर तो प्रश्न सोडविला होता. त्यामुळे तर सरकारचीहि ह्यांच्यावर नाराजी होती. अशी प्रतिकूल परिस्थिति असतांहि हे पुनः निवडून आलेच.

### अपुऱ्या योजनांचा संकल्प

कोर्टाच्या पहिल्या सभेंत भाषण करतांना आपल्या जुन्या राजवटींतील अपुऱ्या योजना पूर्ण करण्याचा आपला संकल्प ह्यांनी जाहीर केला. त्याप्रमाणे मेडिकल कॉलेजची पूर्व योजना हातीं घेऊन ह्यांनी त्या संबंधीचा ठरावहि पास करून घेतला व डॉ. खरे ह्यांची लगेच वैद्यकीय अभ्यासक्रम विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ति केली. पण यावेळच्या ह्यांच्या राजवटीला विशेष उठाव येऊं नये अशी अंतःस्थ कारवाई घडून येत असल्याचें दिसून येत होतें. युद्धाच्या

खबबीवर सरकारकडून आर्थिक सहाय्य न झाल्याने या योजनेला ह्यांना मूर्तस्वरूप आणतां आलें नाही. तरी प्रांतांत आज मेडिकल कॉलेजला जें स्वरूप प्राप्त झालें आहे तें ह्यांच्याच पूर्वयोजनेचें फळ होय असेंच मी म्हणेन.

## हैद्राबादला उतरण्याचा निर्धार

पहिल्या राजवटींत सुरू केलेल्या औद्योगिक शिक्षणाच्या इमारतीचें बांधकाम आता पुरें होऊन पूर्वीच्या ओसाड जागेवर 'व्ही' आकाराची एक भव्य व सुंदर इमारत तयार झाली. या इमारतीच्या समोरच रा. ब. कै. डी. लक्ष्मीनारायण यांचा एक ब्रॉंझचा संपूर्ण आकाराचा पुतळा उभारण्यांत आला. इमारत व पुतळा ह्यांचें उद्घाटन होऊन प्रांतांतील विद्यार्थ्यांना औद्योगिक शिक्षण घेण्याचें एक दालन अशा रीतीने ह्यांनी मोकळें करून दिलें. आज या संस्थेंतून बाहेर पडणारे किती तरी विद्यार्थी प्रांताचा औद्योगिक विकास करण्यासाठी आपल्या या ज्ञानाचा उपयोग करीत आहेत. औद्योगिक शिक्षणाची या प्रांताची व पर्यायाने विद्यार्थ्यांची निकड या संस्थेमुळे आता दूर झाली आहे. आज ही इमारत शहरापासून सुमारें तीन चार मैलांवरील एका टेकडीवर मोठ्या डौलाने उभी आहे. औद्योगिक शिक्षणाचें दालन उघडण्यापूर्वी तत्सम इतर संस्थांना भेट देण्याचें ह्यांनी ठरविलें. या भेटीचा उद्देश एवढाच की, तेथील शिक्षणपद्धति व योजना आपल्या संस्थेंतून चालू कराव्या. या दौऱ्यांचे वेळीं मी सुद्धा ह्यांच्या बरोबर असे. त्याप्रमाणे आम्ही दोघेंहि हैदराबादमार्गें बंगलोरला जाण्यास निघालों. मार्गांत हैदराबाद येथे मुक्काम करून मग बंगलोरला जावें अशी ह्यांची योजना होती. माणसाच्या आयुष्यांत असे कांही प्रसंग येतात की, त्या प्रसंगांची आठवण आयुष्यभर मनांत ठाण देऊन बसते. अशाच तऱ्हेची एक

मजेदार पण संशयकल्लोळाने भरलेली घटना आम्ही या वेळीं अनुभवली. 'वंदेमातरम्' प्रकरणीं निजाम सरकारची ह्यांच्यावर खूपच नाराजी झाल्यामुळे निजाम सरहद्दीवर पाय ठेवतांच तेथील सरकार ह्यांना अटक करील अशी नागपुरांत दाट वदंता पसरली होती. त्यामुळे ह्यांनी निजामच्या सरहद्दींत चुकूनहि पाऊल ठेवूं नये अशी ह्यांच्या हितचिंतकांची ह्यांना सूचनाहि होती. माझाहि पण असाच आग्रह होता. पण या सूचनेकडे दुर्लक्ष करून बंगलोरला जातांना हैदराबादला मुक्काम करायचाच असा ह्यांनी निर्धार केला.

### फोनवरून चौकशी

ह्यांच्या दौऱ्याचा तारीखवार कार्यक्रम अगोदरच संबंधित संस्थांकडे रवाना झाला होता. त्यामुळे हैदराबादच्या स्टेशनवर ह्यांच्या स्वागतार्थ उस्मानिया विद्यापीठाचा अधिकारीवर्ग हजर होता. पण आम्ही मात्र आमच्या पूर्वयोजनेनुसार हैदराबादला न उतरतां शिकंदराबादलाच उतरलों. त्यामुळे स्वागतार्थ आलेल्या उस्मानिया विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची व आमची भेट होऊं शकली नाही. या अधिकाऱ्यांनी नंतर लगेच नागपूरला फोन करून ह्यांच्याबद्दल चौकशी केली. तेव्हा आम्ही नागपूर सोडल्याचें त्यांना कळविण्यांत आलें. पण याच गोष्टीमुळे नागपूर येथील मंडळींना आमच्याविषयीं विलक्षण काळजी वाटूं लागली. हैदराबादेस जाणें धोक्याचें आहे असें या लोकांचें पूर्वीपासूनच म्हणणें होतें. त्यांत या फोनवरून झालेल्या चौकशीने तर त्यांचा तो ग्रह अधिकच दृढ झाला. इकडे हैद्राबादेंतील घांदल तर कांही विचारूंच नका! हैदराबादला आम्ही निश्चित रवाना झालों अशी माहिती नागपूरहून मिळाल्यामुळे आम्ही स्टेशनवर त्यांना दिसलों नाही यामुळे तर ते फारच बुचकळ्यांत पडले. त्यांची व आमची चुकामूक झाली की काय या समजु-

तीने आमच्या शोधांत त्यांनी नंतर शहरभर मोटारी फिरविल्या-आम्हांला मात्र या सर्व भानगडीची कांहीच कल्पना नव्हती. सिकंदराबाद येथील श्री. हनुमंतराव नायडू यांच्या येथे मुक्काम करून आम्ही तो सबंध दिवस मजेंत घालविला. संध्याकाळीं कांही परिचित मंडळींना भेटून आम्ही रात्रीचें जेवण आटोपलें व उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे समोरील आवारांत झोपलों.

## ‘आपके लिये पकडवारंट आगया’

रात्रीं ११ च्या सुमारास धाडधाड करीत एक पोलीस लॉरी व दोनतीन मोटारी हनुमंतरावांच्या दाराशीं येऊन उभ्या राहिल्या. त्यांच्या आवाजाने जागें होऊन आम्ही उठून बसलों. पहातों तों एक पोलीस अधिकारी मोटारच्या खाली उतरला व त्याने ‘नागपूर युनिव्हर्सिटीके व्हायसचँसिलेर साब यहां ठहरे हैं क्या?’ अशा करडया आवाजाने चौकशी सुरू केली. लगेच घरमालकाने त्यांना होकारार्थी उत्तर दिलें. ते ह्यांच्याजवळ आले आणि हळूच म्हणाले, ‘केदार साहेब, आपल्याकरता पकड वारंट आलें आहे.’ त्यावर मोठ्या शांत चित्ताने ह्यांनी उत्तर दिलें, ‘ठीक आहे मी तयार आहें.’ नंतर तितक्याच शांततेने हे मला म्हणाले, ‘माझा शर्ट आणून दे बरं.’ इतक्यांत सरकारी गणवेषांतील चारपांच अधिकारी व पांचसहा पोलीस कान्स्टेबल फाटकांतून आंत आले. हा सर्व प्रकार पाहून मी तर भीतीने घाबरूनच गेलें. क्षणांतच माझ्या मनांत विचारांचे नानातरंग उठले. वाटलें, हैदराबादला येण्याचें भलतेंच धाडस करून स्वतःवर ह्यांनी नसतें संकट ओढवून घेतलें. ह्यांना जर या लोकांनी खरोखरच अटक करून नेलें तर आपणहि ह्यांच्या बरोबर जाण्याची तयारी दाखवावी. कारण आमच्या विवाहानंतर रोजच्या घरगुती जीवनांत मी अहर्निश ह्यांच्या सेवेंत राहिल्यामुळे तुरुंगांतील

एकाकी जीवन ह्यांना फारच दुःसह होईल. म्हणूनच ह्यांच्या बरोबर तुरुंगांत जावें असें मला वाटलें. आलेली गणवेषधारी मंडळी ह्यांच्या जवळ आली आणि मोठया अदबीने लवून ह्यांना त्यांनी सलाम केला. त्यावर घरमालक श्री. हनुमंतराव खदखदा हसूं लागले. आमच्या शोधासाठी ही मंडळी दिवसभर कशी हैराण झाली याचें अस्सल उर्दू भाषेंत वर्णन करतांना 'आपने तो साब यहां आके भी बडा गहज़ब उडा दिया' असें म्हणून ते देखील जोरजोराने हसूं लागले.

### मी तर गरीब माणसाचा पाहुणा

एकूण हा सर्व समजुतीचा घोटाळा झाला होता. आलेली ही मंडळी पकडवारंट घेऊन आलेली नसून ह्यांचा शोध लावून निजाम सरकारचे पाहुणे म्हणून सरकारी अतिथिनिवासांत घेऊन जाण्यासाठी आली होती. अशा रीतीने या साऱ्या संशयकल्लोळाचा उलगडा होऊन त्या मंडळींनी आम्हांला नंतर आपल्याबरोबर चलण्याची विनंति केली. पण हे त्यांना म्हणाले की, 'आज तर मी एका गरीब माणसाचा पाहुणा आहे. त्याची परवानगी असेल तर तुम्ही मला आपल्याबरोबर घेऊन जाऊं शकतां.' आम्ही त्या वेळीं या मंडळी-बरोबर गेलों नाही. दुसरे दिवशीं सकाळीं ती मंडळी येऊन मोठया इतमामाने आम्हांला इष्ट स्थळीं घेऊन गेली. चारपांच दिवस निजाम सरकारच्या पाहुणचाराचा उपभोग घेऊन नंतर आम्ही पुढच्या प्रवा-साला रवाना झालों. याच मुक्कामांत निजाम सरकारचे मुख्य दिवाण सर अकबर हैदरी व श्रीमती सरोजिनीदेवी नायडू यांनीहि आम्हांला उपाहाराला बोलावलें होतें. एक दिवस खास निमंत्रणाने ह्यांनी निजामसाहेबांचीहि मुलाखत घेऊन सुमारें एक तास त्यांच्याशीं बोलणें केलें. या सबंध संभाषणांत 'वंदेमातरम्' प्रश्नाचा मात्र चुकूनहि उल्लेख झाला नाही, असें नंतर ह्यांच्याकडून मला कळलें.

## सरोजिनी नायडूंच्या घरीं

सरोजिनीबाई फार अघळपघळ व मनमोकळया गप्पा मारणाऱ्या होत्या. विनोदीहि तितक्याच. ह्यांचाहि स्वभाव बोलका व विनोदी. मग काय ! दोघांच्या गप्पांना नुसता ऊत आला होता. नाना विषयांवर बोलणीं व मधून मधून हास्यविनोद चालू होता. इतर मंडळींना श्रोत्यांची भूमिका पत्करावी लागली. बाईंना जुन्या वस्तूंचा भारीच अभिमान दिसला. आपल्या घरांतील वस्तूंचा परिचय करून देऊन त्यांबद्दलची ऐतिहासिक माहितीहि त्यांनी भरपूर ऐकविली. बराच वेळ बोलणीं झाल्यावर आम्ही उठूं लागलों तेव्हा त्या म्हणाल्या, 'आत्ताच काय जातां; थांबा थोडा वेळ. मिसेस केदारकडून मला मसालेभाताची माहिती करून घ्यायची आहे.'

## या बाई का भात करणार ?

नागपूर विद्यापीठाच्या पदवीदान सभारंभांत दीक्षांत भाषण करण्यासाठी जी कोणी मंडळी येई, त्यांना आमच्याकडे कुलगुरु या नात्याने प्रत्येक वेळीं मेजवानी देण्यांत येत असे. सरोजिनी देवींनाहि दीक्षान्त भाषणासाठी नागपूरला आल्या होत्या तेव्हा आमच्याकडे मेजवानी दिली होती. त्या प्रसंगीं खव्याचे गोळे घालून कोफ्ता भात केला होता. तो त्यांना फारच आवडला होता. तेव्हाच त्यांनी मला त्याबद्दलची माहिती विचारली होती. मी त्यांना त्या वेळीं थोडक्यांत तोंडीं माहिती दिली होती. तेव्हाच माझ्या मनांत असा विचार आला होता की, रात्रंदिवस राजकारण करणाऱ्या या बाई का भात करून पाहणार आहेत !

नंतर माझ्याकडे वळून त्या म्हणाल्या, 'घरीं आल्यावर माझ्या 'कुक'ला तसा भात बनविण्यास सांगितलें तर त्याने भातांत पेढे

टाकून तो बनविला. तो पण खायला चांगला लागला.' त्यांच्या या बोलण्याने मंडळींत चांगलाच हशा पिकला. त्यानंतर त्यांनी आपल्या 'कुक'ला हाक मारली व मला म्हणाल्या, 'कृपा करून याला भाताची कृति सांगा.' मी कागद पेन्सिल घेऊन हिन्दीमध्ये कृति लिहून दिली. सरोजिनीबाईंचें एका गोष्टीचें मला मोठें नवल वाटलें. त्यांनी नागपूरच्या बऱ्याच भगिनींचीं नांवें घेऊन त्यांची खुशाली विचारली.

## वासुदेव आर्ट्स कॉलेजला मान्यता

हे कुलगुरु असतांनाच वर्ध्याच्या वासुदेव आर्ट्स कॉलेजला नागपुरांत आणण्याच्या कामीं ह्यांची चांगलीच मदत झाली. वर्ध्याला या कॉलेजची परिस्थिति सर्वच दृष्टींनी शोचनीय झाली होती. या कॉलेजचे व्हाइस प्रिंसिपल श्री. या. मु. पाठक यांनी आमच्याकडे येऊन हें कॉलेज नागपूरला आणण्यांत आपल्याला मदत करावी अशी विनंति केली. त्यांच्या विनंतीला ह्यांनी मान्यता देऊन लौकरच तें कॉलेज नागपूरला आणलें. परंतु त्या कॉलेजला मान्यता देण्यास सरकारने तें कांही अटी पूर्ण करूं शकत नसल्यामुळे, विरोध केला. ह्यांनी नंतर नियमांनुसार आवश्यक त्या अटी पुऱ्या करण्यास कॉलेजच्या चालकवर्गास मदत केली व अशा रीतीने आपल्या प्रयत्नाने त्या कॉलेजला मान्यता मिळवून दिली. हें कॉलेज आज नागपुरांत नॅशनल कॉलेज या नांवाने अस्तित्वांत आहे.

## बाबूरावाचें लग्न

विद्यापीठांतील कुलगुरुपदाचा सहा वर्षांचा हा काळ आम्हांला सर्वच दृष्टीने मोठा भाग्याचा ठरला. या कालखंडांत यशाची व सुखाची कमान एकसारखी वाढतच गेली. याच वेळीं आमच्या घरगुती जीवनांत सुखाची व आनंदाची भर पडत होती. बाहेर जसा

यांचा नांवलौकिक गाजत होता, तसेंच घरांतील वातावरण आनंदाने बहरून गेलें होतें.

याच काळांत आमच्या बाबूरावचें लग्न नाशिकचे शिक्षणाधिकारी श्री. द. द्वा. तखंडकर यांच्या मुलीशीं २४ फेब्रुवारी १९४२ रोजीं झालें. हा समारंभ नागपूरलाच करण्यांत आला. त्या वेळीं प्रांताचे गव्हर्नर सर हेन्री ट्वायनम् या मंगलकार्याला उपस्थित होते. आमचा तिसरा मुलगा वसंत उर्फ दादा याची त्या वेळीं नुकतीच एल्एल्.बी.ची परीक्षा आटोपली होती. तो उंचा पुरा मुलगा गव्हर्नरसाहेबांना पानसुपारी देतांना दिसला, तेव्हा त्यांनी त्याच्यासंबंधी माझ्याजवळ सहजच कुतूहलपूर्वक विचारणा केली. तो आमचा मुलगा आहे असें मी त्यांना सांगतांच ते पटकन् मला म्हणाले, 'या मुलाला तुम्ही सैन्यामध्ये कां पाठविलें नाही? शौर्य गाजविण्याजोगा उत्तम मुलगा आहे हा!' पण मी त्यांना म्हटलें 'मुलाला लढाईवर पाठविण्याची आमची इच्छा नाही.' तेव्हा त्यांनी त्याला 'सिव्हिल पायोनियर फोर्स' मध्ये घालण्याविषयी सुचविलें. त्याप्रमाणे कांही दिवसांनी त्याची 'सेकंड लेफ्टनंट' म्हणून सिव्हिल पायोनियर फोर्समध्ये नेमणूक झाली.

## 'आजोबा, केवली लांब तल्वाल!'

आमचा नातू सुनील याला एका गोष्टीची मोठी मौज वाटायची. ती म्हणजे आपल्या आजोबांजवळील लांब तरवारीची! विद्यापीठांत बी. ए. व बी. एस्सी. ला नेमबाजीचें शिक्षण सुरू केलें होतें. तेव्हा ह्यांना 'लेफ्टनंट कर्नल' हा किताब मिळाला होता. त्याला अनुसरून हे लष्करी गणवेष करून त्या कवायतींना हजर राहात असत. तेव्हा सुनील आपल्या बोबड्या बोलाने आजोबांना विचारी 'आजोबा, तुमच्या जवल केवली लांब तल्वाल आहे?'



ले. कर्नलच्या वेषात (सन १९४२)

## माळव्यांत प्रवास

या कालखंडांतच ह्यांनी आपलें कांही लिखाणहि केलें. कालिदास, भवभूति यांच्या नाटकांविषयी तर ह्यांची भक्ति जाज्वल्यच होती. कालिदासाविषयी ह्यांना फारच अभिमान व प्रेम वाटायचें.

एका केसच्या निमित्तानें आम्हांला इंदूरला जाण्याचा योग आला. त्या वेळीं आमचे व्याही रा. ब. भांडारकर यांच्याकडे आम्ही उतरलों होतों. केस संपल्यावर ह्यांना वाटलें, आपण अनायासें माळव्यांत आलोंच आहों, तर कालिदासाच्या जन्मस्थानाचें प्रत्यक्ष दर्शन तरी घेऊन जाऊं या. आपल्या लिखाणाला पुरावा म्हणून कांही माहिती मिळविणें हाच ह्यांचा उद्देश होता. त्याप्रमाणे आम्ही उज्जैन, सांची व भिलसा या ठिकाणांना भेट देण्याचें ठरविलें. आमच्या व्याह्यांनी आणखी एक दिवस थांबून जाण्याचा आग्रह केला. परंतु मनांत विचार आला की तो लागलीच अमलांत आला पाहिजे असा ह्यांचा स्वभाव. तेव्हा व्याह्यांना नकार देऊन, संध्याकाळच्याच गाडीनें आम्ही इंदूर सोडलें.

## ह्या प्रवासाची कशी काय लहर आली ?

या भागांत प्रवास करण्याचें कारण काय हें मला कांहीच ठाऊक नव्हतें. गाडींत बसल्यावर 'या बाजूनें प्रवास करण्याची कशी काय लहर लागली ?' असा मीं ह्यांना प्रश्न केला. तेव्हा ह्यांनी भावी संशोधनात्मक लिखाणाकरिता या प्रवासाचा आपला उद्देश असल्याचें सांगितलें. कालिदासावरील प्रेमाचा अनिवार उमाळा येऊन त्याची सारी साहित्यसृष्टीच ह्यांनी माझ्या डोळ्यांसमोर त्या वेळीं उभी केली.

## कालिदासाचें गुणगान

दोन तासांच्या अवधींत कालिदासाच्या साहित्यगुणांचा ह्यांनी आढावा घेतला. कुमारसंभवांतील शृंगार, मेघदूतांतील यक्षाचा विरह आणि रघुवंशांतील अजाने केलेला विलाप इत्यादि प्रसंग ह्यांनी इतके हुबेहूब वर्णन केले की, ते ऐकत असतां मी आपलें भान खरो-खरच विसरून गेलें होतें. आज जें काय मी वेडेवाकडें लिहूं शकतें तें ह्यांनी दिलेल्या ज्ञानाचें फळ होय असेंच मी म्हणेन.

उज्जैनला येईपावेतों कालिदासाचें गुणगान सारखें चालूंच होतें. दुसरे दिवशीं सकाळीं चहापान करून तेथील प्राचीन अवशेष पाहण्यास आम्ही निघालों.

## 'सा रम्या नगरी—'

अशा प्रकारचें वैभवशाली वर्णन असलेली ती अवंति नगरी! तिचे आजचे भग्न अवशेष पाहण्यास आम्ही निघालों. आज ते अगदीच मोडकळीस आले असले तरी त्यांनी आपलें अस्तित्व अजूनहि टिकवून ठेवलें आहे. मला हे अवशेष पाहण्यांत विशेष कांही वाटलें नाही, पण हे मात्र त्यांच्या निरीक्षणांत पूर्ण गढून गेले होते. क्षणाक्षणाला ह्यांच्या चेहेऱ्यावर कौतुकाचे भाव व्यक्त होत होते. ह्यांनी लगेच त्या अवशेषांची आवश्यक तीं टिपणें घेतलीं. मला मात्र उज्जैनच्या क्षिप्रा नदींतील मोठमोठाले असंख्य कासव, पात्रांत तरंगतांना पाहून भारीच मौज वाटली. कासवांच्या पाठींचा तो देखावा पाहतांना मला असें वाटायला लागलें की, राजस्थानच्या लढायांनंतर रजपूत सैनिकांच्या निराधार ढालीच जणू या क्षिप्रा नदींत आणून टाकल्या आहेत की काय! क्षिप्रेवरील ˘ दृश्य पाहिल्यानंतर आम्ही 'श्रीमहाकालेश्वरा'चें (बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक) दर्शन घेऊन बिऱ्हाडीं परतलों व त्याच दिवशीं रात्रींच्या गाडीने सांचीला प्रयाण केलें.

## भुकेने देव आठवले

सकाळीं दहाच्या सुमारास आम्ही सांचीला पोहोचल्यावर स्टेशनजवळील डाक बंगल्यांत आम्ही मुक्काम केला. या ठिकाणीं आमच्यावर मोठाच बाका प्रसंग आला. डाकबंगल्यांतील खानसाम्यास ह्यांनी आमच्यासाठी जेवण करण्यास सांगितलें तेव्हा तो म्हणाला, 'साब, आपके साथ अनाज लाया होगा तो वो मेरे सुप्रत कर दीजिये. यहां मेरे पास कुछ भी नही.' आमच्यापाशीं शिधासामुग्री कांहीच नव्हती. त्याला बाजारांतून आणून सोय करण्याविषयी म्हटलें तर 'आपल्याला इतका वेळ नाही' अशी तो सबब सांगूं लागला. तो जातीने मुसलमान असून मोठाच उर्मट दिसला. पोटांत भूक तर सपाटून लागली होती. जवळ मिळण्याची कांही सोय नव्हती. परत जावें तर त्या वेळीं गाडीहि नव्हती. शिवाय ज्या उद्देशाने आम्ही आलों तो तसाच सोडून परत जाणें ह्यांना इष्ट वाटलें नाही. शेवटीं खानसाम्यालाच मोठ्या मिनतवारीने ह्यांनी म्हटलें, 'तुझ्या घरीं जें काय असेल तेंच करून आम्हांला घाल. आम्ही तुला चांगली बक्षिसी देऊं!'

## खुदा जागृत झाला!

हे एवढया करारी स्वभावाचे, पण एका सामान्य माणसाची मिनतवारी करीत असलेले पाहून तशा स्थितींतहि मला मोठी मौज वाटून हसूं लोटलें. याप्रमाणे त्याला खुलविल्यावर त्याच्या मनांतील 'खुदा' एकदाचा जागा झाला. व तो आम्हांला भात आणि कोंबडीची भाजी करून देण्यास राजी झाला. पण ह्यांच्या समोर एक नवीनच अडचण उभी राहिली. प्रसंगीं मांसाहाराचें ह्यांना तितकेंसें वावडें नसलें तरी मला मात्र त्याचा उच्चारहि सहन होत नव्हता.

पण आमच्या या भावनेची त्या मुसलमान भाईस काय कल्पना ! तो तर 'मेरे मुर्गीकी एकही टांग' अशाच वृत्तीचा दिसला.

### उपवासाचा प्रसंग टळला

पण पुढे हा प्रसंग टळला. अचानक तिथे एक हिंदु मनुष्य आलेला आम्हांला दिसला. ह्यांनी आपली अडचण त्याला सांगतांच त्याने मोठ्या आनंदाने साधेंच पण रुचकर जेवण तयार करून दिलें. हा योगायोगच समजावा की, आम्हांला त्या दिवशीं उपाशी राहण्याचा योग आला नाही.

### सांची येथील प्रसिद्ध स्तूप

जेवण उरकून आम्ही सांचीचा प्रसिद्ध स्तूप पाहायला गेलों. एक बराच मोठा असून दुसरा त्या मानाने लहान आहे. कांही भग्न स्थितींत असलेल्या मूर्तीहि तेथे आहेत. त्या पाहून आम्ही मुक्कामावर आलों व दुसरे दिवशीं सकाळीं भिलशाला रवाना झालों. तेथे मात्र डाकबंगल्यांत आमची कोणत्याहि तऱ्हेने गैरसोय झाली नाही.

### भिलसा येथील भैलेषाचें मंदिर

भिलसा येथे कालिदासाविषयीच्या अवशेषांची पाहणी करावयाची असल्यामुळे सकाळीं जेवणखाण आटोपून आम्ही निघालों. डोंगरांतील लेणीं व निरनिराळ्या देवतांच्या मूर्ति पाहण्यांत तब्बल तीनचार तास घालविले. ह्यांचें निरीक्षण फारच बारकाईने चालू होतें. प्रत्येक महत्त्वाची जागा व तिचें वैशिष्टय ह्यांनी मला चांगल्या तऱ्हेने पटवून दिलें. या ठिकाणीं 'भैलेषा'चें (सूर्य) मंदिर असून त्याचीहि ह्यांनी चौकसपणें पाहणी केली. त्यावरून ह्या गावाला भिलसा हें नांव पडलें असें म्हणतात.

## माळवा हीच कालिदासाची जन्मभूमि

आमचा हा प्रवास आटोपून आम्ही नागपूरला आलों. त्यानंतर ह्यांनी कालिदासाच्या जन्मस्थानाच्या विवाद्य प्रश्नावर नवीन प्रकाश टाकण्याच्या हेतूने दोन दीर्घ प्रबंध लिहिले. त्यांत ह्यांनी आपल्या या निरीक्षणाचा उपयोग करून घेतला आहे.

कालिदासाच्या जन्मस्थानाबद्दल देखील विद्वानांत बरेच मतभेद आहेत. तो बंगालमध्ये जन्मला असें बंगाली लोकांचें म्हणणें आहे तर कालिदासाचा जन्म काश्मीरमध्येच झाला असा काश्मीरी लोकांचा दावा आहे. बंगाली लोकांनी आपलें मत कालिदासाच्या मेघदूत काव्यावर आधारलें आहे. मेघदूत काव्यांत कालिदास नवीन वर्षाची सुरुवात आषाढ शुद्ध प्रतिपदेपासून करतो. बंगाली लोकहि आपलें नवीन वर्ष त्याच तिथीपासून सुरू होतें असें मानतात. आणि यामुळेच कालिदास बंगाल्यांत जन्मला असा त्यांचा दावा आहे. काश्मिरी लोक आपल्या विधानाच्या पुष्टयर्थ रामायणांतील अज इंदुमतीच्या विवाहप्रसंगाच्या वर्णनाचा दाखला देतात. पण वरील दोन्ही मतें बरोबर नसून कालिदासाचा जन्म माळव्यांत झाला व त्याचें बालपण आणि पुढील आयुष्यहि माळव्यांतच गेलें असें आपल्या संशोधनाचा निष्कर्ष म्हणून एक नवीनच मत आपल्या या दीर्घ प्रबंधांतून ह्यांनी पुढे मांडलें.

## कालिदासाचें स्मारक

कविकुलगुरूवरील आपली भक्ति आणि श्रद्धा यांमुळे ह्यांनी आपल्या कुलगुरुपदाच्या राजवटींत रामटेकला कालिदासाचें स्मारक म्हणून एक स्तंभ उभारला व त्यासाठी स्वतः देणगीहि दिली.

## भवभूतीवर विद्वत्ताप्रचुर व्याख्यान

कालिदासाप्रमाणेच भवभूतीच्या जन्मस्थानासंबंधी ह्यांचें संशोधन चालू होतें व त्यासंबंधीचे ह्यांचे कांही निर्णय ठरले होते. १९४८ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत गोंदिया येथे विदर्भ साहित्य संघाचें अधिवेशन डॉ. वि. भि. कोलते ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलें होतें. अधिवेशनाच्या स्वागत मंडळाच्या खास निमंत्रणावरून हे त्या अधिवेशनास आधीपासून हजर राहिले होते. त्याच संमेलनप्रसंगीं भवभूती स्मारकोत्सव साजरा झाला. या उत्सवाचें अध्यक्षपद ह्यांच्याकडे होतें.

उत्सवाध्यक्ष म्हणून ह्यांचें त्या प्रसंगीं भवभूतीवर सुमारें दीड पावणेदोन तास अत्यंत माहितीपूर्ण व उद्बोधक व्याख्यान झालें. त्या संमेलनांतील ह्यांचें तें व्याख्यान सर्व लोकांना फारच आवडलें. दुसरे दिवशीं गोंदियापासून ८–१० मैल अंतरावर भवभूतीचें मूळ स्थान असलेल्या पदमपूर गावीं संमेलनास आलेली मंडळी गेली होती. हेहि त्या मंडळींबरोबर मुद्दाम गेले होते. तेथील भवभूतीच्या कालचे कांही अवशेष ह्यांनी सोबतच्या मंडळींना मोठ्या कुतूहलाने दाखविले. सदरहु ठिकाणीं भवभूतीचें कोणत्या तरी स्वरूपांत स्मारक व्हावें, अशी ह्यांनी आपल्या व्याख्यानांत हार्दिक इच्छा प्रकट केली होती. असें स्मारक उभारण्याचें कार्य हातीं घेण्यांत आल्यास आपणहि आपल्या सामर्थ्यानुसार त्याला हातभार लावूं असेंहि पण ह्यांनी आपल्या व्याख्यानांत जाहीर केलें होतें.

## मणी सोळावा

# कुलगुरुपदाच्या कालखंडांत !

‘ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । ’

—भगवान श्रीकृष्ण

### सुनीलचा पराक्रम

१९४० मध्ये पुण्याला महाराष्ट्र एकीकरण परिषद झाली. त्या परिषदेचे हे अध्यक्ष होते. त्याप्रीत्यर्थ आम्ही नागपूरहून पुण्याला मोटारने गेलों होतों. बरोबर मोठी सून सौ. वीणा व छोटा नातू सुनील होता. प्रवासामध्ये असली घरची बालमंडळी अथवा मित्रमंडळी गप्पा मारायला सोबत असल्यावांचून ह्यांना बरें वाटत नसे. पुण्याला आमचा मुक्काम गायकवाड वाड्यांत होता.

आम्ही पुण्याला गेलों त्याच दिवशीं सुनीलने एक पराक्रम केला. तो म्हणजे त्याने तापलेल्या बंबाची तोटी फिरविली व त्यांतील कढत पाण्याने आपला हात चांगलाच भाजून घेतला. त्याच्या हातावर आंब्याच्या कोयीएवढा फोड उठला व तो कळवळून रडूं लागला. त्याचें तें कळवळणें पाहून ह्यांचा जीव खालीवर होऊं लागला. स्वागतासाठी मंडळी हारतुरे घेऊन आली होती. पण ह्यांचें लक्ष त्याकडे कुठे होतें ! ह्यांनी लागलीच त्याला घेऊन डॉक्टरचा दवा-

खाना गाठला व त्याला मलमपट्टी करवून घेतली. पुढे तीन चार दिवस, परिषदेला हजर राहण्यापूर्वी त्याच्याविषयीची काळजी घेण्यास हे चुकत नसत.

## ह्यांचें अध्यक्षीय भाषण

या परिषदेच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत भाषावार प्रांतनिर्मितीच्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून मोठ्या तडफदारपणे त्याचा ह्यांनी पुरस्कार केला. हे म्हणाले, 'गत वैभवापासून स्फूर्ति घेऊन महाराष्ट्राचें एकीकरण करण्यासाठी आपण आपली सर्व शक्ति पणाला लावली पाहिजे. खुद्द नेहरू रिपोर्टांतहि भाषावार प्रांतरचनेला स्थान मिळालें आहे.' नंतर महाराष्ट्रीय कोणाला म्हणावें याची व्याख्या करून महाराष्ट्राच्या एकीकरणामुळे कायदेमंडळ आणि न्यायदान यांमध्ये उपस्थित होणाऱ्या भानगडींची सांगोपांग चर्चा केली. महाराष्ट्राबद्दलचें प्रेम, गतवैभवाची आठवण आणि मराठी भाषेचा अभिमान हीं तिन्हीहि वैशिष्ट्यें मराठी बोलणाऱ्याच्या मनांत सतत असल्यामुळे महाराष्ट्र एकीकरणाच्या चळवळीला प्रत्येक मराठी भाषा बोलणाऱ्याचा पाठिंबा मिळेल याबद्दल आपल्यास मुळीच शंका वाटत नसल्याचें ह्यांनी शेवटीं बोलून दाखविलें.

## आगगाडींतील मौज

एकदा एका लग्नप्रसंगाकरिता आम्ही आगगाडीने आकोल्यास जात होतों. एका डब्यांत एक बंगाली जोडपें पूर्वीच बसलें होतें. आमचें त्या डब्यांत जाणें त्या बंगाली बाईला रुचलें नसावें. कारण ती बाई मोठ्या अविर्भावाने व हातवारे करून आपली नापसंती व्यक्त करीत होती त्यावरून, आणि कांही परिचित बंगाली शब्दांवरून त्यांच्या त्या संवादाचा भावार्थ आमच्या लक्षांत आला. त्या बाईचा

तो आततायी स्वभाव पाहून मी ह्यांना दुसऱ्या डब्यांत बसण्याची सूचना केली, पण ह्यांनी तिकडे दुर्लक्ष केलें. इतकेंच नव्हे तर त्या बाईची ह्यांना एकप्रकारें गम्मतच वाटूं लागली. लगेच ह्यांची काव्य-प्रतिभा जागृत होऊन तिच्यावर एक विडंबनात्मक काव्य रचून मला तें म्हणून दाखविलें. त्यांत त्या बाईचें स्वभावचित्र हुबेहुब रेखाटलेलें पाहून मला चांगलेंच हसूं येऊं लागलें. त्यामुळे तर ती अधिकच चिडली व मनमानेल तशी बडबडूं लागली. अकोला स्टेशन येईपर्यंत आमची मोठीच करमणूक झाली. कांही प्रसंगीं हे असेंब्लीगृहांतहि हास्याचा असाच कल्लोळ उडवून देत असत.

## विद्यामंदिर योजना

१९३९ मध्ये प्रांताचे शिणक्षमंत्री पं. रविशंकर शुक्ला यांनी एक विद्यामंदिर योजना आखली होती. ही योजना ह्यांना मुळीच पसंत नव्हती. मुसलमानांना जशी ही योजना पसंत नव्हती तशीच खुद्द महात्मा गांधींनाहि ती पसंत नव्हती. पण ह्यांनी जो या योजनेला विरोध केला, त्याची तात्त्विक भूमिका अगदी निराळी होती. विद्यामंदिर या शब्दाचें 'बैतुल–इल्म' असें नांव बदलवून मुसल-मानांचा विरोध शांत झाला व 'वर्धा शिक्षण योजने'च्या चौकटींत बसविण्याचें कबूल केल्यामुळे महात्मा गांधींनीहि तिला संमति दिली. ह्यांना मात्र मुळांतच या योजनेंतील 'एक शिक्षक शाळे'ची कल्पना वेडगळपणाची वाटली. त्या योजनेवर ह्यानी खूप ताशेरे उडविले.

## विद्यामंदिर योजनेवरील भाषण

१९३९च्या मार्च महिन्यांत भरलेल्या कायदेमंडळाच्या बैठकींत अंदाजपत्रकावर टीका करतांना ह्यांनी या योजनेचें वांझोटें स्वरूप सर्वांच्या निदर्शनास आणलें. त्या प्रसंगीं ही चर्चा ऐकायला बरीच

स्त्रीपुरुष मंडळी असेंब्लीगृहांत हजर होती. ह्यांचें म्हणणें असें होतें की, मुलांची प्रगति किती झाली, याचें मूल्यमापन करण्यासाठी कांहीहि साधन या बिलांत ठेवण्यांत आलेलें नाही. त्या दिवशीं आपल्या अस्खलित वाणीने ह्यांनी सारें सभागृह दणाणून सोडलें. विद्यामंदिरांत शिकविल्या जाणाऱ्या एका चोपड्याच्या आधारें ह्यांनी जेव्हा पुढील कविता वाचल्या तेव्हा तर सभागृहांत एकच हशा पिकला. त्या हशाने टेबलावर पाय ठेवून झोपणारे सभासद खडबडून जागे झाले. गॅलरीमध्ये आमची तर हसून मुरकुंडीच वळली. ती कविता अशी.

'चेंडू दांडू नको मला । नको मला
हेंच सांगणें गडे तुला । गडे तुला
छान सूत मी काढीन । काढीन
खादी सुबक मी विणीन । मी विणीन
देशभक्त होणार आई, देशभक्त होणार, देशदास राहणार
हातसुताची, हातविणीची, खादी वापरणार।

अशा प्रकारच्या भिकारड्या कविता मुलांना शिकवून आपण देशाचें काय भलें करणार आहांत?' असा उघड सवाल ह्यांनी मंत्र्यांना विचारला. विद्यार्थ्यांसमोर कोणत्या प्रकारचे आदर्श ठेवावे याचा आजकाल कोणी विचार करीत नाही. त्यासंबंधी आपलीं मतें मांडतांना ह्यांनी असें सांगितलें की पूर्वीच्या काळीं विद्यार्थ्यांसमोर—

'अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदम् क्षात्रं शापादपि शरादपि ॥

असें ध्येय ठेवलें जात असें. पण आजकाल अतिशय विसंगत अशा प्रकारचें मिळमिळीत ध्येय विद्यार्थ्यांना शिकविल्या जातें.' असें म्हणून ह्यांनी आपल्या स्वभावाप्रमाणे या प्रसंगींहि त्या श्लोकाचें

खालीलप्रमाणे विडंबन तयार करून असेंब्लीगृहांत म्हणून दाखविलें. हे म्हणाले—'आज विद्यार्थ्यांपुढे—

अग्रतश्चरखा तक्ली पृष्ठे कार्पास पुंजकः

इतः सत्यमितोऽहिंसा हस्तादपि मुखादपि ॥'

असें ध्येय आहे.' ह्यांचें हें विडंबन ऐकून सभागृहांत पुन्हा एकवार हास्याचा कल्लोळ उठला.

## महात्माजींच्या कुटींत

हे मधूनमधून महात्मा गांधींकडे सेवाग्रामला त्यांच्या भेटीस जात. मलाहि हे कांही वेळां आपल्या बरोबर नेत. तेथे गेल्यावर महात्माजी आणि हे बराच वेळ संभाषण करीत बसायचे. संभाषण संपलें म्हणजे माझ्याकडे निर्देश करून महात्माजी ह्यांना म्हणायचे, 'भाई केदार, इनको यहां छोड दो, फिर तुम भी हमारे पास आजावोगे.' त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ मला तितकासा कळत नसे. ह्यांना त्यासंबंधी विचारलें असतां हे मला म्हणाले, 'अग, हा म्हातारा तुला आपल्याकडे वळवून मला आपलासा करूं पहातो.' एका प्रसंगीं तर महात्माजींनी मला पहातांच ह्यांना असाच स्पष्ट प्रश्न केला की, 'क्यों केदार, इनको कब यहां छोडते हो?' यावेळीं महात्माजी एका लाकडाच्या वाडग्यांत खिरीसारखें पातळ पेय लाकडाच्या चमच्याने घेत होते. तें संपल्यावर दुसऱ्या एका 'बेन'ने लाकडाच्या थाळींत आणलेली जाडशी पोळी कितीतरी वेळपर्यंत महात्माजी हळूहळू चर्वण करीत खात बसले होते. दोघांत झालेल्या राजकीय व इतर विषयांवरील संभाषण आटोपून आम्ही तेथून निघालों. बाहेर पडतांच हे मला म्हणाले, 'हें पहा, तुला आता मात्र या म्हाताऱ्याकडे आणण्याची सोय नाही. एकादे वेळीं तो तुला खरोखरच आश्रमांत ठेवून

घ्यायचा.' त्यावर मी ह्यांना म्हणालें, 'काय हरकत आहे मी तेथे राहिलें तर ? इतके दिवस मी तुमची सेवा केली. आता येथे राहून राष्ट्राची सेवा करीन.'

## चिमूर आष्टी प्रकरण

ह्यांनी बरेच खुनाचे खटले चालवून आरोपींना दोषमुक्त केलें होतें. पण चिमूर–आष्टी प्रकरणांमुळे ह्यांचें नांव चांगलेंच गाजलें. १९४२ च्या महात्माजींच्या 'उघड बंडां'त आमच्या मध्यप्रांतांत चिमूर–आष्टीने मोठा पराक्रम गाजविला. त्यामुळे सबंध हिंदुस्थानांत या दोन गावांची चांगलीच प्रसिद्धी झाली. या 'बंडां'त तेथील रहिवाश्यांनी परकीय गुलामगिरीविरुद्ध खवळून जाऊन मानवी हिंसेपर्यंत आपली मजल नेली. अर्थात् त्याबद्दल न्यायालयाने अखेर त्या प्रकरणीं सात इसमांना फाशीची शिक्षा सुनावली. त्यांची फाशी टळावी म्हणून डॉ. खरे प्रभृति पुढाऱ्यांनी फाशी निवारक समिती निर्माण करून तिच्या करवीं ह्यांना कोर्टांत उभें राहण्याची विनंति केली. ती ह्यांनी मान्य करून एक पैहि मोबदला न घेतां आपल्या प्रभावी कायदेपांडित्याच्या जोरावर एक अपूर्व कायदेशीर मुद्दा पुढे करून त्या सात अभागी जीवांची फाशी तात्कालिक का होईना पण स्थगित करविली. त्यामुळे पुढे बदललेल्या परिस्थितीचा फायदा मिळून ते बिचारे फाशीच्या शिक्षेंतून कायमचेच सुटले व मुक्तहि झाले.

## प्रजा विरुद्ध राजा

अशीच एक दुसरी केस रतलामला झाली. तो सुद्धा एक संस्मरणीय प्रसंग आहे. तेथील स्टेटचा राजा व प्रजा ह्यांच्यांत कांही भांडणावरून ही केस निर्माण झाली होती. प्रजामंडळातर्फे ह्यांना केसला जावें लागलें. या केसमध्ये कांही गरीब लोकांवर गुंडगिरीचा

आरोप करण्यांत आला होता व कांही प्रतिष्ठित लोकांना शिक्षाहि झाल्या होत्या. त्या केससाठी संस्थानाने के. एम. मुनशी यांना न्यायाधीश नेमलें होतें.

## ह्यांचा धडाडीचा प्रयोग

पण जज्जाची वर्तणूक स्टेटच्या बाजूलाच कलती आहे असें ह्यांना समजून आलें. अशा परिस्थितींत आपण कितीहि उत्कृष्ट तऱ्हेने बचावाची बाजू मांडली तरी तिचा कांही परिणाम होत नाही असें दिसून येतांच ह्यांनी आपला धडाडीचा प्रयोग करून पाहिला व तो यशस्वी ठरला. एकतर्फी नेमलेल्या जज्जापुढे आम्ही केस चालवूं शकत नाही असा अर्ज स्टेटच्या राजाला पाठविण्याचें ठरवून त्या दिवशीं केस न चालविण्याचें ह्यांनी निश्चित केलें. या गोष्टीची बातमी मुनशींच्या कानावर जातांच त्यांनी एक पत्र राजाला व दुसरें ह्यांना पाठवून 'आपण केस चालवूं इच्छित नाही' असें कळवून ते निघून गेले.

## ह्यांचा जयजयकार

या प्रमाणे आजचें संकट पुढे ढकललें गेल्यामुळे रतलामच्या जनतेचा आनंद नुसता उफाळून निघाला. लोक ह्यांना उचलून अक्षरशः नाचूं लागले. केवढी तरी प्रचंड मिरवणूक काढून ह्यांचा त्यांनी सन्मान केला. अत्तरांच्या कुप्याच्या कुप्या व फुलें ह्यांच्या अंगावर उधळून त्यांनी आपला आनंद प्रकट केला.

## स्वा. वीर सावरकरांना 'डॉक्टरेट'

कुलगुरुपदाच्या कारकीर्दींत स्वा. वीर सावरकरांना नागपूर विद्यापीठातर्फे ह्यांच्याकडून 'डॉक्टरेट'ची पदवी देण्यांत आली. तसें पाहिलें तर सावरकरांसारख्या प्रथम श्रेणीच्या साहित्यिकाला व कर्तृत्ववान

देशभक्ताला मुंबई विद्यापीठाने यापूर्वीच डॉक्टरेट देऊन, त्यांचा गौरव करायला हवा होता. पण ती गोष्ट अखेर ह्यांनीच त्यांच्याविषयी-च्या आदरभावाने नागपूर विद्यापीठाकडून घडवून आणली.

त्या प्रसंगीं पदवीदान समारंभाच्या वेळीं दीक्षान्त भाषण देण्यास आलेले पाहुणे सर मिर्झा इस्माईल व इतर मंडळींना आम-च्याकडे मेजवानी देण्यांत आली. त्या मेजवानीस स्वा. वीर सावरकरहि हजर होते. पण माझ्या आठवणीप्रमाणे प्रकृतीच्या कारणामुळे त्यांनी भोजन न करतां नुसता फलाहारच केला. 'माझी जन्मठेप' हें त्यांचें आत्मचरित्र जेव्हा माझ्या वाचनांत आलें तेव्हा देशप्रेमाने प्रेरित होऊन त्यांच्याकडून घडलेल्या अचाट कृत्यांच्या वर्णनाने माझ्या मनावर फारच परिणाम झाला होता. एवढीं साहसाचीं कृत्यें करणारा वीर अंगानेहि तसाच धिप्पाड व दर्शनीय असावा, अशी माझी साहाजिकच समजूत झालेली होती. पण प्रत्यक्षांत जेव्हा मी त्यांना आमच्या घरीं पाहिलें, तेव्हा त्यांची ती किडकिडीत शरीरयष्टी पाहून मला मोठाच अचंबा वाटला. व असा मनुष्यहि आपल्या आयुष्यांत येवढीं साहसाचीं कृत्यें करूं शकतो तेव्हा माणसाचें धाडस हें शरीर-प्रकृतीवर नसून त्याची बुद्धिमत्ता व खंबीरवृत्ती यावरच अवलंबून असते असें मला वाटलें.

## जबाबदारीची जाणीव

कुलगुरुपदाच्या ह्यांच्या अर्धतपाच्या राजवटींत ह्यांनी बरीच महत्त्वाची कामगिरी केली. त्यामध्येच 'एअर ट्रेनिंग कोअर' ची स्थापना करून ह्यांनी वैमानिक शिक्षणाची सोय करून दिली. तसेंच Ad Eundem डिग्रीज् दुसऱ्या विद्यापीठांच्या ग्रॅज्युएट्सना दिल्या. त्यामुळे ते नागपूर विद्यापीठाचे ग्रॅज्युएट झाले. त्याच प्रमाणे आपल्या राजवटींत ह्यांनी विद्यापीठाचें ग्रंथालय (लायब्ररी) बहुमोल

संदर्भ ग्रंथ व इतर बऱ्याच महत्त्वाच्या ग्रंथांची भर घालून अद्ययावत् केलें.

विद्यापीठाचा सर्व कारभार हे स्वतः जातीने लक्ष घालून पाहत असत. स्वतःवरची जबाबदारी स्वतःच पार पाडायची असेंच ह्यांचें तत्त्व होतें.

विद्यापीठाच्या अधिकारी वर्गाशीं ह्यांची कडक व न्यायनिष्ठुरपणाचीच वागणूक दिसून येत होती. तिच्या अगदी उलट वागणूक ह्यांची विद्यार्थ्यांबरोबर होती. विद्यार्थ्यांविषयी ह्यांच्या मनांत अत्यंत सहानुभूति व जिव्हाळा वसत होता. विद्यार्थी वर्गाच्या अडचणी दूर करणें हें आपलें कर्तव्य आहे असें समजून हे प्रत्यहीं त्यांना सर्व प्रकारचें साहाय्य करीत. विद्यापीठाच्या नियमनिर्बंधांकडे अगदी काटेकोरपणे न पाहतां, प्रसंगीं मार्ग काढून ह्यांनी त्यांच्या अडचणी दूर कराव्या. या बाबतींत अधिकारी वर्ग बराच नाराज असे. पण त्यांच्या नाराजीची व विरोधाची पर्वा न करतां विद्यार्थ्यांच्या तर्फेंच नेहमी हे निवाडा देत.

### विद्यार्थ्यांविषयी ह्यांची विचारसरणी

विद्यार्थ्यांविषयीची ह्यांची विचारसरणी फार उदार होती. तारुण्यांत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं विवेक व संयम यांचा स्वाभाविकतःच अभाव असतो. त्यांचें हें वैगुण्य आहे असें मानणें योग्य होणार नाही. तारुण्यसुलभ अविवेकीपणाने चुकून एखादे वेळीं त्यांजकडून प्रमाद घडला तर त्याबद्दल त्यांच्याकडे सहानुभूतीच्या दृष्टीनेच पाहिलें पाहिजे असें ह्यांचें मत होतें. मुलांच्या चुकांबद्दल त्यांना शासन करून त्यांच्या आयुष्याची घडी विस्कटून टाकणें ह्यांना कधीच पटलें नाही. त्यांचें म्हणणें हे स्वतः ऐकून घेत व त्यांच्या चुका

त्यांना पटवून देऊन त्या पुन्हा होऊं न देण्याविषयी समजावून सांगत. अशा प्रकारें उपदेश करतांना मी ह्यांना कित्येकदा पाहिलें आहे.

विद्यार्थी वर्गाविषयी ह्यांच्या ठायीं जो जिव्हाळा व जी सहानुभूति दिसून येत होती, तिच्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला ह्यांच्याबद्दल आपुलकी व आदर वाटत असे.

विद्यार्थ्यांसंबंधी ह्यांनी कोणत्याहि प्रकारचा तारतम्यभाव कधीच दाखविला नाही. यासंबंधीची एक गोष्ट मला अनायासें आठवते. वर्धा म्युनि. राजकारणांत ह्यांचे कट्टर विरोधी व रा. ब. नायडूंना नेहमी साथ देणारे एक म्युनि. चे अधिकारी होते. त्यांच्या मुलाला बी. ए. च्या परीक्षेला बसण्यांत कांही अडचण निर्माण झाली होती. ते एका मध्यस्थाकडून ह्यांच्याकडे आले. त्यावेळीं ह्यांनी मागील गोष्टीचा यत्किंचित्‌हि संबंध लक्षांत न घेतां त्यांची ती अडचण ताबडतोब दूर करण्याचें आश्वासन दिलें. व फोनवरून त्या मुलाला परीक्षेला बसूं देण्याविषयी कळविलें.

## ह्यांना 'डॉक्टरेट'ची पदवी

मनाची ही उदारताच ह्यांच्या लोकोत्तर यशाचें रहस्य होय असें मला वाटतें. विद्यार्थ्यांबद्दल ह्यांनी दाखविलेल्या या वात्सल्याने हे केवळ विद्यार्थ्यांमध्येच नव्हे तर साऱ्या प्रांतांत व प्रांताबाहेरहि एक लोकप्रिय कुलगुरु म्हणून प्रसिद्धीस आले. विद्यापीठांत निरनिराळ्या महत्त्वाच्या सुधारणा ह्यांनी महत्प्रयासाने व प्रसंगीं विरोधास न जुमानतांहि घडवून आणल्या. विद्यापीठाची आपली सहा वर्षांची राजवट ह्यांनी मोठ्या धडाडीने व निःपक्षपाती बुद्धीने हाकली. आपल्या शांत, न्याय्य व उदार चारित्र्याने ह्यांनी साऱ्या लोकांच्या हृदयांत आदराचें स्थान मिळविलें. त्या प्रीत्यर्थ नागपूर विद्यापीठाने

एक ठराव करून ह्यांना १९४३ मध्ये डॉक्टरेट (D. Lit.) देऊन ह्यांचा सन्मान केला.

### लेखनकार्य

कुलगुरुपदावर असतांनाच ह्यांनी 'आर्यांचें मूळ वसति-स्थान' या ग्रंथाच्या लेखनाला सुरुवात केली होती. अनेक व्यवसाय सांभाळू-नहि ह्यांचें लिखाण मधून मधून चालूच असे.

याच वेळीं कुलगुरूची निवडणूक आली. कुलगुरुपदासाठी हे उभे राहिले. पण या वेळीं मात्र यश मिळालें नाही. ह्यांच्या हातून लेखनविषयक कामगिरी पार पडायची होती म्हणूनच की काय हे त्या वेळीं निवडून आले नाहीत असेंच समजलें पाहिजे. विद्यापीठाच्या कार्यांतून मोकळीक मिळतांच ह्यांनी आपलें संशोधनात्मक गहन लेखनकार्य हातीं घेतलें. त्यामध्ये आता अधिक वेळ खर्च करणें ह्यांना शक्य झालें. कितीतरी संदर्भ ग्रंथांची उलथापालथ करण्यांतच हे गढून गेलेले दिसत.

### 'वेदस्थान' प्रबंधाचा एक भाग

'आर्यांचें मूळ वसतिस्थान कोणतें' यासंबंधीचीं संशोधनात्मक टाचणें ह्यांनी करून ठेवलीं होतींच. १९४६ मध्ये नागपूरला भरलेल्या प्राच्यविद्यापरिषदेच्या अधिवेशनप्रसंगीं, ह्यांनी त्यावरून एक भाग घाईघाईने छापवून तो वाचूनहि दाखविला होता.

आर्यांच्या मूळ ठिकाणाबद्दल विद्वान लोकांत बराच मतभेद आहे. उत्तरेस सिंधू व गंगा नद्यांच्या खोऱ्यांत हे आर्यलोक वसती करून होते असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे. उलट, आर्यांचें मूळ वास्तव्य आशियामायनरमध्ये असावें हा ह्यांचा सिद्धान्त होता. ह्यांनी आपला सिद्धान्त आपल्या लिखाणांतून उत्कटपणाने मांडला

आहे. या प्रबंधाचें वाचन प्राच्यविद्या परिषदेंत केलें त्या वेळीं बऱ्याच विद्वानांनी ह्यांचा हा मुद्दा चिंतनीय आहे असें मत व्यक्त केलें होतें.

**'माझी इच्छा अमूर्तच राहिली'**

हे लेखनकार्याला उत्साहाने लागलेले पाहून मला मोठें समाधान वाटूं लागलें. आता ह्यांच्याकडून कांहीतरी ग्रंथनिर्मिति होईल अशी मला आशा वाटूं लागली. त्यासंबंधाने ह्यांचे उद्गार ऐकले म्हणजे तर खात्रीच वाटे. हे म्हणत की, 'हें लिखाण हातावेगळें झालें म्हणजे मी कायदाविषयक लिखाण करीन.' पण म्हणतात ना, मानवी आशा असते एक नि परमेश्वरी योजना असते निराळीच! त्याला अनुसरून माझ्या आशा आणि आकांक्षा या अमूर्त स्वरूपांतच राहिल्या. 'कालस्य गहना गतिः' असें म्हणून समाधान मानून घेण्यापेक्षा आज आपल्या हातांत काय आहे ?

## मणी सतरावा

# कांही आठवणी

### या अन्नानेच माझें शरीर बनलें !

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु असतांना हे एकदा कलकत्त्याला लष्करी शिक्षणावर व्याख्यान द्यायला चालले होते. हे बसले होते त्या पहिल्या वर्गाच्या डब्यांत एक युरोपियन गृहस्थ होते. दुपारीं जेवणाची वेळ झाली तेव्हा त्याने डायनिंग कारमधून जेवण मागविलें व ह्यांनाहि 'मागवायचें आहे काय?' अशी विचारणा केली. तेव्हा ह्यांनी 'बरोबर जेवणाचे पदार्थ आणले आहेत' असें म्हणून डबा काढून भाजीपोळी व त्याबरोबर असलेला गूळ मोठ्या आवडीने खाण्यास सुरवात केली. ह्यांचा हा प्रकार पाहून त्या गृहस्थाला मोठेंच आश्चर्य वाटलें. ह्यांनी आपलें खाणें आटोपून हाततोंड धुवून, नसाची डबी घेतली व हे नस हुंगूं लागले. तो गृहस्थहि आपला 'लंच' आटोपून व नॅपकिनने तोंड पुसून संत्रीं सोलून खाऊं लागला. त्याच वेळीं दोघांच्या गप्पाहि चालू होत्या. तो युरोपियन ह्यांना म्हणाला, 'तुम्ही हिंदी लोक पैसे खूप मिळवितां पण स्वतःच्या खाण्यापिण्याच्या बाबतींत मात्र फार कंजुषी करतां! इतकें साधें अन्न खाऊन तुमचें कसें भागूं शकतें?' त्यावर ह्यांनी त्याला उत्तर दिलें, 'माझी शरीरप्रकृति या प्रश्नाचें उत्तर देईल. माझ्या शरीरा-वरूनच तुम्ही काय तें समजूं शकतां. या साध्या अन्नापासूनच माझें हें शरीर बनलें आहे!'

## अन्नखर्चाचा आम्ही विचारच करीत नाही

त्याला हे पुढे म्हणाले, 'तुम्ही जो हा आम्हां हिंदी लोकांवर कंजुषपणाचा आरोप करतां आहां तो मात्र चुकीचा आहे. विशेषतः आम्हां हिंदु लोकांची कुटुंबपद्धति बहुधा समाईक स्वरूपाची असल्यामुळे घरांतले व इतर येणारे जाणारे मिळून सहज पंधरावीस मंडळी रोज घरांत जेवत असतांना अन्नाचा खर्च किती होतो याचा आम्ही कधीं विचारच करीत नाही. दुसऱ्यांना खाऊं घालण्यांत आम्ही पुण्य समजतों.' अशाच दुसऱ्या एका प्रसंगीं ह्यांना प्रवासाचा खाण्याचा डबा भरून देतांना ह्यांनी वरील गोष्ट मला सांगितली व हे म्हणाले, 'आमच्या देशांत येऊन आमच्यावरच टीका करतात वेटे.' ह्यांचे हे उद्गार ऐकून मला तर हसूंच आलें.

## ह्यांचा आवडता पदार्थ गूळ

जेवणाच्या बाबतींत हे फारच साधे असत. खाण्याच्या बाबतींत ह्यांच्या आवडीनिवडीचा प्रश्न कधीच उद्भवला नाही. एखादे वेळीं मात्र जेवतांना पोळी बरोबर खाण्यास हे गूळ मागत. गूळ आणि गुळाच्या वस्तू ह्यांना फार प्रिय.

## 'गोडा'ची फारच आवड

वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत तिखट पदार्थ ह्यांच्या तोंडासहि लागला नव्हता. पांच वर्षांचे होई पावेतों नुसत्या दुधावरच ह्यांची वाढ झाली होती. गोड वस्तू खाल्यावर ह्यांना पाणी पिण्याची जरूरीच नसे. त्याबद्दल म्हटल्यास म्हणायचे, 'गोड खाऊन आलेली रुचि पाण्याने नाहीशी करायची की काय!' मोठेपणीं दूध व दुधाचे पदार्थ यांची ह्यांना भारीच आवड! कधीकधी तर रात्रीं झोपतांना ह्यांना गोड खाण्याची लहर येई. त्या वेळीं पेढा किंवा बर्फीचा

तुकडा हातावर ठेवला की स्वारी खुष ! कोर्टातून घरीं येण्याच्या सुमारास असलें कांहीतरी गोडधोड रोजचें करून ठेवावें लागे.

## जेवणाची केवढी पण घाई !

पदार्थ पानावर पडायचाच अवकाश की ह्यांचा जेवणाचा सपाटा सुरू ! हे जेवायला बसले म्हणजे वाढणाऱ्याची खूपच त्रेधा तिरपीट उडायची ! सणवार असो की सुट्टीचा दिवस असो, तसेंच पानावर चार पदार्थ अधिक असले काय किंवा कमी असले काय, जेवणाची ह्यांची आपली सदा घाईच !

## फारच अप्रतिम बुवा !

जेवतांना अशी नेहमी घाई होत असल्याने नवीन आलेल्या पाहुण्यावर तर उपाशींच राहण्याचा प्रसंग ओढवत असे. एखादे दिवशीं नवीन पदार्थ केला तर तो खाऊन टाकतील. पण त्याबद्दल चकार शब्दहि काढायचे नाहीत. या पदार्थाबद्दल ह्यांच्या अभिप्रायाची मी वाट पाहायची पण तें ह्यांच्या ध्यानींमनींहि नसायचें ! जेव्हा कुठे मी ह्यांचें लक्ष तिकडे वेधून घ्यावें तेव्हा त्या वस्तूची फिरून चव घेऊन पाहत व मग आपल्या नेहमीच्या ठरीव शब्दांत 'छान, फारच छान! फारच अप्रतिम!' अशीं कितीतरी विशेषणें चालू होत.

## 'जगण्यासाठीच खातों'

मसालेदार चमचमीत पदार्थांची ह्यांना तेवढी फारशी आवडच नव्हती म्हटलें तरी चालेल. इतकें साधें अन्न ह्यांना बरें तरी कसें वाटतें असें मला वाटे. त्यावर हे म्हणत, 'तोंडाला रुची असली म्हणजे सारें कांही गोड लागत असतें.'

तुरीचें जाडसर वरण, त्यावर लोणकढें तूप, लहानसे दोन फुलके आणि थोडासा भात. झालें ह्यांचें जेवण. पालेभाज्या ह्यांना

नेहमींच पसंत पडत. पण त्यांचीहि गर्दी झालेली खपत नसे. पानावर वाढलेल्या चटण्या कोशिंबिरींकडे ह्यांचें बहुधा लक्ष जात नसे. त्या नेहमी ह्यांच्या पात्रांत तशाच पडून राहत. मी कित्येकदा ह्यांना म्हणायची सुद्धा की, 'या सर्व चटण्याकोशिंबिरी पात्राची शोभा वाढविण्यासाठीच आहेत का?' त्यावर ह्यांचें उत्तर असायचें की, 'मी खाण्यासाठी जगत नसून, जगण्यासाठीच खात असतों.'

ह्यांचें हें तत्त्वज्ञान संसारांत किती जणांना पटण्याजोगें आहे तें कल्पनेनेंच जाणण्यासारखें आहे. हे म्हणत, 'या चटण्या कोशिंबिरी तुमच्यासारख्या भाग्यवान लोकांसाठी निर्माण झाल्या आहेत.' अन्नासंबंधी ह्यांनी कधीहि चिकित्सा केलेली मला आठवत नाही. जें मिळेल तेंच गोड मानून घेत असत.

## व्यसन असें कोणतेंच नव्हतें

पानसुपारी, सिगारेट असें कोणतेंहि व्यसन ह्यांना नव्हतें. फार काय, चहा सुद्धा वेळेवर मिळाला नाही तरी ह्यांचें त्यावाचून तितकेंसे अडून राहत नसे. बरें, चहा तरी घ्यायचा म्हणजे काय! अगदी पातळ! नुसतें दूधपाणीच म्हणाना!! साखर मात्र भरपूर लागे!!

एखादे वेळीं, मित्रमंडळींत बसले असतां दहापांच सिगारेट्स फुंकून फस्त करीत. नंतर मात्र घसा बिघडला म्हणून तक्रार! तसेंच पान खाण्याचा कुणा आग्रह केला तर बरेचसे विडे भिडेखातर खाऊन टाकत.

## नाही म्हणायला नसेची आवड

ह्यांना एकाच गोष्टीचें व्यसन होतें. तपकीर ही ह्यांची अत्यंत आवडती वस्तू! ही सवय सुद्धा अलिकडेच दहापंधरा वर्षांत लागली होती. नसाची चिमूट ओढीत ओढीत विचारांना चालना देणें ह्यांना

आवडत असे. प्रवासांत सुद्धा नस हुंगून हे स्वतःची करमणूक करून घेत.

नसाची एवढी आवड असतांनाहि कोर्टांत किंवा बाहेर जातांना नसाची डबी बरोबर घेऊन जात नसत. मात्र बाहेरून घरीं येणें झाल्याबरोबर 'डबी आणून देतेस का ?' अशी हांक नेमाने मला ऐकूं येई. मी डबी पाहायला लागायची. पण ती कांही केल्या लवकर सापडत नसे.

## तिची 'भ्रमन्ती' साऱ्या घरांत

नस ओढून झाली की, हे तिला कोठे टाकून देतील याचा नेमच नसे. कधी टेबलावर, तर कधी पुस्तकांच्या ढिगाऱ्यात, तर कधी मलतीचकडे पडलेली असायची ! तिची 'भ्रमन्ती' साऱ्या घरांत सुरू असे. तिला हुडकून काढल्यावर ठराविक जागेवर ठेवण्याची सूचना देऊनहि ती पुन्हा नाहींशी होईच ! याबद्दल कांही म्हटल्यास 'माझ्या आईने मला व्यवस्थितपणाचा धडाच शिकविला नाही, तर तो आता कोठून येईल ?' असें म्हणून, 'तूं तरी लग्न झाल्यावर टापटिपीची सवय लावायला पाहिजे होतीस. पण तूंहि ती लावली नाहीस. आता कुरकुर करून काय उपयोग !' ह्यांनी असें म्हटलें की आम्ही दोघेहि हसायचे !

## 'नसाची सवयच सोडून देतों !'

रुमालाचीहि तशीच कथा. नाक पुसायला रुमाल लागायचा, पण तो कधी जागेवर आढळायचा नाही. डबी एकीकडे तर रुमाल दुसरीकडे ! असे रुमाल तरी किती करून ठेवले होते, पण वेळेवर एक सापडेल तर शपथ ! अंगातल्या कपड्यावरहि नसाचे डाग पडायचे ! त्याबद्दल मी नेहमी ह्यांना बोलायची. तेव्हा हे म्हणत, 'आता ही सवयच सोडून देतों मुळीं; मग तर झालं ना !'

### त्या दिवसाची मी वाट पाही

आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणें हे पुन्हा केव्हा एकदा 'नसाची डबी आणतेस का ?' अशी हाक मारतात त्याची मी वाट-पाहत राहीं. आणि अखेर तसा दिवस उजाडायचा !

### एक विचित्र खोड

ह्यांना एक विचित्र खोड होती. हे कोर्टात किंवा सभेत बोला-यला उभे राहिले की उजवा हात कोटाच्या बटनाकडे जाऊन दोन बोटांनी तें फिरविण्याची क्रिया एकसारखी चाले. आपलें भाषण पटविण्याचें कार्य डाव्या हाताने करीत. त्यामुळे साहजिकच ह्यांच्या कोटाचें खालचें बटन तुटलेलें आढळून येई. एखादे वेळीं तें ठराविक बटन नसलें की ह्यांना चुकल्याचुकल्यासारखें होई.

### एकाग्रतेचें स्थान

ह्यांच्या मनाची एकाग्रता इटकून साधण्याचें एकमेव स्थान म्हणजे 'स्नानगृह'! स्नानगृहांत ह्यांची विचारमालिका एकदा सुरू झाली म्हणजे तर विचारावयासच नको! बाहेर येण्याचें भानहि राहत नसे. दाराला धक्के देऊन बाहेर येण्याची सूचना कित्येक वेळां द्यावी लागे. बाहेर आले म्हणजे चेहऱ्यावर कधी कधी स्मित दिसलें म्हणजे समजावें की, 'आज कोणच्या तरी गहन प्रश्नाचा उलगडा झाला असावा.'

### बस्स ! झालें माझें काम

एकदा असेच हे स्नानगृहांतून बाहेर आले. मी जवळपास कोठे दिसलें नाही. तेव्हा नेहमीच्या पद्धतीप्रमाणे, 'कुठं गेलीस ग !' अशी हाक मारीत हे स्वयंपाकघरांत आले. मी कामांत गुंतलेली आहे असें

पाहून निघून जाऊं लागले. मी लगेच ह्यांच्या पाठोपाठ जाऊन 'काय हवं!' म्हणून विचारलें. पण कांही एक न बोलतां हे तडक आपल्या ऑफिसच्या खोलींत गेले व खुर्चीवर बसून कागदावर रेघोट्या काढूं लागले मी जवळ जाऊन सारखें विचारीत होतें. पण माझ्याकडे ह्यांचें लक्षच नव्हतें. कागदावर आडव्या तिडव्या रेघोट्या मारणें चालूंच होतें. चुलीवरचा पदार्थ करपून जाऊं नये इकडे माझें लक्ष लागलें होतें. इतक्यांत मान वर करून हे मला म्हणतात, 'चित्र कलेचें ज्ञान नसलें म्हणजे सरळ रेषाहि काढतां येत नाहीत.' अखेरीस ह्यांना हवी तशी आकृति जमली. तो कागद माझ्यासमोर धरून हे मला म्हणाले, 'पाहा, ही एक खोली आहे. तिला खिडक्या व दोन दारें समोरासमोर आहेत. मी समोरच्या दाराकडे तोंड करून टेबलावर लिहीत बसलों आहे. तूं समोरच्या दारांतून आंत आलीस तर तुला प्रथम काय दिसेल?' मी म्हणालें, 'तुम्ही मला दिसाल.' त्यावर हे म्हणाले, 'आणि तूं मला दिसणार नाहीस काय?' मी उत्तर दिलें, 'लिहितांना तुमची मान खाली असली तर तुमचें माझ्याकडे लक्ष वेधणार नाही.'

हा सारा प्रकार सेशनकोर्टांत चालू असलेल्या एका केससंबंधी होता. त्या केसचा रात्रंदिवस विचार चालू होता. त्या संबंधीचा मुद्दा स्नान घरांतील तंद्रींत ह्यांना अचानक सुचला.

असे केससंबंधीचे प्रयोग घरीं करून पाहण्याची ह्यांना सवय होती. एके दिवशीं रात्रीं झोपण्याच्या खोलींत यायला ह्यांना बराच वेळ लागला. रात्रीचे दोन वाजून गेले तरी ह्यांचें येण्याचें चिन्हच दिसेना मी वाट पाहून कंटाळलें. हे झोपायला येईपर्यंत मला जागावें लागत असे. ह्यांचें काम आटोपलें की, तसेंच उठून झोपायला यायचें अशी ह्यांची रीत असे. मग मी जाऊन ऑफिसचीं दारें, खिडक्या, दिवे वगैरे बंद करीं. त्यामुळे त्या दिवशींहि ह्यांची वाट पाहत मी

जागत बसलें होतें. पण अजून आले नाहीत असें पाहून मी ह्यांच्या ऑफीसमध्ये गेलें. पहातें तों हे आपल्या समोरील टेबलावर ओणवे होऊन एका पुतळ्याच्या गळयाला दोरी बांधून त्याला विहिरींतून पाणी काढतात त्याप्रमाणे खालीवर करीत होते. हे त्या प्रयोगांत इतके कांही गढून गेले होते की, मी समोर जाऊन उभी राहिलें असतांहि ह्यांना कळलें नाही. ह्यांचा हा विक्षिप्तपणाचा उद्योग(!) पाहून मला तर हंसूच आलें. माझ्या हसण्याने मात्र हे आपल्या तंद्रींतून जागे झाले व मला ह्यांनी प्रश्न केला, 'माणसाच्या गळयाला दोरी बांधून त्याला जर विहिरींत सोडलें तर तो अगोदर डोक्याकडून पाण्यांत बुडेल की, पायाकडून ? मी म्हणालें, गळयाला दोरी बांधून माणसाला विहिरींत सोडलें तर अर्थातच त्याच्या पायाची बाजू प्रथम पाण्यांत जाईल.

ह्यावर हे म्हणाले की, उद्या हा पुतळा कोर्टांत नेऊन न्यायाधीशाला मी माझा मुद्दा सप्रयोग पटवून देणार आहे.

## झोप ह्यांच्या कह्यांतच होती

ह्यांना एक फार चांगली सवय होती. ती म्हणजे ताबडतोब झोप लागणें. डोक्यांत विचारांचें कितीहि काहूर माजलें तरी उशीवर डोकें ठेवतांच तीन मिनिटांत हे घोरूं लागत. झोपण्याच्या खोलींत मात्र दिव्याचा चांगला उजेड हवा असे. त्याशिवाय ह्यांना झोप लागत नसे. आपल्या या सवयीबद्दल हे म्हणत, 'प्रसंगवशात् तुरुंगांत जाण्याची पाळी आली तर तेथील अंधाऱ्या खोलींत झोपेपायीं आपले हाल होतील.

## एक प्रसंग

एकदा एक केसमध्ये मोका पहाण्यासाठी हे मोटारने छिंदवाड्यास गेले. त्याच दिवशीं ह्यांना नागपुरला यावयाचें होतें.

जाते वेळीं खिशांत कांही पैसे टाकूं काय म्हणून विचारलें असतां कांही गरज नाही म्हणून म्हणाले. तरी मी तीन चार रुपये खिशांत टाकलेच. संध्याकाळीं परत येणार म्हणून मी सारखी वाट पहात बसलें. पण ह्यांचा पत्ता नाही. मोटर स्टँडवरहि चौकशी केली. पण तेथेंहि पत्ता लागला नाही. ती रात्र मी काळजींतच काढली. त्या दिवशीं पाऊसहि बराच पडत होता. दुसरे दिवशीं पहाटेच एक टांगा बंगल्यांत आला. मी बाहेर येऊन पहातें तों ओल्याचिंब कपड्यानिशीं ह्यांची स्वारी! टांग्यांतून उतरतांच मला म्हणाले, 'आताच्याच गाडीने मी महत्त्वाच्या केससाठी वर्धेला जाणार आहें.' इतका त्रास सोसूनहि ह्यांची पुन्हा प्रवासाची तयारी आहेच हें पाहून मी थक्क झालें. दुसरे कपडे अंगांत घालण्यास देऊन मी मोटार कुठे म्हणून प्रश्न केला. तेव्हा मोटारीने मध्येच कसा दगा दिला त्याची ह्यांनी साद्यंत हकीकत सांगितली. 'अखेर एका बैलगाडींतून आपल्यास स्टेशनवर जावें लागलें. ती बैलगाडी पण एक मैल जाते न जाते तोंच मोडून पडली. मोठ्या मिनतवारीनेच त्याला स्टेशनपर्यंत चलण्यास कबूल केलें असल्यामुळे रस्त्यांत असा प्रसंग घडल्यामुळे तो नाराज झाला. तेव्हा त्याच्या हातावर होते नव्हते ते पैसे ठेवून मी पायींच स्टेशन गाठलें. खिशांत पैसे उरले नसल्यामुळे मोठाच कठिण प्रसंग उद्‌भवला. इतक्यांत गाडीहि स्टेशनवर आली. तेव्हा बिना तिकीट प्रवास करण्याशिवाय गत्यंतर नाही असा विचार करून तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जाऊन बसलों. पण पुढच्या स्टेशनवर एक मारवाडी गृहस्थ डब्यांत आला. मला त्या डब्यांत पाहून त्याला मोठेंच आश्चर्य वाटलें. मी त्याला सर्व हकीकत सांगितली. तेव्हा त्याने मी नको म्हणत असतांहि माझी सर्व व्यवस्था केली.' नंतर मला पुढे म्हणतात की, 'आयुष्यांत असाहि अनुभव यायलाच हवा. पण मला वाईट वाटतें तें एवढेंच की, त्या

बिचाऱ्या बैलगाडीवाल्यास माझ्याकडून माझ्या इच्छेप्रमाणे पैसे मिळूं शकले नाहीत.'

## दुसऱ्याच्या पैशाविषयी जागरूक

असेच एकदा आम्ही प्रवासाहून परत येत असतां एका गावीं मोटारमध्ये पेट्रोल टाकलें. तेथून जवळजवळ २०–२५ मैल अंतर चालून गेल्यावर लक्षांत आलें की, पेट्रोलवाल्याने चिल्लर पैसे देतांना आपल्याला चुकून थोडे पैसे अधिक दिले. लगेच ह्यांनी ड्रायव्हरला मोटार मागे परतविण्यास सांगितलें. या वेळीं संध्याकाळ होऊन गेली होती. अंधार पडण्याच्या आंत आम्हाला पुढील मुक्काम गाठायचा होता. म्हणून मी म्हटलें, 'ते जास्त पैसे कुणा गरिबाला देऊन टाकूं म्हणजे झालें.' पण ह्यांना तें मानवलें नाही. ड्रायव्हर गाडी वेगानेच चालवात होता. म्हणून हे त्याच्यावर असें कांही जोराने रागावले की, त्याला गाडी मागे वळवणें भागच पडलें. नोकरावर कधीच न रागावणारे, एवढेंच काय पण कामानिमित्त चकार शब्दहि त्यांना न बोलणारे हे त्या क्षणीं इतके संतापलेले पाहतांच आम्ही गप्प झालों. शवटीं मोटार मागे घेऊन पेट्रोलवाल्याचे जे काय चार सहा आणे जास्त आले होते ते त्याला परत केले. या सर्व प्रकारामुळे आम्हांला अर्थातच मुक्कामावर जाण्यास उशीर झाला. रात्र बरीच झाल्याने मुलेंहि उपाशींच झोपीं गेलीं. ह्यांच्या असल्या स्वभावामुळे आम्हाला कित्येकदा अशा कांही गोष्टी ह्यांच्यापर्यंत जाऊं न देण्याची खबरदारी घ्यावी लागे.

## आपल्या पैशाविषयी मात्र बेफिकीर

इतरांच्या पैशाविषयी दक्ष असणारे हे, स्वतःच्या पैशासंबंधी मात्र बरेच बफिकीर असत. पक्षकारांनी दिलेले पैसे बहुधा टेबलावरच

पडून असायचे. त्यांना हातच लावायचा नाही. मग ते मोजून पाहणें तर दूरच ! आम्ही ते पैसे उचलून आणायचे; त्यांत दहा पांच रुपयांची नोट कमी असायचीच. त्याबद्दल म्हटल्यास 'फसवलं बेट्यांनी' एवढेंच म्हणायचे ! फिरून तेच पक्षकार कधी आले तर त्याबद्दल ब्रह्हि काढायचे नाहीत !

फी बाबत ह्यांनी पक्षकारावर कधी सक्ती केली नाही. 'यापेक्षा जास्त फी मिळूं शकली असती असें कोणी म्हटलें तर हे त्वेषानेच म्हणायचे, 'त्या बिचाऱ्या पक्षकाराला मुलंबाळं, घरदार, संसार आहे की नाही ? मी त्याला काय लुटून घेऊं !'

## कलबासंबंधी नावड

कलबमध्ये जाऊन तेथील करमणुकींत आपला वेळ खर्च करणें ह्यांना मुळीच आवडत नसे. कोणी फारच आग्रह केला तर एखादे वेळीं जात; पण खेळण्यापेक्षा ह्यांचें मन गप्पागोष्टींतच अधिक रमे. ह्यांच्या एकदा गप्पा सुरू झाल्या म्हणजे लोक खेळ सोडून भराभर ह्यांच्या भोवती जमा होत.

## गप्पा मारायला कोणीहि चालत असे

बरें गप्पा करायला बरोबरची मंडळी पाहिजे असेंहि नव्हतें. निरक्षर खेडुतांबरोबर आणि लहान मुलांबाळांबरोबर हे तितक्याच तन्मयतेने कितीतरी वेळ गप्पा मारीत बसत. तसें करतांना जर कोणी हटकलें तर हे लगेच उत्तर देत की, 'या लोकांपासूनहि मला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतात.'

## 'डाक्तरसाब आम्हांला औषध द्या !'

आम्ही काश्मीरला गेलों होतों. तेथे ह्यांना लोक 'डॉक्टर साहेब' म्हणून संबोधीत. पहेलगांवला असताना ह्यांच्या डॉक्टर या उपाधीची

चांगलीच गम्मत झाली. एके दिवशीं तीनचार खेडूत आमच्याकडे येऊन ह्यांना म्हणूं लागले, 'डाक्तरसाब, आम्हाला तपासून औषध द्या' त्यांच्या या बोलण्याचें आम्हांला हसूंच आलें. हे त्यांना म्हणाले, 'मी औषधांचा डॉक्टर नसून किताबांचा डॉक्टर आहे.' ह्यांनी त्यांची बरीच समजूत घातली. पण तें त्यांना पटेना. मग ह्यांनी त्यांची माहिती विचारून खाण्यापिण्याचें पथ्य व स्वच्छता वगैरे कशी पाळावी याविषयी उपदेश चालू केला. त्यामुळे ते लोक खूष होऊन निघून गेले.

**करमणुकीचीं साधनें**

गप्पांप्रमाणेच गाणें ऐकणेंहि ह्यांना फार आवडे. वास्तविक ह्यांचीं करमणुकीचीं साधनें म्हणजे दोन. एक नाटकसिनेमा व दुसरें नातवंडें ! यासाठी मात्र हे वेळांत वेळ जरूर काढीत. नातवांसह यथेच्छ क्रीडा करून श्रमपरिहार करीत असत. लहान मुलांना सुखी करून आपल्या सुखांत हे भर घालीत. नातवंडांना सदा आनंदी पाहणें हेंच ह्यांचें खरें समाधान होतें.

## मणी अठरावा

# अखेरचीं तीन वर्षें

आत्मार्थं जीवलोकेऽस्मिन्को न जीवति मानवः ।
परं परोपकारार्थं यो जीवति स जीवति ॥

—सुभाषित

### ह्यांच्या समोरील प्रश्नचिन्ह !

१९४९ च्या उन्हाळयांत आम्ही उटकमंडला गेलों होतों. आमचा तेथील दिनक्रम मोठया मजेंत व आनंदांत चालला होता. सकाळ संध्याकाळ मोकळया हवेंत पांच सहा मैलांची पायीं रपेट व दुपारीं विश्रांति हाच आमचा उद्योग ! ह्यांच्या व्याख्यानाचे कार्यक्रम मात्र तेथेहि अधूनमधून होत असत. या रीतीने आम्ही तेथे एक महिना घालविला. त्यानंतर तेथे असतांनाच ह्यांना दिल्लीवरून बोलावणें आलें. सरकारने लाचलुचपतखोरीच्या केसेस उकरून काढल्या होत्या. त्या चालविण्यासाठी सरकारतर्फे एखाद्या नामांकित वकिलाची गरज होती. त्याबद्दल ह्यांना विचारणा केली. त्या वेळीं ह्यांना मोठा प्रश्न पडला. 'आपण आजवर आरोपींना मुक्त करण्याचेंच कार्य केलें; तेव्हा अशा केसेस घ्याव्या की नाही' हाच तो प्रश्न होता. पण दिल्लींतील मंडळींचा विशेष आग्रह झाल्यामुळे ह्यांना या गोष्टीला सम्मति द्यावी लागली.

ह्यांच्या मनांतहि आताशा दिल्लीला जाऊन सुप्रीम कोर्टात प्रॅक्टिस करावी व तेथेच स्थायिक व्हावें असा विचार घोळत होता. तेव्हा या संधीचा आयताच फायदा मिळेल या उद्देशाने ह्यांनी दिल्लीला जाण्याचें ठरविलें.

## मितर-केस प्रकरण

कलकत्त्यास एस्. सी. मितर नांवाचे एक गृहस्थ 'डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज होते. त्यांच्यावर सरकारने पैसे खाल्ल्याचा आरोप ठेवला होता. आरोपी वजनदार गृहस्थ असल्यामुळे ही केस चालविण्यास कोणीच मोठा वकील धजत नव्हता. अशा परिस्थितींत ह्यांनी ती केस स्वीकारली. दिल्लीला जाऊन केस समजावून घेऊन हे कलकत्त्याला रवाना झाले. ह्यांना तेथे बरेच दिवस राहावें लागणार असल्याने मीहि तावडतोब कलकत्त्याला गेलें.

केस फारच महत्त्वाची व कठिण असून आरोपी सुटून जातो की काय याचीच सरकारला चिंता वाटत होती. पण ह्यांनी आपलें जोरदार 'आर्ग्युमेंट' करून सरकारला यश मिळवून दिलें व आरोपी मितरला सजा झाली. जेव्हा ही केस अपीलमध्ये गेली त्या वेळीं पुन्हा ह्यांना दिल्लीवरून बोलावणें आलें. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे जाणें जमलें नाही.

## अ. भा. वकील परिषद्

मध्यंतरीं (जुलै अखेर) नागपूरला अखिल भारतीय वकील परिषद भरायची होती. हे तिचे स्वागताध्यक्ष होते. त्यामुळे या परिषदेसाठी आम्हांला मधेच कलकत्त्याहून नागपूरला यावें लागलें.

परिषदेच्या अध्यक्षस्थानीं कलकत्त्यांतील सुप्रसिद्ध व माजी हायकोर्ट जज्ज श्री. राधाविनोद पाल यांची निवड करण्यांत आली होती. या वेळीं श्री. पाल यांचा मुक्काम आमच्याकडेच होता. ही



परिषद यशस्वी करण्यासाठी नागपुरांतील बऱ्याच वकील मंडळींचा हातभार लागला होता. अपेक्षेप्रमाणे ती चांगल्या तऱ्हेने पार पडली. या परिषदेनंतर आसाम व ओरिसा या दोन ठिकाणांहून ह्यांना वकील परिषदेचें अध्यक्षपद स्वीकारण्याबद्दल निमंत्रण आलें होतें. पण प्रकृति बिघडल्यामुळे ह्यांना नकार द्यावा लागला.

## पाहुणे मंडळींना मेजवानी

या प्रसंगीं परप्रांतांतून आलेली बरीच पाहुणे मंडळी व स्थानिक वकीलवर्ग यांना परिषदेकडून देण्यांत आलेल्या मेजवानीची सर्व व्यवस्था माझ्याकडे सोपविण्यांत आली होती. त्याप्रमाणे मेजवानींत कोणत्याहि प्रकारचें न्यून दिसूं नये म्हणून मी माझ्यापरी चांगलीच दक्षता घेतली. पण वरुणराजाला हेवा वाटला म्हणून की काय ऐन वेळीं त्याने जोराची वर्षा केली. येथील लॉ कॉलेजच्या इमारतींत या मेजवानीचें आयोजन करण्यांत आलें होतें. मेघराजाच्या अवकृपेमुळे कार्यांत अडथळा येईल की काय अशी मला धास्ती वाटत होती. पण त्याला न जुमानतां एकंदर मेजवानीचा प्रसंग माझ्या नागपुरांतील सुशिक्षित भगिनींच्या बहुमोल सहकार्यानें मी पार पाडूं शकलें.

यानंतर ह्यांच्याकडे एकदोन महत्त्वाचे खटले आल्यामुळे हे त्यांत गढून गेले.

## ह्यांचें कार्यबाहुल्य

ह्यांना कामेंच फार ! व्यवसाय तर होताच. शिवाय राजकारण, सार्वजनिक कार्यें, संशोधनात्मक लिखाण, तसेंच साहित्यविषयक लेखन, या अफाट पसाऱ्यांत हे गढून गेलेले असत. आपलीं मतें लोकांना पटवून देण्यासाठी व आपल्या ज्ञानाचा फायदा त्यांना देण्यासाठी व्याख्यानें देण्याची संधि हे चुकवीत नसत !

## दार कमिशनपुढे साक्ष

भाषावार प्रांतरचनेसाठी नेहरू सरकारने नियुक्त केलेलें दार कमिशन नागपूरला आलें असतां त्याच्यापुढे ह्यांची साक्ष झाली. त्या साक्षींत ह्यांनी आपली संयुक्त महाराष्ट्र व महाविदर्भाची विचारसरणी स्पष्टपणें विशद करून सांगितली होती.

## देशाच्या फाळणीला विरोध

याचप्रमाणे १९४७ मध्ये देशाची फाळणी झाली त्या वेळीं वर्तमानपत्रांतून लेख लिहून ह्यांनी निर्भीडपणे आपला विरोध प्रकट केला होता. हे लेख बरेच लोकप्रिय झाले होते.

## डॉ. खरे यांची ताकीद

अशा धकाधकींत जीवन व्यतीत होत असतांना, वयोमानाप्रमाणे एक दिवस असा आला की, डॉ. खरे यांनी ह्यांना सर्व व्यवसाय सोडून चारसहा महिने पूर्ण विश्रांति घेण्याची सक्त ताकीद दिली. याला कारण म्हणजे वयाच्या ६४ व्या वर्षी १९५० च्या जानेवारी ८ ला ह्यांना पहिला 'हार्ट अटॅक' आला. तोंपर्यंत ह्यांच्या प्रकृतीसंबंधी कोणतीच तक्रार ऐकलेली, माझ्या आजवरच्या सहवासांत मला आठवत नाही. ह्यांची प्रकृति मूळचीच निरोगी व काटक. कितीहि शारीरिक किंवा मानसिक श्रम झाले तरी ह्यांना थकवा म्हणून कधी आला असें माझ्या पहाण्यांत आलें नाही. हे सदोदित आपल्या कामांत गर्कच असत.

## 'विश्रांति ही मला घोर शिक्षाच होय !'

डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे पूर्ण विश्रांति घेणें म्हणजे कांही न करतां स्वस्थ पडून राहणें, ही गोष्ट ह्यांच्या मनाला विशेष तापदायक

वाटली. विश्रांतीविषयी ह्यांची कल्पना निराळी होती. हे म्हणत, 'एका कामाचा कंटाळा आला की तें सोडून दुसरें करूं लागावें. कामांत बदल म्हणजेच विश्रांति होय. लिहिण्याचा कंटाळा आला तर वाचूं लागावें, वाचण्याचा कंटाळा आला की नुसता विचारच करीत स्वस्थ राहावें. एक गात्र थकलें की त्याला विश्रांति देऊन दुसऱ्या अवयवाची क्रिया सुरू करावी. त्यांत विश्रांति आपोआपच मिळते. यामुळे विश्रांतीची विश्रांति मिळते, शिवाय कार्यतत्परता टिकून राहते.' अशा आचरणाची सवय असल्यामुळे डॉक्टरांच्या ताकिदीचा ह्यांना बराच ताप होऊं लागला. त्यामुळे, 'कांही दुखत खुपत नसतांना, नुसतें पडून राहणें ही एक मला घोर शिक्षाच आहे' असें हे म्हणूं लागले.

## स्वावलंबी जीवन

आणि हें साहजिकच होतें. ज्यांना आजवर आयुष्यांत दुसऱ्यावर अवलंबून राहण्याचा प्रसंग कधीच आला नाही, त्यांना ही एक प्रकारची शिक्षाच होती. वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच हे स्वावलंबनाचें जीवन जगले होते. दुसऱ्याचा पैसा अथवा कष्ट आपल्या कारणीं लागणें ह्यांना काट्याप्रमाणे सलत असे. दुसऱ्याकडूनच काय पण स्वतःच्या मुलांकडूनहि मदत घेणें ह्यांच्या जिवावर येई. प्रसंगीं मुलाने ह्यांच्यासाठी खर्च केला तर त्याची भरपाई हे दुपटीने करीत असत. हे नेहमी म्हणत की, 'मुलांच्या कमाईवर जगण्याची वेळ देवाने माझ्यावर आणूं नये.' ह्यांच्या इच्छेप्रमाणेच झालें. शेवटपर्यंत ह्यांच्या देहाला कोणाचा पैसा अथवा कष्ट यांची गरज पडली नाही.

## हवापालट करण्यासाठी मुंबईंत

डॉक्टरांनी विश्रांति घेण्याची व हवापालट करण्याची जी सूचना केली होती तिला अनुसरून उन्हाळ्यांत आम्ही आमचा

मुलगा वसंत याजकडे मुंबईला गेलों. तेथे त्याने ह्यांची सर्व तऱ्हेने उत्तम व्यवस्था ठेवली होती. तसेंच सूनबाई सौ. सुरेखा हिनेहि पथ्यपाण्याची विशेष काळजी घेतली. त्यामुळे ह्यांना तेथे बराच आराम वाटूं लागला. पुढे उन्हाळा संपल्यानंतर आम्ही नागपूरला परत आलों. आता ह्यांच्या प्रकृतींत बरीच सुधारणा झाली होती.

## सहा महिन्यांचा कठीण काळ

डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे विश्रांतीचे हे सहा महिने ह्यांना फारच कठीण गेले. नागपूरला आल्यावर हे डॉक्टरांना म्हणाले, 'आता तरी मला कोर्टांत जाण्याची परवानगी द्या. घरांत बसून रिकाम्या मनांत नसत्या शंकाकुशंकांचें वादळ निर्माण होऊन त्याचा परिणाम प्रकृतीवर मात्र होतो. त्यापेक्षा मी कोर्टांत जाऊन बसत जाईन.'

ह्यांच्या मनावर या विश्रांतीचें विलक्षण दडपण पडलें होतें. डॉक्टरांनी ह्यांच्या मनांतील हा भाव ओळखून ह्यांना कोर्टांत जाऊन बसण्याची परवानगी दिली.

## कोर्टांत दिसले नि पक्षकार जमले

हे कोर्टांत जाऊन बसूं लागले आहेत असें लोकांना दिसून येतांच पक्षकार लोक ह्यांच्या भोवतीं जमूं लागले. कांही महत्त्वाच्या खुनाच्या केसेस घेण्याविषयी त्यांच्याकडून विनवणी होऊं लागली. त्यांच्या विनवणीचा अनादर ह्यांना करवेना. याखेरीज अशा केसेस-मध्ये आपलें प्राविण्य दाखविण्याचीहि ह्यांना इच्छा असेच. त्यामुळे प्रकृतीचें अस्वास्थ्य असतांनाहि ह्यांनी अलाहाबाद, छिंदवाडा, वर्धा, नागपूर वगैरे ठिकाणीं मुकदमे चालवून त्यांत पक्षकारांना यश मिळवून दिलें.

प्रकृति तितकीशी चांगली नसल्यामुळे कोर्ट ह्यांचा मान ठेवून खुर्चीवर बसूनच ह्यांच्याकडून काम करवून घेई व तासाचें काम अर्ध्या तासांतच आटोपून घेण्याची सहृदयता प्रगट करी. तरी श्रमांचा परिणाम ह्यांच्या प्रकृतीवर व्हायचाच ! असें असतांहि हे आपलें काम धडाडीने करीत असत; प्रकृतीबद्दल बेफिकीरीच दाखवावयाचे.

## छिंदवाड्याची खुनाची केस

१९५० च्या ऑगस्टमध्ये एका जमीनदारावरील खुनाची केस चालविण्यास हे छिंदवाड्याला गेले होते. त्या वेळीं परगावीं जाण्याजोगी ह्यांची प्रकृति नव्हती. तथापि लोकांचा आग्रह असा की, 'केदार साहेबांनीच ही केस चालवावी.' खुनाच्या कित्येक केसेस चालवून आरोपींना सहीसलामत सोडविण्याचें कसब ह्यांच्या ठिकाणीं आहे याचा प्रत्यय लोकांना अनेकवार येऊन चुकला होता. शिवाय, खुनासारखी महत्त्वाची केस असली म्हणजे ह्यांनाहि नवा जोम येत असे. ह्यांनी प्रकृतीची तितकीशी पर्वा न करतां ही केस चालविली व आरोपी दोषमुक्त झाला.

## 'या गृहस्थांचें काय काम असावें?'

या केसच्या वेळीं ह्यांच्या प्रकृतीच्या नादुरुस्तीमुळे मलाहि ह्यांच्याबरोबर जावें लागलें. ते दिवस गणेशोत्सवाचे होते. आम्ही छिंदवाड्याला पोहोचलों, व मोटारमधून उतरून सर्किट हाउसच्या आंत जात नाही तोंच एक गृहस्थ ह्यांना भेटायला आल्याचें दिसलें. हे आंत गेले होते आणि मी बाहेरच उभी होतें. त्या गृहस्थांचें काय काम असावें हें जाणून घेण्याची मला इच्छा झाली. मी त्यांना तसा प्रश्न केला. तेव्हा 'आपण केदार साहेबांना आमच्या गणेशोत्सवांत व्याख्यानाचें आमंत्रण करावयाला आलों आहोंत' असें त्या गृहस्थांनी

सांगितलें. ह्यांची प्रकृति काळजी करण्यासारखीच असल्याने मी त्या गृहस्थांना परभारेंच घाईघाईने सांगून टाकलें की, 'साहेबांची प्रकृति सध्या बरी नाही. व्याख्यान देण्याच्या स्थितींत ते नाहीत. डॉक्टरांनी त्यांना व्याख्यान देण्याची सक्त मनाई केली आहे. त्याकरतां आपण त्यांना आग्रह करूं नये.' असें सांगून त्या गृहस्थाची मी एकदाची कशी तरी बोळवण केली.

## ह्यांना 'नाही' म्हणवेना !

पण जें व्हायला नको तेंच झालें. ह्यांची व त्या गृहस्थांची गाठ पडूं नये अशी माझी इच्छा होती. परंतु लोकांनी ह्यांना कचेरींतच गाठून व्याख्यान देण्याची गळ घातली. ह्यांना नाही म्हणवेना. अखेर काय, ह्यांनी आमंत्रण स्वीकारलेंच ! या गोष्टीची मला गंधवार्ताहि नव्हती. संध्याकाळीं बाहेर जाण्याची तयारी चालू असतांना मी विचारलें तेव्हा कळलें की हे व्याख्यानाला जाणार. मलाहि चलण्याविषयी हे म्हणूं लागले. मी ह्यांना म्हणालें 'मी तर तुमच्या व्याख्यानाबद्दल नकार दिला होता आणि तुम्ही कबूल झालांत ! डॉक्टरांनी मनाई केली असतां, व्याख्यानाच्या भानगडींत कां पडतां ?' तेव्हा हे म्हणाले, 'अग, लोक फार आग्रह करतात, नाही म्हणवत नाही. फार वेळ बोलणार नाही. फार फार तर दहा एक मिनिटांतच आटोपून घेतों !'

## व्याख्यान संपण्याचें चिन्ह दिसेना

भाषणाला सुरवात झाली. दहा, वीस, तीस मिनिटें होऊन गेलीं. ह्यांचीं दहा मिनिटें आहेत तरी कोणतीं हेंच मला समजेना ! दहा मिनिटांच्या जागीं तब्बल एक तास होऊन गेला तरी व्याख्यान संपण्याचें चिन्ह दिसेना. इकडे माझा जीव कासावीस होऊं लागला.

जास्त बोलण्याने चक्कर वगैरे येईल की काय अशी धास्ती वाटायला लागली मी इकडे अस्वस्थ होतें आणि तिकडे सारा श्रोतृवर्ग ह्यांच्या भाषणावर आनंदाने डुलत होता. वाक्यागणिक टाळ्यावर टाळ्या पडत होत्या. त्या टाळ्यांच्या निनादाने सारें सभागृह दुमदुमून गेलें होतें.

## 'जिव्हा हें माझें शस्त्र होय!'

ह्यांची बोलण्याची शैलीच मोठी विलोभनीय असे. विचारपरिप्लुत भाषा आणि श्रुतिमनोहर शब्दरचना यांमुळे सुजाण आणि अजाण या दोन्ही थरांतल्या श्रोत्यांना ह्यांचें भाषण सारखेंच प्रिय वाटत असे. प्रतिपाद्य विषयाशीं ह्यांचें स्वभावतःच तादात्म्य होत असल्यामुळे इतरांना तल्लीन करण्याचें सामर्थ्य ह्यांच्या वाणींत होतें असेंच म्हटलें पाहिजे. ह्यांचें प्रत्येक भाषण ऐकणाऱ्याच्या मनाची विलक्षण पकड घेत असे. एकदा वर्धेला ह्यांचें भाषण झालें होतें. तेंहि दोन अडीच तास लांबलें होतें. तेव्हा तेथील श्रीमती जानकीबाई बजाज ह्यांना म्हणाल्या, 'दादा, तुम्ही फार बोलतां!' त्यावर हे म्हणाले, 'जिव्हा हें माझें शस्त्र होय. या शस्त्रास जितकें चालवावें तितकें तें अधिक धारदार बनतें. कोणी माझें सर्वस्व हिरावून घेईल, पण माझी वाणी हिरावून घेण्याचें सामर्थ्य कोणांतच नाही!'

## 'माझी बायको रागावेल अशी भीति वाटते'

त्या दिवशींच्या व्याख्यानाचा विषय गंभीर होता. तरी पण मधून मधून विनोदी प्रसंग आणून हे लोकांमध्ये हास्याचे फवारे उडवीत होते. दीडदोन तासपर्यंत लांबलेलें हें भाषण शेवटपर्यंत श्रोते सावधानपूर्वक ऐकतील इतकें लज्जतदार होऊं लागलें. आता आणखी हे किती वेळ असे बोलत राहणार याचीच मला भीति वाटूं लागली. माझ्या मनाची तगमग होऊं लागली. वेळेची सूचना द्यावी की काय असा विचारहि माझ्या मनांत आला. पण लोक म्हणतील, 'ही बाई

नवऱ्यावर फार बंधन घालते' असें वाटून जागच्या जागींच चुळबूळ करीत मी स्वस्थ बसून राहिलें. इतक्यांत ह्यांचें लक्ष माझ्याकडे गेलें. माझी ही मनोव्यथा ह्यांना कळली असावी असें वाटलें. हे एकदम स्मित करून म्हणाले, 'मी इतका वेळ सारखा बोलत आहें याबद्दल माझी बायको रागावेल की काय अशी मला आता भीति वाटते.' असे उद्गार ह्यांच्या तोंडून बाहेर पडतात न पडतात तोंच हास्याचा प्रचंड कल्लोळ उठला. पण इतकें होऊन तरी ह्यांनी आपलें भाषण संपविलें काय? छे! तें पुन्हा तसेंच चालू राहिलें.

हें व्याख्यान खरोखरच फार उत्तम झालें होतें. प्रथम उत्सवाचें महत्त्व, त्यांतील व्याख्यानांच्या विषयाची निवड व त्यासाठी विषय-पारंगत अशा वक्त्यांची योजना यांविषयी प्रास्ताविक माहिती देऊन व नेहमीप्रमाणे चालू राजकारणावर टीका करून हे आपल्या मूळ विषयाकडे वळले. 'आर्यांचें मूळ वसतिस्थान' हा ह्यांच्या या व्याख्यानाचा विषय होता. हें ह्यांचें शेवटचें व्याख्यान होय.

### 'माझ्या प्रकृतीचा उगीच बाऊ करतेस!'

छिंदवाड्याहून नागपूरला आल्यावर लगेच एका फौजदारी केसकरता ह्यांनी अलाहाबादला जाण्याची तयारी केली. 'प्रकृति अस्वस्थ असतांना इतकी मेहनत करणें बरें नाहीं' असें म्हणून मी ह्यांना विरोध दार्खावला. पण हे माझें ऐकायला थोडेच तयार! माझें बोलणें तर ह्यांना पटलेच नाही. उलट ह्यांचें म्हणणें पडलें की, 'माझी प्रकृति वास्तविक तितकीशी खराब नाही. घरीं बसून राहिल्यानेच मात्र ती बिघडण्याचा संभव अधिक! माझ्या प्रकृतीचा तूं उगीच बाऊ करून ठेवला आहेस.' असें बोलून ह्यांनी आपला अलाहाबादला जाण्याचा निश्चय कायम केलाच!

## 'फॅमिली डॉक्टर तरी बरोबर घेऊं या!'

अलाहाबादला बरेच दिवस राहावें लागणार असल्यामुळे 'निदान येथून आपण आपले फॅमिली डॉक्टर श्री. दत्तोपंत प्रधान यांना तरी बरोबर घेऊं' असें मी म्हणालें. या गोष्टीला ह्यांनी मान्यता दर्शविली. हे म्हणाले, 'डॉक्टरांना तर बरोबर घेच, शिवाय त्यांच्या कुटुंबालाहि बरोबर घे. म्हणजे तेथे जोडप्याने तीर्थयात्रा करण्याचें श्रेय त्यांना मिळेल आणि वेणीदान वगैरे करतां येईल.' त्याप्रमाणे डॉ. प्रधान, त्यांचें कुटुंब, आमची मधली सून सौ. शैला व छोटा नातू विनोद इतकी मंडळी मोटारने अलाहाबादला गेलों. तेथे गेल्यावर हे मला म्हणाले, 'तूं डॉक्टरांना आणलें आहेसच, तेव्हा तुम्ही सर्व लोक येथील सगळीं प्रेक्षणीय स्थळें पाहून येत चला.' याप्रमाणे आम्ही सर्व स्थळें पाहिलीं. बनारसला जाऊन विश्वेश्वराचें दर्शनहि घेऊन आलों. स्वतः मात्र केसमध्ये पूर्णपणें गुंतले होते. ही केस एका राजकुमारीवर तिने आपल्या नवऱ्याचा खून केल्याबद्दलची होती. त्या बाईच्या बचावाबद्दल ह्यांनी बरीच मेहनत घेऊन ती केस कोर्टासमोर यशस्वीपणे मांडली.

## लिमसे वकिलाची केस

नंतर अशाच प्रकारची नागपुरांतील लिमसे वकील यांच्या-वरील खुनाची केस ह्यांनी नागपुरांत लढविली. या केसला बरेंच महत्त्व आलें होतें. सेशन कोर्टांत आरोपीला फाशीची शिक्षा होऊन त्याने हायकोर्टांत अपील केलें होतें. त्या संबंधीचें ह्यांचें 'आर्ग्युमेंट' ऐकण्यास कोर्टांत चिकार गर्दी झाली होती. केसविषयी ज्याला त्याला मोठेंच कुतूहल वाटत होतें. अशा प्रकारची ही बिकट केस उत्कृष्टपणें 'आर्ग्यु' करून आरोपीची बाजू ह्यांनी बिनतोड मांडली आणि त्याची अखेर फासावरून मुक्तता केली.

## ह्याचा मला अभिमान वाटतो

या केसमधला आरोपी सहीसलामत–निर्दोष–सुटणें म्हणजे एक आश्चर्यच होतें. प्रतिपक्षाचे पुरावे जय्यत असूनहि ह्यांनी आरोपीचा बचाव केला. या कामगिरीचा साऱ्या लोकांवर प्रभाव पडला. हे म्हणायचे, 'माझ्या आजवरच्या ४० वर्षांच्या आयुष्यांत एकहि आरोपी माझ्या हाताने फासावर लटकला नाही, याचा मला मोठा अभिमान वाटतो.' आम्हां कुटुंबीय लोकांनाहि याविषयी अभिमान वाटणें साहजिकच आहे!

## पुन्हा एकवार दिल्लीकडे

अशा प्रकारच्या केसेस चालवीत असतांना ह्यांना आपल्या प्रकृतीविषयी आता विश्वास वाटूं लागला. 'आता दिल्लीच्या राहिलेल्या केसेस चालूं करण्यास कांहीच हरकत नाही' असें हे म्हणायचे सुद्धा. त्या वेळीं डिसेंबरचा महिना होता. दिल्लीला तर खूपच कडाक्याची थंडी असते. अर्थातच मी त्यांना दिल्लीला जाण्याचे विचार मनांतून काढून टाकण्याविषयी म्हटलें. तुमच्या सध्याच्या नाजुक प्रकृतीला तेथील थंडी मानवणार नाही, तेव्हा प्रकृतिशीं वैर करणें चांगलें नव्हे, असें मी परोपरीने ह्यांना विनविलें. पण ह्यांचा आत्मविश्वास मोठा दांडगा! उत्साह तरी केवढा म्हणून सांगावा! त्यापुढे माझा विरोध तुच्छ ठरला. ह्यांनी अखेर दिल्लीला जाण्याचं निश्चित केलेंच! त्याप्रमाणे आम्ही तेथे गेलों. आम्ही तेथे नागपूरचे एक वरिष्ठ पोलिस अधिकारी श्री. नानासाहेब बंबावाले यांच्याकडे उतरलों होतों. तेथे त्यांनी आमची अगदी घरच्याप्रमाणे व्यवस्था ठेवली होती.

## फिरून 'हार्ट अटॅक'

दिल्लीला गेल्यावर हे आपल्या नियोजित कार्यांत इतके गढून गेले की, ह्यांना आपल्या प्रकृतीची फिकीरच राहिली नाही. नेहमीच्या

सवयीप्रमाणें एकसारखे आठआठ तास काम करणें सुरू झालें. केसेस होत्याच तशा किचकट व गुंतागुंतीच्या! या केसेस ह्यांच्या प्रकृतीच्या कारणामुळे सरकारकडून मुद्दामच रहित करण्यांत आल्या होत्या. पण ह्यांची प्रकृति थोडीफार दुरुस्त होतांच त्या पुन्हा सुरू करण्यांत आल्या. या प्रकरणीं आरोपींना शिक्षा होऊं नये असाच कदाचित् ईश्वरी संकेत असावा असें मला वाटूं लागलें. कारण दिल्लीला गेल्याच्या चौथ्याच दिवशीं ह्यांना 'हार्ट अॅटॅक' आला. अर्थातच सर्व काम तसेंच थांबवून ह्यांना लागलीच नागपूरला आणलें. त्या प्रसंगीं दिल्लीचे एक बडे पोलिस अधिकारी बोलूनहि गेले की, 'आम्ही एवढ्या प्रयासाने या केसेस घडवून आणल्या, पण केदार-साहेबांची प्रकृति ऐन वेळीं बिघडली हें आमचें दुर्दैवच! आरोपींचें मात्र सुदैव, यांत कांहीं शंका नाही!' नागपूरला आल्यावर डॉ. खरे हे ह्यांना उपचार करूं लागले. त्याचा थोडा इष्ट परिणामहि दिसूं लागला. पण ह्यांचा आत्मविश्वास मात्र आता डळमळूं लागला होता.

### विलक्षण आशावादी

मनुष्य आशेवर जगतो हें वचन ह्यांच्या एकूण आयुष्यांत फारच चांगल्या रीतीने माझ्या प्रत्ययास आलें होतें. आपल्या सबंध जीवनाला आशावाद हा फारच पोषक झाला, असे उद्‌गार हे नेहमीच काढीत. याच आशावादाने ह्यांनी आपलें एकूण कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय जीवन विकसित केलें होतें व अशा रीतीने आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा या प्रत्येक क्षेत्रांत हे उमटवीत होते. लहानपणापासून आपल्या कणाकणांत आशावाद बाळगणारे हे आतांशा एकदोन महिन्यांत मात्र निराशेचे उद्गार काढीत असत. ते ऐकून माझें मन कळवळून जिवाचा थरकाप होत असे व डोळ्यांत आलेले आंसू मोठ्या कष्टाने मीं परतवीत असें. हा बदल

माझ्या लक्षांत येण्यास उशीर लागला नाही. मीहि आशावादीच; परंतु माझ्या आशावादापेक्षा ह्यांचा निराशावादच अधिक प्रभावी ठरला.

## समारोप

जन्मदिनापासूनचा ह्यांचा जीवनवृत्तांत माझ्या अल्प शक्तीनुसार लेखणीला गति देत देत मी शेवटच्या दिवसापर्यंत आणून ठेवला आहे. त्यांत ह्यांचें व्यक्तिमत्व व त्याचा विकास कसा होत गेला हें ह्यांच्या आयुष्यांतील अनेक प्रसंग व अनेक आठवणी यांच्या द्वारें मी यथामति दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. या दिवसापर्यंत ह्यांची सहचारिणी म्हणून मोठ्या अभिमानाने व डौलाने मी मिरवलें. आमचा हा ४० वर्षांचा मंगलमय सहवास हें माझें 'सुवर्ण युग' होय. माझें हें 'सुवर्ण युग' ता. १४ मार्च १९५१ रोजीं संपलें. नेहमीं आपल्या जीवनाचीं गूढ प्रमेयें उकलण्यासाठी हे आपल्या मनाची एकाग्रता जेथे साधीत त्या स्नानगृहांत स्नान करतांना नित्याच्या शंकराच्या स्तुतींतच ह्यांनी आपली ज्योत श्रीशंकराच्या ज्योतींत विलीन केली !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७७८६
समास
REFBK-0007786